

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ-भाद्रपद १९३५
जुलै-सप्टेंबर २०१३/खंड ३७ अंक २

## जागतिकीकरण विशेषांक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर आषाढ-भाद्रपद १९३५
जुलै-सप्टेंबर २०१३/खंड ३७ अंक २

## जागतिकीकरण विशेषांक

International Research Journal
ISSN 0973-8452
Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**
अविनाश रामलाल निकम

**सल्लागार मंडळ**
(२०१२-१५)
प्रशांत काटोले
अशोक खाचणे
राहुल म्होपरे
अशोक हळ्ळी

**सहाय्यक संपादक**
शंकर सुदामराव पवार

**संपादकीय पत्रव्यवहार**
**डॉ.अविनाश निकम**
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५४०९,जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

**(लेखातील मते लेखकांचीच)**

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१३-१४**

**अध्यक्ष**

जगन्नाथ शामराव पाटील (सातारा)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

मधुकर शिंदे (इस्लामपूर)
सूर्यकांत जगदाळे (उस्मानाबाद)
मुक्ता जहागिरदार (अमरावती)

**सदस्य**

श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
रामकृष्ण टाले (नागपूर)
तुकाराम मुंडे (मानवत)
तुकाराम बारबोले (उस्मानाबाद)
राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
बालाजी शिंदे (परभणी)
वामन सावंत (रत्नागिरी)
वनिता चौरे (चांदूरबाजार)

**अक्षर रचना**- सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
**मुद्रणालय**- सातपुडा ऑफसेट, जळगाव.

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
दूरध्वनी: ०२१८४-२२४२१४,
भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६

**वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१२-१३ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक **अर्थसंवाद**

## जागतिकीकरण विशेषांक

## अनुक्रमणिका


**अविनाश निकम**, शहादा. संपादकीय संवाद ........ १०९

**श्रीराम जोशी, जळगाव; तुषार महाजन, अमेरिका**. आर्थिक सुधारणा-शहरीकरण ........ ११०

**राहूल म्होपरे, अर्जुननगर**. जागतिकीकरणानंतर शहरीकरण- दशा व दिशा ........ ११४

**तानाजी गिते, पुणे**. जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम ........ ११८

**तेजस्विनी मुडेकर, कोल्हापूर**. किरकोळ व्यापार क्षेत्रातील गुंतवणुकीचा परिणाम ........ १२२

**साधना पाटील, ओझर(मिग)**. अन्नप्रक्रिया उद्योग आणि परकीय गुंतवणूक ........ १२७

**पी. ई. विभुते, नांदेड**. विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम ........ १३१

**प्रज्ञा बागडे, नागपूर**. जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर परिणाम ........ १३५

**सुरेश जगताप, अमरावती**. जागतिकीकरणाचे कृषि व ग्रामीण विकासावर परिणाम ........ १३९

**आर.बी.भांडवलकर, यवतमाळ**. किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशी गुंतवणूक ........ १४३

**भागचंद्र खुरुद, राहूरी**. प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक: भारतीय किरकोळ क्षेत्र ........ १४८

**मोहन चौधरी, पुणे**. रुपयाचे अवमूल्यन-कारणे, परिणाम व उपाय ........ १५२

**ए. के. पाटील, कराड**. जागतिकीकरण व ग्रामीण विकास ........ १५६

**राजू शिंदे, देवपूर**. जागतिकीकरणाचा पर्यटन क्षेत्रावर परिणाम ........ १६०

**शिवाजी काकडे, गढी, दिनकर टकले, परतूर**. संगणक आज्ञावली उद्योग-निर्यात कामगिरी ........ १६४

**माधुरी लेले, नागपूर**. किरकोळ क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक धोरण ........ १६८

**विजयकुमार पाटील, आटपाडी**. जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम ........ १७२

**एस.बी.कटमुसरे, कुही**. शेतमालाचा हमीभाव आणि मुक्त अर्थव्यवस्था ........ १७६

**निता यादव, संतोष यादव, कोल्हापूर**. आर्थिक सुधारणांचा खर्चावरील परिणाम ........ १८०

**हिरालाल चव्हाण, जळगाव; राजेंद्रकुमार गव्हाळे, खामगाव**. जागतिकीकरणाचे परिणाम ........ १८४

**पी.बी.शिंदे, सिध्देश्वर भोसले, कुर्डूवाडी**. जागतिकीकरण आणि भारतातील सेवाक्षेत्र ........ १८८

**आर.जी.टाले, खापरखेडा**. भारतातील किंमतवाढीचे चिकित्सक अध्ययन ........ १९२

**विकास सुकाळे, नांदेड; सागर कोंडेकर, लातूर**. शहरीकरणातील भारताचे स्थान ........ १९६

**राजकुमार वाडंगडे, अर्जुननगर; विद्या म्होपरे, कोल्हापूर**. जागतिकीकरण व महिला ........ २०१

**भगवान महाजन, मुक्ताईनगर**. परकिय गुंतवणुकीचा किरकोळ विक्री क्षेत्रावर परिणाम ........ २०५

**बाजीराव इंगवले, वैभववाडी**. आजचे जागतिकीकरण-वित्तीय जागतिकीकरण ........ २०९

**धेडे डी. आर., वारणानगर**. विदेशी गुंतवणुकीमुळे आर्थिक सुधारणा ........ २१३

**एन.एल.चव्हाण, फैजपूर**. जागतिकीकरणाचा बाह्यक्षेत्रावर परिणाम ........ २१७

**डी.आर.बच्छाव, नाशिक**. ब्रिक्स संघटना आणि विकास ........ २२१

**ज.फा.पाटील, कोल्हापूर**. अर्थ शब्दांची वाट पाहे: वर्तनार्थशास्त्र ........ २२५

# संपादकीय संवाद...

## जागतिकीकरणाच्या निमित्ताने...

एखाद्या राष्ट्रास निसर्गानं २०-२२ वर्षं भरभरून देतच रहावं - हवं तितकं पर्जन्य, हवा तसा सूर्यप्रकाश, गगनाला भिडणारी शिखरं, शेतीयोग्य मुबलक जमीन, खनिज संपत्तीची विपुलता....विस्तीर्ण समुद्र किनारा.... अफाट वनसंपत्ती.... सारं काही मुक्तहस्तानं. अन् घोंघावणारं मोठं वादळ अचानक समुद्र मार्गानं त्या देशाच्या विस्तीर्ण किनाऱ्यावर येऊन धडकावं....त्सुनामी लाटांनी हाहाकार माजवावा...हळू-हळू या वादळानं पुढं सरकत एक-एक राज्य मनमानी दाखवत उद्ध्वस्त करावं, असंच काहीसं जागतिकीकरणाचं झालंय्. जागतिकीकरण जवळपास सर्वच राष्ट्रांना हवंय्, विकसित देशातील उपभोगवादी संस्कृती हवीहवीशी वाटतेय्....विदेशातील आकर्षक वस्तू-सेवा हव्या आहेत, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी बाजारात आणलेल्या ऐषारामाच्या वस्तू हव्या आहेत, विदेशी पिझ्झा-बर्गर कोल्ड्रिंक्स्सह हवे आहे...मॉल संस्कृतीचं स्वागत तर मनापासून केलच आहे.... भरपूर विदेशी भांडवल अनेकांना हवंय्. शेअर बाजार - अर्थव्यवस्थेत उत्साह संचारलेलं वातावरण हवं आहे. हा उत्साह शिगेला जाऊन तेजीच्या शिखरावर अर्थव्यवस्था पोहोचली तरी कुणाची हरकत नाही. मात्र त्या वादळाप्रमाणे येणारा मंदीचा तडाखा आम्हाला नकोसा वाटतो आहे. बघता-बघता भारताला जागतिकीकरण स्वीकारून २२ वर्षेपूर्ण झाले असून त्याचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम आता स्पष्टपणे जाणवू लागले आहेत. भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेला नव्या मुक्त आर्थिक प्रवाहात विकासाची विपुल संधी उपलब्ध आहे. जागतिकीकरणातून 'बाजाराधिष्ठीत' आर्थिक व्यवहारास उत्तेजन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता अन् विकासदर पूर्ववत करण्याचा देखील प्रयत्न आहे. मंदी, रुपयाची घसरण, महागाईच्या या काळातही कोणत्या क्षेत्रानं आश्चर्यकारकरित्या प्रगती केली आहे? जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचं नेमकं स्थान कोणतं? जागतिकीकरणानंतर भारतातील शहरीकरणानं नेमका किती वेग साधला आहे? ग्रामीण क्षेत्र, बँकींग क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, किरकोळ व्यापार क्षेत्र यासह विविध क्षेत्रांवर कोणते परिणाम झाले आहेत? या परिणामांची वास्तवता आहे तरी काय? या बाबत 'खूप काही' देण्याचा प्रयत्न आपल्या लेखकांनी नेहमीप्रमाणे या अंकातही केला आहे.

जागतिकीकरण विशेषांकासाठी लेखकांनी मोठ्या संख्येने शोधनिबंध पाठवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्वच शोधनिबंधांचा समावेश करण्याची इच्छा असून देखील जागेअभावी या अंकात समावेश करता आला नाही, हे नम्रपणे सांगू इच्छितो. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी सलग पाचव्यांदा अर्थसंवादसाठी जाहिरात उपलब्ध करून दिली. स्थानिक कार्यवाह डॉ.वनिता चोरे यांनी जाहिरात पाठवली. आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार. अर्थसंवाद विशेषांकास वाचक मनापासून स्वीकारतील, अशी अपेक्षा आहे.

- अविनाश रामलाल निकम, प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# आर्थिक सुधारणा कालावधीत शहरीकरणाची अवस्था

**श्रीराम देविदास जोशी**, जळगाव,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
मूळजी जेठा महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२१००८७७६.

**तुषार भागवत महाजन**, अमेरिका,
८२०१, कमिनोमिडिया, प्लॉट नं.७१,
कॅलिफोर्निया, बेकर्स फिल्ड,
भ्रमणध्वनी: ००१२०१७७९७५७७.

भारताच्या आर्थिक इतिहासात अनेक महत्त्वाची वर्षे होऊन गेली, परंतु भारताच्या आर्थिक इतिहासाचा विचार केला तर १९९१ हे वर्ष निश्चितच एक महत्त्वपूर्ण वर्ष आहे. १९९१ च्या आर्थिक सुधारणांमध्ये औद्योगिक व व्यापारातील उदारीकरण वित्तीय क्षेत्रातील नियंत्रणे शिथील झाली. खासगीकरणासाठी व थेट विदेशी गुंतवणुकीसाठी आवश्यक असणारी धोरणे बदलली गेली. भारतात जागतिकीकरणामुळे सॉफ्टवेअर आणि आऊट सोर्सिंग उद्योगाचा उदय हा एक महत्त्वाचा दृश्य परिणाम आहे, यामुळे आधुनिक माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, मनोरंजन तंत्रज्ञान यांच्या विकासाला प्रेरणा मिळाली. या सर्व आर्थिक सुधारणांचा परिणाम म्हणजे भारतातील महत्त्वाची शहरे या सुधारणांची केंद्रबिंदू ठरली.

भारत सरकारच्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणामुळे आणि वास्तव मालमत्ता (Real Estate) थेट विदेशी गुंतवणूकीला खुले केल्यामुळे मोठ्या खाजगी शहरी वसाहती विकसित होण्याला चालना मिळाली. या वसाहती एकात्मिक/अनिवासी भारतीय किंवा हायटेक वसाहती म्हणून ओळखल्या जातात. या वसाहती मुंबई, पुणे, दिल्ली, गुरगाव, चेन्नई, हैद्राबाद, अहमदाबाद, बेंगलोर या महानगरांचा परिसरात उदयाला आल्या. वेगाने होणाऱ्या शहरीकरणात १९९१ मध्ये दहा लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरांची संख्या २३ होती. ती २००१ मध्ये ३५ पर्यंत वाढली. या शहरीकरणाचे अनेक गंभीर परिणाम दिसून येतात.

प्रस्तुत लेखामध्ये उदारीकरणानंतर शहरांचा झालेला विकास त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी दुय्यम तथ्यांचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रमुख्याने जनगणनेचे अहवाल, नियोजन मंडळाची आकडेवारी, वार्षिक अहवाल, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रातील लेख, इंटरनेटवर आधारित

माहिती इत्यादींचा उपयोग केला आहे.

**रोजगार निर्मितीची स्थिती:**

भारतातील शहरे नवीन आर्थिक वास्तवतेला सामोरे जाण्यास सज्ज झाली आहेत. शहरातील आर्थिक विकास प्रक्रिया औद्योगिक उपक्रमाकडून ज्ञानाधिष्ठीत उपक्रमाकडे संक्रमित होत आहे. एका अभ्यासानुसार शहरी भागातील श्रमशक्ती १९८३ मध्ये ५७.१५ दशलक्ष होती. ती १९९३-९४ मध्ये ८०.६ दशलक्ष झाली तर १९९८-९९ मध्ये ९२.९५ दशलक्षापर्यंत त्यात वाढ झाली. शहरी श्रमाच्या उत्पादकतेचे ग्रामीण श्रमाच्या उत्पादकतेशी असलेले गुणोत्तर १९८०-८१ मध्ये २-३२ होते, ते १९९३-९४ मध्ये २-३४ झाले तर १९९९-२००० मध्ये हे गुणोत्तर २-८३ इतके होते. याशिवाय शहरातील श्रमिकांचा वृध्दीदर १९९३-९४ मध्ये २.२६ % होता तो १९९९-२००० मध्ये ८.३८ % इतका वाढला.

१९९१ नंतरच्या कालावधीत संघटीत क्षेत्रातील रोजगार निर्मितीचा वृध्दी दरामध्ये संथगतीने वाढ होत आहे. १९८३-९३ या दशकात रोजगार निर्मितीचा वार्षिक सरासरी वृध्दी दर २.०४ % होता. १९९३ नंतरच्या काळात हा वृध्दी दर १ % च्या आसपास आहे. जागतिक पातळीवरील रोजगार निर्मितीच्या प्रवृत्ती प्रमाणेच भारतात देखील एकुण रोजगार निर्मिती पैकी ७५ % रोजगार सेवा क्षेत्रात निर्माण झाला आहे. याच कालावधीत प्राथमिक क्षेत्रातील रोजगार निर्मिती २३ % पर्यंत घटली आहे.

**लोकसंख्येतील बदल:**

भारताची एकुण लोकसंख्या १९०१ मध्ये २३.८४ कोटी, २००१ मध्ये १०२.९ कोटी झाली तर २०११ मध्ये ती १२९ कोटी पर्यंत वाढली. याच कालावधीत शहरी लोकसंख्या १९०१ मध्ये २.५८ कोटी पासून २००१ मध्ये २८.६ कोटी पर्यंत तर २०११ मध्ये ३७.७ कोटी पर्यंत वाढली आहे. शहरी लोकसंख्येचा वृध्दीदर १९९१-२००१ या दशकात ३१.५ % होता. तो २००१-२०११ या दशकात ३१.८ % पर्यंत वाढला. शहरी लोकसंख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होण्यामागे ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर, लोकसंख्येतील नैसर्गिक वाढ आणि शहरामध्ये आजुबाजुच्या गावांचा समावेश होणे ही कारणे आहे. शहरात रोजगाराच्या संधी असल्यामुळे स्थलांतरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. एक लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरातील लोकसंख्या १९९१ मध्ये ६५ % होती ती २००१ मध्ये ६९ % पर्यंत वाढली.

शहरीकरणाच्या प्रवृत्तीचा आढावा घेतला असता १९०१ मध्ये भारतात १०.८४ % शहरीकरण होते. म्हणजेच १०.८४ % शहरी लोकसंख्या होती. हेच प्रमाण २००१ मध्ये २७.८०% पर्यंत वाढले. २०११ मध्ये ३१.१६ % शहरीकरण भारतात झाले आहे. साधारणत: तीन पट शहरीकरण झाले. नियोजन आयोगाच्या अंदाजानुसार शहरी लोकसंख्या सन २०२० पर्यंत ४० % पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. या कालावधीत शहरातील कुटुंबांची संख्या वाढेलच त्याचबरोबर संयुक्त कुटुंबाचे रुपांतर विभक्त कुटुंबात होण्याची प्रवृत्ती वाढणार आहे. या कालावधीत मध्यमवर्गीयांची संख्या वाढत आहे.

**वास्तव मालमत्तेतील वृध्दी:**

आर्थिक सुधारणांमुळे शहरीकरणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. महानगरांचा

उच्च वृध्दी दर व या महानगरात केंद्रीत झालेली शहरी लोकसंख्या हे आर्थिक सुधारणांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. जागतिकीकरणाच्या कालावधीत शहरातील घरबांधणी, वाहतुक, व्यापारी व माहिती तंत्रज्ञानावर आधारीत सेवा (BOP) या महत्वाच्या क्षेत्रात बदल झाले आहेत. वास्तव मालमत्तेत १०० % थेट विदेशी गुंतवणुकीला मुभा दिल्यामुळे उद्योग क्षेत्रात वाढीची प्रवृत्ती आली आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय खाजगी उद्योगांना शहरामध्ये स्थानिक भागीदाराबरोबर गुंतवणूक करण्यास प्रेरणा मिळाली. शहरातील सेवा क्षेत्रात खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे शहरी विकासास चालना मिळाली. खासगीकरणाच्या धोरणामुळे शासनाने महत्त्वाच्या क्षेत्रातून प्रामुख्याने पायाभूत सुविधा निर्मितीच्या क्षेत्रातून माघार घेतली आहे.

नियोजन आयोगाच्या मते १९९४-९५ ते १९९९-२००० या कालावधीत वास्तव मालमत्ता क्षेत्रात, घरे व बांधकाम क्षेत्रात ४.६ % वाढ झाली आहे. यात घरबांधणी व्यवसाय फक्त २.८ % वाढला तर बांधकाम व्यवसाय ६.४ % वाढला आहे. भारतातील विकसित केलेल्या वास्तव मालमत्तेपैकी ८० % राहण्याच्या घरांसाठी आहेत, उरलेल्या २० % मध्ये कार्यालये, दुकाने, मॉल, हॉटेल, दवाखाने इ.चा समावेश होतो.

**शहरीकरण:**

भारतातील शहरीकरण जगभर जी शहरीकरणाची प्रवृत्ती आहे त्या सारखेच आहे. आर्थिक बदलाबरोबर जे शहरीकरण होते तसेच भारतात झाले आहे. भारतातील शहरीकरण महानगरांभोवती केंद्रीत होत आहे.

२०११ च्या जनगणनेच्या प्राथमिक अहवालानुसार भारतातील शहरीकरण झालेली तीन मुख्य राज्यांमध्ये महाराष्ट्र ५०.८ दशलक्ष (१३.५ % एकुण शहरी लोकसंख्येच्या) उत्तर प्रदेश ४४.४ दशलक्ष (११.८ एकुण शहरी लोकसंख्येच्या) तर तामीळनाडू राज्यात ३४.९ दशलक्ष (९.३ % एकुण शहरी लोकसंख्येच्या ) लोकसंख्या आहे. २००१ च्या जनगणने प्रमाणे भारतात ३५ शहरे दहा लाख लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असणारी आहेत व या शहरात एकुण शहरी लोकसंख्येपैकी ३९ % लोकसंख्या राहते. दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणारी शहरे १९५१ मध्ये ५ होती. १९९१ मध्ये ही संख्या २३ झाली तर २००१ मध्ये ही संख्या ३५ पर्यंत वाढली. दहा लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणारी शहरे देशात साधारणतः समान विभागली आहेत.

मुंबई, अहमदनगर, चेन्नई, बेंगलोर आणि हैद्राबाद या भागात शहरी पट्टा निर्मितीमुळे अनेक प्रमुख शहरे जोडली गेली आहेत व त्यामुळे १९९१ नंतर येथे मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक वाढली आहे. ही शहरे द्रुतगती मार्गाने व रेल्वेने जोडली गेली आहेत. आर्थिक सुधारणानंतरच्या काळात जागतिक उद्योजक व गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी शहरांच्या व शहरातील पायाभूत सुविधांचा विकास झाला पाहिजे ही बाब भारत सरकारच्या लक्षात आली आहे. अलीकडील काळात शहरी विकासाच्या राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या योजना देशातील सर्वच शहरासाठी आहेत.

शहरीकरणाबाबत झालेल्या अभ्यासात असे लक्षात आले आहे की, लागवडीखालील जमीन बिगर-कृषी जमिनीत रुपांतरीत होतांना दिसते. शासनाच्या उदार धोरणामुळे १०० % थेट

विदेशी गुंतवणूकीला एकात्मिक शहर वसाहत (Township) विकास योजनेत गुंतवणूक करण्यास मुभा मिळाली आहे. परिणामतः पायाभूत सुविधांच्या निर्मितीला चालना मिळाली आहे. या योजना एकात्मिक/अनिवासी भारतीय/हायटेक वसाहती या नावाने ओळखल्या जातात. या वसाहतीसाठी कमीत कमी १०० एकर जमीन लागते.

शहरीकरणामुळे वाहतुकीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. शहराच्या विस्तारामुळे व उपनगरांची संख्या वाढल्यामुळे वाहतुकीचे अंतर वाढले आहे. वाहतुक सेवांची मागणी वाढली आहे व त्यातुन रस्त्यावरील गर्दी वाढली आहे. तसेच रस्ता अपघाताचे प्रमाणही वाढले आहे. या समस्यांबरोबरच शहरीकरणामुळे काही समस्या निर्माण झाल्या आहेत. जागेची टंचाई, झोपडपट्टीची समस्या, प्रशासनविषयक समस्या, सार्वजनिक सोयीचा अभाव, शैक्षणिक समस्या, ई-कचऱ्याची समस्या, प्रदुषणाची समस्या इत्यादी होत.

## संदर्भ सूची:


१) Mutter R. Performance of Urban India during Globalisation period. Website.

२) Mathur O.P., Impact of Globalisation on cities and city related policies in India.

३) Census of India-2001.

४) Census of India - 2011 (Provisional)

५) Planning Commission, projection of Investment in Infrastructure during Eleventh plan. GOI, New Delhi.

६) डॉ. गायकवाड जे.व्ही., अमरावती जिल्ह्यातील नागरीकरणाचे स्वरुप व समस्यांचे विश्लेषण, अमरावती.

७) डॉ. दि.व्यं.जहागीरदार, नागरीकरण : स्वरुप आणि वादप्रश्न. अर्थसंवाद, खंड १६, अंक-३ ऑक्टोंबर-डिसेंबर १९९२.

# जागतिकीकरणानंतर शहरीकरण: दशा व दिशा

**राहुल शं. म्होपरे, अर्जुननगर,**
अर्थशास्त्र विभाग, देवचंद कॉलेज,
ता. कागल, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी: ९९२३८७९०२०.

प्रस्तुत लेखात जागतिकीकरणानंतर भारतातील शहरीकरणाचा विकास कसा होत गेला आहे त्यातून कोणत्या समस्या निर्माण झाल्या आहेत याचा प्राथमिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागातील लोक विविध कारणांनी (उदा. नोकरी, उद्योग, व्यवसाय, रोजगार इ.) शहराकडे वळतात व शहरातील लोकसंख्या वाढीबरोबरच शहरांची संख्या देखील वाढू लागते याला शहरीकरण / नागरीकरण असे म्हणतात. १९७१ च्या जनगणनेनुसार शहरीकरणाचे ठरवून दिलेले निकष पुढील प्रमाणे आहेत. (१) ज्या वस्तीमध्ये महानगरपालिका, नगरपालिका, कॅटोन्मेंट बोर्ड स्थापन झालेल्या आहेत. अशा वस्त्या की, ज्या शासनाने नगर म्हणून मान्य केलेल्या आहेत.(२)पाच हजारपेक्षा जास्त लोकसंख्या, दर चौ. कि. मी ४०० पेक्षा जास्त घनता आणि बिगर कृषी व्यवसायात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या कार्यरत असलेल्या वस्त्या म्हणजे नागरी क्षेत्र होय. शहरांच्या लोकसंख्येवरून त्यांचे सहा प्रकारात वर्गीकरण केले जाते. वर्ग १-एक लाखाच्या वर, वर्ग-२:५०००० ते ९९९९९, वर्ग-३: २००००ते ४९९९९, वर्ग-४ : १०००० ते १९९९९, वर्ग - ५ : ५००० ते ९९९९, वर्ग -६ : ५००० पेक्षा कमी. याबरोबरच १ लाख लोकसंख्या असलेल्या ठिकाणास शहर, १ ते १० लाख- नगर १० लाखांपेक्षा अधिक - महानगर तर ५० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या ठिकाणास महाकाय नगर म्हटले जाते.

**जागतिकीकरण आणि शहरीकरण:** भारतात १९९१ नंतर शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. वर्ष १९०१ मध्ये भारतातील फक्त १०.८९% लोकसंख्या शहरी भागात होती व एकूण शहरांची संख्या १६२७ एवढी होती. हेच प्रमाण १९५१ मध्ये अनुक्रमे १७.६ % व २८४३ एवढे झाले. थोडक्यात १९०१ ते १९५१ या ५० वर्षांच्या काळातील भारतातील शहरीकरणाचे वेग अतिशय कमी (४३% वाढ) होता. १९६१ ते २०११ या काळातील म्हणजेच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेपूर्वीची ३० वर्षे व नंतरची २० वर्षे अशा ५० वर्षांची भारतातील शहरीकरणाची दशकनिहाय सांख्यिकी तक्ता क्र. १ मध्ये दिलेली आहे.

तक्ता क्र.१ : भारतातील शहरीकरणाचे स्वरूप व प्रवृत्ती

| वर्षे | भारताची एकूण लोकसंख्या (कोटी) | शहरी लोकसंख्या (कोटी) | शहरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी शे. प्रमाण | शहरांची संख्या | शहरी लोकसंख्येची घनता |
|---|---|---|---|---|---|
| १९६१ | ४३.९३ | ७.८३ | १८ | २६५७ | १३३ |
| १९७१ | ५४.८२ | १०.८३ | १९.९० | ३०८१ | १६७ |
| १९८१ | ६८.५२ | १५.८२ | २३.३० | ३९७१ | २३० |
| १९९१ | ८४.३० | २१.५७ | २५.७० | ४६१५ | २६७ |
| २००१ | १०३.३६ | २८.५४ | २८.८० | ५१६१ | ३२५ |
| २०११ | १२०.३० | ३१.९० | ३१.८० | ७९३६ | ३८२ |

स्रोत: १) *Census 2011. Govt. Of India.*

*२) पानसरे गोविंद (संपादक) - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टिकोन पृ. ३४९*

तक्ता क्र. १ वरून असे निदर्शनास येते की, भारतात शहरीकरणाची प्रवृत्ती सातत्याने वाढत आहे. तक्त्यामधील सांख्यिकीची जागतिकीकरणा पूर्वीची म्हणजे वर्ष १९९१ च्या अगोदरची व नंतरची अशी विभागणी करून विश्लेषण केले असता आपणास खालील प्रमुख निष्कर्ष मिळतात.

१. १९६१ ते १९९१ या तीस वर्षाच्या काळात भारतातील शहरी लोकसंख्येमध्ये ६३.७०% नी वाढ झालेली आहे. तर १९९१ ते २०११ पर्यंत हीच वाढ ४७.९०% ती झालेली आहे.

२. १९६१ ते १९९१ या काळात शहरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असणारे शेकडा प्रमाण ७.७ नी वाढले असून ही वाढ ३०% आहे. तर १९९१ ते २०११ या काळात शहरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असणारे शे. प्रमाण ६.१ नी वाढले आहे व ही वाढ १९% आहे.

३. १९६१ ते १९९१ या काळातील भारतातील शहरांच्या संख्येत ४२% नी वाढ झालेली आहे. ही वाढ १९९१ ते २०११ काळातसुद्धा ४२% एवढ्यानेच झालेली आहे.

४. १९६१ ते १९९१ या काळातील शहरी लोकसंख्येशी घनता ५०% नी वाढलेली आहे. हीच वाढ १९९१ ते २०११ या काळात ३०% नी झालेली आहे.

थोडक्यात, जागतिकीकरणानंतरच्या २० वर्षाच्या काळात भारतातील नागरी लोकसंख्या, त्यांचे एकूण लोकसंख्येशी असणारे शेकडा प्रमाण, शहरांची संख्या अशा सर्वच बाबतीत अतिशय वेगाने वाढ होत आहे. अर्थात वाढत्या शहरीकरणाचे बरे-वाईट परिणाम देखील सध्या भारतात दिसत आहेत.

### वाढत्या शहरीकरणाचे परिणाम:

**१. प्रदूषण वाढ :**

भारताच्या शहरी भागात सर्व प्रकारच्या प्रदूषणात मोठी वाढ होत आहे. वायू प्रदूषणाचे प्रमाण तर अतिशय मोठे आहे. शहरात ७०% वायू प्रदूषण फक्त वाहनांमुळे होते. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अभ्यासान्वये भारतातील फक्त २%

शहरे वायू प्रदूषणाच्या विळख्यात नाहीत. वायू प्रदूषणाबरोबरच ध्वनी प्रदूषण, पाणी प्रदूषण यासारख्या बाबींनी देखील उच्छाद मांडला आहे.

२. स्वच्छतागृहे, सांडपाणी व्यवस्थापन व शुद्ध पिण्याचे पाणी :

युनिसेफने जाहीर केल्यानुसार अपुरे सांडपाणी व्यवस्थापन व शुद्ध पिण्याच्या पाणी पुरवठ्याअभावी जगातील लहान मुलांच्या एकूण मृत्यूंपैकी ८८% मृत्यू मुलांना फक्त डायरीया (जुलाब) झाल्यामुळे होतो. भारतात देखील हे प्रमाण मोठे आहे. भारताच्या शहरी भागात आजही १४% लोकांना स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध झालेली नाही, २०% लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नाही.

३.अपुरी निवास व्यवस्था :

भारतातील राज्यघटनेतील तरतुदीनुसार निवास व्यवस्था हा मानवी हक्क आहे . मा. सुप्रीम कोर्टनेदेखील विकास प्रक्रियेत निवास व्यवस्था हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे असे नमूद केले आहे. परंतु दुर्दैवाने नियोजनाच्या सहा दशकानंतर देखील भारतात, विशेषत: शहरी भागात ते शक्य झाल्याचे दिसत नाही. अकराव्या पंचवार्षिक योजनेनुसार (२००७-२०१२) अजूनही २६.५३ दशलक्ष शहरी लोकांना आजही स्वत:चे पुरेसे असे हक्काचे घर नाही. २०११ च्या मध्याला शहरी भागातील ४२% (१५८.४२ दशलक्ष) लोकसंख्या झोपडपट्टीत वास्तव्यास होती. भारताची राजधानी दिल्लीमध्ये हे प्रमाण ५०% तर आर्थिक राजधानी मुंबई मध्ये ६०% एवढ्या मोठ्या प्रमाणात आहे. आज सुद्धा शासनामार्फत शहरातील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचितांना पुरेशी निवास व्यवस्था पुरवण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम नाही.

४. अनियोजित शहरीकरण :

भारतातील शहरांची सध्या होत असलेली वाढ ही अनियोजित व अशास्त्रीय पद्धतीने होत आहे. सध्याची शहरे ही शिक्षण, आरोग्य अपुऱ्या मूलभूत सुविधा अशा बाबतील अतिरिक्त भार सहन करत आहे. शहरात होत चाललेली वाहनांची गर्दी, निवासाची समस्या, पाण्याची समस्या, वीज, स्वच्छतागृहे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, क्रीडांगणांचा अभाव या सर्व बाबी भारतातील अनियोजित शहरीकरणाच्या द्योतक असून याचा परिणाम म्हणूनच शहरात लोकांच्या राहणीमानाच्या तसेच पर्यावरणीय समस्या देखील मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत.

५. आर्थिक आणि प्रादेशिक विषमता :

शहरातील काही कंपन्या कामगारांना अतिरिक्त पगार देत आहेत. काही कंपन्या त्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (उएज) प्रती वर्षी ५० कोटी रु. पेक्षा अधिक वेतन देतात, जे देशाच्या दरडोई उत्पन्नाच्या १२५०० पटीने अधिक आहे. अशाप्रकारे गरीब श्रीमंताच्या उत्पन्नातील विषमता अधिक वाढीस लागली आहे. त्याचबरोबर शहरी भागातच विविध सोयी सुविधा पुरविण्यास प्राधान्य दिले जाते. त्यामुळे शहरांचा विकास व ग्रामीण भाग मात्र पिछाडीवर राहून प्रादेशिक विषमता देखील वाढीस लागली आहे.

६. उपभोग प्रवृत्तीतील बदल :

जागतिकीकरणानंतर शहरी लोकांच्या उपभोग प्रवृत्तीत देखील हानिकारक बदल झाल्याचे चित्र आहे. वर्ष २००५ नंतर प्रती वर्षी शहरी लोकांच्या उपभोग खर्चात साधारणत: १४% नी वाढ झाली आहे. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून मॅक्डोनॉल्ड्स सारख्या परदेशी कंपन्यांनी भारतात

प्रवेश केला व लोक दैनंदिन आहार सोडून, पीज्जा, सँडविच, बर्गर यासारख्या फास्ट-फूड संस्कृतीकडे वळल्याचे दिसून येते. याबरोबरच जागतिकीकरणानंतर अतिशय वेगाने शहरात पारंपरिक साडी तथा चुडीदारची जागा मीडी, फ्रॉक्स, जीन्स अशा पेहरावांनी घेतली आहे. पुरुषांच्या पेहरावामध्ये देखील मोठा बदल झाला आहे. पुरुष लांब केस तथा कानात कर्णफुले अथवा रिंग घालताना दिसून येत आहेत. शहरात मोठ्या प्रमाणात फादर्स डे, मदर्स डे, फ्रेंडशिप डे, परदेशी सण समारंभ साजरे होताना दिसत आहेत. एकंदरीत उपभोगप्रवृत्तीमधील हा ऋणात्मक बदल देखील भारतीय संस्कृतीला तथा शहरी विकासाला बाधक आहे.

**समारोप:**

शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्या समस्या या प्रामुख्याने मानवनिर्मितच आहेत. यासाठी पूर्वीपासूनच विविध कायदे करण्यात आलेले आहेत. आज देशात पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जवळपास ४०० कायदे आहेत. १९७४ चा जलप्रतिबंधक व प्रदूषण नियंत्रण कायदा, १९८१ चा वायू प्रतिबंधक आणि प्रदूषण नियंत्रण कायदा, १९८६ चा पर्यावरण संरक्षण कायदा इ. त्यांपैकी काही प्रमुख कायदे आहेत. विशेष म्हणजे भारतीय राज्यघटनेत करण्यात आलेल्या ७४ व्या घटना दुरुस्तीमध्ये देखील पर्यावरण संरक्षणाला विशेष महत्त्व व स्थान देण्यात आलेले आहे. परंतु दुर्दैवाने या सर्वच कायद्यांची अंमलबजावणी मात्र योग्य रित्या होत नाही हे दु:खद वास्तव आहे. सबब जागतिकीकरणाला दोष देऊन किंवा फक्त कागदावर कायदे करून चालणार नाही, तर वाढत्या लोकसंख्येने शहरात निर्माण होणाऱ्या समस्यांना लगाम घालण्यासाठी कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी व प्रत्येकाने स्वत:च्या वर्तनात स्वत:च सुधारणा घडवून आणणे एवढा एकच रामबाण उपाय आता शिल्लक राहिला आहे असे वाटते.

**संदर्भ यादी:**


१. Census 2011, Govt. of India, New Delhi.

२. Keshava, S. R. (2013), *Indian Urbanization Under Globalization Development or Delusion !*, SSIJMAR, *Vol II*, Jan-Feb.

३. Kshirsagar, Anil & etc. (2012). *Globalization and The Changing Urban Realities in India Chetan Bhagat's One Night @ The Call Center and 2 States,* The Criterion An International Journal in English, Vol III, Issue IV.

४. म्होपरे राहुल शं. (२०१३), *जागतिक लोकसंख्या आणि भारत*, प्रबोधन प्रकाशन ज्योती, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, ऑगस्ट.

५. पानसरे, गोविंदराव (संपादक), (२०१२) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टीकोण,* श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर.

# जागतिकीकरणाचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम


**तानाजी गेनभाऊ गिते, पुणे**

व्यापारी अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर.

पदव्युत्तर विद्याशाखा सदस्य, पुणे विद्यापीठ.

भ्रमणध्वनी : ९८५०४९७८९९


जागतिकीकरणाचा पूर्व इतिहास हा ॲडम स्मिथ पासून सुरू होतो. १८४८ मध्ये जगाच्या उत्पादक शक्तींचे कार्यक्षम समुपयोजन असे मत ॲडम स्मिथ यांचे होते. रिकार्डो यांनी तुलनात्मक खर्च सिध्दान्ताचे विश्लेषण केले. १७१८ मध्ये रिकार्डो यांनी Principal of Political Economy and Trade ह्या ग्रंथातील प्रकरण ७ मध्ये On Foreign Trade ह्या प्रकरणात जागतिक व्यापाराची स्थिती दर्शविली आहे. प्रो. पी. ए. सॅम्युलसन यांनी १९७३ मध्ये खुला व्यापार परस्पर लाभप्रद प्रादेशिक श्रमविभागात वाढ करतो. सर्व देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात जागतिकीकरणामुळे मोठी भर निर्माण होते. प्रो.जगदीश भगवती यांच्या मते +उत्पादन क्षमता व खुले आर्थिक धोरण' यांचा जवळचा संबंध असतो. खुल्या आर्थिक धोरणामुळे उत्पादन क्षमतेत वाढ होते. एडवर्ड यांच्या मते ÷खुल्या आर्थिक धोरणामुळे मोबदल्यात वाढ होते व विकासाचा वेग वाढतो'. जागतिकिकरणामुळे ज्ञानामध्ये भर पडते व त्यामुळे स्थानिक पातळीवरील ज्ञानाचा विस्तार होतो. जागतिकिकरण म्हणजे आर्थिक एकात्मीकतेकडे नेणारी भारतीय बँकिंग क्षेत्रातील विकासाचे स्वातंत्र्य. पूर्वीचे बँकिंग क्षेत्र म्हणजे, स्वातंत्र्यानंतर ते बँकांच्या राष्ट्रीयीकरणापर्यंत म्हणजेच १९४७ ते १९६७ आणि राष्ट्रीयकरणानंतर म्हणजेच १९६९ ते १९९१ हा कालखंड आणि १९९१ नंतरचे बँकिंग क्षेत्र होय. पहिल्या टप्प्यात प्रामुख्याने खाजगी बँकिंग व्यवस्था होती. ही व्यवस्था शहरांपूर्ती मर्यादित होती. ही व्यवस्था अपयशी ठरली. त्यामुळे त्यावर अवलंबून असणाऱ्यांना रोजगारास मुकावे लागले. ह्या बँका दिवळखोरीत निघाल्या. राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंग क्षेत्राचा चेहरा मोहरा बदलत गेला. ८४% क्षेत्र सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या ताब्यात आले. ह्याचा परिणाम सहकाराच्या क्षेत्रामुळे बँकिंग क्षेत्राचा आत्मविश्वास वाढला. त्यातूनच ग्रामीण आणि निमशहरी भागात बँकिंग क्षेत्राचा विकास होऊ लागला. गरीब आणि शेती क्षेत्रास पतपुरवठा होण्यास

सुरूवात झाली. त्यामध्ये लहान उद्योजक, सीमान्त शेतकरी, लहान दुकानदार, भाजी विक्रेता ह्यांना बँकिंग क्षेत्र पतपुरवठा करू लागले.

बँकिंग क्षेत्राच्या विकासाचा परिणाम होऊन नोकरीच्या संधी निर्माण झाल्या. त्याचबरोबर १९६६ ते १९६९ ह्या काळात हरित क्रांती झाली. शेतीची उत्पादकता वाढली. लहान उद्योजकांनाही नफा मिळू लागला. सावकाराच्या कर्जातून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर कर्जदारांना मुक्तता मिळाली. मोठ्या प्रमाणावरील ग्रामीण लोकांची बचत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये होऊ लागली. सार्वजनिक क्षेत्रातील बँका लहान आणि मध्यम उद्योगांना पतपुरवठा करू लागल्या. स्वयंपूर्ण आर्थिक विकासात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा वाटा वाढू लागला.

राष्ट्रीयीकरणानंतर १९७५ मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना झाली. ग्रामीण पतपुरवठ्यात प्रादेशिक ग्रामीण बँकांनी आपला पतपुरवठा वाढविण्यास सुरूवात केली. १९९१ पर्यंत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ह्या पतपुरवठ्यावर लक्ष केंद्रित केले. जागतिक बँक आणि आंतराष्ट्रीय निधी ह्यांनी उदारीकरणानुसार सुधारणा सुचविल्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी एकत्र येऊन बँकिंग क्षेत्राचा विकास करण्याचे निश्चित केले. १४ ऑगस्ट १९९१ रोजी भारत सरकारने एम. नरसिंहम समितीची बँकिंग क्षेत्रात सुधारणा सुचविण्यासाठी स्थापन केली. १६ नोव्हेंबर १९९१ रोजी ह्या समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला. सार्वजनिक क्षेत्रातील काही बँकांचे विलिनीकरण करण्याचे सुचविले. प्राधान्यक्रम क्षेत्रांना १०% वरून ४०% पर्यंत अर्थलाभ करावे. बँकांना अधिक स्वायत्तता देण्यात यावी. यानंतर अनेक कमिट्या स्थापन करण्यात आल्या. त्यामध्ये नरसिंहम कमिटी दोन, खान कमिटी, वर्मा कमिटी, सी. जी. गुप्ता समिती, रघुराजन समिती, अनुरॉयल होडा समिती इ. ह्या सर्व समित्यांनी नरसिंहम समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे सुचविले. नरसिंहम समितीने असेही सूचविले की भविष्यात जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सूचनेनुसार अपेक्षित त्या सुधारणा करणे आवश्यक आहे.

### भारतीय बँकिंग क्षेत्रापुढील आव्हाने:

भारतीय बँकिंग क्षेत्रापुढे अनेक आव्हाने, संधी आहेत. विशेष करून २००९ मध्ये मोठ्या प्रमाणात ह्या व्यवसायात स्पर्धा निर्माण झाली त्यातून अनेक आव्हाने निर्माण झाली. ह्यामध्ये एन.पी.ए. कमी करणे ही सर्वात मोठे आव्हान ह्या काळात निर्माण झाले. बँकिंग मधील खर्च कमी करणे, ह्याबाबत विचार करताना प्रामुख्याने महत्त्वाची आव्हाने निर्माण झाली आहेत-

ग्राहकांच्या गरजांनुसार बदल करणे, नियमानुसार सुधारणा करणे, मालमत्तेची देखभाल करणे, व्यवस्थापनात बदल करणे, आधुनिक तंत्रज्ञान वापरणे, भागधारकांमध्ये विश्वास निर्माण करणे, नविन प्रकारच्या कर्ज योजना शोधणे, बँकांमध्ये निकोप स्पर्धा करणे.

या सर्वसाधारण आव्हानांशिवाय जी विशेष आव्हाने जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आहेत त्यामध्ये बँकिंग क्षेत्राचे संगणकीकरण करष व आधुनिकीकरण करणे, १९८० पर्यंत पारंपारिक पध्दतीने बँक व्यवसाय चालविला जात होता. परंतू संगणक प्रगतीमुळे बँकिंग क्षेत्राचे नूतनीकरण करताना तंत्रज्ञानाचा

खर्च वाढला. १९९१ नंतर बँकांचा इतर जगाशी संपर्क वाढला, त्यामुळे अद्ययावत संगणकीकरण करणे हे मोठे आव्हान बँकांना स्वीकारावे लागले व त्यासाठी मोठा खर्च करणे आवश्यक झाले. कारण त्याशिवाय स्पर्धेत टिकाव लागणे अशक्य होते. कोअर बँकींग ही संकल्पना पुढे आली. ग्राहकांचे व्यवहार त्वरीत पूर्ण करण्यासाठी वेगवान सेवा आवश्यक झाली. मोठ्या बँकांनासुध्दा केवळ २०% ते ३०% प्रमाणात ही सेवा पुरविणे शक्य झाले. त्यातून ७०% ते ८०% व्यवसाय बँकांना करणे शक्य झाले आहे. प्रत्येक बँकेला आत ए.टी.एम. सेवा देणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी खर्च करावा लागत आहे. त्यातून बँकांची उत्पादकता, लाभप्रदता ही कमी होत आहे.

### बँक सेवांची गुणवत्ता:

जागतिकीकरणानंतर बँकिंग सेवांचा वेग वाढविणे आवश्यक होऊ लागले. त्यातून ए.टी.एम., क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, टेलि बँकिंग, मोबाईल बँकिंग, होम बँकिंग, ट्रॅव्हल चेक, डिमांड ड्राफ्ट, कार्पोरेट कॅश मॅनेजमेंट इ. सुविधा पुरविणे आज आवश्यक झाले. हे मोठे आव्हान जागतिकीकरणामुळे निर्माण झाले आहे.

### तंत्रज्ञानातील तफावत:

नविन पीढीतील परकिय बँका आणि भारतीय बँका ह्यांच्या तंत्रज्ञानात तफावत निर्माण होताना दिसत आहे. नाविन्यपूर्ण उत्पादने आणि सेवांमुळे तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. तंत्रज्ञानात सतत बदल होत आहेत, त्यामुळे भारतीय बँकांना परकिय बँकांबरोबर स्पर्धा करणे हे एक मोठे आव्हान आहे. परकिय बँका माहिती तंत्रज्ञान, तंत्रज्ञान आणि सेवा ह्यामध्ये भारतीय बँकांच्या बऱ्याच पुढे आहेत. ह्यामध्ये भारतातील नविन खाजगी बँकांनी परकिय बँकांचे अनुकरण केले आहे. त्यामध्ये आय.सी.आय.सी.आय. बँक, एच.डी.एफ.सी. बँक, अॅक्सीस बँक ह्यांचा समावेश आढळतो.

### बँकिंग व्यवसाय जागेची निवड:

बँकांचे आधुनिकीकरण होताना आय.टी. क्षेत्रावर विशेष भर प्रत्येक बँकेचा दिसून येतो. स्पर्धा तीव्र असल्याने बँका एका ठराविक ठिकाणी गर्दी करताना दिसून येत आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या व्यवसायावर त्याचा परिणाम होताना दिसून येतो.

### ग्राहकावरील परिणाम:

अनेक बँकात खाती उघडणे व कर्ज घेणे, त्याचप्रमाणे ज्या बँका चांगली सुविधा पुरवितात त्याकडे ग्राहकांचा जाण्याचा कल दिसतो. त्यामुळे अनेक बँकांना ग्राहक आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात.

### जागतिकीकरणाचे बँकिंग क्षेत्रावरील सकारात्मक परिणाम:

ग्राहकांना अनेक बँकांचा पर्याय निर्माण झाला त्यामुळे काही बँकांची मक्तेदारी संपुष्टात आली, ग्राहकांना कमी वेळेत कर्ज उपलब्ध होऊ लागले, बँकिंग क्षेत्राविषयी ग्राहकांमध्ये जागृती निर्माण झाली, ग्राहकांचा बँकिंग क्षेत्रातील सहभाग वाढला, वेळ आणि पैसा यांची बचत होऊ लागली, पैशाच्या हस्तांतरणाचा वेग वाढला, नविन तंत्रज्ञानाचा स्वीकार होऊ लागला, ग्राहकांच्या सेवांत वाढ झाली, ग्राहकांच्या बँकांविषयीचा दृष्टीकोन बदलला, जागतिक पातळीवर पैसा पाठविण्याची सोय सहज उपलब्ध होऊ लागली, ग्राहकांचा बँकांवरील विश्वास

वाढला, खाजगी क्षेत्रातील बँकांचा सहभाग वाढला, बँकांच्या व्यावसायिकीकरणाला सुरूवात झाली, बँकिंग क्षेत्रात निकोप स्पर्धा निर्माण झाली, बँकांची लाभप्रदता वाढली, बँकांचे विलिनीकरण होऊ लागले, बँक बुडण्याचे प्रमाण कमी झाले, बँकिंग क्षेत्रात पारदर्शकता निर्माण झाली, आर.बी.आय. ला नियंत्रण करणे शक्य होऊ लागले, बँकांची व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढली, बँकिंग सेवांत परिवर्तन झाले.

**नकारात्मक परिणाम:**

परकिय बँकांची संख्या वाढल्याने भारतीय बँकांचा व्यवसाय कमी होऊ लागला, भारतीय बँकांच्या तांत्रिक खर्चात वाढ झाली, भारतीय बँकांना वेगाने बदल करणे शक्य होत नाही, भारतीय बँक व्यवसायातील निर्णय प्रक्रियेला लागणाऱ्या वेळेमुळे नफ्यावर त्याचा परिणाम होत आहे, तुलनेत सार्वजनिक बँकांना प्रगती करणे अडचणीचे होऊ लागले.

**निष्कर्ष:**

जागतिकीकरणामुळे ग्राहकांच्या संस्था, लहान उद्योग, व्यापारी ह्या सर्वच क्षेत्रांना फायदा होऊ लागला. पैशाचे हस्तांतरण वेगाने होऊ लागले. भारतीय बँकिंग क्षेत्राची विश्वासार्हता वाढली. निकोप स्पर्धा निर्माण होऊ लागली. अकार्यक्षम बँका बंद होऊ लागल्या. भारतीय बँकांनी पारंपरिकता सोडून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. बँकिंग क्षेत्र प्रगतीपथावर जाण्यासाठी जागतिकीकरणाचा एक शिडी म्हणून उपयोग झाला. त्यातूनच भारतीय अर्थव्यवस्थेला याचा मोठा लाभ होत आहे.

**संदर्भसूची:**


१) जी. एस. ब्राथा, *÷ग्लोबलायझेशन स्ट्रॅटिजी अँण्ड इकॉनॉमीक लिब्रलायझेशन'*, अनमोल पब्लिकेशन, न्यू दिल्ली, १९९५.

२) रमाकांत जैन, *÷ग्लोबलायझेशन अँण्ड इंडियन इकॉनॉमी'*, पॉईंटर पब्लिशर, १९९६.

३) एम. वाय. खान, *÷फायनान्शिअल सर्व्हिसेस'*, टाटा मॅक्ग्रॉ हिल, न्यू दिल्ली, १९८७.

४) आय. एम. पांडे, *÷फायनान्शिअल मॅनेजमेंट'*, विकास पब्लिकेशन, न्यू दिल्ली, १९९१.

५) डॉ. वि. वि. घाणेकर, *÷जागतिकीकरण व भारतातील बँका'*, १९८७.

६) जरनल ऑफ फायनान्शिअल इकॉनॉमिक्स, २०१२.

# किरकोळ व्यापार क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणुकीचा अर्थव्यवस्थेवर परिणाम

**तेजस्विनी बी. मुडेकर, कोल्हापूर,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कमला कॉलेज.
भ्रमणध्वनी : ९६०४३४३४००

देशाच्या मरगळलेल्या अर्थव्यवस्थेत जोम निर्माण करण्यासाठी केंद्राने धोरणात्मक तसेच गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारे निर्णय घेतले नाहीत तर आर्थिक विकासदर ५ टक्क्यांपेक्षा खाली घसरेल, असा इशारा केंद्रिय नियोजन आयोगाने दिला. तसेच आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थांकडून *'ब्रिक्स'* (ब्राझिल, रशिया, इंडिया, चायना, साऊथ अफ्रिका) या वेगाने विकसित होणाऱ्या अर्थसत्तांमध्ये भारत अखेरच्या स्थानावर फेकला जाण्याची शक्यता वर्तविण्यात आली. या पार्श्वभूमीवर घटकपक्ष तसेच विरोधीपक्षाच्या विरोधाला न जुमानता सरकारने किरकोळ क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्याचा निर्णय घेतला. भारताची किरकोळ बाजारपेठ ही 'किरकोळ' नसून पहिल्या पाच क्रमांकामधील एक आकर्षक बाजारपेठ असल्याने विदेशातील सरकारे, मोठे गुंतवणूकदार, मोठ्या कंपन्या यांनी या निर्णयाचे स्वागत केले. थेट परकीय गुंतवणूकीचे भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रावर जे बरे वाईट परिणाम होऊ शकतील याचा ऊहापोह करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला आहे.

## भारतातील विदेशी भांडवल गुंतवणुकीचा मागोवा :

पारतंत्र्यातून मुक्त होऊन स्वातंत्र्याचा अनुभव घेताना सुरवातीस सरकारचा विदेशी भांडवल गुंतवणुकीबाबतचा दृष्टीकोन भितीचा व संशयाचा होता. १९४८ च्या औद्योगिक गुंतवणुकीच्या धोरणाने विदेशी भांडवलदार तर नाराजच झाले. पंतप्रधान कै. पंडित नेहरूंनी या बाबतीत थोडा विस्तारित व वास्तव दृष्टीकोन स्वीकारला. विदेशी भांडवल व परकीय भांडवल यात भेद केला जाणार नाही, उद्योजकांना नफा मिळवण्याची संधी दिली जाईल, एखाद्या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण केल्यास नुकसान भरपाई दिली जाईल इ. पण धोरणात्मक निर्णय म्हणून प्रमुख मालाचे व उद्योगांचे नियंत्रण भारतीयांच्या हातीच ठेवण्याचे

निश्चित करण्यात आले. यासारख्या काही जाचक अटींमुळे विदेशी भांडवल व मोठे गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करण्यास आकर्षित झाले नाहीत. १९७२ मध्ये १०० टक्के उत्पादन निर्यात करण्याच्या अटींवर परदेशी उद्योगांना भारतात त्यांच्या पूर्ण मालकीच्या सहयोगी कंपन्या स्थापन करण्याची परवानगी देण्यात आली. १९७७ मध्ये जनता सरकारच्या कारकिर्दीत काही मार्गदर्शक तत्त्वे सांगितली. तंबाखू, मद्यनिर्मिती या अग्रक्रम नसलेल्या क्षेत्रात गुंतवणुक करण्यास सांगण्यात आल्याने याही कालावधीत भारताला फार मोठी गुंतवणूक आकर्षित करता आली नाही. १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाला जागतिकीकरण, उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर विविध क्षेत्रात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला वाव देण्यात आला. व्यापार क्षेत्राचा विचार करता १९९५ मध्ये सेवाविषयक करार मान्य करून घाऊक आणि किरकोळ व्यापार मुक्त करण्याची भारताने तयारी दर्शविली. त्यानुसार १९९७ मध्ये सरकारने कॅश ॲण्ड कॅरी होलसेल यात १००% विदेशी गुंतवणुकीला परवानगी दिली. ही गुंतवणूक शासनाच्या पूर्व परवानगीने (Approval Route) शक्य होती. २००६ मध्ये ती Automatic Route द्वारे करण्यास परवानगी देण्यात आली. तसेच सिंगल ब्रँडमध्ये ५१% पर्यंत गुंतवणुकीस परवानगी दिली. किरकोळ विक्री क्षेत्रातील वॉलमार्ट, कॅरेफोर, मेट्रो या कंपन्यांची संकुले भारतात उभारली गेली. २४ नोव्हेंबर २०११ रोजी केंद्र सरकारने सिंगल ब्रँड रिटेल क्षेत्रात १००% थेट परकीय गुंतवणूक आणि मल्टी ब्रँड रिटेल क्षेत्रात ५१% थेट परकीय गुंतवणुकीला मान्यता देण्याचा निर्णय घेतला. मात्र सहयोगी व विरोधी पक्षांच्या विरोधाने तो निर्णय ७ डिसेंबर २०११ रोजी मागे घेण्यात आला. परंतु १४ सप्टेंबर २०१२ मध्ये विरोधास न जुमानता या आर्थिक सुधारणा जाहीर केल्या. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या औद्योगिक धोरण आणि संवर्धन विभागाने प्रेस नोट क्र.४ व प्रेस नोट क्र. ५ मध्ये या गुंतवणुकीबाबतचे सविस्तर धोरण स्पष्ट केले. परकीय गुंतवणुकीस मान्यता देताना सरकारने काही अटी लादल्या आहेत. मल्टी ब्रॅण्ड रिटेल क्षेत्रात गुंतवणूक करताना गुंतवणूकदारांनी किमान १०० कोटी डॉलर्सची गुंतवणूक केली पाहिजे, गुंतवणुकीच्या ५० टक्के रक्कम साठवणूक व इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी वापरणे बंधनकारक आहे. उत्पादित वस्तूंच्या एकूण खरेदीपैकी ३० टक्के खरेदी लघु, मध्यम, ग्रामीण उद्योग यांच्याकडून खरेदी करणे आवश्यक आहे. किरकोळ व्यापार ई-कॉमर्सद्वारा करता येणार नाही, १० लाख लोकसंख्येपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरातच दुकाने उघडता येतील, शेती संबंधित उत्पादनासाठी खरेदीचा प्रथम अधिकार सरकारचा राहील. परकीय गुंतवणुकीला संधी देण्याची बाब राज्य सरकारांच्या बाबतीत ऐच्छिक ठेवलेली आहे. आतापर्यंत ११ राज्यांनी या गुंतवणुकीस मान्यता दिली आहे.

## भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्राची सद्यस्थिती:

भारतातील किरकोळ व्यापाराची सद्यस्थिती व हा व्यापार विस्तारण्याची शक्यता याविषयीच्या विविध अंदाजाचा आढावा घेऊ.

• Investment Commission of India - च्या अंदाजानुसार २०१५ पर्यंत भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्र सध्याच्या पातळीपेक्षा तिपटीने वाढेल.

• Indian Councile of Research in International Economic Relations (ICRIER)– च्या अंदाजानुसार भारतातील किरकोळ क्षेत्रातील उलाढाल २०११-१२ मध्ये ४९७ अब्ज डॉलर्स होती. ICRIER ने केलेल्या आणखी एका अभ्यासानुसार भारतातील किरकोळ व्यापारात १३ टक्क्यांनी वार्षिक वाढ होणार आहे.

• A.T. Kearney - Global Retail Development Index 2012 नुसार येत्या पाच वर्षात भारतातील किरकोळ क्षेत्रात १५ ते २० टक्क्यांनी वृध्दी होण्याची शक्यता आहे.

• Confederation of Indian Industry & Boston consulting group च्या अंदाजानुसार २०१० मध्ये संघटित किरकोळ व्यापाराचा हिस्सा २८ अब्ज डॉलर्स असून तो एकूण व्यापाराच्या ६ ते ७ टक्के होता. २०२० मध्ये तो २६० अब्ज डॉलर्स इतका वाढेल म्हणजे एकूण व्यापाराच्या तो २०.८ टक्के होईल.

• Fitch (पतमापन करणारी जागतिक संस्था) ने भारताच्या किरकोळ व्यापारक्षेत्राला स्थिर (Stable)दर्जा दिला आहे.

विविध तज्ज्ञ गटांच्या अंदाजानुसार भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्र भविष्यात निश्चितच विस्तारणार असल्याने परदेशातील टॉमी हिलफिगर, बूक्सब्रदर ग्रुप, डमियानी इंटरनॅशनल, एस.ए.एस., फ्रेंड फॅशन ब्रॅण्ड प्रोमोड, वॉलमार्ट यासारख्या बलाढ्य कंपन्या भारतातील या प्रचंड मोठया बाजारपेठेत शिरण्यास उत्सुक आहेत.

## किरकोळ क्षेत्रातील थेट गुंतवणुकीचे अर्थव्यवस्थेतील सकारात्मक परिणाम :

जगातील इतर देशांचा अनुभव लक्षात घेता अमेरिका, इंग्लंड, मेक्सिको या देशांमध्ये परकीय थेट गुंतवणूकीचे सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. अर्जेंटिना, चीन, ब्राझील, चिली, इंडोनेशिया, रशिया, सिंगापूर या देशात मल्टीब्रँड रिटेल क्षेत्रात १०० टक्के परकीय गुंतवणुकीस परवानगी दिली असून ती फायदेशीर ठरली आहे. Indo-Asian News Service या वॉशिंग्टन येथून प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रातील वृत्तानुसार अमेरिकेने भारताच्या या निर्णयाचे स्वागत केले असून भारत व अमेरिका दोहोंनाही ही गुंतवणूक फायदेशीर ठरेल असे म्हटले आहे.

१. खेळत्या भांडवलाची उपलब्धता: भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात १५ टक्के वाटा असणारे हे किरकोळ व्यापार क्षेत्र असून विदेशी गुंतवणुकीत या क्षेत्रास खेळते भांडवल उपलब्ध होईल. विदेशी भांडवलाचा बूस्ट मिळाल्यास या क्षेत्राचा अधिक विस्तार होऊ शकेल.

२. रोजगार संधी : इंडिया स्टाफींग फेडरेशनच्या मते पुढील १० वर्षात एका संघटित क्षेत्राकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होण्याची ही पहिली वेळ आहे. या काळात अंदाजे १ कोटी रोजगार निर्मिती होईल, पैकी ४० लाख थेट रोजगार तर ५० ते ६० लाख अप्रत्यक्ष रोजगार असेल. हा रोजगार वाहतूक कंत्राटी कामगार, सुरक्षा रक्षक, हाऊस किपींग, प्रक्रिया उद्योग, पायाभूत सुविधा निर्मितीस आवश्यक कामगार, व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञ या स्वरूपाचा असेल. केंद्रिय नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष मॉंटेकसिंग अहुलवालिया यांच्या मते परकीय गुंतवणुकीने किरकोळ व्यापारक्षेत्राचे आधुनिकीकरण होईल त्यामुळे दर्जेदार रोजगार निर्मिती होईल.

३. पायाभूत सुविधांत गुंतवणूक: गुंतवणूकदारांनी

आपल्या गुंतवणुकीपैकी ५० टक्के गुंतवणूक बॅक एड व पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी वापरावी. असे बंधन असल्याने आपोआपच भारतात या सुविधांची वाढ होईल.

४. शेतीमालाची नासाडी कमी: भारतातील एकूण फळे, भाजीपाला उत्पादनापैकी योग्य वाहतूक व साठवणुकीच्या सोयींच्या अभावी ३० ते ३५ टक्के माल वाया जातो. या गुंतवणुकीने कार्यक्षम वाहतूक व्यवस्था व शीतगृहे निर्माण झाल्याने शेती मालाची नासाडी कमी होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच करार शेतीने माल विक्रीची खात्री मिळेल.

५. मध्यस्थांची साखळी: शेतीमाल विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थ नष्ट होऊन शेतकरी- किरकोळ व्यापारी- ग्राहक अशी व्यवस्था निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना १० ते ३० टक्के जादा मोबदला मिळेल.

६. स्पर्धात्मकता : परदेशी गुंतवणूकदार भारतात येऊन उद्योगांशी स्पर्धा करू लागतील. त्यामुळे उद्योगाची स्पर्धात्मकता वाढेल. टिकून रहायचे असेल तर दर्जेदार उत्पादन निर्मितीशिवाय पर्याय नसल्याने उत्पादनाचा दर्जा वाढेल.

७. महसूलात वाढ: व्हॅट, सेवा कर अशा विविध करांच्या रूपाने सरकारला अंदाजे २३ ते ५० अब्ज डॉलर्सचे उत्पन्न मिळू शकेल. त्यामुळे सरकारी महसूलात वाढ होईल.

८. जागतिक बाजारपेठेशी संपर्क : देशी उत्पादने विदेशी बाजारपेठेत पोहोचविण्याची संधी मिळेल. असा दावा केला जातो की, वॉलमार्ट ही एकच कंपनी भारतातून जवळ जवळ १ अब्ज डॉलर्सचा माल खरेदी करून निर्यात करेल.

९. उपभोक्त्यांना कमी किंमतीत दर्जेदार मालाची उपलब्धी होईल. भारतात मध्यम वर्ग एकूण लोकसंख्येच्या ३/४ आहे, ब्रँडेड वस्तूंची उपलब्धी झाल्याने त्यांना अधिक चांगले राहणीमान जगण्याची संधी मिळेल.

१०. इतर: आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांकडून ज्ञान मिळाल्याने ज्ञानवृध्दी होईल, भाववाढ रोखणे शक्य (कॅनडासारख्या देशात भाववाढ रोखण्याचे श्रेय वॉलमार्टला दिले जाते.), व्यवस्थापनविषयक शिक्षण देणाऱ्या संस्थात वाढ होईल. (भारती वॉलमार्टने अमृतसर, दिल्ली, बेंगलोर येथे ट्रेनिंग सेंटर्स सुरू केली आहेत.) देशातील मंदीसदृश्य वातावरण निवळेल.

### किरकोळ क्षेत्रातील थेट गुंतवणुकीचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील नकारात्मक परिणाम :

१. भारतातील १४ कोटी लोकसंख्या व त्यांचे अंदाजे ४० कोटी कुटुंबिय किरकोळ व्यापार क्षेत्राशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंधित आहेत. मॉल संस्कृतीने तसेच स्थानिक उत्पादने काही प्रमाणात नष्ट झाल्याने उत्पादन व रोजगार यावर काही प्रमाणात नकारात्मक परिणाम होईल.

२. बडया कंपन्यांच्या प्रवृत्तीबाबत मात्र संभ्रम आहे. बडया कंपन्या इतर देशातील स्वस्त माल आणून भारतात विकतील. सुरवातीस किंमती कमी ठेवून नंतर ग्राहकांना सवय लागल्यानंतर किंमती वाढवू शकतील अशा वेळी आपली पूर्वीची व्यवस्था नष्ट झाल्याने त्यांच्याकडून माल खरेदीशिवाय पर्याय राहणार नाही.

३. गुंतवणूकदारांनी ३० टक्के माल लघु, मध्यम उद्योगातून खरेदी करून त्याचे प्रमाणपत्र स्वतः द्यावयाचे असल्याने अशा कंपन्या माल त्याच पध्दतीने खरेदी करतील ही खात्री नाही.

४. मोठे मॉल्स, वातानुकूलन, पॅकेज्ड फूड

खाण्याच्या सवयीत वाढ, प्रचंड वीज वापर त्यामुळे पर्यावरणीय ऱ्हास होण्याची शक्यता आहे.

५. मॉल संस्कृती निर्माण होईल, चंगळवाद वाढीस लागेल.

### अपेक्षेइतकी गुंतवणूक शक्य आहे का?

किरकोळ व्यापार क्षेत्रात परकीय थेट गुंतवणुकीचा विचार करता भारतात अपेक्षेइतकी गुंतवणूक होईल का? Rating agency Crisil Ltd. यांच्या संशोधन नोटमध्ये असे म्हटले आहे की, २०१३ च्या शेवटी वॉलमार्टसह अनेक कंपन्या आपली स्टोअर्स उघडणार आहेत असे सांगितले असले तरी त्या प्रमाणात गुंतवणूक झालेली दिसत नाही. कदाचित हा २०१४ मध्ये होणाऱ्या निवडणूकीचा हा परिणाम दिसतो. टायटस ॲण्ड ॲडव्होकेटस्चे संस्थापक आणि व्यवस्थापन पार्टनर दलजित टायटस यांच्या मते बॅकएड पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक, मध्यम व लघुउद्योगातील खरेदीविषयीच्या बाबी स्पष्ट नाहीत. मात्र वाणिज्य आणि उद्योग मंत्री यांनी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी गुंतवणुकीच्या मार्गदर्शक तत्त्वात अधिक स्पष्टता आणली जाईल असे स्पष्ट केलेले आहे. त्याचप्रमाणे परदेशातील गुंतवणूकदारांना मोठया शहरात व्यापारी संकुल उभारण्यास योग्य जागा मिळणे, स्थानिक उद्योजक शोधून माल मिळविणे या गोष्टी थोड्या कठीण आहेत. चीनमध्ये वॉलमार्टसाठी स्पेशल पोर्ट तयार केला आहे. अशा काही खास सुविधा भारतात नाहीत. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

**निष्कर्ष:** भारतात होणाऱ्या गुंतवणुकीचा भारतीय शेतकरी, व्यापारी, ग्राहक यांना अधिकाधिक लाभ कसा होईल या दृष्टीने सरकारने नियोजन करणे आवश्यक आहे. बडया कंपन्यांना आमंत्रित करताना त्याची उद्देशस्पष्टता, गुंतवणूकधोरण स्पष्टता, लघु व मध्यम उद्योगामधील खरेदी बाबतीत स्पष्टता आणल्यास नकारात्मक परिणाम कमी करणे शक्य आहे.

**संदर्भसूची:**


1. Dr. S. Sundaram (Feb 2012) *FDI Retail Boon or Ban*, facts for you.
2. Dr. Gaurav Bisaria - *'Foreign Direct Investment in Retail in India'*, International Journal of Engineering & Management Research. P.No. 31 to 36
3. डॉ. प्रभा कदम. लेख - *'लघु उद्योगाला विदेशी कुबड्यांची गरज नाही'*. प्रबोधन प्रकाशन ज्योती नोव्हें. २०१२ इचलकरंजी.
4. डॉ. विनायक गोविलकर *'रिटेलमधील थेट विदेशी गुंतवणूक'* - ऑक्टो. २०१२, हरि ओम प्रकाशन, नाशिक.
5. A. T. Kearney's Report on Indian Retail - 2008.
6. Research Report by Sharetpsinfo - *'FDI in Retail and is impact or Indian Market.'*
7. Govt. of India Ministry of Commerce and Industry Dept. of Industrial Policy & Promotion Press note No. 4 & 5, (2012 Series) Dated 20 Sept. 2012.
8. Economic Survey of India - 2010-11, 2011-12.
9. Economic and Political weekly (Feb. 2005).
10. www.retailguru.com
11. www.managementparadise.com

# अन्नप्रक्रिया उद्योग आणि थेट परकिय गुंतवणूक

साधना वाल्मिक पाटील, ओझर (मिग),
वाणिज्य अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, जि. नाशिक.
भ्रमणध्वनी - ९६०४५६९१३१.

भारतीय अर्थव्यवस्था ही शेती प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. अत्यंत पुरातन काळापासून भारतात आजही शेती क्षेत्राला अनन्य साधारण महत्त्व आहे. राष्ट्रीय उत्पन्न समिती आणि मध्यवर्ती सांखिकीय संघटनेच्या (CSO) आकडेवारीनूसार १९५०-५१ मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात (GDP) शेतीक्षेत्राचा वाटा ५६.५% होता. २०११-१२ मध्ये तो १४.१% असलेला दिसून येतो. असे असले तरी अजूनही भारतातील २/३ लोकसंख्या शेती व शेतीपुरक व्यवसायात उपजिवेकेसाठी व लोकसंख्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रितीने रोजगारासाठी शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

अलिकडील काळात शेती आधारित उद्योगांचे व शेती आधारित अन्नप्रक्रीया उद्योगांचे महत्त्व उत्पन्न व रोजगार वाढीच्या दृष्टीने वाढत असल्याचे दिसून येते. अमेरीकेचा दोनशे वर्षापूर्वीचा शेतीचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, अमेरीकेची आर्थिक क्रांती मक्याची लागवड आणि त्यावर होणारी प्रक्रीया यातून झालेली आहे. अमेरीकेत मक्यापासून १५० ते २०० प्रकारचे पदार्थ तयार केले जातात. भारत हा जगातील दूसऱ्या क्रमांकाचा अन्नउत्पादक देश असल्याने शेती आधारीत अन्नप्रक्रीया उद्योगांना विकासाची मोठी संधी आहे. भारतात १८० दसलक्ष टन फळे व भाजीपाल्याचे उत्पादन होते त्यापैकी ३० ते ४०% शेतमालाचे नुकसान शेतापासून ग्राहकांना पोहोचेपर्यंत होत असते. प्रक्रीया उद्योगाचा विचार केला असता जगामध्ये प्रगत देशात ७० ते ८०% शेतमालावर प्रक्रीया होते, भारतात हे प्रमाण केवळ २% आहे. सन २००९-१० च्या आकडेवारीनुसार तेलबिया, धान्य, कडधान्य यासारख्या टिकावू शेतमालाचे प्रक्रीयेअभावी होणारे नुकसान १०%, अर्धनाशवंत उत्पादन यांत बटाटा, कांदा, रताळी, कंदमूळ इत्यादीचे होणारे नुकसान १५% व नाशवंत शेतमाल यात भाजीपाला, फळे यांचे प्रक्रीयेअभावी होणारे नुकसान २०%

एवढे आहे. हे नूकसान ८७,८०० को.रु. एवढे आहे. यावरून शेतीवर आधारित उद्योग व शेती प्रक्रीया उद्योगांचे महत्त्व लक्षात येईल.

**शेती आधारित अन्नप्रक्रिया उद्योग:** अन्नप्रक्रिया उद्योग हा भारतातील ५ व्या क्रमांकाचा एक मोठा उद्योग आहे. २००७ मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात या उद्योगाचा वाटा ७.३% एवढा होता व भारतातील एकूण औद्योगिक उत्पादनात या उद्योगाचा वाटा ७% होता. या उद्योगाने १.६ दशलक्ष कामगारांना प्रत्यक्षपणे रोजगार पुरविलेला होता. भारताची विविध शेती उत्पादनातील जागतिक स्थिती पाहता असे दिसून येते की, भारताचा गहू उत्पादनात जागतिक पातळीवर २ रा क्रमांक, भात उत्पादनात २ रा क्रमांक, दुध उत्पादनात प्रथम क्रमांक, फळ उत्पादनात २ रा क्रमांक, भाजीपाला उत्पादनात १ क्रमांक, ऊस उत्पादनात २ रा क्रमांक, तेलबिया उत्पादनात ३ रा क्रमांक आहे, ही जागतिक स्थिती पाहता भारतात शेती आधारित अन्नप्रक्रिया उद्योगांच्या विकासास मोठा वाव आहे.

**अन्नप्रक्रिया उद्योगात थेट परदेशी गुंतवणूक:**

भारतातील अन्नप्रक्रिया उद्योग हा उत्पादन, उपभोग आणि आयात निर्यातीच्या दृष्टीने एक सगळ्यात मोठे उगवते क्षेत्र आहे. त्यामूळे ही बाजारपेठ देशांतर्गत आणि परदेशी गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करत आहे. २०१० पर्यंत या बाजारपेठेने भांडवल श्रम तंत्रज्ञान आणि वित्त स्वरूपात ३२ दशलक्ष यू.एस.डॉलर एवढी गुंतवणूक आकर्षित केलेली आहे. भारतात अन्नप्रक्रिया क्षेत्रात थेट परदेशी गुंतवणूकीला १००% ॲटोमॅटीक रूट (स्वयंचलीत मार्गाने) परवानगी देण्यात आलेली आहे. ही परवानगी अन्नप्रक्रिया क्षेत्र शेती आधारीत उत्पादने, दुध आणि दुध उत्पादने, मांस आणि मच्छीमारी उत्पादने यांना देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अशी गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना भारत सरकारच्या या क्षेत्रांसाठीच्या विकास योजनांचा फायदा घेता येवू शकेल. ११ व्या पंचवार्षिक योजना काळात भारत सरकारने परदेशी पोर्ट फोलीओ गुंतवणूकीच्या विकासासाठी (FPI) ÷मेगा फूड पार्क' योजना सूरू केलेली आहे व त्यासंदर्भातील ३० प्रोजेक्टना मान्यता देण्यात आलेली आहे.

भारतातील अन्नप्रक्रिया उद्योग हा उत्पादन, उपभोग निर्यातीच्या दृष्टीने ५ व्या क्रमांकाचा उद्योग आहे. या उद्योगाने १३ दशलक्ष लोकांना प्रत्यक्षपणे ३५ दशलक्ष लोकांना अप्रत्यक्षपणे रोजगार पूरविलेला आहे. भारतातील वस्तुनिर्मिती क्षेत्रातील स्थूल देशांतर्गत उत्पादनात अन्नप्रक्रिया उद्योगाचा वाटा १४% निर्यातीतील वाटा १३% एवढा आहे. या उद्योगाचा सध्याचा वार्षिक विकासाचा दर १०% एवढा आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणुकदार या उद्योगाकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित झालेले दिसून येतात.

भारतीय शेती आधारित अन्नप्रक्रिया उद्योगात गुंतवणूकीसाठी प्रचंड वाव आहे. उदा. मेगा फूड पार्क, शितगृहांची साखळी, शेती पायाभूत सूविधा, वितरण साखळी, वाहतूक, फळ आणि भाजीपाला उत्पादने, प्राणीजन्य उत्पादने (मांस, मत्स्य, सी फूड इत्यादी समुद्री उत्पादने) फास्ट फूड, वाईन शेती आधारित उद्योगांसाठी लागणाऱ्या विविध सामग्री, पॅकींग इत्यादी या सर्व क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूकीला मोठा वाव आहे.

भारतात शेतीप्रक्रीया उद्योगासाठी कच्च्यामालाची प्रचंड उपलब्धता असली तरी केवळ २% उत्पादनावर प्रक्रीया केली जाते. इतर देशांमध्ये उदा. यु.एस.ए. मध्ये एकूण उत्पादनापैकी ६५%, फिलीपाईन्स ७८%, चीन ४०%, ब्राझील ३०%, मलेशिया ८०% शेती उत्पादनावर प्रक्रीया केली जाते. या दृष्टीकोनातून थेट परकीय गुंतवणुकीकडे बघावे लागेल.

भारतातील अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाने शेती आधारित उद्योगात थेट परकीय गुंतवणूक यावी म्हणून अनेक प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत की ज्यात दररोज या क्षेत्रात येवू इच्छिणारे प्रस्ताव रोजच्या रोज त्वरीत मंजुरी देण्याची यंत्रणा उभी करण्यात आलेली आहे. १००% थेट परदेशी गुंतवणुकीला स्वयंचलीत यंत्रणेनुसार परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच विविध प्रकारच्या करांमधून सवलत, अन्नप्रक्रिया उद्योग सूरू करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी वित्तीय सहाय्य इ. उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. शेती आधारित उद्योगांत निर्यातीभिमूख थेट परदेशी गुंतवणूक करण्यात येत असेल तर अशा उद्योगांसाठी विविध सवलती आणि प्रोत्साहने मंत्रालयाकडून दिली जातात. उदा. भांडवली वस्तू आयात करात सवलती, अशा उद्योगांसाठी लागणारा कच्चामाल वस्तू यांच्या आयात करात सवलत इत्यादी विविध सवलतींमुळे या क्षेत्राकडे थेट परदेशी गुंतवणूक आकर्षित होत आहे. १९९१ ते २००५ पर्यंत अनिवासी भारतीयांनी ४५.१९ अब्ज डॉलर जी एकूण थेट विदेशी गुंतवणूकीच्या ३.३% आहे, एवढी गुंतवणूक या क्षेत्रात केलेली आहे. आज भारतातले थेट विदेशी गुंतवणूक आकर्षित करणारे अन्नप्रक्रीया उद्योग क्षेत्र हे ७ व्या क्रमांकाचे सर्वाधिक मोठे क्षेत्र आहे. २०१५ पर्यंत भारत सरकारने अन्नप्रक्रीया उद्योगात २५.०७ अब्ज यू.एस.डॉलर एवढा थेट विदेशी गुंतवणूकीचा इष्टांक ठेवला आहे. त्यामुळे भारताचा जागतिक अन्न व्यापार १.६% वरून ३% पर्यंत वाढू शकेल आणि नाशवंत प्रक्रीया वस्तूंचा वापर ६% वरून २०% पर्यंत वाढू शकेल. राष्ट्रीय धोरणानूसार अन्नप्रक्रीया उद्योगाची विकासपातळी २०१० ते २०२५ या दरम्यान १०% वरून २५% पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. २०१०-११ या अर्थिक वर्षात नोव्हेंबर २०१० अखेर अन्नप्रक्रीया उद्योगात ५७६.५० को. रु. एवढी थेट विदेशी गुंतवणूक झाली होती. हि गुंतवणूक भारतातील एकूण थेट विदेशी गुंतवणूकीच्या (५३४४.२२ कोटी रु.) ११% एवढी होती. २००९ ते २०१२ या ३ वर्षाच्या काळात भारतातील अन्नप्रक्रीया उद्योगात ६११७.६३ कोटी रु. एवढी थेट विदेशी गुंतवणूक झालेली आहे.

ऑगस्ट १९९१ ते ऑक्टोबर २००६ या कालावधीत भारतीय अन्नप्रक्रीया उद्योगात यू.एस.एस, नेदरलँड, फ्रान्स, इटली व थायलंड या देशांनी थेट परकीय गुंतवणुकीसाठी २९६ प्रस्ताव दाखल केले होते ज्यांचे एकूण मूल्य २१२७.१ दशलक्ष यू.एस.डॉलर एवढे होते. भारताच्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीबरोबर याचे प्रमाण ७५.१९% एवढे होते. म्हणजेच या वरून असे दिसून येते की, भारतात थेट परकीय गुंतवणुकीसाठी अन्नप्रक्रिया उद्योग क्षेत्र अतिशय महत्त्वाचे क्षेत्र आहे.

थेट विदेशी गुंतवणुकीबाबतचे सरकारचे

अनुकूल धोरण आणि शेती आधारीत अन्नप्रकिया उद्योगांचे उत्पादन, उपभोग, रोजगार आणि आयात निर्यातीच्या दृष्टीने असलेले महत्त्व यामुळे भारतात या क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक वाढत आहे. अन्नप्रक्रीया उद्योगांत थेट विदेशी गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये सगळ्यात जास्त प्रमाण यू.एस.ए. चे आहे. भारत सरकार व भारतातील अन्न प्रक्रीया उद्योग मंत्रालयाने दिलेल्या विविध सोयी व सवलतींमुळे अन्नप्रकिया क्षेत्राकडे थेट विदेशी गुंतवणूक अधिकाधीक आकर्षित होत आहे. भारतात वाढते शहरीकरण, दरडोई उत्पादनात झालेली वाढ, स्त्रीयांचा श्रमशक्तीत वाढलेला सहभाग यामूळे मागणीच्या रचनेत बदल घडून आलेला आहे त्यामूळे अन्नप्रकिया उद्योगांत मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग वाढत आहे. भारतातील शेती आधारित अन्नप्रकिया उद्योगांमध्ये एक अशी शक्ती आहे की जी खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचा विकास घडवून आणू शकेल या दृष्टीने शेतीआधारित उद्योगांना भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे व हे स्थान टिकविण्यासाठी या उद्योगात थेट विदेशी गुंतवणुकीला मोठी संधी आहे.

**संदर्भसूची:**


१) Economic and political weekly, (2003) *Food processing: unrealized potential*, Editorinal, Vol-38.

२) Fact *SHEET ON FOREIGN DIRECT INVESTMENT (FDI)* From August 1991 to Jan 2011.

३) India, Ministry of Food processing and Agriculture (Dept of Agriculture), *Annual Report.*

४) Chakraborty, C. and P. Basu (2002) *Foreign Direct Investment and growth in India : A cointegration Approach.* Applied Economics.

५) Reserve Bank of India (2011) RBI, *Handbook of Statistics on the Indian Economy.*

६) V. Venkiah (1987), *Impact of Agro Based Industries on Rural Economy.*

७) Govt. of India, *Economic Survey - 2011-12* http://indiabudget.hic.in.

८) Datt Gaurav, Mahajan Ashwini, Sundaram, *Indian Economy* S. Chand (2012).

९) Report of Agro processing Industries in India, Growth, status and prospects, R.P. Kachru. Page 116.

१०) *अर्थसंवाद* ऑक्टोबर-डिसेंबर २०१२, जूलै-सप्टेंबर-२०१२.

# विदेशी गुंतवणूकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**पी.ई.विभुते, नांदेड,**
विभाग प्रमुख,
पदवी -पदव्यूत्तर व संशोधन अर्थशास्त्र विभाग,
यशवंत महाविद्यालय, नांदेड
भ्रमणध्वनी: ७५०७२६१६२६

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आर्थिक व राजकीय परिवर्तनात जागतिकीकरण किंवा वैश्विकीकरण हे अत्यंत महत्वाचे मानले जाते. जागतिक व्यावसायिक पर्यावरणात जी आधुनिक अशी परिवर्तने घडून येत आहेत त्यात जागतिकीकरणाचे अत्यंत मानाचे प्रमुख स्थान आहे.

**जागतिकीकरणाची व्याख्या:**

÷÷जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणीमान, शासन, समाजव्यवस्था व संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रामधून होत राहणारे रूपांतरण होय.''

जागतिकीकरण या संज्ञेत पुढील बाबींचा समावेश होतो.

१. वित्त व भांडवल यांची मालकी
२. बाजार व स्पर्धा
३. संशोधन व ज्ञान यांना संलग्न तंत्रज्ञान
४. नवनव्या वस्तुद्वारा उपभोग व राहणीमानाचे आधुनिकीकरण
५. संपूर्ण जगाविषयी जाणीव
६. राजकीय संलग्नता व जागतिक नियंत्रणाची क्षमता व व्यवस्थापन या सर्वांचा समावेश करता येतो. अशा प्रकारे जागतिकीकरण हे एक आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रांना व्यापणारे अस्त्र आहे.

आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीच्या व्याख्येनुसार *÷÷जागतिकीकरण म्हणजे वस्तु, सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह, अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता त्यांच्या साह्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परावलंबित्व होय.''*

खरे पाहता जागतिकीकरण ही संकल्पना भारतीयासाठी फारशी नवीन नाही तर ती फार पूर्वीपासून रामायण व महाभारत या सारख्या हिंदू महाकाव्यामध्ये सुद्धा इतर देशाशी होत असलेला आंतरराष्ट्रीय व्यापार दिसून येतो. आधुनिक कालखंडात म्हणजे १९७० च्या दशकापासून जागतिकीकरणास म्हणजेच शिथिलीकरणास किंवा उदारीकरणास सुरूवात झाली. बहुराष्ट्रीय कंपन्या व अमेरिका यांच्या पुढाकारातून त्याचबरोबर अमेरिकेच्या वर्चस्वाखाली येणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्या साह्याने कर्ज देताना करण्यात येणाऱ्या अटीत उदारीकरणाची कार्यवाही करण्यात येत आहे.

सोविएत रशियाचे विभाजन झाल्यापासून पूर्व युरोपातील देशांनी स्वत: रशियानेही या तत्त्वाचा स्वीकार केला आहे. १९७० च्या पूर्वी प्रभावी असलेले साम्यवादी तत्वज्ञान अडगळीत गेले. उत्पादक निर्माणक उद्योग स्थापने व चालविणे हे सरकारचे क्षेत्र नसून शिक्षण, आरोग्य व मानव विकास हे सरकारची क्षेत्रे आहेत असे नव्याने स्पष्ट करण्यात आले. एकूण राष्ट्रीय विनियोगातील सरकारी विनियोगाचे प्रमाण कमी झालेले नाही. ते सरासरीने २५ ते ४० टक्क्याच्या दरम्यान आहे परंतु सरकारी विनियोगाची क्षेत्रे बदललेली आहेत. स्वत: उद्योग न चालविता खाजगी क्षेत्राला संपत्ती व रोजगार वाढविण्यास प्रोत्साहन मिळेल असे वातावरण निर्माण करणे, विज्ञान व तंत्रज्ञान यातून विशेष गुंतवणूक करणे, उपभोक्त्याचे हित साधणारी स्पर्धा निरोगी ठेवण्यासाठी, बाजार व्यवस्था निर्माण करणे ही सरकारची क्षेत्रे आहेत असे आता मानले जात आहे.

शिथिलीकरण किंवा उदारीकरण हे खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन देणारे साधन आहे. जागतिकीकरणातून संपूर्ण जगाची आर्थिक उन्नती करणे हे नव्या युगाचे उद्दिष्टय आहे. पूर्ण रोजगारासाठी अर्थव्यवस्थेत सक्रिय हस्तक्षेप व प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याचे धोरण १९५० च्या दशकात अवलंबिले परंतु त्यामुळे नोकरशाहीची पकड वाढली. लायसन्स राज निर्माण झाले. कामगार संघटनांचा स्वार्थ वाढला. त्यातून अरेरावीत वाढ झाली.

सरकारी उद्योगाच्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी वाढत्या प्रमाणात कर्जाची उभारणी करावी लागली. खाजगी उपक्रमशिलतेची कुचंबना होऊ लागली. अशा विविध कारणामुळे सरकारने उत्पादन क्षेत्रातून अंग काढून घ्यावे या विचाराला समर्थन मिळू लागले. १९७० च्या दशकात दुष्काळ, भाववाढ, बेकारी या सारख्या संकटांना तोंड द्यावे लागले. राजकोषीय व मौद्रिक धोरणे अयशस्वी ठरली याच काळात बहुराष्ट्रीय कंपन्या वाढल्या व त्यातून जागतिकीकरण व शिथिलीकरणाने जोर धरला.

**भारत आणि जागतिकीकरण:**

भारताने १९९१ मधील आर्थिक धोरण हे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्वाचे पाऊल होय. या वर्षात भारत सरकारने अर्थव्यवस्थेचे शिथिलीकरण व जागतिकीकरण करण्याकरिता आर्थिक सुधारणांची एक शृंखलाच सुरू केली. या आर्थिक सुधारणांचा कल हा बाजार अर्थव्यवस्था व देशाच्या जागतिकीकरणाकडे भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मीकीकरण व्हावे या उद्देशाने आर्थिक सुधारणांची ही नीती अवलंबविण्यात आली.

**जागतिकीकरणाचा अर्थ-व्यवस्थेवर होणारा परिणाम:**

भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा संस्थापक सदस्य असल्यामुळे तिच्या निर्णयाचे पालन करावे लागले याचे परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवरील विविध क्षेत्रावर झाले त्याची चर्चा पुढीलप्रमाणे:

१.भारतीय उद्योग क्षेत्र- आयातीवरील प्रशुल्क कमी करणे, उपभोग्य वस्तुच्या आयातीवरील नियंत्रणे हटविणे, मात्रात्मक निर्बंध दूर करणे इ.बाबतीत जागतिक व्यापार संघटना (WTO) भारतावर दडपण आणीत आहे. भारताने प्रामाणिकपणे करारातील अटीचे पालन करून सिमाशुल्क दरवर्षी घटवित नेले. आयात प्रशुल्क लावून स्वदेशी उद्योगांना दिलेले संरक्षण क्रमशः हटवित नेले याचा परिणाम म्हणजे भारतीय उत्पादनांना विदेशी मालाशी स्पर्धा करावी लागली. उद्योगाची शिखर संस्था असलेल्या भारतीय उद्योग महासंघाने भांडवली उद्योग क्षेत्र आयात शुल्क मुक्त केल्याबद्दल झालेल्या नुकसानी बद्दल म्हटले आहे ÷÷देशांतर्गत भांडवली वस्तु उद्योगांना विदेशामधून आदेश न मिळाल्यामुळे ५००० कोटी रु. नुकसान झाले आहे. देशी उद्योगांना उत्पादन शुल्क, विक्रीकर, चुंगीकर भरावे लागतात. परंतु आयात वस्तु ह्या भारतात आयात शुल्क न लागता येतात या स्वस्त आयातीमुळे भारतीय उद्योगावर अतिशय प्रतिकुल परिणाम झालेला आहे. २००३ च्या पूर्वीपासूनच भारतातर्फे सर्वच प्रकारचे मात्रात्मक प्रतिबंध हटविण्यात आलेत, त्यामुळे भारतीय बाजारपेठ्या विदेशी मालांनी ओसंडून वाहू लागल्या.

२.जुन्या कार आयातीची परवानगी: भारत सरकारने कार आयातीला परवानगी दिल्यामुळे भारतीय ॲटोमोबाईल उद्योगावर संक्रांत ओढावली आहे. प्रसिद्ध उद्योगपती राहुल बजाज यांनी या कृतीला राष्ट्रविरोधी कार्य म्हणून संबोधले आहे.

३.चीनमधून होणारी वस्तू आयात- अलिकडच्या काळात भारतीय बाजारात चीनमधील वस्तुंचा सुळसूळाट झाला आहे. चीन आता WTO चा सदस्य असल्यामुळे चीन करत असलेल्या डंम्पीग विरूद्ध होणारी कार्यवाही ही संघटनेच्या नियमानुसारच होईल. नियमित व बेकायदेशीर अशा दोन्ही मार्गांनी प्रचंड चीनी मॉल भारतात येत आहे. याचे दुष्परिणाम भारतातील उद्योगावर मोठ्या प्रमाणावर होत आहे.

४.जागतिक व्यापार संघटनेचा लघू उद्योगावरील होणारा परिणाम: भारतात लघू उद्योग ४० टक्के कारखानी मालाचे उत्पादन करून ५० टक्के रोजगार संधी देतो, ३३ टक्के आयात करतो. अशा लघु उद्योग क्षेत्रावर जागतिकीकरणामुळे मोठे संकट ओढावले आहे. कारण या क्षेत्रात होणाऱ्या स्वस्त वस्तुंची स्पर्धा करावयाची आहे. रोजगार निर्मितीच्या बाबतीत कृषी क्षेत्रानंतर या क्षेत्राचा क्रमांक लागतो. हे क्षेत्र १८० व्यक्तींना रोजगार देत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्याद्वारे आईस्क्रीम, अगरबत्ती, खाद्य संसाधने, पेय जल इ.बाबतीतही लघु उद्योगाला स्पर्धा करावी लागत असल्यामुळे दूष्परिणाम भोगावे लागत आहेत. कोकाकोला, पेप्सी या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतातील शितपेयाचे उद्योग बंद करून टाकले.

५.विकसित देशाचे दुटप्पी धोरण: विकसित देश हे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात व्यापार, भांडवल व तंत्रज्ञान यांच्या मुक्त प्रवाहाला प्रोत्साहित करत आहेत की केवळ स्वार्थ साधण्याकरिता

जागतिकीकरणाचा वापर करीत आहेत हा महत्वाचा प्रश्न आहे. विकसित देश हे बऱ्याचशा सवलती प्रशुल्क यात कपात करण्याकरिता विकसनशील देशावर मोठ्या प्रमाणावर दडपण आणत आहेत.

६.कापड उद्योग करारात अनुचित व्यवहार: भारत कापड उद्योगात स्पर्धा करण्यास समर्थ आहे. म्हणून विकसित देश विविध संरक्षणवादी उपयांचा अवलंब करून कार्यक्षम व कुशल कापड उद्योगपतींना बाजारात प्रवेश करण्यापासून रोखत आहे. विकसित देशानी आपल्या देशीय कापड उद्योगाचा हिस्सा कमी करण्याकरिता १० वर्षाचा दीर्घ काळ मागितला आहे. या उलट विकसनशील देशावर आपले प्रशुल्क, मात्रात्मक प्रतिबंध हटविण्याकरीता व बौद्धीक संपत्ती अधिकार इ. त्वरित लागू करण्याकरीता विकसित देश दडपण आणत आहेत, म्हणजेच विकसित देश ह्या बाबत अनुचित असा डाव टाकत आहेत.

७.बालकामगार: विकसनशील देशातील आयातीचा प्रभाव पडतो तेव्हा अमेरिका भारतीय आयातीबाबत पर्यावरण व मानवाधिकाराबाबत बरेचसे मुद्दे उपस्थित करून भारतीय मालाच्या आयातीवर बंदी घालीत आहे. या वस्तुच्या उत्पादनात बालकामगारांचा वापर होतो म्हणून या उत्पादनाच्या आयातींना अमेरिकेचा विरोध आहे. परंतु रूगर विश्वविद्यालयाद्वारे नुकत्याच करण्यात आलेल्या अध्ययनानुसार २९०२०० बालकामगार हे संयुक्त राज्य अमेरिकेतील दुकाने, कारखाने व फर्म मध्ये अत्यंत खडतर जीवन जगत आहेत.

८.अमेरिकेचा डंपीग विरोधी कायदा व कॉपी राईट कायदा विसंगत- अमेरिकेच्या डंपीग विरोधी कायदा व WTO च्या सिद्धांताविरूद्ध आहे अशी तक्रार जपान व युरोपीयन आर्थिक समुदायाने केली आहे. व तक्रारीत तथ्य असल्याचे प्रतिपादन WTO ने केले आहे.

९.कृषी बाबतचा करार: या करारानुसार विकसीत देशानी कृषीला देण्यात येणारे आर्थिक सहाय्य ०६ वर्षाच्या दरम्यान २० टक्के कमी करावयाचे आहे. व विकसनशील देशांनी १० वर्षात १३ टक्के करावयाचे आहे. परंतु विकसित देशांनी ग्रीन बॉक्स व ब्लू बॉक्स सहाय्य अशी पळवाट काढून आपल्या देशातील कृषी सहाय्य चालू ठेवले आहे.

**संदर्भ सुची:**


१. डॉ.जी.एन.झामरे ÷÷*आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त* '' पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, जून २००६.
२. के.एन.वर्मा ÷÷ *माईक्रो ईकॉनॉमिक थेयरी*'' विशाल पब्लिशिंग कंपनी जालंधर, नवी दिल्ली २०१०.
३. आर.एन.सोनी. ÷÷*लिडिंग इश्यूस ईन ॲग्रीकल्चरल ईकॉनॉमिक्स*'' वशाल पब्लिशिंग कंपनी जालंधर, नवी दिल्ली २०१०.
४. रॉबिन्स.एल. ÷÷*एन एसे ऑन दि नेचर ॲन्ड सिग्नीफिकन्स ऑफ ईकॉनॉमिक्स*'' मॅकमिलन कंपनी, लंडन, १९४६.

# जागतिकीकरणाचा ग्रामीण विकासावर परिणाम

प्रज्ञा महेन्द्र बागडे, नागपूर.
विभाग प्रमुख, अर्थशास्त्र
पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य
महाविद्यालय, नागपूर.
मो. ९६६५०१८४३२

भारत हा खेड्यांनी बनलेला देश आहे. आजही एकूण लोकसंख्येच्या ६८% लोकसंख्या ग्रामीण आहे. त्यामुळे जोपर्यंत खेड्यांचा म्हणजे ग्रामीण भागाचा विकास होणार नाही, तोपर्यंत भारताचा विकास होणे शक्य नाही. भारताच्या विकासाचे प्रतिबिंबच मुळात खेड्यांच्या म्हणजेच ग्रामीण भागाच्या विकासात आहे. म्हणूनच ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास हा जागतिकीकरणाच्या स्पर्धेत कळीचा मुद्दा ठरला आहे.

**ग्रामीण विकास:**

संयुक्त राष्ट्र - संघटनेने ग्रामीण विकासाची संकल्पना पुढील शब्दात मांडली आहे ÷÷*शासनाच्या व लोकांच्या संघटीत प्रयत्नाद्वारे सर्व समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमांना हातभार लावण्यास शिक विणारी प्रक्रिया म्हणेजच ग्रामीण विकास होय.*'' भारतीय नियोजन मंडळाने ग्रामीण विकासाची संकल्पना अशी केली की, ÷*ज्या प्रक्रियेमुळे जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणली जाते त्या प्रक्रियेस ग्रामीण विकास असे म्हणता येईल.*'' नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनीही कोणत्याही राष्ट्राच्या स्थीर व समतोल विकासासाठी ग्रामीण भागाच्या विकासावर भर दिला आहे. एकूणच आजच्या जागतिकीकरणाच्या युगात ग्रामीण विकासाचे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट झाले आहे.

**जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील परिणाम:**

- जागतिकीकरणाच्या माध्यमातून भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारात शोधनशेष अनुकूल करण्याचा उद्देश होता. त्यासाठी जास्तीत जास्त वस्तू व सेवा निर्यात करून कमीत कमी वस्तूंची आयात करावी. ज्या वस्तू विकसित देशांकडून सतत आयात कराव्या लागतात, अशा वस्तू किंवा त्यांना पूरक ठरणाऱ्या वस्तू देशात बनविणे म्हणजे ÷आयात प्रतिस्थापन' करणे हा उद्देश होता परंतु

जागतिकीकरणामुळे वस्तू व सेवांच्या निर्यातीपेक्षा आयात जास्त झाली आहे.

- जागतिकीकरणाच्या धोरणामुळे भारतात विकसित देशात निर्माण केलेल्या उच्च दर्जेदार वस्तु कमी किंमतीत भारतीय बाजारपेठेत उपलब्ध झाल्या. भारतात कुटीर व लघु उद्योगात निर्माण झालेली वस्तु ही विकसित देशांच्या वस्तुंच्या स्पर्धेत टिकाव धरू शकत नसल्यामुळे व त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रोत्साहन सरकारकडून मिळत नसल्यामुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रात बेरोजगारीचे प्रमाण सतत वाढत आहे.
- कृषीच्या बाबतीत जर जागतिकीकरणाचा विचार केला, तर कृषीचे उत्पादन दिवसें-दिवस कमी होत आहे. कृषीला पूरक असलेल्या वस्तुंचा व उदयोगांचा फारसा विकास झालेला नाही. जागतिकीकरणामुळे शासनाच्या किमतीवरील नियंत्रणामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदतीचा अभाव असल्याने छोटया कृषकांचे उच्चाटन होणार आहे. यात प्रत्येक देशाला स्वतंत्रपणे आपल्या कुवतीनुसार आणि सोयीप्रमाणे जगण्याचा व विकासाचा हक्क आहे, हे तत्वच नाकारले जात आहे.
- अमेरिकेसारखे विकसित देश आपल्याला अनुकूल असलेल्या नीतीचा उपयोग करून विकसनशील देशांवर आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विकसित व विकसनशील देशात सलोख्याचे संबंध निर्माण होवून मुक्त व्यापार, भांडवल, तंत्रज्ञान व श्रमाचा प्रवाह होईल असे अनुमान अपेक्षित होते. श्रमाचा प्रवाह विकसित व विकसनशील देशात होतांना दिसत नाही.
- जागतिकीकरणामुळे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक व शिक्षणविषयक विकास होईल असे अपेक्षित होते, पण आजही असे निदर्शनास येते की, बालविवाहा सारख्या प्रथा राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यांमध्ये सूरूच आहेत. बालमृत्यूचे प्रमाण तर आहेच एवढेच नव्हे तर कुपोषित बालके जन्माला येत आहेत. आरोग्याच्या सोयी आजही ग्रामीण भागात पूर्णतः मिळत नाही. फि रता दिवाखाना ही गोष्ट मात्र कल्पनाच राहिली आहे.
- ग्रामीण क्षेत्र वीज वितरणातील असमानतेमुळे आणखी अधोगतीला चालले आहे. याचा प्रत्यक्ष प्रभाव शेती उत्पादकतेवर, उत्पन्नावर दिसून येत आहे. अन्नदात्या शेतकऱ्यांच्या अन्नान्न दशेत अधिकच भर पडत आहे. आजही आम्ही पाहतो, की ग्रामीण भागात ८ ते १० तास विद्युत पुरवठा खंडीत केला जातो. आजही हजारोच्या संख्येने अशी गावे दिसुन येतात की जिथे शुद्ध पिण्याचे पाणी मिळत नाही. काही ठिकाणी तर २ ते ३ कि.मी दूर पाण्यासाठी जावे लागते.
- जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योग मोडकळीस आल्यामुळे तरूण रोजगारासाठी शहरांकडे आकर्षित होत असतात. आजच्या तरूण पिढीच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मोकळे व उच्च प्रतिचे जीवन जगावे, असे तरूण पिढीला वाटते. त्यामुळे विशेषतः तरूण शहरांकडे स्थलांतर करीत आहेत. शहरातील रोजगाराच्या संधी, झगमगाट, मनोरंजनाच्या सुविधा, उच्च प्रतिचे जीवनमान, इतर सोयी-सुविधा यामुळे ग्रामीण

युवकांची मानसिकता बदलत चालली आहे व तो शहराकडे आकर्षित होवू लागला आहे.

- ग्रामीण लघुउद्योग व कुटीरोद्योगावर मोठ्या प्रमाणात खर्च झाला असला तरी आधुनिकीकरणामुळे नागरी विभागांचा मोठ्या प्रमाणात विकास होवून गावे ओस पडताना दिसत आहेत. अनेक लघु उद्योग व कुटीर उद्योग येवून जीवनावश्यक वस्तुंची निर्मिती मोठमोठया कारखान्यांतून होतांना दिसते.
- जागतिकीकरणामुळे एकूण आर्थिक विकासाचा वार्षिक दर वाढला असला तरी रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध झालेल्या दिसत नाहीत. उलट आर्थिक विकासाबरोबर बेकारी वाढतांना दिसत आहे.

भारताने आपले अंतर्गत उत्पादन, शिक्षण, उद्योग, रोजगार, कृषीक्षेत्राचा विकास करून ह्या तत्वाचा अवलंब केल्यास ही नीती देशाच्या विकासाला पूरक ठरेल अन्यथा स्पर्धात्मक क्षेत्रात भारताला मागे वळावे लागेल.

उपाययोजना:

- ग्रामीण विकासातील प्रमुख समस्या म्हणजे आर्थिक विषमता होय. सर्वांत कमी उत्पन्न असणाऱ्या ४०% असंघटीत क्षेत्रात सीमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवी, भुमीहीन शेतमजुरांचे प्रचंड प्रमाण होय. यामुळे ग्रामीण विकासामध्ये अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात. ग्रामीण विकास तेव्हाच शक्य आहे, जेव्हा शेतातील उत्पादन क्षमता, लघु उद्योग व कुटीर उद्योग या सर्वांचा ताळमेळ बसेल.
- जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत भारतीय अर्थव्यवस्थेचे अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल, तर ग्रामीण भागात विजेसारख्या पायाभूत सुविधांचा विकास करणे गरजेचे आहे. अन्यथा ग्रामीण-शहरी उत्पन्न वितरणातील दरी अधिकच वाढत जाईल व त्याचे परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेला भोगावे लागतील.
- ग्रामीण विभागाचा विकास घडवून आणण्यासाठी व बेकारी कमी करण्यासाठी कृषी विषयक लघु व कुटीर उद्योगांना महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यासाठी कृषी विषयक लघु व कुटीर उद्योगांच्या स्थापनेवर भर देण्यात यावा. यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल व कायम उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल.
- ग्रामीण विकासाच्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना लाभ मिळावा यासाठी शासकीय यंत्रणेकडून होत असलेला गैरप्रकार व भ्रष्टाचाराचे निर्मूलन होणे आवश्यक आहे. तेव्हाच विकासाच्या विविध योजनांचा मूळ हेतू साध्य होवू शकेल.
- ग्रामीण भागातील अंधश्रद्धेच्या निर्मुलनाकरीता सामाजिक संघटनांद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. यामुळे ग्रामीण जनतेमधील अंधश्रद्धा व दैववादी प्रवृत्ती कमी होण्यास मदत होईल व ते आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करतील.
- शेतकऱ्यांच्या कृषी मालाला मिळणारा भाव लागत खर्चावर आधारित असेल, तर तो मिळणाऱ्या उत्पन्नातून बचत करू शकतो. बचतीमुळे भांडवल निर्मिती होते. ग्रामीण

भागातच भांडवलनिर्मिती झाली, तरी त्याचा ग्रामीण विकासावर निश्चितच सकारात्मक परिणाम होइल.

- दळण-वळणाची साधने विकासात महत्वपूर्ण योगदान देतात. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये दळणवळणाची साधने ग्रामीण विकासात महत्वपूर्ण योगदान देवू शकतात. त्यादृष्टीने दळण-वळणाच्या साधनांचा विकास होणे आवश्यक आहे.
- ग्रामीण भागात उच्चशिक्षण व तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन केल्या, तर ग्रामीण जनतेतील कार्यकुशलता व कल्पकता वाढून भांडवल तसेच उत्पादनाच्या इतरही साधनांचा योग्य वापर होवू शकेल.

**निष्कर्ष:**

जागतिकीकरणात भारताने वरवर पाहता प्रगतीची मजल मारली असली, तरी एकूण लोकसंख्येच्या एका मोठ्या वर्गावर त्या प्रगतीचे थेंबाच पडले आहेत. तो प्रगतीच्या थेंबा तळागाळाच्या वर्गापर्यंत जो मोठा आहे तोपर्यंत झीरपलाच नाही. आपल्या विकासाच्या वाटचालीतील ही मोठी न्यूनता आहे. अर्थात् या सर्व बाबी प्रगतीमध्ये बाधा निर्माण करणाऱ्या आहेत.

प्राचीन भारतात खेडी स्वयंपूर्ण होती आणि त्याचबरोबर ती आत्मनिर्भर होती. उत्पादन, वितरण आणि उपभोग ह्या तिन्ही क्रिया एकाच पातळीवर पूर्ण होत असे. या पार्श्वभूमीवर ग्राम विकास साधायचा असेल तर सरकारने जनतेच्या सहकार्याने व विविध विकासाच्या योजनांच्या माध्यमातून आपल्या कार्यात सातत्य व नियमितता तसेच कार्यपुर्तता टिकवून ठेवल्यास देशातील सर्वच खेडी लवकरच विकसित होवून समृद्ध भारत, प्रगतीशील भारत साकार होऊ शकेल.

**संदर्भ सूची:**


१. प्रा. रा.ना. घाटोळे: *ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायिक विकास.*

२. डॉ प्रदीप आगलावे: *ग्रामीण व नागरी समाजशास्त्र.*

३. के.सी.प. खेर: *जागतिकीकरण समस्या, आशय आणि अनुभव.*

४. रूद्र दत्त,के.पी.एम.सुंदरम: *भारतीय अर्थव्यवस्था.*

५. डॉ. नंदा बाराहाते: *भारतीय ग्रामीण समुदाय विकास*

६. डॉ. विजय कवि मंडन: *कृषी अर्थशास्त्र*

७. डॉ. जी.एन. झामरे: *भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थव्यवस्था.*

८. प्रा. संजीव के. निंबाळकर: *समाजकल्याण*

९. तिजारे बाबा: *सामुदायिक विकास आणि विस्तार*, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, औरंगाबाद.

१०. डॉ. श्रीधर देशपांडे, डॉ. विनायक देशपांडे: *भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास).*

११. डॉ. भा.डी.खडसे, डॉ. ना. रा. चौधरी: *जातीव्यवस्था व अर्थव्यवस्था.*

१२. यशदा, यशमंथन: एप्रील जुन २०११

१३. यशदा, यशमंथन: जुलै सप्टेंबार २०११

# जागतिकीकरणाचे कृषी व ग्रामीण विकासावर परिणाम

**सुरेश रा. जगताप, अमरावती,**
श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९४२०८३२५९२.

जागतिकीकरणामध्ये कृषि क्षेत्राला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसते. जागतिकीकरणामुळे नवीन तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण झाली. तसेच उच्च दर्जाची बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, यंत्रसामुग्रीमुळे कृषि कार्य पहिल्यापेक्षा अधिक लवकर होण्यास मदत झाली. वेगवेगळ्या पिकासंबंधी आधुनिक माहिती लोकांना मिळाली. त्यामुळे कृषीउत्पादनात निश्चितच वाढ झाली. शेतकऱ्यांचा दृष्टिकोन बदलला. कृषिमध्ये नव-नवीन उद्योगाला तसेच गुंतवणुकीला चालना मिळाली. पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रमाण वाढले. आज भारतीय कृषि अन्नधान्य उत्पादन २५० दशलक्ष टनापर्यंत पोहचले हा जागतिकीकरणातून उपलब्ध झालेल्या तंत्रज्ञानाचा व जैववैज्ञानिक विकासाचा परिणाम म्हणावा लागेल. जागतिकीकरणामुळे सहकार शेती, करार शेती, व्यापारी शेती, गट शेती या नवीन संकल्पना कृषि क्षेत्रात येऊ लागल्या. विविध बाजार अंमलात आले, जसे वायदा बाजार, सुपर बाजार, किसान बाजार यामुळे शेतकऱ्याला फायदा झाला असे बोलले जाते. तसेच मत्स्यपालन, मधमाशीपालन, रेशीमपालन, वराहपालन, कुक्कुटपालन, पशुपालन इत्यादी कृषिपुरक व्यवसायांना चालना मिळाली. कृषि क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २०११-१२ ला १३.९ टक्के होता. कृषि क्षेत्राची निर्यात १९९०-९१ ला ६३.१७० दशलक्षावरुन २००६-०९ ला ७,७७,८३० दशलक्षापर्यंत वाढली म्हणजे निर्यातीमध्ये जवळ-जवळ १२ पटीने वाढ झाल्याची दिसून येते. जागतिकीकरणामुळे भारतीय शेतीला फायद्यापेक्षा तोट्याचाच जास्त सामना करावा लागत आहे.

## जागतिकीकरणाची कृषी अलाभदायकता:

अमेरीकेतून स्वस्त कापूस मोठ्या प्रमाणात आल्यामुळे स्थानिक कापसाचाभाव ४० टक्क्यांनी उतरला. कापुस पट्ट्यातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. इथल्या कारखानदारांना स्वस्त कापूस मिळाला पण तयार कपड्यांचे भाव मात्र उतरले नाही, उलट वाढले. कृषी व्यवस्थेचे भांडवलीकरण झाले

आहे. जागतिक वित्तीय संस्थांचा प्रवेश या क्षेत्रात झाला आहे. केवळ १६% शेती सिंचनाखाली आली आहे आणि ८४% शेती अजूनही जिरायती आहे. पावसाने हुलकावनी देणे, सिंचनाची पुरेशी व्यवस्था नसणे आदि कारणामुळे शेती तोट्यात असे दृष्टचक्र सुरु आहे. पिकेल ते विकले जात नाही, आणि विकले जाते ते पिकविता येत नाही. अशी शेतकऱ्यांची अवस्था आहे. भारतीय शेतकरी हा मुळात अल्पभूधारक आहे. त्यामुळे त्याचा उत्पादन खर्च अधिक आणि उत्पन्न कमी आहे. भारतीय कृषी व विपणन क्षेत्रात अनेक दोष दिसून येत असल्यामुळे ४० टक्के शेतकरी शेती सोडून देण्याच्या मानसिकतेत आहेत असे पाहणी अहवालात दिसून आले. जागतिकीकरणामुळे विकसित देश विकसनशील देशांवर दबाव टाकून अनुदान कमी करण्याचे सांगत आहेत व विकसित देश अनुदान देण्याचे धोरण आपल्या शेतकऱ्यांसाठी चालूच ठेवत आहेत. जागतिकीकरणामुळे देशाच्या कृषि मधून बहू पिकपद्धतीचे अस्तित्व संपुष्टात येत असून एक पिक पद्धती अस्तित्वात येत आहे. स्थानिक वाणांचा लोप होत आहे. कृषितील आधुनिक तंत्रज्ञानामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. बागायती शेतीतून नगदी उत्पन्न देणाऱ्या फुलशेती, फळशेती आदि पिकांना प्राधान्य दिल्यामुळे अन्न, धान्य पिकाकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे अन्न सुरक्षा धोक्यात येईल. कृषि व संबंधीत क्षेत्रांचा वृध्दी दर १९८०-८१ ते १९९०-९१ मध्ये ३.८ टक्के होता. तर १९९०-९१ ते २०००-०१ मध्ये २.३ टक्के होता. तर २००१-०२ ते २००६-०७ मध्ये २.२ टक्के ऐवढा होता. म्हणजेच जागतिकीकरणाच्या काळात कृषि व संबंधित क्षेत्राचा दर घटल्याचे दिसून येते त्याच प्रमाणे कृषि क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणुकीचा वाटा घटलेला आहे. १९९० मध्ये सार्वजनिक गुंतवणूक ३०% होती ती २००८-०९ मध्ये १८.५% झाली आहे. जागतिकीकरणामध्ये ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे दिसते.

### शेती-ग्रामीण विकासावर विशेष परिणाम:

विकसनशील देशाचा जेव्हा विकास होऊ लागतो तेव्हा तेथील राष्ट्रीय उत्पन्न, निर्यात- उत्पन्न आदि घटकांमधील शेतीचा वाटा कमी कमी होत जातो. ही वस्तुस्थिती असली तरी भारतासारख्या देशात शेतीचे महत्त्व कमी होत नाही, कारण शेतीमध्ये गुंतलेल्या बहुसंख्य लोकांच्या जीवनाचा व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार शेती हाच आहे. जागतिकीकरणातील विदेशी गुंतवणूक, आयातीमधील आधुनिक वस्तू, अत्याधुनिक तंत्रज्ञान इत्यादी घटक पाहता सकृतदर्शनी असे वाटू लागते की शेतीप्रधान ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरण यांचा संबंध असण्याचे काही कारण नाही. बहूराष्ट्रीय कंपन्यांनी विकसनशील देशांच्या ग्रामीण भागात १९७० ला हरित क्रांतीच्या नावाखाली प्रवेश केला. खते, बियाणे, पीक संरक्षणाचे उपाय यासारख्या बाबतीत बराचसा स्वावलंबी असलेला शेतकरी या कंपन्यांच्या अधीन झाला. रासायनिक खते, संशोधित बियाणे, विविध कीटकनाशके यांचा वेगाने प्रसार होत असतानाच शेतकऱ्यांचे परावलंबित्व वाढत गेले.

जागतिकीकरणामुळे शेती व ग्रामीण विकासावर प्रत्यक्ष होत असलेले गंभीर परिणाम पुढील प्रमाणे आहेत:

१)शेतीच्या उत्पादन खर्चात वाढ: हरित क्रांतीच्या काळात शेतीच्या उत्पादनाचे तंत्र बरेच बदलले आहे. सिंचन, सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, आधुनिक अवजारे हे शेतीमधील खर्चाचे आवश्यक घटक झाले असून त्यांचा खर्च सतत वाढतो आहे. महागडे किटकनाशके वेगवेगळ्या नावाने खपविली जातात. शेतकऱ्याला लुटण्याचा या पद्धतशीर तंत्रामुळे विकसनशील देशातील शेतकऱ्यांचा खर्च वाढला. उत्पादनाच्या परिस्थितीवरील नियंत्रण गेले. परिणामत: बहुसंख्य छोटी धारणक्षेत्र शेती परवडेनाशी झाली आहेत.

२) शेतजमिनीचा, पर्यायी वापर: उपलब्ध शेतजमीन पर्यायी उपयोगांकडे वळविल्या जात आहेत. शेतकरी भूमिहीन होत आहे. जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय व बलाढ्य भांडवली कंपन्या कृषिक्षेत्रात प्रवेश करीत आहेत. ही आधुनिक जमीनदारी जास्त हानीकारक आहे. तरीही तिला शासकीय पाठबळ आहे. विशेष आर्थिक क्षेत्राच्या नावाने हजारो एक्कर जमीन या कंपन्यांनी हडपल्या आहे.

३) शेतमालाच्या निर्यातीचा प्रश्न:

जागतिकीकरणामुळे आयात-निर्यात निर्बंध अतिशय शिथिल झाले असून त्याचा फायदा विकसनशील देशातील शेतमाल - निर्यात होईल असे म्हटले जाते. प्रत्यक्षात, जागतिक व्यापाराची सर्व सूत्रे आता (विकसित देशांचे वर्चस्व असलेल्या) जागतिक व्यापार संघटनेच्या हाती एकवटलेली आहेत. जागतिक व्यापार संघटनेने अनुदानाबाबत जे नियम केले आहे ते प्रत्यक्षात विकसित देशच डावलत आहेत. व स्वत:च्या देशाचा फायदा करीत आहे. अमेरिकेने म्हटले होते की, जागतिक व्यापार संघटनेच्या कराराचे काहीही झाले तरी चालेल पण आमच्या शेतीची अनुदाने कमी केली जाणार नाही. म्हणजे विकसित देशातील शेतकऱ्यांना अनुदानाचा भक्कम पाठींचा असल्याने ते शेत मालाच्या निर्यातीत उभे राहतात आणि भारतासारखे विकसनशील देश मागे पडतात. अर्थात जागतिकीकरणामुळे शेत मालाच्या निर्यातीच्या संधी वाढल्या आहे, हे म्हणणे प्रत्यक्ष परिस्थितीशी जुळणारे नाही.

४) बौद्धीक संपदा अधिकार: जागतिकीकरणामुळे बौध्दिक संपदा अधिकार कंपन्यांच्या हातात जावून त्यांना शोषणाचा नवीन मार्ग उपलब्ध झाला आहे. या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या बियाणे संग्रहीत व विनिमय करण्याचा हक्क हिरावला गेला आहे. भारताची The Seeds Act 2004 बाबत डॉ. वंदना शिवा म्हणतात, बेभरवशाचे आणि पुन:निर्मिती शक्य नसलेले बियाणे पुरवून खाजगी कंपन्यांनी भारतीय शेतकऱ्याला परावलंबीत्व, कर्जबाजारीपणा व अखेर आत्महत्या या स्थितीत आणून सोडले आहे.

५) दारिद्र्यात वाढीची शक्यता: जागतिकीकरण म्हणजे विकसनशील देशाचा वेगाने विकास ही गोष्ट शहरी महानगरीय भागातील उच्च उत्पन्न धारक वर्गाबद्दल लागु होते. परंतु बहूसंख्य ग्रामीण भागातील सामान्य जनतेला जागतिकीकरणाने काय दिले. हा खरा प्रश्न आहे. भारतात १९८३-९३ या काळात दारिद्र्यरेषेचे प्रमाण ३६% वरुन २६% पर्यंत खाली आले तर २००० साली अनुसूचीत जाती ३६% तर अनुसूचीत जमाती ४४% लोक दारिद्र्यरेषेखाली होते. मग ग्रामीण भागातील या अ.जा आणि अ.ज. या लोकांचा कोणता फायदा झाला हा खरा प्रश्न आहे.

६) ग्रामीण शिक्षण क्षेत्र: जागतिकीकरणामुळे

उत्पादन-उद्योग क्षेत्रासोबतच शिक्षण क्षेत्रातसुध्दा स्पर्धा निर्माण झाली आहे. नव्या व्यावसायिक शाळा, महाविद्यालय, अभ्यासक्रम व भाषाशिक्षण इ. भरमसाठ शुल्क असलेल्या महागड्या संस्था निर्माण झाल्या. याच स्पर्धेला तोंड देण्याची क्षमता नसतांना सुध्दा ग्रामीण नागरिक प्रयत्न करीत असून ते बळी पडत आहे. गावातील नागरिक शिक्षणासाठी शहरातील स्पर्धेत मुलांना टाकत आहे व गावातील जि.प. शाळा ओस पडत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांचा पाया तितकासा पक्का नसल्याने एवढा खर्च करुन सुध्दा स्पर्धेत टिकणे कठीण आहे. भविष्यात हा विद्यार्थी ना इकडचा ना तिकडचा अशी अवस्था सामान्यांची या स्पर्धेत झाली आहे. त्यातून मानवी संसाधन क्षमतेचा मुद्दा निर्माण होईल.

७) इतर काही ठळक परिणामः (१)विकसित राष्ट्रातील चंगळ वादाचे आगमन भारतात झाले. (२)चैनीच्या वस्तूंची मागणी वाढली. (३)बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनामुळे स्थानीक लघु- कुटीर उद्योगांवर वाईट दिवस आले. (४)परदेशातील प्रदूषण निर्माण करणाऱ्या उद्योगांचे भारतात स्थानांतरण झाले.(५) बहुराष्ट्रीय कंपन्याव्दारे समाजाची पिळवणूक होत आहे.

**भारताने करावयाच्या उपाय योजनाः**

(१) सिंचनाच्या सुविधा निर्माण करुन त्याचा केवळ शेती सिंचनासाठी पुर्ण क्षमतेने उपयोग करणे. (२) शेतीसाठी अत्यंत स्वस्त दरात अखंडीत आणि निरंतर विद्युत पुरवठा करणे. (३) विपणन व्यवस्थेत कृषी मालाला किंमतीची खात्री पेरणीपुर्वीच शेतकऱ्याला देणे. शेतमालाच्या किंमती व लागवडी खर्च लक्षात घेऊन शेतकरी पेरणी करु शकेल. (४) पाऊसाचे अनुमान व पिकाची लागवड यांची माहिती शेतकऱ्यांना अचुक देणे. त्यासाठी हवामान खात्याचे संशोधनाचे तंत्रज्ञान विकसित करणे. (५) कृषि मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न.(६) कृषि मध्ये कायम स्वरुपी सुधारणांवर भर देणे आवश्यक. (७) शेतमालाला संरक्षण व अर्थ सहाय्य या बाबीकडे लक्ष देणे वित्तीय संस्थाकडून विहीत मुदतीत शून्य व्याजदरात कर्ज पुरवठा करणे. (८) शेतकऱ्यांना व्यावसायीक शेती करीता संगठीत करणे गरजेचे. (९) शेतकऱ्यांची उत्पादन व निर्यात क्षमता वाढविणे गरजेचे. (१०) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये शेतकऱ्यांनी पाय ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार देशभर कार्बो सेवा निर्माण करणे. (११) देशात तयार होणाऱ्या मालाचा परदेशातील मागणी नुसार उत्पादन दर्जा वाढवावा जेणे करुन निर्यात वाढेल. देशातच माल तयार करुन आयातीवरील निर्भरता कमी करावी.

**संदर्भः**

१) डॉ.कवीमंडन विजय, *कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर -२०१२.
२) मिश्र-पुरी, *भारतीय अर्थव्यवस्था*, हिमालय पब्लिकेशन हाऊस - २०१२.
३)साठे मधुसुदन दत्तात्रय, *जागतिक अर्थव्यवस्था*, मेहता पब्लिशिंग हाऊस - २००७.
४) डॉ. कवीमंडन विजय, *डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २०१३.
५) दैनिक लोकमत, नागपूर ६/१२/२००७, १३/७/२००८
६) दैनिक सकाळ, नागपूर - ६/१२/२०००.
७) जनमाध्यम, अमरावती. २४/५/२०१०.

# किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक

**आर. बी. भांडवलकर**, यवतमाळ,
प्रपाठक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
अमोलकचंद महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

भारतात स्वातंत्र्यानंतर आर्थिक धोरण ठरविण्याची जबाबदारी राज्यकर्त्यावर आली. परिणामत: निर्यातीवर बंधने आणि आयातीला पर्याय यावर भर दिल्यामुळे कराचे वाढते दर, रुपयाचे शासन निमंत्रित विनिमय दर, बँकांचे राष्ट्रीयीकरण, वाढती लोकसंख्या, शेतीचा कासव गतीने विकास, वाढती बेरोजगारी इत्यादीचा नकारात्मक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला. सन १९९१ मध्ये भारत जगातील १६० देशापैकी विसावा गरीब देश गणला गेला तर कर्जबाजारीपणात तिसऱ्या क्रमांकावर होता. त्यामुळे जगातील वित्त संस्था (उदा. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक) आणि प्रगत राष्ट्रे यांनी भारतावर एका अर्थाने लादलेले नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्याशिवाय भारताकडे पर्याय नव्हता. त्यावेळी देशात पाश्चिमात्य कंपन्या येवून कामगारांना चांगले दिवस येतील या उद्देशाने भारतीय अर्थव्यवस्थेची अनेक क्षेत्रे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूकीला खुली करण्यात आली. तसेच सन १९९५ पासून भारतात किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक व्हावी यासाठी शासकीय व जागतिक स्तरावर प्रयत्न होत होते. शेती आणि कारखानदारी क्षेत्रानंतर व्यापार क्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्वाचे क्षेत्र आहे. एवढेच नव्हे तर जगातील उदयोन्मुख ३० बाजारपेठामध्ये चीननंतर क्रमांक दोनची आकर्षक व मोठा वाव असणारी भारताची किरकोळ बाजारपेठ आहे असे जगप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन सल्लागार संस्थेनें आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे. तसेच जीडीपीच्या निकषात जगात १० वी अर्थव्यवस्था असून दरडोई उत्पन्नाच्या निकषात जगात १४० वा क्रमांक भारताचा आहे.

ग्राहकांना हव्या असणाऱ्या वस्तू व सेवा ज्या विपणन व्यवस्थेच्याद्वारे त्यांच्यापर्यंत पोहोचविल्या जातात त्या साखळीच्या सर्वात तळाशी किरकोळ व्यापाराचे क्षेत्र असते. साहजिकच या क्षेत्राचा ग्राहकांशी थेट संबंध येत असतो. उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करून तो उपभोक्त्यांना लहान मात्रेमध्ये

उपभोगाकरिता विकणे हा किरकोळ व्यापार होय. उदा. धान्य, भाजीपाला, दुधदुभते, फळे, अंडी, मांस, तयार कपडे, औषधे, घरगुती उपभोगाच्या वस्तू, विद्युत उपकरणे इत्यादी. हा माल एकाच कंपनीचा असू शकतो किंवा अनेक कंपन्यांचा असू शकतो. ग्राहकांना मिळणाऱ्या वस्तू आणि सेवा यामुळे ग्राहकांचे समाधान किरकोळ व्यापारावर अवलंबून असते.भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात किरकोळ व्यापार क्षेत्राचा वाटा १४ टक्के इतका आहे. व्यापार क्षेत्रातील श्रमिक हे देशातील एकूण श्रमिकांच्या (रोजगाराच्या संधी) ७ टक्के तर बिगरशेती क्षेत्रातील श्रमिकांच्या २५ टक्के आहेत. म्हणजेच मोठ्या प्रमाणात रोजगार हा शेती क्षेत्रातून प्राप्त होतो तो असंघटीत स्वरूपाचा आहे. यामध्मे प्रामुख्याने स्वयंरोजगाराचा समावेश होतो. यापैकी ४० कोटी लोकांचे दररोजचे उत्पन्न ६० रूपये पेक्षा कमी आहे तर अंदाजे चार कोटीपेक्षा अधिक लोक भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रात गुंतलेले आहेत. देशात १.२ कोटी लहान दुकाने आहेत भविष्यात किरकोळ क्षेत्रात १५ ते २० टक्के वृद्धी भारतात होण्याची शक्यता आहे असे ग्लोबल रिटेल डेव्हलपमेंट इंडेक्स २०१२ च्या अहवालात म्हटले आहे. यामध्ये ग्राहकाचे दरडोई उत्पन्न, उपभोग खर्च यातील वाढ आणि चंगळवाद यांचा परिणाम दिसून येतो. आज ग्रामीण भागात जनरल स्टोअर्स, मोबाईल शॉपी, पान- बिडीची दुकाने, किराणा दुकाने, फूटपाथ आणि गल्लीतून होणाऱ्या आकर्षक पॅकिंग तसेच ब्रँडिंग वस्तुच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामध्ये गरीब व मध्यमवर्ग यांचा समावेश असून तो असंघटीत आहे. त्यामुळे जगातील मोठ्या किरकोळ व्यापारी संस्थांना भारतीय बाजारपेठेचे आकर्षण निर्माण झाले आहे. कारण निर्यातीच्या निकषात जगात १९ वा आणि आयातीच्या निकषात १० वा क्रमांक भारताचा आहे. म्हणजेच भारताचीआयात ही निर्यातीपेक्षा जास्तच आढळून येते.

चीन, थायलंड, इंडोनिशिया इत्यादी देशामध्ये किरकोळ व्यापारात १०० टक्के विदेशी भांडवलाची गुंतवणूक करायला परवानगी दिलेली आहे. दुसऱ्या देशाच्या उद्योगामध्ये उत्पादन, वितरण आणि सेवा, पुरवठा इत्यादी करीता केलेली गुंतवणूक ही विदेशी थेट गुंतवणूक होय. याचा मुख्य उद्देश विदेशात धंदा करणे हाच असतो. भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. सन १९९७ मध्येच भारताने विदेशी गुंतवणुकीला तत्त्वत: परवानगी दिली आहे. तसेच सन २००६ मध्ये एकाच ब्रँडच्या मालाची किरकोळ विक्री करण्याची परवानगी दिली होती. आता मल्टीब्रँडस असणाऱ्या मालाच्या किरकोळ विक्रीच्या क्षेत्रात ५१ टक्के विदेशी भांडवलाची गुंतवणूक करता येऊ शकते. विदेशी गुंतवणुकदाराची किमान गुंतवणूकीची रक्कम दहा कोटी अमेरिकन डॉलर्स इतकी असली पाहिजे आणि त्यापैकी किमान ५० टक्के रक्कम पायाभूत सुविधांच्या विकासासाठी खर्च करावी लागेल. ज्यामध्ये शेतकऱ्यांच्या मालाकरीता शीतगृहे, रस्ते, साठवणीच्या सोयी, अन्नप्रक्रिया करण्याच्या सोयी इत्यादीचा समावेश आहे. विदेशी गुंतवणुकदाराकडून निघणारी दुकाने ज्या शहराची लोकसंख्या दहा लाखापेक्षा जास्त आहे. अशाच शहरामध्ये आणि शहराच्या १० किमीच्या परिसरात काढता येथील सन २०११ च्या जनगणनेनुसार अशा शहराची संख्या निश्चित केली

जाईल. भारतात एक लाख लोकसंख्या असलेली ४० हजार शहरे तर ६ लाख वस्ती असलेली पाच हजार शहरे आहेत.

शेतमालाची खरेदी करण्याचा पहिला अधिकार हा शासनाचा राहिल. केंद्र सरकारने हे धोरण स्वीकारले असले तरी राज्य सरकार व केंद्रशासित प्रदेशांना या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य आहे. सरकारच्या मते, देशात प्रचंड मोठ्या प्रचंड मोठ्या प्रमाणावर भांडवल अंदाजे ३० लाख कोटी असेल त्यापैकी१५ लाख कोटीचा वापर पायाभूत सोयीच्या विकासासाठी होईल आणि या गुंतवणूकीमुळे एक कोटी नवीन रोजगार, वाहतूक, प्रक्रिया उद्योग, शीतगृहे यासारख्या क्षेत्रामध्ये निर्माण होवून शेतकऱ्यांची उत्पादने (फळे, भाज्या, फुले, धान्य, कडधान्य, अंडी, मासे इत्यादी) थेट विदेशी कंपन्या खरेदी करतील त्यामुळे अडते व मध्यस्थ व्यापारी यांना कमी भावाने शेतमाल विकावा लागणार नाही. त्यांच्या उत्पादनाला योग्य किंमत मिळेल तसेच किमान ३० टक्के खरेदी लहान उद्योगाकडून करावी लागणार आहे. पर्यायाने लहान व कुटीर उद्योगांना चालना मिळण्याची शक्यता आहे. असा आशावाद शासन जनतेला दाखवून विदेशी थेट गुंतवणूक ही किरकोळ क्षेत्रासाठी तारक ठरेल, असे ठणकावून सांगत आहे. एवढेच नव्हे तर विदेशी थेट गुंतवणूकीमुळे किरकोळ क्षेत्रातील वितरण शृंखलेकरीता आवश्यक तंत्रज्ञान भारतात येईल आणि सध्याच्या त्रूटी दूर होतील.

भारतात हरितक्रांतीनंतर कृषी उत्पादन पुरेसे असूनही ४० टक्के अन्नधान्य उत्पादने वितरण आणि साठवणूक सुविधा अभावी उपभोक्त्यांपर्यंत पोहोचत नाहीत त्याचा परिणाम पाच कोटी मुले भारतात कुपोषित आहेत. जगाच्या एकूण भुकेल्या माणसापैकी२० टक्के लोक भारतात आहेत म्हणजेच दर १०० माणसामागे १५ माणसे भुकेली आहेत. चीन सारख्या अर्थव्यवस्थेचा आदर जगभर केला जातो त्यांनी स्वत:चे सार्वभौमत्व अबाधित राखून विदेशी थेट गुंतवणूक किरकोळ क्षेत्रात स्वीकारली असली तरी चीनची एकूणच रचना पुर्णत: वेगळी आहे. तेथील शासकीय नियम. उत्पादकाची स्थिती आणि लोकांची खरेदी करण्याची पद्धती याची भारताशी तुलना होवू शकत नाही. भारतात आज शेतकरी विकत असलेल्या मालावर सरकारचे नियंत्रण आहे तो सरकारशी भांडून हमीभाव प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो परंतु उद्या वॉलमार्ट संस्कृतीने ठराविक किंमतीलाच माल विकत घेतला जाईल अशी सक्ती केली तर शेतकरी कुठे जाईल? सद्य: स्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यंत्रणेला बदनाम करून त्या बंद करण्याचा प्रयत्न हळुहळू सुरू झाला आहे. भारत विकसित आहे, विकसनशील आहे की गरीब आहे हे आपण आज ठरवू शकत नाही. कारण विकसित, विकसनशील आणि गरीब हे जगमान्य निकष आपल्या देशात एकाचवेळी पहायला मिळतात. ज्या दिवशी भारताने वॉलमार्टसाठी पायघड्या अंथरल्या त्याच दिवशी अमेरिकेतील सर्वात मोठ्या न्युयॉर्क शहरातून वॉलमार्टने पळता पाय काढला, चीन, मोक्सिको सारख्या देशातील किरकोळ व्यापार वॉलमार्ट सारख्या कंपन्यांनी गिळंकृत केला आहे. तसेच दि. १ जून २०१२ रोजी अमेरिकेतील वॉशिंग्टन आणि ३० जून २०१२ रोजी दहा हजार लोकांनी अमेरिकेतील सर्वात श्रीमंत शहर लॉस एंजिल्समध्ये वॉलमार्ट विरोधी आंदोलन केले होते. आज चीनने भारतातील लहान मुलांच्या

खेळण्याची जवळपास ८० टक्के बाजारपेठ काबीज केलेली आहे. विद्युत उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू, सणासुदीच्या वेळी लागणाऱ्या सजावटीच्या वस्तू चीनमधून मोठ्या प्रमाणावर येवू लागल्या आहेत. अशावेळी भारतातील किरकोळ क्षेत्रावर विदेशी किराणा दुकानांची घट्ट पकड बसल्यास देशांतर्गत उद्योग आणि अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होणार आहेत. त्यातून साधारणपणे पुढील समस्या निर्माण होवू शकतात:

१) वॉलमार्ट , कॅरीफोर, टेस्को सारखे आंतरराष्ट्रीय सुपर मार्केटस् भारतात सुरू झाल्यानंतर लहान व्यापारी किंवा व्यावसायिक यांची दुकाने स्पर्धेअभावी बंद पडतील कारण ही स्पर्धा असमान स्वरूपाची राहणार आहे. यामध्ये लहान व्यापारीच नाहिसे होतील. पर्यायाने स्वयंरोजगार सुद्धा बंद पडण्याच्या मार्गात असेल भारतात साधारणत: १.२ कोटी लहान दुकानदार आहेत तर या क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या चार कोटी आहे तसेच या क्षेत्रातील निर्माण होणारी बेरोजगारी इतर क्षेत्रामध्येही परावर्तीत होऊ शकेल याचा दरडोई उत्पन्न आणि राहणीमान यावर विपरीत परिणाम होईल. थोडक्यात काही हजार रोजगार संधी निर्माण करणाऱ्या या निर्णयामुळे काही लाख बेरोजगार निर्माण होतील. म्हणजेच असंघटीत क्षेत्रात बेरोजगारी निर्माण होईल उदा. आज जगभर पसरलेल्या वॉलमार्टच्या एका दुकानात सरासरी २१४ कर्मचारी काम करतात जर भारतात किरकोळ क्षेत्रात तीन वर्षामध्ये ४० लाख रोजगाराची निर्मिती व्हावयाची असेल तर भारतात १८ हजार ६०० किराणा दुकाने उघडावी लागतील.

२) मोठ्या विदेशी भांडवलदार संघटनांची बाजारपेठेत मक्तेदारी निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण भारतीय बाजारपेठेत भरपूर क्रयशक्ती असणारे थोडे श्रीमंत ग्राहक आणि मध्यम ग्राहक आहेत. परंतु जेमतेम क्रयशक्ती असणारे ग्राहक बहुसंख्य आहेत तर हे ग्राहक नवीन दुकानाकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होतील. कालांतराने ते कोणत्याही किंमतीला वस्तू खरेदी करतील. पर्यायाने अशी लहान दुकाने बंद पडतील किंवा लघू, मध्यम व कुटीर उद्योगाची सूत्रे त्यांच्या हातात जातील. उदा ब्राझील, अर्जेंटीना, चिली, लॅटीन अमेरिका, पूर्वआशिया इत्यादी ठिकाणी किरकोळ व्यापाराचे, रोजगाराचे व बाजाराचे नियंत्रण विदेशी बलाढ्य कंपन्यांकडे गेल्याची आकडेवारी उपलब्ध आहे.

३) जागतिकीकरणाच्या काळात जास्तीत जास्त नफा कमविणे हे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे उद्दिष्ट असल्याने ज्या देशात वस्तूच्या कमी किंमती आहेत त्या वस्तू आयात करून भारतात उपलब्ध करून देतील. त्याचा परिणाम विदेशी गंगाजळीवर होवू शकतो. आणि नफा विदेशात नेण्यावर कोणतेही बंधन नसेल पर्यायाने भारतातील संपत्ती देशाबाहेर जाईल. श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब बनण्याचा धोका संभवतो तसेच परकीय सरकारवरील अवलंबित्व वाढेल.

४) भारतातील शेती ही प्रामुख्याने सीमांत शेती आहे. शेतकरी ग्रामीण भागात विखुरलेले असून नवीन तंत्रापासून ते अशिक्षीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन मर्यादित आहे. या ग्रामीण विखुरलेल्या भागातून लहान शेतकऱ्याकडून थोड्या-थोड्या मालाची खरेदी करण्यात विदेशी कंपन्यांना स्वारस्य राहणार नाही. आठवडेबाजार ही संकल्पना संपुष्टात येईल आणि एकदाची आपली एकाधिकारशाही प्रस्थापित केली की,

विदेशी कंपन्या सांगतील त्या भावाने शेतकऱ्यांना आपला माल विकणे भाग पडेल. पर्यायाने कृषीमालाचे दर कमी होतील दुसरीकडे ग्राहकांची सुद्धा पिळवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उदा. दक्षिण आफ्रिकेतील एका ब्रिटीश सुपरमार्केटकडून सफरचंदाची निर्यात केली जाते त्यामध्ये सफरचंदांना त्या कंपनीने आकारलेल्या किंमतीपैकी सुपर मार्केटला ४२ टक्के हिस्सा मिळतो, ४ टक्के हिस्सा शेतकऱ्यांना आणि ५ टक्के हिस्सा शेतमजुरांना मिळतो.

५) विदेशी कंपन्यांचा पूर्वइतिहास वाईट आहे त्यामुळे देशाच्या संरक्षणाला तसेच सार्वभौमत्वाला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जगातील सगळ्यात मोठी अमेरिकन कंपनी वॉलमार्ट असून ती २८ देशात ६० विभिन्न नावांनी अंदाजे ९८८४ दुकानाद्वारा दर आठवड्याला सुमारे २० कोटी ग्राहकांना सेवा देते. तिच्या सन२०१० मधील विक्रीचे मूल्य २१६०० कोटी रुपये इतके होते याच कंपनीने भारतात गुंतवणूकीला परवानगी मिळावी म्हणून राजकारणी आणि नोकरशहाचे मन वळविण्यासाठी १२५ कोटी रूपये खर्च केले आहेत. भारतीय बाजारपेठेत दरवर्षी ४५० अब्ज डॉलर्सची उलाढाल होते आणि बहुतांश वर्चस्व हे असंघटित किराणा दुकानदाराचे दिसून येते. दुसरीकडे बाजारभाव देण्यासाठी विदेशी कंपन्या खेड्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकणार नाहीत त्यामुळे त्यांना न्याय्य वाटा मिळणार नाही. पर्यायाने भारतीय शेतकरी जगाच्या बाजारपेठेशी स्पर्धा करू शकणार नाही. किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीला केंद्रसरकारने परवानगी देणे हा विकासाच्या मार्गातील एक प्रकारे अडथळा ठरेल. म्हणून राज्यकर्त्यांनी हे धोरण भारतात लागू करतांना वाढती लोकसंख्या, बेकारी, भाववाढ, दारिद्र्य, उपासमारी व अन्य समस्यांचा विचार करूनच निर्णय घ्यावयास पाहिजे तसेच देशाच्या एकात्मतेला आणि अखंडतेला धोकादायक ठरणार नाही याची सुद्धा काळजी घेणे आवश्यक आहे. डॉ. अमर्त्य सेन यांनी सन २०११ मध्ये म्हटले होते की, *बहुविध क्षेत्रातील विदेशी थेट गुंतवणूक हे चांगले राहिल की वाईट हे गुंतवणूकीच्या स्वरूपावर अवलंबून राहिल.* जगातील ज्या देशात किरकोळ क्षेत्रात विदेशी थेट गुंतवणूकीला परवानगी दिली आहे त्या ब्राझील, थायलंड, इंडोनेशिया देशात स्वदेशी धंदे बंद करावे लावले हीच वेळ भारतावर येण्यास वेळ लागणार नाही, कृषीप्रधान देशात, खेड्यांच्या देशात आणि विकसनशील देशात जागतिकीकरणाच्या चांगल्या परिणामपेक्षा वाईटच परिणाम मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे.

**संदर्भ सूची:**

१) डॉ. गोविलकर विनायक, *रिटेलमधील विदेशी थेट गुंतवणूक*, हरिओम प्रकाशन, गंगापूर रोड, नाशिक.

२) डॉ. रसाळ राजेंद्र, *भारतीय अर्थव्यवस्था.*

३) रूद्रदत्त, के.पी.एम.सुंदरम, *भारतीय अर्थव्यवस्था*, एस.चंद अँड कंपनी लि. नई दिल्ली.

४) डॉ. जहागिरदार दि. व्यं. *आर्थिक जगत.*

५) अर्थमीमांसा जाने-जून २०१०,खंड-३ अंक १.

६) दैनिक लोकसत्ता व दैनिक देशोन्नती, नागपूर.

# प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक: भारतीय किरकोळ क्षेत्र

**भागचंद शंकरराव खुरुद**, राहुरी,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय, जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी - ९९७०९८१५९२,
ईमेल: khurudbs@gmail.com

आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेवर अनेक घटकांचा प्रभाव पडत असतो. विकासाच्या सर्व घटकांमध्ये भांडवलाला अनन्य साधारण महत्त्व आहे. भांडवल पूरेशा प्रमाणावर उपलब्ध असेल तर गुंतवणुकीत वाढ होते आणि विकास प्रक्रियेला गती प्राप्त होते. भारतात मात्र विविध घटकांच्या प्रतिकूल प्रभावामुळे बचतीचा व पर्यायाने भांडवल निर्मितीचा दर कमी आहे. याला पर्याय म्हणून भारत सरकार जागतिक भांडवल बाजारातून भांडवल उभारणी करण्याला प्राधान्य देते. यात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (Foreign Direct Investment - FDI) हा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. १९८५ पर्यंत मात्र आपली अर्थव्यवस्था या गुंतवणूकीसाठी फारसी अनुकूल नव्हती. आर्थिक नियंत्रणे, परवाना पध्दती, व्यापार विषयक निर्बंध, कोटा पध्दती आणि विविध शासकीय नियंत्रणांमुळे परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक भारतात येण्यात अनेक अडचणी येत असत. इ.स. १९८५ मध्ये मात्र शासकीय धोरणात बदल होऊन काही प्रमाणात खाजगीकरण व उदारीकरणाचा अवलंब करण्यात आला. त्यानंतर १९९०-९१ दरम्यान भारतीय अर्थव्यवस्था अभूतपूर्व आर्थिक अरिष्टात सापडली. या आरिष्टातून मार्ग काढण्यासाठी तत्कालीन सरकारने जूलै १९९१ मध्ये खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, बाजारीकरण आणि आधुनिकीकरण या पंचसुत्रीवर आधारित नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. नव्या धोरणात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीवरील बरेच निर्बंध दूर करण्यात आले. सप्टेंबर २०१२ मध्ये सरकारने गुंतवणूक धोरणाच्या व्याप्तीत आणखी वाढ करुन किरकोळ क्षेत्र परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीसाठी काही प्रमाणात खुले केले. प्रस्तुत शोध निबंधात १९९१-९२ ते २०११-१२ दरम्यान परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीत किती व कशी वाढ झाली आणि किरकोळ क्षेत्रासाठी स्वीकारलेल्या परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक धोरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतील याचे विवेचन

करण्यात आले आहे.

### परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीची स्थिती:

परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक १९९१-९२ मध्ये १२९ मिलियन डॉलर होती. २००८-०९ मध्ये ती ३७८३८ मिलियन डॉलर तर २०११-१२ मध्ये २५८४१ मिलियन डॉलर अशी वाढली. आर्थिक सुधारणांच्या १९९१-९२ ते २०११-१२ दरम्यान या गुंतवणूकीचे एकूण मूल्य २३९४९५ मिलियन डॉलर इतके होते. असे असले तरी राज्यनिहाय गुंतवणूकीचे चित्र फारसे समाधानकारक नाही. २०००-०१ ते २०११-१२ मध्ये भारतात जी एकूण परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक झाली. त्याच्या ३५ टक्के गुंतवणूक महाराष्ट्र, दादरा नगर हवेली, दमण दीव या प्रदेशात झाली. दिल्ली, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील गुंतवणूकीचे प्रमाण २०.५० टक्के इतके आहे. त्याखालोखाल कर्नाटक (६ टक्के), तामिळनाडू (५ टक्के), गुजरात (५ टक्के) आणि आंध्रप्रदेश (४.५ टक्के) यांचा क्रमांक लागतो. उर्वरित राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील गुंतवणूकीचे प्रमाण अतिशय कमी आहे. या असमतोलाला संबंधित राज्यातील नैसर्गिक साधनसामग्री, आधारभूत सुविधा, शासकीय धोरण, राजकीय परिस्थिती, कुशल कामगारांचे प्रमाण आणि सामाजिक वातावरण हे घटक जबाबदार आहेत. क्षेत्र आणि उद्योगनिहाय गुंतवणूकीतही अशीच असमानता निर्माण झालेली आहे. एप्रिल २००० ते मार्च २०१२ या काळात झालेल्या एकूण परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीत सेवा क्षेत्राचा वाटा २० टक्के इतका आहे. दळणवळण, घरबांधणी आणि संगणक उद्योगातील गुंतवणूकीचे प्रमाण अनुक्रमे ८ टक्के आणि ७ टक्के इतके आहे. तर उर्जा क्षेत्रात ५ टक्के गुंतवणूक झाली आहे.

### किरकोळ क्षेत्रे आणि परकीय गुंतवणूक:

जागतिकीकरणाच्या काळात म्हणजे १९९१-९२ ते २०११-१२ दरम्यान भारतातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीत सतत वाढ झाली असली तरी शासनाला त्या बाबतची निर्धारित लक्ष्ये पूर्णपणे गाठता आलेली नाहीत. शिवाय राज्यनिहाय आणि क्षेत्रनिहाय गुंतवणूकीत बराच असमतोल आहे. म्हणून परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी सरकारने २०१२ मध्ये आणखी एक सकारात्मक निर्णय घेतला आहे. त्यानुसार किरकोळ क्षेत्रासाठी असणारी काही बंधने शिथिल करुन हे क्षेत्र परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीसाठी खूले करण्यात आले आहे. शासनाच्या सप्टेंबर २०१२ मधील अध्यादेशानुसार किरकोळ क्षेत्रात सिंगल ब्रँडमध्ये १०० टक्के तर मल्टीब्रँड मध्ये ५१ टक्के परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याला परवानगी देण्यात आली आहे. आर्थिक विकासाचा दर वाढविणे, परकीय चलन उपलब्ध करणे, डॉलरच्या तुलनेत रुपया मजबूत करणे, रोजगार निर्मितीला चालना देणे आणि व्यवहारतोलातील तूट कमी करणे ही किरकोळ क्षेत्रातील गुंतवणूक बंधने शिथिल करण्यामागची उद्दिष्टे आहेत. या निर्णयामुळे मात्र भारतात राजकीय वाद आणि वैचारिक कलह निर्माण झाला आहे. सरकारच्या या निर्णयाचे दिल्ली, आसाम, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, राजस्थान, उत्तराखंड, हरियाणा, मणीपूर, पंजाब आणि जम्मू - काश्मिर या राज्यांनी स्वागत केले असून पश्चिम बंगाल, बिहार, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, त्रिपूरा, ओडिशा आणि उत्तर प्रदेश यांनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर किरकोळ

क्षेत्रातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणूकीचे भारतीय अर्थव्यवस्थेला होणारे फायदे-तोटे तपासणे आवश्यक आहे.

संभाव्य फायदे:

१. किरकोळ क्षेत्रात परकीय प्रत्यक्ष गुंतवणुकीला परवानगी दिल्यामुळे भारतात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. या क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना कामगारांची बरीच गरज भासेल. त्यामुळे अनेक बेरोजगारांना रोजगार मिळून उपजीविकेचे साधन उपलब्ध होईल.

२. भारतात भांडवलाची टंचाई आहे. अशा परिस्थितीत परकीय कंपन्यांनी किरकोळ क्षेत्रात गुंतवणूक केल्यास भांडवलाच्या समस्येवर मात करता येईल आणि किरकोळ क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या उभारणीला हातभार लागेल.

३. परकीय कंपन्यांच्या आगमनामुळे किरकोळ क्षेत्रात त्यांची मक्तेदारी निर्माण होईल अशी भिती व्यक्त केली जात आहे. परंतु जगात अशा ३५० किरकोळ कंपन्या विविध देशात कार्यरत आहेत. त्यांचा कार्य कालावधी ३० वर्षापेक्षाही जास्त आहे. त्यांची कोठेही मक्तेदारी प्रस्थापित झालेली नाही. त्यामुळे भारतीय व्यावसायिकांना काळजी करण्याचे कारण नाही, असा युक्तिवाद करण्यात येतो.

४. भारतातील राज्यसरकारांना किरकोळ क्षेत्रातील गुंतवणूकीबाबत निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. या गुंतवणुकीवरील निर्बंध, त्याबाबतचे धोरण, कार्यपध्दती आणि गुंतवणुकीची व्याप्ती या संदर्भात सोईप्रमाणे धोरण ठरवून राज्यसरकारे किरकोळ क्षेत्रातील गुंतवणुकीचे फायदे मिळवू शकतात.

५. काही विचारवंत भारतात किरकोळ क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी येणाऱ्या विदेशी कंपन्यांची तुलना ईस्ट इंडिया कंपनीशी करतात. परंतु ही भिती सर्वस्वी निराधार आहे कारण १८ व्या आणि २१ व्या शतकातील परिस्थिती पूर्णपणे भिन्न आहे. आजचा भारत आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या एक महासत्ता म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे किरकोळ क्षेत्रातील गुंतवणुकीच्या माध्यमातून जागतिकिकरणाच्या प्रवाहात सामील होण्याचा भारत सरकारचा निर्णय योग्य वाटतो.

६. शेवटचे आणि अत्यंत महत्त्वाचे म्हणजे किरकोळ क्षेत्रातील परकीय गुंतवणूकीमुळे परकीय आणि भारतीय कंपन्या एकमेकांच्या संपर्कात येतील त्यांच्यात आधुनिक कार्यपध्दती आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण होईल. याचा जास्त फायदा भारतीय कंपन्यांना मिळेल.

संभाव्य तोटे:

१. किरकोळ क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीमुळे या क्षेत्रातील अनेक व्यवसाय बंद पडतील. त्यामुळे अनेक लहान उद्योजकांचे भवितव्य धोक्यात येईल आणि बेरोजगारीचे प्रमाण वाढेल. या गुंतवणुकीमुळे निर्माण होणारा रोजगार काही लाखात तर बेरोजगारीचे प्रमाण काही कोटीत असेल.

२. भारतात येणाऱ्या किरकोळ क्षेत्रातील कंपन्यांमध्ये काम करणारे हात भारतीयांचे असतील. या कंपन्यांना जो नफा होईल. तो मात्र परकीयांच्या खिशात व देशात जाईल. अशा प्रकारे या कंपन्यांची आर्थिक उलाढाल

व लाभांचा भारताला फारसा फायदा होणार नाही.

३. किरकोळ क्षेत्रात गुंतवणूक करणारे गुंतवणुकदार सुरुवातीच्या काळात अवपूंजनाचा मार्ग स्वीकारु शकतात. वस्तूंच्या किंमती कमी करुन ते त्यांची मक्तेदारी प्रस्थापित करु शकतात. नंतर मात्र वस्तुंच्या किंमतीत वाढ करुन हे गुंतवणुकदार भारतीय ग्राहकांची पिळवणूक करु शकतात.

४. विदेशातील कंपन्या भांडवल, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने भारतीय कंपन्यांपेक्षा सक्षम व प्रबळ आहेत. किरकोळ क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे त्यांचे आर्थिक क्षेत्रातील प्राबल्य वाढू शकते. असे झाल्यास या कंपन्या भारताच्या अर्थकारण आणि राजकारणात हस्तक्षेप करु शकतात.

५. किरकोळ क्षेत्रातील परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक भारतीय शेतकऱ्यांसाठी जास्त फायद्याची असेल असे या निर्णयाचे समर्थन करणारे विचारवंत सांगतात. परंतु अशा गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांना कोणताही विशेष फायदा झाला नसल्याचा आजवरचा इतिहास आहे.

सप्टेंबर २०१२ मध्ये सरकारने किरकोळ क्षेत्रात परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याला परवानगी दिली. या धोरणासंबंधी आज अनेक आरोप-प्रत्यारोप होत आहेत. असे असले तरी याबाबतची सत्यता पडताळून पाहण्यासाठी काही काळ जावा लागेल. तसेच किरकोळ व्यापार क्षेत्र हे भारताचे अतिशय महत्त्वाचे क्षेत्र आहे. कोट्यवधी भारतीयांच्या रोजगार व उपजीविकेचे ते प्रमुख साधन आहे. तेव्हा परकीय कंपन्यांच्या स्पर्धेत या क्षेत्राचा बळी जाता कामा नये म्हणून सरकारने या धोरणाची काळजीपूर्वक अंमलबजावणी करावी.

## संदर्भ सूची:


1. Bhasin, N. (2008), *Foreign Investment in India 1947-48 to 2007-08*, New Century Publications, New Delhi.
2. Bhati, V. (2006), *Foreign Direct Investment Contemporary Issues*, Deep & Deep Publication, Pvt. Ltd., New Delhi.
3. Khurud, B. S. and Abhang S. B. (July 2012), *FDI: Why India Lags Behind*, Facts For You, Vol. 32, No. 8, PP. 27-31.
4. Mishra , A. K. (March 2013), *FDI - A Perspective*, International Journal of Management and Economics, Vol. 2, No. 7, PP. 1-4.
5. चौधरी, निधी (जाने. - मार्च २०१३), *बहुब्रैंड खुदरा कारोबार में विदेशी प्रत्यक्ष निवेश - मुद्दे एवं विवेचना*, बँकिंग चिंतन - अनुचिंतन, अंक २, पृष्ठ क्र. ३३-३६.
6. Singh, N. K. (2002), *Report of the Foreign Direct Investment Committee*, Ministry of Finance, Government of India.
7. www.rbi.org.in
8. www.dipp.nic.in

# रुपयाचे अवमूल्यन - कारणे, परिणाम व उपाय

**मोहन किसनराव चौधरी, पुणे,**
व्यापारी अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी, प्राधिकरण.
भ्रमणध्वनी : ९८८१५७४९६८

जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर सर्व क्षेत्रात परिणाम झालेले आहेत. त्यामध्ये खनिज तेलाच्या किंमती भडकल्या आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे वाईट परीणाम निश्चितच झालेले आहेत. खनिज तेलावर भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती व ग्रामीण भागाचे अर्थकारण अवलंबून आहे. खनिज तेलामध्ये सतत वाढ होणार असल्याने महागाईही मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्याचा फटका सर्वसामान्य ग्रामीण भागातील व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांना जास्त प्रमाणात बसणार आहे.

देशाच्या अर्थव्यवस्थेची दुर्दशा अशीच सुरू राहिल्यास २०१४ पर्यंत एका अमेरिकन डॉलर साठी ७० रूपये मोजावे लागतील असे बँक ऑफ अमेरिका, मेरिल लिन्चने स्पष्ट केले आहे. देशाच्या चालू खात्यातील तूट सातत्याने वाढत आहे. ही तूट कमी होत २०१५ पर्यंत ४% पर्यंत येईल. भारतीय चालू खात्यातील तूट ही सहन करण्याच्या पातळी पलिकडे जात आहे ही तूट २०१२-१३ मध्ये जी.डी.पी.च्या ४.८% होती. २०१३-१४ मध्ये ही तूट ४.३% होईल. तर २०१४-१५ मध्ये ती ३.७% होईल. देशात येणाऱ्या व देशाबाहेर जाणाऱ्या परकीय चलनातील फरक म्हणजे चालू खात्यातील तूट किंवा कॅड ही जी.डी.पी.च्या २.४% राहिल्यास ती अर्थव्यवस्थेसाठी सुसह्य मानण्यात येते. अर्थव्यवस्थेचा धीम्या गतीने होत असलेला विकास यामुळे निर्यातीवर होणारा विपरीत परिणाम, वाढता खनिज तेलाचा खर्च, यामुळे चालू खात्यातील तूट वाढत आहे. जुलै मध्ये रुपयाचा प्रवास १०% घसरला, जून अखेर अमेरिकी डॉलरसाठी ६० रुपये लागत होते तर ऑगस्ट अखेर ६६ रूपये मोजावे लागले. या पार्श्वभूमीवर परकीय गंगाजळी राखण्यासाठी व त्यात वाढ करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने तातडीची पावले उचलणे गरजेचे आहे.

दरवाढ:

महागाईच्या वणव्यात होरपळणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये रूपयाच्या घसरलेल्या मूल्यामूळे इंधनाचे चटके बसणार आहेत. रुपयाच्या घसरणीमुळे देशातील पेट्रोलियम कंपन्यांनी पेट्रोलच्या किंमतींमध्ये प्रतिलिटर २.३५ रु. तर डिझेलच्या किंमतींमध्ये ५० पैशांची वाढ केली आहे. ही दरवाढ गेल्या तीन महिन्यातील पेट्रोल दरवाढीची सहावी वेळ आहे. तर १७ जानेवारीपासून आठ वेळा डिझेलची दरवाढ झाली आहे. रुपयाची घसरण आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये वाढलेले इंधनाचे दर यामुळे भारतात या जागतिकीकरणाच्या प्रभावामुळेच ही अर्थव्यवस्था महागाईच्या खाईत सापडली आहे.

रुपयाची घसरण फार मोठ्या प्रमाणात वेगाने झाली आहे. २०१२-१३ या वर्षात डॉलरच्या तुलनेच रुपयाचे मूल्य ५४.४५ वरून ६८.३६ पर्यंत झालेले आहे. यामुळे आयात कराव्या लागणाऱ्या इंधनाचे दर वाढले. अशीच परिस्थिती पुढे राहिली तर या वर्षामध्ये तोटा हा १.८० लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल. २०१२-१३ मध्ये हा तोटा इंधन कंपन्यांना १.६१ लाख कोटी इतका होता.

अमेरिकेने सीरिया या देशाच्या विरोधात कारवाई करण्याची तयारी चालविली असल्याने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये इंधनाचे दर वाढलेले आहेत. ऑगस्ट २०१३ अखेर या दरवाढीनंतरही सरकारी कंपन्यांना तोटा सहन करावा लागत आहे. रॉकेल रु. ३३.५४ प्रतिलिटर, डिझेल रु. १०.२२ प्रतिलिटर, सिलेंडर रु.४१२ (१४.२ किलो एल.पी.जी.साठी). जून २०१३ पासून पेट्रोल मधील भारतातील आयात ९.१७% प्रतिलिटर, पहिल्या तिमाहीतील सरकारी कंपन्यांना एकत्रित तोटा - रु. ४४०३ कोटी. पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅस दर वाढून महागाईचा भडका उडाला तर अन्नसुरक्षा योजनेद्वारे स्वस्तात मिळणाऱ्या गहू-तांदळाचा गरिब जनतेला खरोखरच किती उपयोग होईल याची शंका वाटते.

अमेरिकेने जाहीर केलेल्या काही अनपेक्षित चलनविषयक धोरणांमुळे केवळ भारतीय रुपयावरच नव्हे तर ब्राझील, दक्षिण आफ्रिका या देशांसह अनेक देशांच्या चलनांवरही काही प्रमाणात आघात झालेला आहे. भारतात अगोदरच आयात निर्यातीमधील वाढलेली तफावत, त्याचप्रमाणे वित्तीय तुट व मोठ्या प्रमाणात रुपयाची घसरण त्यामुळेच हा पेचप्रसंग उद्‌भवलेला आहे.

करन्सी स्वॉपिंग:

रुपयाच्या घसरणीची परिस्थिती आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने करन्सी स्वॉपिंग या मार्गाचा अवलंब होऊ शकतो. दक्षिण आफ्रिकेबरोबर यापूर्वी भारताची बोलणी झाली आहे. '*ब्रिक्स*' (ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिका) राष्ट्र समुहाच्या पातळीवरच हा उपाय केला जाईल. या राष्ट्रसमुहातील देशांतर्फे एक विशेष निधी जमा केला जाईल आणि त्यातून देशाला गरज भासेल त्यास काही अटींवर संबंधित चलन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे १९९१ ची परिस्थिती उद्‌भवणार नाही.

रुपयाचे मूल्य घसरण्याची कारणे

१)आयातदारांकडून अमेरिकी डॉलरला मोठी मागणी आणि परकीय गुंतवणुकदार संस्थांकडून देशातून काढून घेतले जाणारे भांडवल.

२)अमेरिकी डॉलरचे बळ वाढत चालेले असल्याने रुपयाचे मुल्य कमी होत आहे.

३)रिझर्व्ह बँकेने परकीय चलन विनिमय बाजारपेठेत हस्तक्षेप केला नाही.

४)रुपयाचे अवमूल्यन आणि देशातील चालू खात्यातील तूट वाढत चालल्याने फिच या पतमूल्यांकन संस्थेने पतमूल्यांकन घटविण्याचा इशारा दिला आहे.

५)परकीय गुंतवणुकदार संस्थांनी (एफ.आय. आय.) ७५ कोटी डॉलर मुल्याच्या शेअरची आणि या वर्षभरात ४.२ अब्ज डॉलर मुल्याच्या रोख्यांची विक्री केली आहे. परकीय गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे.

६)देशातून मोठ्या प्रमाणावर भांडवल बाहेर गेल्यामुळे आणि निर्यातदारांनी मोठ्या प्रमाणावर डॉलरच्या विक्रीमुळे रुपयामध्ये घसरण झाली.

७)चालू वर्ष संपेपर्यंत टप्प्याटप्प्याने अर्थव्यवस्थेने देऊ केलेले विशेष मदतीचे पॅकेज काढून अमेरिकेच्या फेडरल बँकेने शिक्कामोर्तब केल्यानंतर सशक्त होण्यास मदत होऊन रुपया दुबळा झाला.

**रुपयाच्या अवमूल्यनाचे परिणाम:**

१)रुपयाच्या अवमूल्यनामुळे आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किंमतीत वेळोवेळी वाढ होऊ शकते. आयात होणाऱ्या कच्च्या तेलाची किंमत वाढल्याने पेट्रोल व डिझेल दर वाढतच राहतील. परिणामी महागाई वाढ रोखणे अवघड होईल. यामुळे रूपयाची क्रयशक्ती कमी होत जाईल व त्यामधूनच गुंतवणूकीचे मूल्य कमी होईल.

२)वाहन, गृहनिर्माण, पायाभूत सोयी-सुविधा या क्षेत्रात मंदीसदृश परिस्थिती आहे. याचा परिणाम कंपन्यांच्या ताळेबंदावर झाल्याचे दिसते.

३)गुंतवणुकदार संभाव्य नुकसान टाळण्यासाठी मंदीसदृश क्षेत्रात नव्याने गुंतवणुक करत नाहीत.

४)ज्या कंपन्यांच्या ताळेबंदात मोठ्या प्रमाणात कर्ज दिसून येते, अशा कंपन्या भविष्यात अडचणीत येत असतात.

५) रिझर्व्ह बँकेचे सध्याचे धोरण विचारात घेता भविष्यात व्याजदर कमी होणार नाहीत. याशिवाय परदेशी गुंतवणुकदार विक्रीचा मारा करीत गुंतवणूक कमी करीत असल्याचे दिसते. त्यामुळे शेअर बाजाराप्रमाणे रोखेबाजारातही काही प्रमाणात अस्थिरता दिसून येते.

६)भविष्यकाळात व्याजदर वाढले तर गुंतवणुकीचे मूल्य आणखी कमी होईल.

७)अमेरिकेतील बेरोजगारी २००७ नंतर नीचांक गाठल्याने जगभरातील चलनांवर परीणाम, शेअर बाजार कोसळल्याने रुपया कोसळला.

८)पेट्रोल, डिझेल, इतर अनेक वस्तू महाग झाल्या. तसेच रिझर्व्ह बँकेकडून व्याजदरात वाढ.

९)अमेरिकी डॉलरची वाढलेली ताकद, परकीय गुंतवणुकदारांकडून सुरू असलेली शेअर आणि रोख्यांचीविक्री यामुळे आयातदारांकडून डॉलरला वाढलेली मागणी या सर्वांचा परिणाम रुपयाच्या मूल्यावर झाला.

१०)रुपयाच्या घसरणीचा परिणाम आयातीवर होणार आहे. तेल, सोने, वाहनांचे सुटे भाग, यंत्रसामुग्री, इलेक्ट्रॉनिक वस्तू यांचे भाव पुढील काळात वाढणार आहेत. तसेच ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक उपकरणे तयार करणाऱ्या कंपन्यांनी उपकरणांच्या किंमतीत वाढ करण्यास या आधीच सुरुवात केली आहे.

११)रुपयाची घसरण वाईट आहे असे नाही तर घसरणीमुळे लाभही होतात. त्यामुळे आपली

निर्यात ही सॉफ्टवेअर, यंत्र व ऑटोमोबाईल्स यांच्यामध्ये वाढते. परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांकडून देशाकडे डॉलरचा पुरवठा वाढेल. अनावश्यक गोष्टीची आयात कमी होईल. या सर्वांचा परिणाम डॉलरचा पुरवठा नियमित होईल व त्याची मागणी कमी होईल व रूपया आपोआप स्थिर होईल. यालाच ÷*सेल्फ करेक्टिंग मेकॅनिझम*' असे म्हणतात. त्यामुळे चालू खात्यातील तूट कमी होऊन त्याचा चांगला परिणाम अर्थव्यवस्थेवर झालेला दिसून येईल.

उपाय:

१)रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी स्वत:च्या साठ्यातील विदेशी चलन बाजारात आणून त्याचा पुरवठा वाढवावा.

२)बँक दर व पैसे उसने देणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या ÷*मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी*'चा दर वाढवावा.

३)अर्थसंस्थांना रिझर्व्ह बँकेद्वारा होणाऱ्या चलन पुरवठ्यावर मर्यादा आणाव्यात व त्याद्वारे सरकारी रोख्यांची विक्री करून अर्थव्यवस्थेतला अतिरिक्त पैसा शोषून घ्यावा.

४)रिझर्व्ह बँकेने देशाबाहेर गुंतवणूक करणाऱ्या भारतीयांच्या अशा गुंतवणूकीवर निर्बंध घालावेत. त्यामुळे डॉलरचा तुटवडा कमी होण्यास मदत होईल व रुपयाची घसरण रोखता येईल.

५)लोकांनी सोन्यासारख्या अनुत्पादक व देशातले डॉलरमध्ये गुंतवणुकीपेक्षा उत्पादक स्वरूपात पैसे गुंतविणे. त्यामुळे अर्थव्यवस्थेत उत्पादन वाढविता येईल व महागाई कमी करता येईल.

६)रिझर्व्ह बँकेने नवीन आणलेल्या महागाई निगडीत रोखे (इम्फ्लेशन इंडेक्स बाँड) मध्ये गुंतवणूक करणे. त्यामुळे महागाईच्या निर्देशांकानुसार मुद्दल व व्याज दोन्हीमध्ये वाढ होईल व वाढीव रिटर्न मिळतील. त्यामुळे आर्थिक स्थिरता राखणे शक्य होईल. ÷बदलता चलन विनियम दर' हे जागतिकीकरणामधील एक वास्तव आहे, हे नाकारता येत नाही. जागतिकीकरणाचा फायदा घेताना वास्तवाशी परिस्थितीजन्य सामना करावा लागतो. ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, ब्राझील यासारख्या अनेक देशांच्या चलनांत रुपयांपेक्षाही जास्त घसरण झालेली आहे. डॉलर खरेदी करणाऱ्यांना आयातदारांसारख्या घटकांनी फॉरवर्ड कव्हर (विनिमय बाजारातील एक प्रकारचे वीमाकवच) घेऊन आपली जोखीम मर्यादित ठेवणे नेहमीच हिताचे आहे.

संदर्भ:

१)Mohanty Deepak (May 2012), *Evidence of Interest Rate Channel of Monetary Policy Transmission in India*, WPS (DEPR) 6/2012.

२) R. Dutt and KPM *'Sundharam' Indian Economy*, S. Chand & Co. New Delhi - 01.

३)RBI (2011-12), *Report of the Working Group on Operation of Monetary Policy.*

४) RBI Bulletin various issues.

५)अर्थसंवाद, एप्रिल-जून, २०१३, खंड ३७, अंक १.

६)दै. सकाळ, सप्तरंग, ऑगस्ट २०१३, ÷आर्थिक' डॉ. आशुतोष रारावीकर.

७)दै. सकाळ, जून २०१३, जुलै २०१३, ऑगस्ट २०१३

# जागतिकीकरण व ग्रामीण विकास

**ए. के. पाटील, कराड,**
सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड
भ्रमणध्वनी: ९८२२२४९०८२

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकास हा उद्योग व कृषी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो. कृषी व उद्योगक्षेत्राच्या विकासासाठी ग्रामीण संरचनेच्या विकासाची आवश्यकता असते. या क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची अनुकुलता असेल तर विकासाच्या वेगाची गती वाढते. कृषी व उत्पादन क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी मुलभूत सेवा, सुविधा ही एक आवश्यक पूर्व अट आहे. एखाद्या राज्याचा विकास हा त्या राज्यातील ग्रामीण विकासावर अवलंबून असतो. सुविधांचे स्वरुप दर्जा आणि विस्तार यावर अवलंबून असतो. शहरात पायाभूत सुविधांचे प्रमाण चांगले असल्याने तेथील जीवनमानाचा दर्जा उंचावलेला आहे. तर ग्रामीण भागात तो कनिष्ठ आहे.

जागतिकीकरणाच्या युगात बदलणाऱ्या जागतिक परिस्थितीचा अर्थव्यवस्थेमध्ये होत असलेला विकासाचा पूर्ण सामर्थ्याने लाभ उठविण्यासाठी गुणवत्ता आणि कायमस्वरुपी सेवेची व्यवस्था होणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या विकासाचे अंग उपलब्ध सुविधांच्या विकासावर अवलंबून असते.

आर्थिक पायाभूत सुविधांमध्ये ऊर्जा, वाहतूक, दळणवळण, दूरसंचार, वीज, रेल्वे, हवाई, वाहतूक, विमानतळ, बंदर, इत्यादी महत्त्वाच्या घटकांचा समावेश ग्रामीण विकासात करण्यात येतो. नैसर्गिक साधन सामुग्रीची कमतरता असताना देखील केवळ प्रभावी नियोजन व कार्यक्षमता याच्या जोरावर जपानसारख्या राष्ट्राने उल्लेखनीय प्रगती केली आहे. हे केवळ पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेमुळे झाले असे म्हणता येईल, याउलट भारतात नैसर्गिक साधनसंपत्तीची विपुलता असताना देखील अकार्यक्षम नियोजन व पायाभूत सुविधांची वानवा असल्यामुळे पर्यायी उपयोग होऊ शकला नाही.

**जागतिकीकरण अर्थ:**

*÷÷जागतिकीकरण म्हणजे आर्थिक कार्याचा विस्तार हा देशाच राजकीय सीमांच्या पलिकडे केला जातो. तसेच भांडवल, सेवा व मजूर यांच्यासाठी*

*मुक्त वातावरण निर्माण होते.''*

जागतिकीकरणा चार प्रमुख बाबींचा समावेश होतो.

१)ग्रामीण भागातील व्यापारवर निर्बंध दुर करणे.

२)तंत्रज्ञानाच्या मुक्त आयात-निर्यातीस चालना देणे यामुळे ग्रामीण विकासावर चांगला फायदा होईल.

३)भांडवलाच्या मुक्त संचारास परवानगी देणे यामुळे ग्रामीण भागात पर्याप्त भांडवल पोहचू शकते.

४)कामगारांना विविध देशात मुक्त संचार करता यावा यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे. ग्रामीण भागातील विकास साध्य करणे.

## जागतिकीकरणाचे भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परिणाम:

१)जागतिकीकरणानंतर (१९९१) राष्ट्रीय उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर बदल होत गेला. यामुळे ग्रामीण भागातही सुविधा मोठ्या प्रमाणावर बदल होत गेला.

२)जागतिकीकरणाने जगाची संकल्पना ÷एक खेडेगाव' या स्वरुपात करण्यात येत आहे.

३)जागतिकीकरणामुळे प्रगत आणि अप्रगत देशात देवाणघेवाण वाढून ग्रामीण विकासावर त्याचा अनुकूल परिणाम दिसू लागला.

४)देशातील अतिरिक्त उत्पादन विदेशी बाजारात विकता आल्याने विदेशी गंगाजळी मिळवता येऊन देशांतर्गत ग्रामीण विकासासाठी भांडवल वापरता येऊ लागले आहे.

५)जागतिक स्तरावरती बाजारपेठ उपलब्ध झाल्याने देशादेशात उत्पादनवाढीला चालना मिळते व त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील विकासासाठी चालना मिळून ग्रामीण नैसर्गिक संसाधनाचा पर्याप्त वापर होईल.

६)जागतिकीकरणाने एकमेकावरील अवलंबन वाढल्याने त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील पायाभूत सोयी-सुविधांचा एकत्रित विकास होऊ लागला आहे.

## भारतातील ग्रामीण परिस्थिती :

ग्रामीण विकास ही संकल्पना बहु व्यापक व बहु आयामी स्वरुपाची आहे. यामध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाशी संबंधित घटकांचा समावेश केला जातो. मानवी संसाधनाचा विकासामध्ये साक्षरता, विशेषत: महिला साक्षरता, शिक्षण आणि तांत्रिक कौशल्य विकास करणे, आरोग्य, स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य, भूसुधारणा, स्थानिक पातळीवरील उत्पादन संसाधनाचा विकास, दारिद्र्य निर्मुलन आणि राहनीमानाचा दर्जा उंचावणे. सध्या २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ग्रामीण भागामध्ये राहणारी लोकसंख्या ७४ कोटी, २४ लाख, ९०हजार, ६३९ इतकी आहे.

विकसनशील देशात बेरोजगारी आणि दारिद्र्य ही मुख्य समस्या असते कारण देशात कृषी अर्थव्यवस्था कार्यरत असते. या क्षेत्रात क्षमतेपेक्षा अधिक लोक काम करीत असतात. त्यामुळे त्यांची अंतिम उत्पादन क्षमता (सीमांत उत्पादनक्षमता) शुन्य असते. जर याच ठिकाणी पायाभूत सुविधा जसे की, रस्ते, महामार्ग, विमानतळ, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, मोठ्या प्रमाणावर सुरु केल्या प्रचंड प्रमाणात मजुरांची मागणी येईल यामध्ये कुशल व अकुशल या दोन्हींचा समावेश राहील. मजुरांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल. रोजगारनिर्मिती मागणी यामध्ये

वृद्धी होऊन अंतिमतः आर्थिक विकास निरंतर सुरु राहील. समजा, देशात सरकारने राष्ट्रीय महामार्गाची बांधणी करावयाची ठरविली तर त्यासाठी मोठ्या वित्तीय संसाधनाची आवश्यकता असते. ही संसाधने सरकार देशातील बचती व सरकारी रोखे यांच्या माध्यमातून एकत्र करते. त्याचबरोबर या प्रकल्पासाठी तंत्रकुशल अभियंते यांची गरज असते. त्याचबरोबर अकुशल मजुरांची प्रचंड मागणी असते. नैसर्गिक साधनसंपत्तीला ही मागणी येते. सर्व घटकांचा कार्यक्षमता व पर्याप्त उपभोग करणे शक्य होईल. आर्थिक विकासामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक वीजनिर्मिती देशाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व संशोधन विषयक विकास साध्य नियोजनविना शक्य नाही. वीज ही देशाची रक्तवाहिनी आहे.

**ग्रामीण विकासाची वैशिष्ट्ये:**

१) लोक वर्गणीतून ग्रामीण विकास करणे.

२) नियोजन व निर्णय प्रत्यक्षः लोकांचा प्रभावी सहभाग.

३) ग्रामीण शहरी अंतर कमी करणे.

४) ग्रामीण लोकांना स्वयंरोजगाराच्या संधी देऊन आर्थिक विकास करणे.

५) अधिक चांगल्या आर्थिक विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी सुविधा निर्माण करणे.

६) ग्रामीण भागात सतत विकास करण्यासाठी परियोजना सुरु करण्याच्या दृष्टीने शासनास मदत करणे.

**भारतातील ग्रामीण रस्त्यांचा विकास:**

जागतिक औद्योगिकीरणामुळे वाहतूक व्यवस्थेचा व्याप खुप वाढला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आयातीमुळे वेळ व पैसा याचा अपव्यय बऱ्याच प्रमाणात कमी झाला. चलनशीलता हे आधुनिकीकरणाचे व विकासाचे महत्त्वाचे अंग आहे. जर योग्य रस्ते सुविधा त्यामुळे खेडी गतिमान होतील आणि योग्य मार्गाची जोडणी असेल तर चलनशीलता राहू शकते.

ग्रामीण भागाला जवळच्या बाजारपेठेच्या गावाला जोडणारा रस्ता असेल तर व्यापार व फिरती विक्री करणाऱ्यांचा ग्रामीण शेतकरी, कामगार, काम कर्त्यांना त्यांच्या कृषी उत्पादनास जास्त भाव मिळू शकतो म्हणजेच ग्रामीण भागातील रस्ते हा ग्रामीण समृद्धीसाठी एक आवश्यक घटक आहेत. पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण खेड्यांना जोडणारे रस्ते असणे हा किमान गरजेचा कार्यक्रम म्हणून धरला गेला. सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये असे ठरेल की, १५०० पेक्षा जास्त लोकवस्ती असलेली खेडेगावे बारमाही रस्त्याने एकमेकास जोडली जातील.

**ग्रामीण भागातील टेलिफोन सेवा :**

ग्रामीण भागात उपलब्ध झालेल्या टेलिफोन सुविधेमुळे जगातील कोणत्याही ठिकाणी संपर्क करता येतो. त्यामुळे ग्रामीण लोकांची गतिशीलता वाढते. ग्रामीण विकासाचे खरे उद्दीष्ट टेलिकॉम यंत्रणेचा लाभ समाजाच्या सर्व थरातील लोकांना अगदी सामान्य माणसाला मिळाला पाहिजे हे आहे. शहरी भागात दर ५०० लोकांमागे एक सार्वजनिक टेलिफोन व राष्ट्रीय महामार्गावर दर १० किलोमीटरवर एस.टी.डी. सुविधा असलेला एक सार्वजनिक टेलिफोन ९ व्या योजनेच्या अखेरपर्यंत देण्याचे उदीष्ट होते. डिसेंबर २००९ मध्ये ग्रामीण भागातील फोनची संख्या १७.४६ कोटी होती.

**ग्रामीण विद्युतीकरण :**

राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना

२००५ पासून हाती घेतलेल्या या योजनेचा उद्देश विद्युतीकरण न झालेल्या खेड्यांचे विद्युतीकरण व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना मोफत वीज जोडून देणे असा आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषे खालील १३.४४ लाख कुटुंबापैकी ३१ डिसेंबर २०१० पर्यंत एकूण ९.४५ लाख कुटुबांना वीज जोडणी केली होती. ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्राने पिण्यायोग्य, पर्याप्त सोयीची किफायतशीर व सर्वांना समानतेने उपलब्ध होईल अशा पाण्याची शाश्वत उपलब्धता निश्चित करणे पंचायत राज व संस्था आणि सामाजिक संस्थांचा समावेश करुन योजनेचे विकेंद्रीकरण करणे यावर भर दिला.

**समारोप :**

जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती निर्माण झाली आहे. खेडे हे आंतरराष्ट्रीय पातळीशी भांडवल गुंतवणूक, तंत्रज्ञान, कच्चा माल आयात व पक्क्यामालाची निर्यात, इत्यादीबाबत माहिती मिळवून वापर करु लागल्याने उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करता येऊ लागला आहे. शेती व शेती संलग्न व्यवसायातील उत्पादित माल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचल्यामुळे ग्रामीण शेतकऱ्याची उत्पन्न पातळी वाढून खरेदीशक्ती वाढली आहे. कृषी व उत्पादन क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी मुलभूत सेवा, सुविधा ही एक आवश्यक पुर्व अट आहे. एखाद्या राज्याचा विकास हा त्या राज्यातील ग्रामीण विकासावर अवलंबून असतो. सुविधांचे स्वरुप दर्जा आणि विस्तार यावर अवलंबून असतो. शहरात पायाभूत सुविधांचे प्रमाण चांगले असल्याने तेथील जीवनमानाचा दर्जा उंचावलेला आहे. तर ग्रामीण भागात तो कनिष्ठ आहे. मानवी संसाधनाचा विकासामध्ये साक्षरता, विशेषतः महिला साक्षरता, शिक्षण आणि तांत्रिककौशल्य विकास करणे, आरोग्य, भूसुधारणा, स्थानिक पातळीवरील उत्पादन संसाधनाचा विकास, दारिद्र्य निर्मुलन आणि राहनीमानाचा दर्जा उंचावणे. पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण खेड्यांना जोडणारे रस्ते असणे हा किमान गरजेचा कार्यक्रम म्हणून धरला गेला. सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये असे ठरले की, १५०० पेक्षा जास्त लोकवस्ती असलेली खेडेगावे बारमाही रस्त्याने एकमेकास जोडली जातील. ग्रामीण विकासाचे खरे उद्दीष्ट आहे. टेलिकॉम यंत्रणेचा लाभ समाजाच्या सर्व थरातील लोकांना अगदी सामान्य माणसाला मिळाला पाहिजे हे आहे. ग्रामीणभागातील दारिद्र्यरेषेखालील १३.४४ लाख कुटुंबापैकी ३१ डिसेंबर २०१० पर्यंत एकूण ९.४५ लाख कुटुबांना वीज जोडणी केली होती.

**संदर्भ सूची :-**


१.Chandra Prasad, *Agricultural and Rural Development in India, Since 1947* New Century Publication, New Delhi, 2009

२.*Economic Survey of India*, 2012-13

३.www.ruraldevelopment.com

४.नलिनी पंडीत, *जागतिकीकरण आणि भारत*, लोकवाडमय गृह, मुंबई २००१

५.डॉ. वि. म. गोविलकर, *जागतिकीकरण आणि जागतिक व्यापार संघटना*, ब्रेन टॉनिक प्रकाशन, नाशिक २००७.

# जागतिकीकरणाचा पर्यटन क्षेत्रावरील परिणाम

**राजू कथ्थू शिंदे, देवपूर,**
अर्थशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, धुळे.
भ्रमणध्वनी: ९९२१२२११७४.

विविधतेने नटलेल्या भारत देशाचे भौगोलिक व्यक्तिमत्व पर्यटन व्यवसायासाठी फार अनुकूल आहे. त्यासाठी खुप वाव आहे, भारताचा इतिहासच मानवी मनाला भुरळ पाडणारा आहे. पंडित नेहरूंनी आपल्या डिस्कव्हरी ऑफ इंडिया या ग्रंथात लिहिले आहे की, *पूर्वी येथे असे लोक होऊन गेले की, त्यांना जीवन म्हणजे काय ते कळलेले होते. त्यांनी त्यांच्या विद्वत्तेने या देशांचा सांस्कृतिक इतिहास घडविला, तो हजारो वर्षे जिवंत आहे.* सर्व ऋतुत सदाबहार असणाऱ्या या देशात पर्यटनाला ब्रिटिश काळात सुरुवात झाली. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात देशातील एक प्रमुख आर्थिक व्यवसाय म्हणून तो मान्य झाला आहे. म्हणूनच महाराष्ट्र सरकारने २०११-१२ हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून घोषित केले आहे. वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशनने असे म्हटले आहे की, ग्रामीण पर्यटन, समुद्र पर्यटन, मेडिकल टुरिझम, इको टुरिझम याला महत्व आले आहे. याचबरोबर कृषी पर्यटन, आध्यात्मिक पर्यटन, साहसी पर्यटन ऐतिहासिक पर्यटन, समुदकिनारे हेही महत्वाचे आहेत.

आधुनिक पर्यटन व्यवसायाचे महत्व तीन कारणांमुळे वाढले आहे.
१)जगातील विकसित देशात विशेषतः पश्चिम युरोपियन व उत्तर अमेरिकन देशात या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर लोकांना व्यवसाय उपलब्ध झाला.
२)जगातील अविकसित देशांच्या अर्थव्यवस्थेतही या व्यवसायाचा महत्वाचा सहभाग महत्वाचा आहे.
३)या व्यवसायामुळे अनेकांना डॉलर सारखे आंतरराष्ट्रीय चलन उपलब्ध होते.

भारतातील विविधतेमुळे पर्यटन स्थळांमध्ये सुध्दा भारताइतकी विविधता दुसरीकडे नाही. त्यामुळेच मॅक्सम्युल्लर यांनी म्हटले होते की, *जगातील सर्वात संपन्न, शक्तिशाली व सुंदर देश कोणता असेल तर तो भारत होय.* प्राकृतिक विविधतेबरोबरच लोकजीवन, कला, संस्कृती याबाबतही विविधता आहे. सुंदर हिमाच्छादित पर्वतशिखरे, धबधबे, सुंदर किनारे, राष्ट्रीय उद्याने, विविध पशु-पक्षी, पवित्र धार्मिक स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात. तसेच भारताला

वास्तुकला, शिल्पकला यांचा संपन्न व प्रदीर्घ वारसा लाभला आहे. जगप्रसिध्द ताजमहाल, अजिंठा-वेरूळ लेणी समुह, खजुराहो, कोणार्क येथील वास्तुकला व शिल्पे प्रसिध्द आहेत. चित्रकला, हस्तकला, लोककला विशेष आहेत. नृत्य व संगीत ही भारतीय सांस्कृतिक व धार्मिक जीवनाची अविभाज्य अंगे आहेत. कथ्थक, भरतनाट्यम, कथकली, कुचीपुडी, ओडिसी, मणिपूरी असे नृत्यप्रकार जगप्रसिध्द आहेत. भारतीय संगीतकला अनेकांनी अजरामर केली आहे. म्हणूनच भारताला पर्यटाकांचे नंदनवन असे म्हणतात. या विविध नैसर्गिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक घटकांच्या विविधतेमुळे देशात हजारो प्रकारची पर्यटन स्थळे निर्माण झालेली आहेत.

भारतामध्ये येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विकसनशील देशाला पर्यटनापासून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळते. शिवाय या व्यवसायात अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. पर्यटन स्थळांचा शोध घेऊन विकास करण्याच्या हेतूने इ. स. १९४५ मध्ये सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. इ.स. १९४८ मध्ये टुरिस्ट ट्रॅफिक बंच स्थापन करण्यात आली. त्याचे पर्यटक वाहतूक, पर्यटन प्रशासन, पर्यटन प्रसिध्दी व वितरण असे चार उपविभाग पाडण्यात आले. पर्यटन विकासासाठी भारतात व भारताबाहेर पर्यटन कार्यालये स्थापन करण्यात आलेली आहेत. १ मार्च १९५८ रोजी वाहतूक मंत्रालयात स्वतंत्र पर्यटन मंत्रालयाची स्थापना करून पर्यटनाशी संबंधित सर्व खाती या मंत्रालयाकडे सोपविण्यात आली आहेत. इ.स. १९६५ मध्ये भारत सरकारने या समितीच्या शिफारशीनुसार हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, इंडियन टुरिझम कॉर्पोरेशन व इंडियन ट्रान्सपोर्ट टुरिझम अंडरटेकिंग या खाजगी कंपन्या पर्यटन विभागात विलीन केल्या. इ.स. १९६६ मध्ये भारत सरकारने पर्यटन विभागाची पुनर्रचना केली. त्यानुसार भारतीय पर्यटन विकास महामंडळ (आयटीडीसी) म्हणून ओळखले जाऊ लागले. जुलै १९६८ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याकडे ताबा असलेली हॉटेल अशोका, हॉटेल जनपथ व ॲडमिनिस्टेटिव्ह रिर्म कॉर्पोरेशन यांचा ताबा भारतीय पर्यटन विकास महामंडळाकडे देण्यात आला. नंतरच्या काळात लोदी व रणजित हॉटेल्सचा ताबाही महामंडळाकडे देण्यात आला. या महामंडळाकडे सहा सहायक कंपन्या आहेत. १) आसाम हॉटेल अशोक कॉर्पोरेशन लि. २)रांची अशोक बिहार हॉटेल कॉर्पोरेशन ३) उत्कल अशोक हॉटेल कॉर्पोरेशन लि. ४) मध्यप्रदेश अशोक हॉटेल कॉर्पोरेशन लि. ५) पाँडेचरी अशोक हॉटेल कॉर्पोरेशन लि. ६) दोनी पोलो अशोक हॉटेल कॉर्पोरेशन लि. यांचा समावेश आहे.

महामंडळाच्या सेवांचे एक जाळे भारतात व भारताबाहेर तयार करण्यात आले आहे. महामंडळाने निवास व भोजन व्यवस्था, आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुक्त व्यापारी केंद्र चालविणे, दर्जेदार आकर्षक पर्यटन साहित्य उपलब्ध करुन देणे इ.कार्ये होती घेतली आहेत. भारतीय पर्यटन विकास महामंडळ देशात अनेक ठिकाणी हॉटेल व्यवस्थापन, केटरिंग व न्यूट्रिशन संस्था चालवते.

### स्वातंत्र्योत्तर काळातील पर्यटन विकास:

इ.स.१९६७ मध्ये पर्यटन व नागरी हवाई वाहतुक मंत्रालयाची स्थापना झाली. पर्यटनाचे

स्वतंत्र मंत्रालय, हॉटेल्स व इतर सुविधांमुळे झालेली वाढ, सुनियोजित प्रसिध्दी व जाहिरात यामुळे या क्षेत्रात वाढ होऊन सेवा क्षेत्र वाढत आहे. दरवर्षी भारतात सुमारे पन्नास लाख पर्यटक येतात. स्थानिक पर्यटक संख्या पाच कोटी आहे. २००९ पर्यटन भारताला १०० अब्ज अमेरिकन डॉलर्स कमाई झाली तर इ.स.२०१६ पर्यंत हे उत्पन्न २७५.५ अब्ज डॉलर्स जाईल असा अंदाज राज्य पर्यटन मंत्र्याचा आहे. अलीकडे १७.९ मिलेनियन होते. एकूण पर्यटकात अमेरिका, इंग्लंडचे प्रमाण वरचे आहे. परदेशी पर्यटक भारतातील महाराष्ट्र, तामिळनाडू, दिल्ली, उत्तरप्रदेश, राजस्थान या पाच राज्यांत येण्याचे प्रमाण जास्त आहे. देशांतर्गत पर्यटकामध्ये आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र यांचे प्रमाण जास्त आहे.

**पर्यटनाचे महत्व :**

१)रोजगारनिर्मिती: भारतासारख्या लोकसंख्येने मोठ्या असलेल्या देशात पर्यटन व्यवसाय रोजगारांसाठी महत्वाचे साधन आहे. या व्यवसायात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या मोठ्या संधी प्राप्त होतात. भारतीय नियोजन आयोगाचे सदस्य नरेंद्र जाधव यांनी आगामी काळात पर्यटन क्षेत्रात ९६ लाख नोकऱ्या उपलब्ध होतील असे म्हटले आहे. मा.फोय एम्प्लॉयमेंट टेन्डस् सर्वेक्षणानुसार (एमईटीएस) पर्यटन क्षेत्रामुळे हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात ४,२६,६६८ नवीन नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत.

प्रत्यक्ष रोजगारामध्ये हॉटेल्स, अल्पोपहारगृहे, मार्गदर्शक, वाहतुक इ.क्षेत्रांमधील रोजगारांचा समावेश होतो. या व्यवसायात भारतातील एकूण भांडवलाच्या केवळ २.३ टक्के भांडवल गुंतले असून देशाच्या रोजगारामध्ये ८.७८ टक्के रोजगार या उद्योगातून मिळतो. या व्यवसायात अप्रत्यक्ष रोजगार शेती, हस्तकला, बांधकाम, पशुपालन, मासेमारी इ.अशा ४० क्षेत्रातून उपलब्ध होतो. पर्यटकांच्या आवडीप्रमाणे फुले, शेतीपिके, फळे, भाज्या, दुग्ध उत्पादने, पशुउत्पादने पर्यटन स्थळाजवळील शेतकरी घेतात. पर्यटकांच्या मागणीनुसार विविध कलाकुसरयुक्त वस्तु, भरतकाम, हस्तकाम केले जाते. पर्यटन स्थळांच्या विकासासाठी रस्ते, रेल्वे, इमारती, विमानतळ इ.बांधकामे केली जातात. अनेकांना रोजगार मिळतो.

२) स्थानिक रोजगार: पर्यटनामुळे स्थानिक रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. विदेशी पर्यटक देशातील महानगरे, प्रमुख पर्यटक देशातील महानगरे, प्रमुख पर्यटन स्थळांना भेटी देतात. परंतु स्थानिक पर्यटक किंवा देशांतर्गत पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या स्थानिक रोजगाराचे महत्व काही कमी नाही. इ.स.२००४ मध्ये स्थानिक पर्यटकांची संख्या ३६८ दशलक्ष होती. देशातील लहान-मोठ्या पर्यटन स्थळातील निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या पर्यटनाशी संबंधित रोजगारामध्ये गुंतल पर्यटनेली आहे.

३) विदेशी चलन: पर्यटन हे विदेशी चलन मिळविण्याचे महत्त्वाचे साधन आहे. देशात येणाऱ्या विदेशी पर्यटकांकडून हे विदेशी चलन मिळते. भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याने विदेशी चलनाच्या प्राप्तीतही वाढ होत आहे. इ.स.२०१० मध्ये वर्ल्ड ट्रॅव्हल व टूरीझम कौन्सिल (डब्ल्युटीटीसी) च्या अपेक्षेप्रमाणे १,९७० बिलीयन रु.भारताला या व्यवसायापासून मिळाले

असून ते एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.१ टक्का आहे. याशिवाय अप्रत्यक्षरित्या मिळालेले उत्पन्न एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८.६ टक्के आहे.

४) गुंतवणूक वाढ : अर्थतज्ज्ञांच्या मते, भांडवल हे उत्पादनाचे महत्वाचे अंग आहे. एस.मेडलिक यांच्या Economic Importance of Tourism या ग्रंथात, पर्यटनातील एकूण गुंतवणुकीच्या ९०% भांडवल स्थिर व निश्चित वस्तूंच्या स्वरुपात गुंतवले जाते. त्यामुळे भांडवल परत मिळण्याची शाश्वती इतर उद्योगांपेक्षा पर्यटनात अधिक आहे असा उल्लेख आहे. यावरुन या व्यवसायात अधिक गुंतवणूक होते, अधिकाधिक नफा होतो.

५) प्रादेशिक विकास : साधन संपदाचे प्रादेशिक वितरण असमान आहे. काही राज्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेली आहेत. परंतु या राज्यात नैसर्गिक सौंदर्य आहे. त्यामुळे या राज्यात पर्यटनाला खुप वाव आहे. त्याद्वारे या राज्यांचा आर्थिक विकास साधता येईल. हे गोवा, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर या राज्यांवरून दिसून येईल.

६) आंतरराष्ट्रीय सहकार्य: देशादेशातील सामजस्य वाढते, दुसऱ्या देशाबद्दल गैरसमज दूर होतात.

देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाच्या वरील योगदानाशिवाय गरिबी निर्मूलन, तांत्रिक ज्ञानाचे आदान प्रदान अशा आर्थिक क्षेत्राच्या विकासालाही चालना मिळू शकते.

**पर्यटन विकासाचे घटक :**

१) ज्या पर्यटन स्थळाकडे पर्यटक येतात त्या स्थळांचा अधिक विकास करण्याची आवश्यकता आहे. याशिवाय पर्यटनविषयक साधनसंपत्तीचा स्त्रोत व त्यांची पर्यटन विकासक्षमता यांचा विचार करुन पर्यटनाचे नियोजन करावे लागेल. दुर्लक्षित पर्यटन स्थळांची जाहिरात करुन त्यांचा विकास करावा लागेल.

२) पर्यटन सुविधांचा विकास: भारतीय पर्यटन व्यवसाय विकासातील सर्वात महत्वाची अडसर म्हणजे सुविधांचा अभाव होय. आपल्या देशातील हॉटेल्स्, रेस्टॉरंटस् व अन्य पर्यटन सुविधा यामध्ये पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी खास भारतीय पारंपरिक पध्दतीच्या सोयी उपलब्ध केल्या तर पर्यटनाचा विकास तर होईलच परंतु या उद्योगांचाही विकास होईल. आयुर्वेद, मसाज केंद्रे, लोककला व संगीत यांचा विकास करावा.

३) विक्री व्यवस्थेचा विकास: भारतातील हस्तोद्योग, ग्रामोद्योग, भरतकाम, सुतीकाम, रेशीमकाम यांचा विकास करावा. त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांची उत्पादने विक्रीची व्यवस्था करावी. कस्टम फ्री वस्तूच्या विक्रीची सोय पर्यटन स्थळी किंवा प्रवासाच्या ठिकाणी करावी.

**संदर्भ:**


१) डॉ.एस.बी.शिंदे, *पर्यटन भूगोल*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००९

२) Dhar Premnath, *Development of Tourism and Travel Industry*, Kanishka Publishers, Delhi, 1997

३) डॉ.नागतोडे व पारधी, *पर्यटन भूगोल*, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६.

# संगणक आज्ञावली उद्योगाची निर्यात कामगिरी


**शिवाजी काकडे**, गढी,
विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
ज.भ. शि.प्र.मंडळाचे कला व
विज्ञान महाविद्यालय, जिल्हा बीड
भमणध्वनी:९०९६६९८२६९
Email: skakde15@gmail.com

**दिनकर टकले**, परतूर,
विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,
जिल्हा जालना.
भमणध्वनी:९४२१३२२६१५
Email: takle.dp@gmail.com


भारत हा ज्ञानधिष्ठीत अर्थव्यवस्था म्हणून पुढे येण्यामागील प्रमुख कारण म्हणजे अर्थव्यवस्थेतील माहिती तंत्रज्ञान (IT) आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यक सेवा (ITeS) क्षेत्र होय. भारतीय अर्थव्यवस्थेची संथ गतीने प्रगती करणारी सनदीय अर्थव्यवस्था अशी असणारी प्रतिमा एक नवपरिवर्तनवादी उद्योजकाची भूमी अशी प्रतिमा रुपांतरीत करण्यामध्ये माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यक सेवा क्षेत्राने महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. तसेच जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान व व्यावसायिक सेवा पुरवठादार म्हणून जगामध्ये ओळख निर्माण केली आहे.

भारतीय संगणक आज्ञावली उद्योग माहिती तंत्रज्ञान उद्योगाचा भाग आहे. माहिती तंत्रज्ञान उद्योग आणि सॉफ्टवेअर उद्योग यांचा जवळचा संबंध आहे. एवढेच नाही तर माहिती तंत्रज्ञान उद्योग सॉफ्टवेअर उद्योगाचा आधार आहे. माहिती तंत्रज्ञान उत्पादकांच्या संघटनेने (MAIT) नमूद केल्यानूसार सॉफ्टवेअर उद्योगामध्ये ऑफ शोअर डेव्हलपमेंट, तांत्रिक मदत आणि सॉफ्टवेअर उत्पादनाचा समावेश होतो.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१) भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाच्या आर्थिक विकासातील योगदानाचा अभ्यास करणे.

२) भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाच्या निर्यातीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

हे संशोधन पूर्णतः द्वितीय सामग्रीवर आधारीत आहे. समक आणि आकडेवारी गोळा करणयासाठी वेगवेगळी संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख, मासिके तसेच नॅसकॉम (NASSCOM), Statistical outline of India इ. स्त्रोताचा

आधार घेतला आहे. भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाची सुरूवात १९७४ मध्ये झाली. १९७४ मध्ये टिसीएस (Tata Consultancy Services -TCS) या पहिल्या सॉफ्टवेअर कंपनीची स्थापना अमेरिकेतून परत आलेल्या जे.आर.डी. टाटा आणि एल.एस.कानोडिया यांनी केली. भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाची रचना पिरॅमिड सारखी आहे. काही मोजक्या परंतु आकाराने मोठ्या असलेल्या कंपन्यांचे वर्चस्व संपूर्ण उद्योगावर आहे. सॉफ्टवेअर निर्यात करणाऱ्या ३००० भारतीय कंपन्यापैकी ३ मोठ्या कंपन्यांची वैयक्तीक वार्षिक विक्री अमेरिकन $ १ बिलीयन पेक्षा जास्त होती. दुसऱ्या बाजूला लहान २९०० कंपन्यांची वार्षिक विक्री अमेरिकन $ १० मिलीयन पेक्षा कमी आहे. त्यातही अमेरिकन $ २ मिलीयन पेक्षाही वार्षिक कमी विक्री असणाऱ्या कंपन्याची संख्या अधिक आहे. भारताच्या सॉफ्टवेअर निर्यातीत सर्वाधिक मोठ्या असलेल्या पाच कंपन्यांचा निर्यातीतील वाटा ३२ टक्के होता तर सर्वाधिक लहान कंपन्यांचा निर्यातीतील वाटा १४ टक्के होता. सॉफ्टवेअर उद्योगाच्या बाबतीत आपणाला असे दिसून येते की, हा उद्योग काही मोजक्याच शहरामध्ये जसे की, बंगलोर, हैद्राबाद, चेन्नई, मूंबई, दिल्ली आणि पूणे केंद्रीत झाला आहे. याचे कारण म्हणजे याठिकाणी कूशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची असलेली उपलब्धता, तरूण व्यावसायिकांना या शहरांचे असलेले आकर्षण, राहणीमानाचा कमी खर्च आणि पोषक वातावरण इ. सांगितले जाते.

## भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाचे आर्थिक विकासातील योगदान :

कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेमूळे भारत माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर आणि संबंधीत सेवांचा एक प्रमुख निर्यातदार म्हणून उदयास आला आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रामुळे भारतामध्ये नविन उद्योजक वर्गाची वाढ होण्यास मदत झाली आहे, देशामध्ये प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीला आकर्षित करण्यास मदत झाली आहे. तसेच ब्रेनड्रेन (Brain drain) ला खीळ बसली आहे. वाढत्या सॉफ्टवेअर उद्योगामुळे खूप मोठ्या प्रमाणात अनिवासी भारतीय देशामध्ये परत आले.

## माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे सकल देशांतर्गत उत्पादीतातील (GDP) योगदान:

सन १९९७-९८ यावर्षी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे (हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि सेवा सहीत) सकल देशांतर्गत उत्पादितातील योगदान अमेरिकन $ ६ बिलीयन वरुन महत्वपूर्ण रित्या वाढून सन २००७-०८ यावर्षी अमेरिकन $ ६४ बिलीयन इतके झाले. म्हणजेच या दहा वर्षांच्या काळात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा हिस्सा जवळपास पाच पटीने वाढला. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे सकल देशांतर्गत उत्पादितामध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे जे योगदान आहे त्यामध्ये सॉफ्टवेअर आणि संबंधीत सेवांच्या निर्यातीचा हिस्सा जास्त आहे.

## माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे रोजगारातील योगदान:

माहिती तंत्रज्ञान वार्षिक अहवाल (२००८) नूसार माहिती तंत्रज्ञान सॉफ्टवेअर आणि सेवा रोजगार (हार्डवेअर क्षेत्रातील रोजगार वगळून) २००७-०८ या वर्षी २ मिलीयन पर्यंत वाढेल. २००६-०७ यावर्षी १.६३ मिलीयन लोकांना या क्षेत्रामध्ये रोजगार प्राप्ती झाली होती. म्हणजेच एका वर्षात जवळपास ३७५,०००

व्यावसायिकांना रोजगार मिळेल असे नमूद केले आहे. तसेच या क्षेत्रामूळे अर्थव्यवस्थेमध्ये २००७-०८ या वर्षी ८ मिलीयन लोकांना अप्रत्यक्ष रोजगार प्राप्ती होईल. यावरून असे दिसून येते की, मागील दशकामध्ये अर्थव्यवस्थेतील संघटित खाजगी क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्र हे रोजगार निर्माण करणारे सर्वात मोठे क्षेत्र ठरले.

### भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाची निर्यात:

दोन दशकांपूर्वी जगामध्ये भारताची प्रतिमा दारिद्र्याचे जास्त प्रमाण असलेला, वाढता लोकसंख्येचा दर असलेला देश अशी होती. परंतु आज भारत सॉफ्टवेअर उद्योगाच्या प्रचंड वृद्धीमुळे जगामध्ये कौशल्यपूर्ण आणि तंत्रज्ञान वापरणाऱ्या मनुष्यबळाची उपलब्धता असणारा देश अशी प्रतिमा तयार झाली आहे.

Dept of Electronics, Govt. of India च्या विविध वार्षिक अहवालावरुन, Data Quest च्या आकडेवारीवरुन असे दिसून येते की, १९८०-८१ या सॉफ्टवेअर निर्यातीच्या पहिल्यावर्षी सॉफ्टवेअरची निर्यात केवळ अमेरिकन $ ४ मिलियन एवढी झाली. यानंतर मात्र सॉफ्टवेअर निर्यातीत सातत्याने वाढ झाली. १९९०-९१ मध्ये सॉफ्टवेअरची निर्यात अमेरिकन $ १३१.२ मिलीयन एवढी वाढली.

अशरफ इलियान (२००८) यांच्या अभ्यासावरुन असे दिसून येते की, १९९१-९२ यावर्षी सॉफ्टवेअरची निर्यात रु.४१० कोटींची झाली होती. तर १९९६-९७ यावर्षी सॉफ्टवेअरची निर्यात रु. ३९०० कोटीची झाली होती. २००७-०८ यावर्षी सॉफ्टवेअर निर्यात रु १६३.००० कोटीची झाली होती. त्यांच्या अभ्यासातून असे ही दिसून येते की, १९९०-९१ ते २०००-०१ या काळात सॉफ्टवेअर निर्यातीचा वार्षिक सरासरी वृद्धी दर ५७.१३ टक्के राहीला. २००१-०२ ते २००७-०८ या काळात हा दर २८.४२ टक्के पर्यंत घटल्याचे दिसून येते. आग्नेय आशियाई देशामध्ये आलेल्या चलन संकटामुळे आणि अमेरिकेमध्ये आलेल्या मंदीचा परिणाम म्हणून १९९७-९८ नंतर सॉफ्टवेअर निर्यातीचा वृद्धीदर घटल्याचे दिसून येते.

### भारताच्या सॉफ्टवेअर निर्यातीची दिशा:

Statistical outline of India, Tata Statistical Services, Dept. of Economics & Statistics, (2006) च्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, भारत सॉफ्टवेअरची निर्यात अमेरिका, यूरोप, आशिया इ. खंडातील अनेक देशांना करतो. भारताच्या सॉफ्टवेअर निर्यातीचा सर्वात मोठा ग्राहक अमेरिका (USA) आहे. एकुण सॉफ्टवेअर निर्यातीच्या ६८.४ टक्के निर्यात एकट्या अमेरिकेला होते. भारत एकुण सॉफ्टवेअर निर्यातीच्या २३.१ टक्के सॉफ्टवेअर निर्यात यूरोपला करतो. २००४-०५ या वर्षी भारताने अमेरिकन $ ४०९३ मिलीयन सॉफ्टवेअर निर्यात यूरोपला केली. या शिवाय भारत ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, सिंगापूर, द. कोरीया इ. राष्ट्रांनाही सॉफ्टवेअर निर्यात करतो.

### भारतीय सॉफ्टवेअर उद्योगाची निर्यात वाढविणारे घटक:

-सॉफ्टवेअर निर्यात करण्याची सुलभ पद्धत- करसवलत.

-Software Technology Parks (STPs) ची स्थापना.

-कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाची विपुल

उपलब्धता.

-स्वस्त श्रमपूरवठा.

-नॅसकॉम (NASSCOM) ची सक्रीय भूमिका.

अशा प्रकारे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये वाढत्या सॉफ्टवेअर निर्यातीमूळे जगामध्ये भारताची प्रतिमा एक ज्ञानाधिष्टीत अर्थव्यवस्था म्हणून तयार झाली आहे. कुशल मणूष्यबळ, स्वस्त श्रमपूरवठा इ. बाबीमूळे सॉफ्टवेअर निर्यात वाढविण्यास मदत झाली असे असले तरी सॉफ्टवेअर निर्यातीचा वृद्धीदरामध्ये सातत्य असणे गरजेचे आहे. त्याबरोबरच देशातंर्गत सॉफ्टवेअर बाजार कमजोर असू नये. इ. अडथळे ठरत असल्यामूळे भारतीय सॉफ्टवेअर निर्यातीचा वेग मंदावल्याचे दिसून येते.

संदर्भ:


1) AsherefIlliyan (2008), *'Performance, Challenges and opportunities of Indian Software export'*, Journal of Theoritical and Applied Information Technology (2005-08) Pp. 1038-1106.

2) Nagesh Kumar and K.J. Joseph (2005) *'Export of software and BPO from Developing Countries: Lessions from the Indian experience,'* Asia-Pacific Trade and Investment Review Vol. 1 No. 1 April Pp. 91-110.

3) Subhash Bhatnagar (2006), *'India's Software Industry'*, Technology, Adaptation and Exports: How some Developing countries Got it Right, Vandana Chandra (Ed.), World Bank, Pp. 95-124.

4) Vijay Thakur (2011), *'Growth of IT and ITeS Sector'* Yojana,Sept.Pp.45-47.

5) Dept of Electronics, Govt of India, Data Quest.

6) Statistical outline of India, Tata Statistical Services, Dept of Economics & Statistics (2006)

7) www.nasscom.org

# किरकोळ क्षेत्रातील विदेशी गुंतवणुक धोरण

**माधुरी प्रदीप लेले, नागपूर,**
सहाय्यक प्राध्यापक,
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर
भ्रमणध्वनी: ९४२२४०५०९७

किरकोळ क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी विदेशी गुंतवणुकीचे दोन भागात विभाजन करण्यात आले. Single Brand Retail आणि Multi Brand Retail. १९९७ ला भारत सरकारने घाऊक व्यापारात, तसेच रोख आणि प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीला परवानगी दिली. २००६ मध्ये किरकोळ व्यापारातील Single Brand Retail मध्ये ५१ टक्के विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. २०११ मध्ये ती मर्यादा १०० टक्के करण्यात आली. एप्रील २०१२ पासून Multi Brand Retail ५१ टक्के विदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. २० सप्टेंबर २०१२ रोजी उद्योग आणि वाणिज्य मंत्रालयाच्या औद्योगिक धोरण आणि संवर्धन विभागाने याबद्दलचे जाहीर धोरण प्रसारित केले. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे.

Single Brand Retail :

जेव्हा उत्पादक विशिष्ट चिन्ह किंवा नावाचा उपयोग करून आपली वस्तू इतर उत्पादकापेक्षा भिन्न असल्याचे स्पष्ट करतात तेव्हा त्या चिन्ह, चित्र किंवा नावाला ब्रँड असे म्हणतात. तो उत्पादक आपल्या ब्रँडचा वापर बाजारपेठेत ख्याती प्राप्त करण्यासाठी करीत असतो. ज्या किरकोळ विक्रीच्या दुकानात केवळ एकाच ब्रँडच्या म्हणजे एकाच उत्पादकाच्या वस्तूंची विक्री केली जाते त्याला Single Brand Retail असे म्हणतात. उदा. वूडलँड किंवा पिटर इंग्लंड किंवा आदिदास इ. प्रत्येक उत्पादकाचे स्वतंत्र शोरूम असते. उत्पादन व विपणन क्षेत्रात विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे. भारतीय उद्योगांना स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करुन देणे जेणे करुन तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्य वाढीस लागेल. भारतीय वस्तूंना जागतिक बाजारपेठ मिळवुन देणे या उद्देशाने भारतात Single Brand Retail मध्ये १००% विदेशी गुंतवणुकीला मान्यता देण्यात आली.

१) अशा किरकोळ विक्रीच्या दुकानांमधुन फक्त Single Brand उत्पादनेच विकता येतील. २) जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त ब्रँडनेच उत्पादने विक्रीसाठी ठेवली जावीत. ३) ५१% पेक्षा अधिक विदेशी गुंतवणूक असणाऱ्या संस्थांनी भारतातील

एकुण विक्रीच्या ३०% खरेदी भारतीय लघु कुटीर 'ग्रामीण आणि सुक्ष्म उद्योगांकडून करणे बंधनकारक राहील ही ३०% खरेदी अट पूर्ण केल्याचे विदेशी गुंतवणुकदाराने स्वप्रमाणित करुन सनदी लेखापालाने त्या विषयीची खात्री करणे आवश्यक राहील. ४) Single Brand Retail मध्ये गुंतवणुक करु इच्छिणाऱ्या विदेशी गुंतवणुकदाराने त्यासाठी परवानगी अर्ज औद्योगिक धोरण आणि संवर्धन विभागाकडे करणे आवश्यक आहे. ५) शासन अर्जाची छाननी करुन व मार्गदर्शक तत्वांचे पालन होत आहे यांची खात्री करुन परवानगी प्रदान करेल. ६) Single Brand Retail trading साठी कोणत्याही प्रकारच्या E-Commerce ला परवानगी देण्यात आलेली नाही.

Multi Brand Retail :

जेव्हा किरकोळ विक्रीच्या दुकानात एका वेळी अनेक वेगवेगळया उत्पादकांची म्हणजेच वेगवेगळया ब्रँडची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध करून दिली जातात. त्यांना Multi brand retail stores असे म्हणतात याचा अर्थ एकाच छताखाली अनेक उत्पादनाची विक्री होणे . उदा. केंब्रिज, पिटर इंग्लंड, ॲरां, बॅन हयसून, जॉन प्लयर इ. सर्व ब्रँडचे कपडे एकाच दुकानात उपलब्ध असते. प्रेस नोट क्रमांक ५ दिनांक २० सप्टेंबर २०१२ नुसार शासनाने Multi Brand Retail मध्ये ५१% पर्यत विदेशी गुंतवणुकीस परवानगी देण्याचे खालील अटीवर मान्य केले. (१) या दुकानात ब्रँड नसलेल्या कृषी उत्पादनांची देखील व्रिकी करता येईल. उदा. फळे, भाजी, फुले, धान्य. (२) किमान १० कोटी डॉलर्स विदेशी गुंतवणुक आणणे बंधनकारक राहील. (३) एकुण विदेशी गुंतवणुकी पैकी ५०% गुंतवणुक मुलभूत सोयी सुविधा या मध्ये गुंतविली पाहीजे. त्या विदेशी गुंतवणुकी पैकी पहिला हप्ता आल्यापासून तीन वर्षाची मुदत निश्चित केली आहे यामध्ये कच्च्या मालावरील प्रक्रिया, उत्पादन, वितरण, उत्पादनातील दर्जात्मक सुधारणा व नियंत्रण, संवेदन, वाहतूक आणि साठवणूक अशा सर्व पायाभूत सुविधांचा समावेश होतो. (४) एकूण उत्पादन खरेदीच्या किमान ३०% किंमतीच्या वस्तू या भारतातील लघूउद्योगांकडूनच खरेदी करणे बंधनकारक राहील. ज्या उद्योगात संयत्रावरील गुंतवणुक १०लाख डॉलर्स एवढी गुंतवणूक केली आहे अशा उद्योगांना लघुउद्योग म्हणता येईल. अशा उद्योगातील संयंयावरील गुंतवणूक जेव्हा १० लाख डॉलर्सच्या वर जाईल तेव्हा त्या उद्योगातून केलेली खरेदी ३०% स्थानिक खरेदी' या अटीसाठी पात्र ठरणार नाही. (५) ३०% स्थानिक खरेदी अट पूर्ण केल्याचे विदेशी गुंतवणुकदाराने स्वतः प्रमाणित करावयाचे आहे आणि सनदी लेखापालकडून त्याची खात्री म्हणजे अंकेक्षण करून घ्यावयाचे आहे. ३०% खरेदीची अट पूर्ण करण्यासाठी ज्या वर्षी विदेशी गुंतवणूकीचा पहिला हप्ता भारतात आला त्या वर्षापासून पुढील पाच वर्षाच्या खरेदीच्या सरासरीचा विचार करण्यात येईल. त्यानंतर मात्र दरवर्षी ३०% स्थानिक खरेदीची अट पूर्ण करावी लागले. (६)विदेशी गुंतवणुकीची दुकान २०११ च्या जनगणनेनुसार ज्या शहरामंध्ये १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या आहे अशा शहरांमध्ये आणि १० कि.मी. च्या परिघामध्ये स्थापन करता येतील. या परिसरात वाहतुक व पार्किंग च्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. (७)कृषी उत्पादनांची प्राधान्याने खरेदी करण्याचा हक्क

भारत सरकारचाच राहीले. (८) या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य सरकारे व केंद्र शासित प्रदेशांची सरकारे स्वतंत्रपणे घेऊ शकतात. तसेच त्यासंबंधीचे स्वतःचे नियम तयार करू शकतात. (९)विदेशी गुंतवणुकीद्वारे सुरू झालेल्या Multi brand retail stores ना कोणत्याही स्वरुपातील E-Commerce करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**वास्तविकता:**

१९९१ ला नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यापासून भारताचा आर्थिक विकास वेगाने होईल असे प्रतिपादन सातत्याने केले. त्यासाठी १९९७ पासून विदेशी गुंतवणुकीला प्रारंभ झाला. त्यासंबंधी धारेणे निश्चित करण्यात आली. परंतु वस्तुस्थिती ही आहे की संसदेत चर्चा केल्यानंतर जी धोरणे ठरविली जातात ती जशीच्या तशी शब्दांकित होत नाहीत. अनेक हितसंबंध गुंतलेल्या गटांकडून पाहिजे तशी फेरफार करण्यात येतो. हे फार देशविघातक कृत्य आहे परंतु भारतात हे फार सहज होत आहे. किरकोळ क्षेत्रातील गुंतवणुकीच्या धोरणात झालेले बदल घेतले तर हे सहज समजुन येईल.

१) ३० % स्थानिक खरेदीची अट:

भारत सरकारच्या उद्योग व वाणिज्य मंत्रालयाच्या सर्क्यलर जे १० एप्रिल २०१२ पासून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीबाबत आहे, त्यातील परिच्छेद क्रमांक ६. २. १६. ४

२) e) मध्ये खालील शब्दांकन होते.

(e) In respect of proposals involving FDI beyond 51 % mandetory sourcing of atleart 30% of the value of product sold would have to be done from Indian small industries, village and college industries, artisans and craftsman. दि. २० सप्टेंबर २०१२ (म्हणजे ६ महिन्यात) रोजी जी प्रेस नोट क्रमांक ४ प्रसिद्ध झाली त्यामध्ये वरील परिच्छेद पुढीलप्रमाणे शब्दांकित झालेला आहे. In respect of proposals involving FDI beyond 51 % saurcing of 30 % of the value of goods purchase, will be done from India perferably from MSME village and college indurtries, artizens and arftsmans in all sectors. 'mMm AW© mandatory have to be done हे शब्द वगळून preferably हा शब्द आला. म्हणजे सक्ती नाही केवळ प्राधान्यक्रमाने अशी खरेदी करावी असे म्हटले आहे. सक्ती नसेल तर कोणती विदेशी कंपनी अशा उद्योगातून अशी खरेदी करेल? विदेशी गुंतवणुकीमुळे भारतीय लघु उद्योगांना खुप फायदा होईल. हा शासनाचा दावा कितपत खरा ठरेल याविषयी साशंकता निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.

२) स्वयं प्रमाणित करण्याची अट:

Multi Brand Retail मधील ५१ % विदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्यासाठी २० सप्टेंबर २०१२ रोजी जी प्रेस नोट जारी करण्यात आली, त्यामध्ये तीन अटी घालण्यात आल्या. १) कमीत कमी १०० मिलीयन डॉलर्सची गुंतवणुक केली पाहीजे. २) एकुण विदेशी गुंतवणुकीपैकी ५०% गुंतवणुक मूलभुत सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी खर्च करण्यात यावी. त्यासाठी विदेशी गुंतवणुकीचा पहिला हप्ता आल्यापासुन तीन वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला.

३) ÷३०% स्थानिक खरेदीची अट: वरवर पाहता

वरील तीनही अटी भारतीय अर्थव्यवस्थेला अतिशय पोषक वाटतात. भारतीय ग्राहक, लघुउद्योग आणि मूलभुत सोयीसवलती यासाठी अतिशय फायदेशीर वाटतात. परंतु वास्तविकता वेगळीच आहे. या तीनही अटी पूर्ण केल्यात की नाही हे स्वतः विदेशी गुंतवणूदारांनेच प्रमाणित करावयाचे आहे. त्याची फक्त नोंद घेऊन आपल्या सनदी लेखापालाकडून अंकेक्षित करवून घ्यावयाचे आहे. यामुळे या अटींची खरोखरच पूर्तता होईल का? या अटींची पूर्तता न झाल्यास त्यांच्यावर काय कारवाई येईल? याचा उल्लेख या धोरणात कुठेही करण्यात आलेला नाही. वास्तविकतः कोणत्याही नियमाचा किंवा कायद्याचा भंग झाल्यास त्या कायद्यातच शिक्षेची तरतूद केली जाते. परंतु हा सामान्य नियम देखील विदेशी गुंतवणुकीच्या धोरणाला लागू केलेला नाही.

४) अमंलबजावणीची मुदतः Single Brand Retail मध्ये वरील अटींची पूर्तता विदेशी गुंतवणूकीचा पहिला हप्ता भारतात गुंतवणूक केलेल्या वर्षापासून पाच वर्षात सरासरी पद्धतीने करावयाची आहे. Multi Brand Retail मध्ये ही मुदत तीन वर्षांची आहे. याचा अर्थ काही वर्षापर्यंत ही पूर्तता न करण्याची मूभा आपोआपच प्राप्त होते. Single Brand Retail ला पहिले चार वर्ष तर Multi Brand Retail दोन वर्ष या अटींची पूर्तता पुढे ढकलता येते.

## निष्कर्ष आणि उपाययोजनाः

A.T. Kearney या जगप्रसिद्ध जागतिक व्यवस्थापन सल्लागार संस्थेने जगातील ३० उदयोन्मुख बाजारपेठांचा अभ्यास करुन Global Retail Development Index 2012 हा अहवाल प्रसिद्ध केला. त्यानुसार ÷+भारतीय बाजारपेठ ही जगातील दोन क्रमांकांची आकर्षक बाजारपेठ आहे. किरकोळ क्षेत्रातील वृद्धी १५ ते २०% होण्याची शक्यता आहे. किरकोळ व्यापाराचे योगदान १४ % इतके आहे, तर देशात ७% रोजगार संधी किरकोळ क्षेत्रातून उपलब्ध आहे. भारतात भांडवलाची कमतरता आहे. आर्थिक विकासासाठी आधिकाधिक भांडवल निर्मितीची आवश्यकता आहे याबद्दल दुमत नाही. ही गरज विदेशी भांडवलाद्वारे पूर्ण होऊ शकते. त्यामुळे जागतिकीकरणाच्या युगात विदेशी भांडवलाचे स्वागत करणे गैर नाहीच. परंतु हे भांडवल येण्यासाठी आपले धोरणात्मक निर्णय त्यांच्या कलाने घेण्याची किंवा बदलविण्याची मुळीच आवश्यकता नाही. देशहित हे सर्वतोपरी असलेच पहिजे. किरकोळ व्यापारात मोठे विदेशी गुंतवणुकदार आले तर थेट शेतकऱ्यांना फायदा माल खरेदी करतील. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल असेही प्रतिपादन करण्यात येते. परंतु भारतीय शेतकरी असंख्य व विखुरलेले आहेत त्यांची सौदाशक्ती अतिशय क्षीण दर्जाची आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना किती फायदे मिळतील याबद्दल खरोखरच साशंकताच आहे.

## संदर्भ सूचीः


१) *रिटेलमधील थेट विदेशी गुंतवणुक*, डॉ.विनायक गोविलकर, हरिओम प्रकाशन, नाशिक.

२) वाणिज्य व उद्योग मंत्रालय, *उद्योग धोरण व संवर्धन विभाग*, Press note no. 4 & 5 20 sup 2012.

३) वाणिज्य व उद्योग मंत्रालय वार्षिक अहवाल.

४) अर्थसंवाद जुलै ते सप्टेंबर २०१२.

५) दैनिक लोकसत्ता दि. १६ ऑक्टो. २०१२.

६) दैनिक लोकमत दि. २० ऑक्टो. २०१२.

# जागतिकीकरणाचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम

विजयकुमार आप्पासाहेब पाटील, आटपाडी,
प्र. प्राचार्य, कला व विज्ञान महाविद्यालय,
भ्रमणध्वनी:९४२३२६८७८९.

भारतासह जगातील अनेक राष्ट्रात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण यांच्या संबंधात विचारमंथन चालू आहे. सन १९९४ मध्ये उरूग्वे येथे राष्ट्रातील व्यापारविषयक वाटाघाटी पूर्ण झाल्यानंतर सन १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. या राष्ट्रात भारताचा देखील समावेश होता. आचार्य विनोबा भावे यांचे ÷ जय जगत' हे केवळ स्वप्न राहिले नसून ते प्रत्यक्षात येत आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर युनो, गॅट, नाणेनिधी, जागतिक बँक इत्यादी जागतिक संघटना स्थापन करण्यात आल्या. या सर्वांचा उद्देश जगातील विविध देशांनी कोणत्याही अडथळ्याविना विविध प्रकारचे व्यवहार एकमेकात करावेत. जागतिकीकरणाने विविध देशात निरनिराळ्या प्रकारचे व्यवहार कोणतेही अडथळे न येता पार पाडले जातील. परिणामी जागतिकीकरण हा २० व्या शतकाच्या अखेरीचा व २१ व्या शतकाच्या प्रारंभीचा शब्द बनला आहे. जागतिकीकरणाला दोन मुख्य बदल घडवून आणावयाचे आहेत. ते म्हणजे १)आंतरराष्ट्रीय व्यापाराची दारे मोकळी करणे म्हणजेच सर्व राष्ट्रांनी त्यांनी पूर्वी घातलेली व्यापारावरील सर्व नियंत्रणे काढून टाकणे, आणि देशादेशात वस्तुंचा, सेवांचा, भांडवलाचा माहितीचा आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह मोकळेपणाने होऊ देणे. २) जागतिकीकरण या प्रक्रियेत सर्व देशांनी त्यांच्या अंतर्गत आर्थिक व्यवस्थेमध्ये बदल करण्याचा समावेश आहे. या बरोबरच सर्व देशांनी जागतिक व्यापार यंत्रणेने आखून दिलेले अर्थव्यवस्थेचे नवीन धोरण अवलंबिले पाहिजे. या नवीन अर्थव्यवस्थेमध्ये पुढील गोष्टी अभिप्रेत आहेत. खाजगी बाजारावर आधारलेल्या खाजगी अर्थव्यवस्थेचा उत्तेजन देणे. आर्थिक आणि सामाजिक मार्गावरील शासकीय नियंत्रणे कमी करणे किंवा सर्वस्वी सोडून देणे हे या प्रकियेतील महत्त्वाचे कलम आहे.

सध्या जगातील अनेक देशांनी या धोरणाचा विस्तृत प्रमाणावर स्वीकार केला आहे. भारतानेही जागतिकीकरण या धोरणाचा स्वीकार केला आहे. तेव्हा या जागतिकीकरणाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवरील परिणामांची चर्चा करणे महत्वाचे ठरेल.

## जागतिकीकरणाचे भारताच्या दृष्टीने फायदे:

भारताने जागतिकीकरणाच्या धोरणाचा कार्यक्रम अमलात आणण्यास सुरुवात केली आहे तरीही भारताला सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करावे लागेल, भारतात परकीय गुंतवणुकीस मान्यता द्यावी लागेल. आयातीवरील बंधने दूर करावी लागतील, परकीय चलनावर नियंत्रण ठेवणारे फेरा सारखे कायदे रद्द करावे लागतील, तसेच निर्यात वाढीसाठी विनिमय दरात सुधारणा करावी लागेल. या गोष्टींची पूर्तता केली तरच जागतिकीकरणाचा लाभ भारताला होऊ शकेल. जागतिकीकरणापासुन भारताला कोणते फायदे मिळू शकतील ते पुढीलप्रमाणे:

१. जग जवळ येईल :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने जगातील सर्व देश, एकमेकांच्या अधिक जवळ येत आहेत. नवे तंत्रज्ञान स्वीकारून उद्योगांचे आधुनिकीकरण तत्पर व सुलभ होईल. सर्व देशांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढेल. पीटर ड्रकर यांच्या मते, भावी समाज हा ज्ञानार्थी समाज आहे. दुरसंचार, पेजर्स, एंटरनेट, कॉम्प्युटर्स, ई-मेल यांनी माहिती तंत्रात क्रांती केली. या क्रांतीने ज्ञान जगाच्या एका भागातून दुसऱ्या भागात तत्पर पसरते. परिणामी जग अत्यंत जवळ येत आहे.

२. उत्पादन श्रमतेचा पुरेपूर वापर करता येईल:

जागतिकीकरणामुळे भारताला आपल्यात असणाऱ्या उत्पादन समतेचा पुरेपूर वापर करता येण्याची शक्यता आहे. जागतिकीकरणामुळे उत्पादित वस्तुंची मागणी वाढेल. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण वाढवावे लागेल. परिणामी असलेल्या उत्पादन समतेचा पूरेपूर वापर करता येईल.

३. नव्या तंत्रज्ञान हस्तांतराचा लाभ घेता येईल:

जागतिकीकरणामुळे नवे तंत्रज्ञान हस्ताराचा फायदा भारतात होऊ शकेल. जगातिल विविध राष्ट्रांत, विविध प्रकारचे शोध लागत असतात. नवे तंत्रज्ञान, उत्पादन पध्दती, जागतिकीकरणामुळे हे नवे तंत्रज्ञान एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रांत सहज जाऊ शकते. त्यामुळे विकसनशील राष्ट्राचा विकास जलद गतीने होतो.

४. आर्थिक विकासाला प्रेरणा मिळेल :

जागतिकीकरणाच्या धोरणाने मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीने जगातील सर्व देशांच्या आर्थिक विकासाला प्रेरणा प्राप्त होईल. विशेषत: अविकसित देशांनाही फायदा मिळेल. तेथील लोकांचे जीवनमान सुधारण्यात मदत मिळेल. अर्थात भारतासह अनेकदेशांनी जागतिकीकरणाच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रभावाखाली न येता तंत्र व विज्ञान उत्पादन आर्थिक व्यापता यामध्ये स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून आर्थिक विकास साधता येईल.

५. विविध प्रकारच्या बचती मिळू शकतील :

जागतिकीकरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला विविध प्रकारच्या बचतीचा लाभ मिळू शकेल. उत्पादन शक्तीचा पुरेपूर वापर केल्याने उत्पादनात वाढ होईल. त्यामुळे विविध प्रकारच्या बचतींचा फायद्याचा लाभ उत्पादकांना होईल. त्यांचा परिणाम उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होईल.

६. परकीय चलनाच्या साठ्यात वाढ होण्यास मदत होईल :

जागतिकीकरणामुळे स्वदेशी उत्पादकांना परदेशी उत्पादकांशी स्पर्धा करावी लागेल. त्यामुळे स्वदेशी उत्पादक आपला उत्पादन खर्च कमी

करण्याचा, दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्या या प्रयत्नामुळे निर्यात वाढीला चालना मिळेल. परिणामी परकीय चलनाच्या साठ्यात वाढ होण्यात मदत होईल. या बरोबरच भारतात परकीय गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढेल. त्याचा लाभ भारतीयांना मिळू शकेल.

७. उद्योगातील कार्यक्षमतेत वाढ होईल :

जागतिकीकरणामुळे कुशल व्यवस्थापक, कार्यक्षम, तंत्र भारतात येतील. त्याचा परिणाम भारतीय उद्योगातील कार्यक्षमता उत्पादकता वाढण्यात मदत होईल.

८. लोकांच्या प्रवृत्तीत बदल होईलः

जागतिकीकरणाने देशातील लोकांच्या प्रवृत्तीत बदल होतात. पाश्चिमात्य देशांतील विविध वस्तूंच्या आयातीने भारतातील अनेक लोकांच्या आयुष्यक्रमात बदल झाला आहे.अनेक नवीन वस्तू आल्याने जुन्या वस्तू कालबाह्य ठरतात. चीनसारख्या साम्यवादी देशातील स्त्री-पुरूष पाश्चिमात्य कपड्यांचे अनुकरण करू लागतात. विदेशी वस्तू वापराचे फॅड निर्माण होते. इतकेच नव्हे तर यामुळे देशातील कामगारांच्या वागण्याने बदल होतो. थोडक्यात जागतिकीकरणाने देशाच्या अर्थव्यवस्थेत सकारात्मक सामाजिक बदल घडवून आणला जातो.

९. इतर लाभ :

जागतिकीकरण केल्याने भारताचा मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकेल हे निश्चित परंतु भारताचे विविध वस्तूंचे उत्पादन करताना कोणाच्या उत्पादन क्षेत्राचा फायदा आहे हे पाहावे लागेल. जसे औषध निर्मितीक्षेत्र, वस्त्रोउद्योग क्षेत्र, कृषीक्षेत्र इत्यादी क्षेत्रात भारताची मोठ्या प्रमाणावर निर्यात क्षमता आहे. त्यात भरीव वाढ केली पाहिजे त्यासाठी निर्यातातरील नियंत्रणे कमी करणे, जकात दरात कपात करणे, उत्पादकतेत वाढ करणे, मालाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. या बरोबरच सध्याच्या काळात माहिती तंत्रज्ञान व दळणवळण या क्षेत्रात क्रांतीकारक बदल होत आहेत. या तंत्रज्ञानामुळे जग लहान झाले आहे. त्यामुळे भारताला या नव्या वातावरणापासुन दूर रहाणे परवडणारे नाही याचाही विचार करावा लागेल.

जागतिकीकरणाचे तोटे:

जागतिकीकरण केल्याने भारत कर्जाच्या विळख्यात सापडण्याची शक्यता आहे, असे तज्ज्ञाचे मत आहे. कारण जागतिकीकरणाने आयातीत वाढ होईल. परिणामी परकीय कर्ज परत करण्यासाठी कर्ज कढावी लागतील त्यामुळे कर्जाच्या विळख्यात देश सापडेल. तसेच जागतिकीकरणामुळे भारतीय उद्योग परकीय उद्योगांच्या स्पर्धेत टिकू शकणार नाहीत. त्याचा परिणाम भारतीय उद्योगांच्या वाढीवर प्रतिकुल होईल. एवढेच नव्हे तर जागतिकीकरणाची प्रक्रिया राबवितांना आरोग्य, शिक्षण, रस्ते, पाणी, वीज या सारख्या मुलभूत सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. या सोयीशिवाय विकासाची प्रक्रिया गतिमान होत नाही. भारताने जागतिकीकरणाची कल्पना स्वीकारण्यावर भारतात मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक होणे आवश्यक आहे. परंतु भारतातील नोकरशाहीवृत्ती, दफ्तर दिरंगाई, सरकारी नियंत्रणे, भ्रष्टाचार राजकीय अस्तिरता इत्यादीमुळे गुंतवणुकीस अडथळे निर्माण झालेले आहेत. जागतिकीकरणाने नवे तंत्रज्ञान उपयोगात आणले जाणार असल्याने बेकारी देखील वाढणार आहे. असे भारतीय कामगार

संघटनेला वाटते. वरील दोष जागतिकीकरणात आढळत जरी आसले तरी अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी उत्पादन वाढ, उत्पादकता, गुणवत्ता वाढीसाठी उत्पादक घटक तंत्रज्ञान यांचे स्थलांतर करण्यासाठी तसेच त्यांच्या गतिशिलता निर्माण करण्यासाठी जागतिकीकरण आवश्यकच आहे.


संदर्भसूची:

१. प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी, *÷भारतीय अर्थव्यवस्था'* (२०१३) विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

२. डॉ. ज्योत्स्ना देशपांडे - *÷विकासाचे अर्थशास्त्र'*(२०११) पिंपळापुरे अॅण्ड कंपनी, पब्लिशर्स, नागपूर.

३. प्रा. के. एस. भोसले व प्रा. के. बी. काटे - *÷जागतिक अर्थव्यवस्था'* (२०००) फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. *÷अर्थसंवाद'* - ऑक्टोंबर - डिसेंबर (२००८ खंड ३२ अंक ३)

६. Datta, Sundaram, *Indian Economy*, 2008, 2009 S. Chand Pub. Delhi.


---


मनुष्याणाम् वृत्तिरर्थः ।

International Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

**अर्थसंवाद**

**जाहिरातीचे दर**

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद ×

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२१४
मो.९०११३३९९०६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

# शेतमालाचा हमीभाव आणि मुक्त अर्थव्यवस्था

एस.बी.कटमुसरे, कुही,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालय, जिल्हा-नागपूर,
भ्रमणध्वनी: ९२२६९६३५६४

कृषीच्या अडचणी व्यापक आहेत. त्या एका बाजुने स्थानिक आहेत तर दुसऱ्या बाजूने आंतरराष्ट्रीय पातळीशी संबंधित आहेत. जागतिक बाजार ज्यांच्यासाठी खुला आहे. पण या बाजारापर्यंत स्वत:च्या भरवश्यावर शेतकरी पोहोचणे अशक्य आहे. ते मालक आहेत पण संयोजक नाहीत. एखादी बहुराष्ट्रीय कंपनी भारताच्या एकूण उत्पादनाच्या ४४ प्रतिशत उत्पन्न मिळवू शकते हे कोणत्याही एका शेतकऱ्याला शक्य आहे काय? आणि शक्य झाले तरी ०.४९ हेक्टर जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्याचा सहभाग त्यात असेल काय? असे प्रश्न त्यामध्ये निर्माण होतात. सातत्याने बदलणारी जागतिक विपणी शासनासाठी आणि शेतकऱ्यासाठी त्रासदायक ठरली आहे. असे सर्व मूल्य आयोगांचे निरिक्षण आहे. पायाभुत सोयींचा अभाव ही शेतीसाठी मोठी समस्या आहे. डब्ल्यु.टी.ओ.मुळे कल्याणकारी राज्य आणि खुली अर्थव्यवस्था यापैकी ठाम निवड शासन करू शकत नाही.

गृहिते:

१)शेतीमालाचा हमीभाव काढतांना अधिक कार्यक्षम भागातील व्यय लक्षात घेतला आहे.

२)शेतीमालातील किमतीत होणारे चढ उतार याची जबाबदारी शासनाची आहे.

३)आंतरराष्ट्रीय बाजाराशी देशी बाजारपेठ जोडल्यामुळे मागणी पुरवठ्यात असमानता निर्माण झाली आहे.

४)कृषी किंमती धोरणाच्या बाबतीत शासनाच्या अनेकदा स्वत:च्या धोरणावरील विश्वास उडतो आहे.

५)अधिक आधार किंमत, अधिक बाजारभाव हे चक्र सातत्याने सुरू आहे.

## आधार किंमतीची उद्दिष्ट्ये:

आधारभूत किंमती शासनाद्वारे राबविल्या जाणाऱ्या महाकाय खरेदी प्रक्रियेशी जोडलेले आहेत. या मागे तीन कारणे आहेत.

१) संकटकाळात अन्नधान्य उपलब्ध व्हावे.

२) सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी अन्नधान्य खरेदी करणे जेणेकरून गरीबांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून धान्य स्वस्त दरात उपलब्ध होईल.

३) किंमती स्थिर ठेवण्याचे खुल्या बाजार योजनांच्या माध्यमातून साठे बाजारपेठेत उतरवून पुरवठा वाढविणे आणि किंमती खाली आणून ते साध्य केले पाहिजे.

### कृषीमाल किंमत आयोगाचे परिक्षण:

सर्व आयोगांनी शासनाच्या धोरणातील त्रुटी दाखविल्या आहेत. पण नेमकेपणाने सूचना केल्या नाहीत काही सूचना परस्पर विसंगत आहेत. आयोगाची परीक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

अ)वाहतुक वेळाच्या समावेश उत्पादनाच्या खर्चात करणे आवश्यक आहे हे योग्यच आहे.

ब)बाजारातील कृषी मालाच्या किंमतीत होणारे चढउतार आणि त्यातून निर्माण होणारे अनेक प्रश्न याची जबाबदारी शासनावर येणार आहे.

क)अधिक आधार किंमत, अधिक बाजारभाव हे चक्र कुठे तरी थांबले पाहिजे.

ड)गरीब तेलबिया उत्पादकाकडून श्रीमंत गहू उत्पादकाकडे उत्पन्नाचा प्रवाह सुरू आहे. तेलबियांची आयात वाढली आहे. हा मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वभावधर्म आहे.

इ)देशीबाजारपेठ आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडल्यामुळे मागणी पुरवठ्यामुळे असंतुलन निर्माण झाले आहे. ते असंतुलन दूर करण्याची गरज आहे.

ह)आयोगाच्या मते महाराष्ट्रातील कापुस एकाधिकार योजना रद्द करण्यात यावी. चीनकडून अपेक्षित स्पर्धेमुळे ही शिफारस आयोगाने केली आहे.

एकूणच किंमत धोरणाच्या बाबतीत शासनाचाच आपल्या धोरणावरील विश्वास उडालेला दिसून येतो. शासन अनिच्छेने सामाजिक दायित्व घेते असे दिसून येते. इ.स. २००२ चे धोरण याचे उत्तम उदाहरण होय. शासकीय किंमत धोरणाचे व्यापक उद्दिष्ट उत्पादकाच्या खर्चाची भरपाई करून अधिक गुंतवणूक आणि अधिक उत्पादन करण्यात प्रेरणा मिळावी हे असते. मात्र आधार किंमती गोठवाव्यात असे या पाहणीत सुचविण्यात आले आहेत. कारण शासनाच्या मते सतत आधार किंमती वाढल्यामुळे देशांतर्गत किंमती विस्कळीत झाल्या. परिणामतः भारताची निर्यात स्पर्धात्मकता कमी झाली.

### बफर स्टॉक धोरण:

खुल्या बाजारात जेव्हा किंमती वाढतात. तेव्हा शासन किंमतीमध्ये स्थैर्य आणण्यासाठी कमाल दर ठरवून त्या दराने अन्नधान्याचा साठा वाढवितो आणि त्यासाठी शासन धान्याची आयात करून मागणी पुरवठ्यात समानता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. याउलट एखाद्या वेळेत अन्नधान्याची अतिरिक्त खरेदी आणि साठा होत असेल तर त्याची निर्यात करून किंमतीमध्ये स्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

### किंमत स्थिरता:

चहा, कॉफी, रबर आणि तंबाखू या व्यापार पिकांच्या किंमतीत होणारे तीव्र चढ उतारी कमी करण्यासाठी सरकारने ३०० कोटी भांडवल उभारून किंमत स्थिरीकरण निधीचा स्थापना २००३ मध्ये केली सरकारकडून या निधीतून २ ते ४ हेक्टरपर्यंत जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांकडून मदत करण्यात येते. ३१ मार्च

२००७ पर्यंत ४५,२६८ शेतकऱ्यांनी मदतीसाठी अर्ज केला आहे. आधार किंमतीमध्ये आयोग व शासन प्रत्येकवेळेस वाढ करतात. पण ही वाढ जीवन खर्चातील बदलाशी पुरेशी नसते. ऊस आणि कापूस यांच्या १९९०-९१ च्या तुलनेत २००१-०२ मध्ये आधार किंमतीचे वास्तविक मुल्य ४६ प्रतिशत येते. सर्व पिकांच्या बाबतीत हेच प्रमाण लागू होते. याचा अर्थ असा होतो की, आधार किंमतीत ५४ प्रतिशत वाढ होणे अनिवार्य आहे.

## कृषी मालाच्या हमी किंमत धोरणाचा फेरविचार करण्याची गरज:

आर्थिक सर्वेक्षणानुसार गहु आणि तांदूळ या पिकांचा भारताच्या खरेदीचा खर्च साधारणपणे २.१२ ते २.८९ रूपये प्रति किलो येत असून वितरणावर १.८२ ते २.४५ रूपये प्रति किलो खर्च करावे लागत आहे. एकुण खर्चाचा विचार केल्यास तांदळासाठी १८.९३ रूपये प्रति किलो व गव्हासाठी १४.०२ रूपये प्रति किलो येत असतांना गरीबांना तांदुळ व गहु ३.००/७.९५ रूपये प्रति किलो व २.००/६.१० रूपये प्रति किलो (बीपीएल/एपीएल) दराने मिळत असल्याने आधारभुत किंमती वाढवितांना विचार करावा लागतो. कृषी मालासंदर्भात दोन मुद्दे वेगळ्या मनः स्थितीतून सोडविणे आवश्यक आहे आणि त्याची सांगड घालणे देखील गरजेचे आहे. या प्रक्रियेत नेमकी काय उद्दिष्ट्ये प्राप्त करावयाची आहेत? किमान आधारभुत किंमत शेतकऱ्यांसाठी सरतेशेवटी बाजारपेठेशी नाळ जोडायला हवी. त्याशिवाय आपल्या देशातील डाळी, तेलबिया, साखर व अन्य पिक पद्धतीत बदल घडवून आणण्यासाठी सवलत आधारित यंत्रणा आणून अन्य पर्यायाचाही विचार करायला हवा. भारतातील उत्पन्नातील औद्योगिक आणि विशेषतः सेवा क्षेत्राचे योगदान वेगाने वाढते आहे. हे एका बाजूने औद्योगिक प्रगतीचे आणि जागतिक बदलाशी तादात्म्य साधले जाण्याचे गमक आहे तर दुसऱ्या बाजुने कृषीने योगदान घटते आहे. हे पाया कच्चा होत जाण्याचे लक्षण आहे. कृषी मालाची उल्लेखनियरित्या न वाढलेली उत्पादकता, कृषकांची हलाखीची स्थिती त्या धोरणांच्याच नव्हे प्रणालीच्या असफलतेची साक्ष आहे. या धोरणांमुळे ना पूर्णतः मुक्त बाजाराचे लाभ मिळत आहेत. ना पूर्णतः शासकीय मदतीचा लाभ मिळत आहे. नवीन धोरणाने खतांच्या किंमतीचे मिळणारे अनुदान उत्पादकतेशी जोडले. ही बाब आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेच्या धोरणाशी सुसंगत आहे. पण उत्पादकता आणि खते ही परस्पर पूरक नसून उत्पादकता खतांवर अवलंबून असते, असा एकतर्फी संबंध आहे याकडे दुर्लक्ष झाले.

## उपाय:

कृषी मालाच्या आधारभुत किंमती व खुली अर्थव्यवस्था यामध्ये शेतकऱ्यांमध्ये हित साधायचे असेल तर पुढील उपाय अमलात आणता येईल.

१) सर्वप्रथम देशात मोठ्या प्रमाणावर तफावत असल्याखेरीज किमान हमी भाव वाढवायला नको. शासनाने त्याऐवजी बियाणे, रासायनिक खते, सिंचन या माध्यमातून थेट अनुदान द्यायला हवे.

२) शासनाने शेतकऱ्याला आपले उत्पादन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने तात्काळ बाजारात विकण्यास समर्थ बनविले पाहिजे.

३) सर्वोत्कृष्ट किंमत देणारे पिक कोणते? हे

ठरविण्याकरीता शेतकऱ्यांनी वायदेबाजारातील कृषी उत्पादनाच्या भावाच्या फायदा उचलण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे. त्यामुळे त्यांना तांदुळ व गव्हाला चिकटून न राहता अन्य पिकांकडे वळणे शक्य होईल.

४) कृषी धोरणे अशा पद्धतीने आखली जावी की, ज्यामुळे पिकपद्धतीत सातत्याने बदल होत राहतील आणि अर्थव्यवस्थेत योगदान देतानाच शेतकऱ्याला उत्पादनाचे योग्य मुल्य मिळेल.

५) सध्या आधारभुत किंमत धोरणात २७ पिकांचा समावेश आहे. पिकांच्या संख्येत वाढ होणे आवश्यक आहे.

६) आधुनिक शेतीच्या गरजा आणि कृषी क्षेत्रात खुल्या बाजारव्यवस्थेअंतर्गत होणारी खाजगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी जीवनाश्यक वस्तू कायदा आणि कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यात परिस्थितीनूरूप सुधारणा करणे आवश्यक आहे.

७) शेतीमाल निर्यातीला परवानगी देवून शेतीमालाची किंमत ठरविण्यासाठी स्वतंत्र न्यायाधिकरणाची नियुक्ती करावी. अध्ययन करून आधारभूत किंमती निश्चित कराव्या व त्या उत्पादन खर्चावर आधारित असाव्यात.

**निष्कर्ष:**

कृषी मालाच्या उत्पादकतेत वृद्धी झाली आहे. तथापि विकस दृष्ट्याही वृद्धी अपर्याप्त आहे. कृषकाचे दरडोई उत्पन्न वाढलेले दिसत नाही. कृषी मालाची किंमत ठरवितांना लघु व सिमांत शेतकऱ्याचा विचार करायला पाहिजे. त्या संबंधीचा विचार पुरेसा झाला नाही, असे आढळून येते. खाद्यान्नाची कमाल किंमत निश्चित व्हायला पाहिजे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत सुधारणा झाली पाहिजे. ही वितरणव्यवस्था कशी मजबुत होईल यासंबंधी विचार होणे अनिवार्य आहे.

**संदर्भसूची:**


१)सुभाष मल्होत्रा, (२०११) ÷÷*वैश्विकण एवमं भारतीय अर्थव्यवस्था"* रितु पब्लिकेशन, जयपूर.

२)प्रा. एन.एल. चव्हान, (२००९) ÷÷*भारतीय अर्थव्यवस्था"*, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

३)Banrjee, (2007) *Indian Economic Reforms And Response of State*" , Kanishka Publishers New Delhi

४)खंडेला, एम.सी. (२००६) ÷÷*उदारीकरण और भारतीय अर्थव्यवस्था"* पॉईटर पब्लिकेशन जयपूर.

५)Pandya Kiran (2006) *"Reginal Development And Agricultural Wages"* Himalaya Publishing House, India.

६)Sinha, Ajit K. Sen, Raj K. (2006) *Economics of Amartya Sen* Deep & Deep Publication, New Delhi.

७)Kumar, Shashi (2007) *"Encyclopedia of Agriculture and food science"* Anmol Publication Pvt. Ltd. New Delhi.

८)Coubey, S.(2005 ) *"Economics Reforms in India Need Effects and Suggestions"* New Delhi

९)Chennappa, D. *New Economics Policy and Self Employment Schemes*, Anmol Publications Pvt. Ltd. New Delhi.

१०)Economic Survey of India, Central Govt. of India, 2011-12

११)Economic Survey of Maharashtra, Govt. of Maharashtra 2004-05.

# आर्थिक सुधारणांचा केंद्र सरकारच्या सामाजिक सेवांच्या खर्चावरील परिणाम

**निता धर्मे-यादव, कोल्हापूर,**
संशोधन विद्यार्थिनी,
अर्थशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ.

**संतोष यादव, कोल्हापूर,**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर.
भ्रमणध्वनी: ९९२११६०२०८

१९५० ते १९८० या काळात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर साधारणपणे सरासरीने ३.५ टक्क्यांच्या दरम्यान होता. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रावर असलेली बंधने, परवाना पध्दती, नोकरशाहीचे नियंत्रण आणि सरकारने राबविलेले संरक्षणाचे धोरण यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन बिघडून १९९१ चे आर्थिक संकट निर्माण झाले. त्यावेळी देशामध्ये मोठ्या प्रमाणावरील वित्तीय तूट, चालू खात्यावरील भरमसाठ वाढलेली तूट, दोन अंकी भाववाढ, अत्यल्प परकीय गंगाजळी यासारख्या समस्या निर्माण झाल्या होत्या. या संकटातून बाहेर पडण्यासाठी केंद्र सरकारने देशामध्ये नवीन आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली. नवीन आर्थिक सुधारणामध्ये स्थिरीकरण आणि रचनात्मक समायोजन कार्यक्रम यांचा समावेश होतो. स्थिरीकरणाच्या उपायांमध्ये सरकारचा खर्च कमी करणे आणि अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात खाजगी क्षेत्राला वाव देणे अशी भूमिका मांडली गेली. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेमध्ये सरकारचा असलेला क्रियाशील सहभाग कमी करणे अशीही भूमिका मांडली गेली.

सरकारने शिक्षण, आरोग्य यासारख्या सामाजिक सेवांवर वाढत्या प्रमाणात खर्च करणे आवश्यक असते. देशाच्या एकंदर आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये सामाजिक सेवांवरील खर्च महत्त्वाची भूमिका बजावत असतो. सरकारने यावरील खर्च केल्याशिवाय निश्चित केलेली सामाजिक-आर्थिक

उद्दिष्ट्ये चांगल्या पध्दतीने साध्य करता येत नाहीत. म्हणून देश विकसित असो किंवा विकसनशील, सामाजिक सेवांवरील खर्चाला देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचे स्थान असते.

अविकसित आणि विकसनशील देशातील आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा अडथळा म्हणजे या देशांमध्ये आर्थिक आणि सामाजिक सोयीसुविधांची कमतरता असणे होय. चांगल्या वाहतूक व दळणवळणांच्या सोयींचा अभाव, अपुऱ्या शैक्षणिक आणि आरोग्य सुविधा इत्यादीमुळे देशाच्या आर्थिक विकासामध्ये अडथळे निर्माण होतात. म्हणून अविकसित आणि विकसनशील देशामध्ये वरील सेवा पुरेशा प्रमाणात आणि योग्य किंमतीत उपलब्ध करणे ही सरकारची जबाबदारी ठरते. सार्वजनिक खर्चामुळे सामाजिक आणि आर्थिक सोयीसुविधा उपलब्ध करण्याने देशाचा औद्योगिक विकास, शैक्षणिक विकास होऊन उत्पादन क्षमता वाढण्यास मदत होते. सार्वजनिक आरोग्यावरील सरकारचा खर्च हे एक सरकारचे महत्त्वाचे कार्य आहे. सरकार एका बाजूला कुटुंब नियोजनासाठी विविध कार्यक्रम राबविते; तर दुसऱ्या बाजूला बालक आणि माता कल्याण यासारख्या कार्यक्रमावर मोठया प्रमाणावर खर्च करते.

सरकारच्या खर्चाची विकासात्मक खर्च आणि विकासेतर खर्च अशी विभागणी करता येते. सरकारच्या विकासात्मक खर्चामध्ये सामाजिक सेवांवरील खर्च, आर्थिक सेवांवरील खर्च आणि राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना दिलेली अनुदाने यांचा समावेश होतो. केंद्र सरकारच्या सामाजिक सेवांवरील खर्चामध्ये खालील महत्त्वाच्या सामाजिक सेवांवरील खर्चाचा समावेश होतो.

१. शिक्षण
२. कला आणि संस्कृती
३. शास्त्रीय सेवा आणि संशोधन
४. वैद्यकीय, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि पाणी पुरवठा
५. कुटुंब कल्याण
६. गृहनिर्माण
७. नागरी विकास
८. दूरदर्शन
९. श्रम आणि रोजगार
१०. सामाजिक सुरक्षा आणि कल्याण
११. माहिती आणि प्रसिध्दी

१९९१ नंतर देशात राबविलेल्या उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण कार्यक्रमामुळे केंद्र सरकारच्या सामाजिक खर्चात झालेल्या बदलाचे १९९१-९२ ते २०११-१२ या वर्षातील आकडेवारीचा अभ्यास केला असता खालीलप्रमाणे निष्कर्ष मिळतात:

१. सुधारणेत्तर काळामध्ये केंद्र सरकारचा विकासात्मक महसूली खर्च १९९१-९२ मध्ये २९०८९.८० कोटी रू. इतका होता. तो वाढून २०११-१२ मध्ये ४८६४४४.३३ कोटी रू. इतका झाला. या २१ वर्षाच्या कालावधीमध्ये सरकारचा हा खर्च १६ पटीने वाढलेला दिसून येतो. याचा अर्थ असा होतो की, १९९१ नंतर केंद्र सरकारचा विकासात्मक महसूली खर्च सातत्याने वाढत आहे.

२. सामाजिक सेवांवरील विकासात्मक खर्चामध्ये शिक्षण, संशोधन, कला आणि संस्कृती, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा आणि कल्याण यावरील खर्चाचा समावेश होतो. देशातील नागरिकांच्या

आयुष्याचा दर्जा सुधारण्यासाठी अशा प्रकारचा खर्च गरजेचा आणि महत्त्वाचा असतो. १९९१-९२ मध्ये केंद्र सरकारच्या विकासात्मक खर्चामध्ये सामाजिक सेवांवरील खर्च ९५१३.१८ कोटी रु. होता. तो वाढून २०११-१२ मध्ये २२८७१७.३३ कोटी रु. इतका झाला. गेल्या २१ वर्षामध्ये हा खर्च मोठया प्रमाणात वाढलेला दिसून येतो. या कालावधीतील या सेवांवरील खर्चाचा संयुक्त वार्षिक वृध्दी दर(Compound Annual Growth Rate) १७.२ टक्के इतका होता. यावरून हे स्पष्ट होते की, केंद्र सरकारचा सामाजिक सेवांवरील विकासात्मक खर्च जलद गतीने वाढला.

३. केंद्र सरकारच्या विकासात्मक खर्चामध्ये सामाजिक सेवांवरील खर्च आणि आर्थिक सेवांवरील खर्च यांचा समावेश होतो. या दोन्ही खर्चाची तुलना केली असता असे दिसते की, या कालावधीत आर्थिक सेवांवरील खर्च १३.१७ पटीने वाढला; तर सामाजिक सेवांवरील खर्च २४.०४ पटीने वाढला. त्याचबरोबर एकूण विकासात्मक खर्चात सामाजिक सेवांवरील खर्चाचा हिस्सा १९९१-९२ मध्ये ३२.७० टक्के इतका होता; तो वाढून २०११-१२ मध्ये ४७.०२ टक्के एवढा वाढला.

४. प्लेटोच्या काळापासून विकासामधील शिक्षण, संशोधन आणि सार्वजनिक आरोग्य यांची भूमिका विशद केलेली आहे. ॲडम स्मिथ यांनी पहिल्यांदा शिक्षण आणि आर्थिक विकासातील संबंधातील चर्चेमध्ये महत्त्वाचे योगदान दिले. स्मिथच्या मते, सर्व प्रकारच्या भांडवलामध्ये मानवी भांडवलातील गुंतवणूक महत्त्वाची असते. या प्रकारच्या खर्चामुळे देशाची उत्पादकता वाढण्यास मदत होते. सरकारने या घटकांवर किती खर्च केला यावरून तो देश शैक्षणिक कार्यक्रमांना किती महत्त्व देतो हे दिसून येते. १९९१-९२ ते २०११-१२ या कालावधीत केंद्र सरकारचा शिक्षण, शास्त्रीय सेवा आणि संशोधन, कला आणि संस्कृती आणि सार्वजनिक आरोग्य यावरील खर्च ५६ पटीने वाढला. १९९१-९२ मध्ये तो १७४१.०९ कोटी रु. होता; तो वाढून २०११-१२ मध्ये ९८५६८.७४ कोटी रू. इतका झाला. याचा संयुक्त वार्षिक वृध्दी दर १७.२ टक्के इतका होता. या वाढलेल्या खर्चाचा परिणाम देशातील साक्षरतेचे प्रमाण आणि आर्युमान वाढ यामध्ये दिसतो. त्याचबरोबर देशातील अर्भक मृत्युदरही घटलेला दिसतो.

५. अलिकडच्या काळात केंद्र सरकारच्या खर्चातील सामाजिक सेवांवरील खर्चाचे प्रमाण वाढलेले दिसून येते. परंतु कुटुंब कल्याण आणि सामाजिक सुरक्षिततेवरील खर्चाचा हिस्सा एकूण सामाजिक सेवांवरील विकासात्मक खर्चामध्ये तुलनेने १०.१५ टक्केवरून ७.८३ टक्के इतका घटलेला दिसून येतो. केंद्र सरकारचा या घटकावरील खर्च १९९१-९२ मध्ये ९६५.१४ कोटी रु. इतका होता; तो वाढून २०११-१२ मध्ये १७९१८.३१ कोटी रु. इतका झाला.

६. १९९१-९२ मध्ये केंद्र सरकारचा गृहनिर्माण, शहरी विकास, दूरदर्शन, श्रम आणि रोजगार, माहिती आणि प्रसिध्दी यावरील खर्च १०६९.६७ कोटी रु. होता. तो २०११-१२ मध्ये १६००५.६८ कोटी रु. इतका झाला. १९९१ नंतरचा देशातील नागरीकरणाचा वेग लक्षात घेता यावरील खर्च कमी आहे.

एकंदरीने असे म्हणता येईल की,

सुधारणेत्तर काळात केंद्र सरकारचा सामाजिक सेवांवरील खर्च मोठया प्रमाणात वाढलेला दिसून येतो. तथापि, देशाची वाढती लोकसंख्या, शिक्षण आणि आरोग्य यासारख्या सामाजिक सेवांना वाढती मागणी, दारिद्र्यरेषेखालील लोकांची मोठी संख्या, या लोकसंख्येला परवडत नसलेल्या शिक्षण आणि आरोग्य सेवांच्या किंमती, वाढते शहरीकरण आणि त्यामुळे वाढणाऱ्या सामाजिक, आरोग्यविषयक समस्या या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा हा खर्च कमी असलेला दिसतो. हा खर्च पुरेसा नाही म्हणून देशातील नागरिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी आणि देशाच्या एकंदर विकासासाठी या क्षेत्रावरचा खर्च केंद्र सरकारने आणखी वाढविण्याची गरज आहे.

संदर्भ -


1. Basu Anuradha (1995) : *'Public Expenditure Decision Making - The Indian Experience,'* Sage Publications, New Delhi.
2. Jain Vasundhara (July - August 2012) : *'The Development Expenditure by the Central Government of India and its Impact on Poverty and Per Capita Income in the Country'*, International Journal of Economic Research, Vol. 3, No. 04, pp. 121-133.
3. Joshi Seema (January 28, 2006) : *'Impact of Economic Reforms on Social Sector Expenditure in India '*, Economic and Political Weekly, Vol. XLI, No. 04, pp. 358-365.
4. Handbook of Statistics on the Indian Economy (2011-12) : Reserve Bank of India.
5. Indian Public Finance Statistics (1998-99, 2011-12) Ministry of Finance, Government of India, New Delhi.

# जागतिकीकरणाचे परिणाम

हिरालाल वामन चव्हाण, जळगाव,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कला, वाणिज्य व गृहविज्ञान
महिला महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२३९१५६४६

राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे, खामगाव,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
जी.एस.कॉलेज,
जिल्हा- बुलढाणा,
भ्रमणध्वनी: ९४२२५४७७२२

आर्थिक व्यवहाराचे उदारीकरण आणि जागतिकीकरण हे १९८० च्या दशकानंतर आपल्या देशात परवलीचे शब्द झाले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिकीकरण (Globlisation ) हा अत्यंत महत्त्वाचा असा चर्चेचा विषय झाला. उदारीकरण, खाजगीकरण आणि प्रामुख्याने जागतिकीकरणाच्या बाजूने आणि विरोधाने सर्व देश ढवळून निघाला. मात्र कालांतराने राष्ट्रीय आणि जागतिक व्यावसायिक पर्यावरणात घडत गेलेल्या आधुनिक अशा परिवर्तनामुळे सुरवातीच्या काळात जागतिकीकरणाला झालेला विरोध हळूहळू मावळत गेला. देशाची आणि एकूणच संपूर्ण जगाची उन्नती करण्यासाठी जागतिकीकरणाशिवाय पर्याय नाही, हे सगळ्यांनाच पटले आहे. आणि पुढे त्याचे परिणामही तसेच दिसून आले.१९५१ पासून नियोजनाला सुरवात केल्यानंतर १९९१ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती आणि १९९१ नंतर आजपर्यंतचा विकास याचा आढावा घेतल्यास जागतिकीकरणाचे आणि नवीन आर्थिक सुधारणांचे अनुकूल परिणाम सहज लक्षात येतात. प्रस्तुत निबंधात याच दृष्टीने जागतिकीकरणापूर्वी आणि नंतर काही निवडक आर्थिक व सामाजिक निर्देशांकामध्ये झालेल्या उल्लेखनीय बदलांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## जागतिकीकरणाचे भारताच्या दृष्टीने फायदे-तोटे:

जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्वच क्षेत्रातून होत राहणारे रुपांतर होय असे म्हणता येते. जागतिक पातळीवरील आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक सीमांची मर्यादा दूर करणे म्हणजे जागतिकीकरण आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या मते वस्तू सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान ह्याचे वाढते प्रमाण तसेच विविधता यांच्या साहाय्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे

परस्परावलंबित्व म्हणजे जागतिकीकरण, असा जागतिकीकरणाचा अर्थ आहे. *'कुछ पाने के लिए कुछ खोना पडता है ।'* या उक्तीप्रमाणे भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिकीकरणाच्या फायद्यां बरोबरच तोटेही अपेक्षित आहेत.

फायदे:

१) उत्पादन क्षमतेचा जास्तीत जास्त वापर त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ.

२) राष्ट्रीय उत्पन्नाबरोबरच दरडोई उत्पन्नात लक्षणीय वाढ.

३) आर्थिक, सामाजिक व प्रादेशिक विषमता कमी होण्यास मदत.

४) नवीन यंत्र आणि तंत्रज्ञानाचा वापर.

५) विदेशी भांडवल गुंतवणूक.

६) आंतराष्ट्रीय व्यापारात वाढ व सुधारणा.

७) विदेशी गंगाजळीत वाढ किंवा सुधारणा.

८) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची उपलब्धता तसेच बाजारपेठांचा विस्तार व विकास.

९) उत्पन्न-उपभोग पातळीत वाढ यामुळे राहणीमान व जीवनमानात सुधारणा.

तोटे :

१) आंतरराष्ट्रीय व्यापारातील तुटीची समस्या .

२) विदेशी कर्जाचा डोंगर वाढण्याची भिती.

३) आवश्यक वस्तुपेक्षा चैनीच्या वस्तुची मागणी वाढून चंगळवादाला प्रोत्साहन त्यामुळे उत्पादनाची साधने आवश्यक वस्तुकडून चैनीच्या वस्तुकडे वळण्याची भिती.

४) महागाई व बेरोजगारीची समस्या.

५) गळेकापू स्पर्धा यामुळे भारतीतील कमकुवत उद्योगांवर विपरीत परिणाम.

६) आर्थिक विषमतेत वाढ.

७) विकसित देशांकडून भारतीय बाजारपेठ काबीज होण्याची भिती.

## जागतिकीकरणानंतर निवडक आर्थिक निर्देशांकात झालेले लक्षणीय बदल:

१९५०-५१ ते २०११-१२ या कालावधीत १९५०-५१ ते १९९०-९१ आणि १९९०-९१ ते २०११-१२ अशा साधारण जागतिकीकरणापूर्वीचा आणि नंतरचा कालखंड विचारात घेऊन या दोन कालखंडात प्रमुख आर्थिक निर्देशांकात झालेल्या बदलाचा अभ्यास केल्यास जागतिकीकरणाच्या काळात सर्वच आर्थिक निर्देशांकात तुलनात्मक दृष्ट्या अधिक वाढ झाल्याचे दिसून येते.

स्थूल राष्ट्रीय उत्पादन (G.D.P.):

१९५० मध्ये भारताचे चालू किमतीनुसार घरखर्चावर आधारित स्थूल राष्ट्रीय उत्पन्न १००३६ कोटी रुपये होते. १९९०-९१ मध्ये ते ५३१८१४ कोटी रूपये झाले. तर २०११-१२ मध्ये ते ८३५३४९५ कोटी रूपये झाले. १९५०-५१ ते ९०-९१ या ४० वर्षाच्या काळात राष्ट्रीय उत्पादनात ५२१७७८ कोटी रूपयाची वाढ झाली तर पुढील २० वर्षातच ७८२१६८१ कोटी रुपये उत्पादन वाढले. स्थिर किंमतीनुसार मोजलेल्या उत्पन्नातही या काळात अनुक्रमे १०६८२२१ कोटी आणि ३८९५६८३ कोटी अशी वाढ झाली याचा अर्थ स्थूल राष्ट्रीय उत्पादनात जागतिकीकरणानंतर लक्षणीय वाढ झाल्याचे स्पष्ट होते.

दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न :

दरडोई उत्पन्न हा अत्यंत महत्त्वाचा आर्थिक निर्देशांक मानला जातो. देशाच्या दरडोई उत्पन्नातही जागतिकीकरणानंतरच्या काळात भरीव वाढ झाल्याचे निदर्शनास येते. १९५०-५१ मध्ये घटक खर्चानुसार व स्थिर किंमतीनुसार देशाचे

दरडोई उत्पन्न ७११४ रुपये होते. ते १९९०-९१ मध्ये १४३३० म्हणजे ७२१६ रुपयांनी वाढून दुप्पट झाले तर २०११-१२ मध्ये ते ३८०३७ रुपये झाले म्हणजे नंतर केवळ वीस वर्षात त्यात २३७०७ रुपयांची म्हणजे अडीच पटीपेक्षा अधिक वाढ झाली.

**बचत आणि गुंतवणुक:**

१९५०-५१ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पादनाशी भांडवल गुंतवणूक व बचतीचे प्रमाण अनुक्रमे ९.३ टक्के व ९.५ टक्के होते. ते १९९०-९१ मध्ये अनुक्रमे २६.० व २२.९ टक्के तर २०११-१२ मध्ये ३५.० टक्के व ३०.८ टक्के झाले याचा अर्थ बचत आणि भांडवल उभारणीचे प्रमाणही १९९१ नंतरच्या काळात तुलनात्मक दृष्ट्या वाढले आहे.

**कृषी उत्पादन निर्देशांक:**

कृषी उत्पादन निर्देशांकात मात्र १९९१ नंतरच्या काळात प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते .१९५०-५१ मध्ये कृषी उत्पादन निर्देशांक ४६.२ होता तो १९९०-९१ मध्ये १४८.४ झाला तर २०११-१२ मध्ये कमी होऊन १२४.१ झाला अर्थात अन्नधान्याच्या उत्पादनात सातत्याने होणारी वाढ या ठिकाणी महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. १९५०-५१ मध्ये ५०.८ दशलक्षटन अन्नधान्याचे उत्पादन झाले होते. १९९०-९१ ते १२५.६ दशलक्ष टनाने वाढून १७६-४ दशलक्ष टन झाले तर पुढील वीस वर्षात त्यात आणखी ८१ दशलक्ष टनाने वाढ होऊन २०११-१२ मध्ये २५७.४ दशलक्ष टन उत्पादन झाले.

**औद्योगिक उत्पादन निर्देशांक:**

औद्योगिक उत्पादन निर्देशांकात मात्र १९९१ नंतरच्या काळात उल्लेखनीय वाढ झाल्याचे निदर्शनास येते. उदा. १९५०-५१ मध्ये औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक केवळ ७.९ होता तो १९९०-९१ मध्ये ९१.६ तर २०११-१२ मध्ये १७०.३ वर पोहोचला. या काळात सर्वच प्रकारच्या औद्योगिक उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली.

**आंतरराष्ट्रीय व्यापार:**

आंतरराष्ट्रीय व्यापारात म्हणजे देशाच्या आयात निर्यातीत सातत्याने वाढ होत आहे. मात्र आयातीपेक्षा निर्यातीत होणारी वाढ अधिक असल्याने व्यापार शेषातील तुटीत लक्षणीय वाढ झाली आहे. १९५०-५१ मध्ये ६०६ कोटी रुपयांची निर्यात तर ६०८ कोटी रुपयांची आयात झाली यावर्षी व्यापार शेषात केवळ २ कोटीची तुट होती. १९९०-९१ मध्ये ३२५५३ कोटी रुपयांची आयात तर ४३१९८ कोटी रुपयांची निर्यात होऊन व्यापार शेषातील तुट १०६४५ कोटी रुपयांपर्यंत पोहचली. नंतरच्या वीस वर्षात मात्र तुटीचे प्रमाण वेगाने वाढत गेले. २०११-१२ या वर्षात व्यापार शेषातील तुटीचा आकडा ८७९५०४ कोटी रुपयापर्यंत पोहचला या वर्षात १४६५९५९ कोटी रुपयांची निर्यात तर २३४५४६३ कोटी रुपयाची आयात करण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय व्यापारात झालेली लक्षणीय वाढ हा जागतिकीकरणाचा अनुकूल परिणाम म्हटला तरी यातील वाढत जाणारी प्रचंड तूट ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अर्थ व्यवस्थेच्या विविध क्षेत्रात मुलभूत स्वरूपाचे बदल घडविण्यात आले. अजूनही असे बदल घडविले जात आहेत. कारण ती एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. अशा बदलांचे बरे वाईट परिणामही

अटळ आहेत. मात्र यातील अनिष्ट परिणाम रोखण्यासाठी ठोस धोरणात्मक उपाययोजना करण्याची गरज आहे. प्रामुख्याने चालू खात्यातील रुंदावत चाललेली तूट कमी करणे, वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळविणे, बेरोजगारीचा प्रश्न सोडविणे, कृषी उत्पादन वाढीच्या दरात वाढ करणे. आर्थिक वृध्दीच्या दरात वाढ करणे, भांडवली वस्तुच्या आयातीमुळे देशातील भांडवली वस्तुच्या उत्पादन वाढीवरील विपरित परिणाम, चंगळवादावर नियंत्रण, विषमतेचा प्रश्न, व्यवहारतोलातील तूटीची समस्या आदि समस्यांवर सुधारणांच्या पुढील टप्प्यात विशेष लक्ष देण्याची गरज आहे. थोडक्यात जागतिकीकरणामुळे विविध प्रश्न निर्माण होणार यात वाद नाही. मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावरील नव्या संधी उपलब्ध होण्यासाठी जागतिकीकरण आणि उदारीकरणाशिवाय आतातरी पर्याय नाही.

**संदर्भ सूची:**

१) *Economic Survey* - 2012-13.

२) *Indian Economy* : Gaurav Datt, Ashwani Mahajan.

३) *भारतीय अर्थव्यवस्था* (संक्रमण आणि विकास) -डॉ. श्री.आ. देशपांडे व डॉ. वि.श्री. देशपांडे.

४) *Indian Economy* : Datt, Sundaram.

## निवेदन: अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# जागतिकीकरण आणि भारतातील सेवाक्षेत्र

**पी. बी. शिंदे, कुर्डूवाडी,**
के.एन.भिसे आर्टस अँड कॉमर्स कॉलेज,
जिल्हा सोलापूर.
भ्रमणध्वनी : ९४२००९१४०७

**सिध्देश्वर चंद्रकांत भोसले, कुर्डूवाडी,**
के.एन.भिसे आर्टस अँड कॉमर्स कॉलेज,
जिल्हा सोलापूर.
भ्रमणध्वनी :९९२२७७०४८६
ई-मेलः sidhdeshwar@gmail.com

भारताने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. हा स्वीकार स्वेच्छेने नव्हता तर प्रतिकूल व्यवहारतोल, विदेशी चलनाचा तूटवडा, मोठ्या प्रमाणातील वित्तीय तूट अशा अनेक समस्या अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झाल्याने उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (LPG) प्रतिमानाचा स्वीकार तत्कालीन सरकारने केला. या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था संकटामधून बाहेर पडेल, अधिक गतीने विकसित होईल व विकासाचे लाभ सर्व लोकांपर्यंत पोहोचतील असा दृष्टिकोन समोर ठेवूनच या धोरणाचे समर्थन व अवलंब केला गेला.

**जागतिकीकरण संकल्पनाः**

अ)जागतिकीकरणः जागतिकीकरण ही एक प्रक्रिया आहे. यामध्ये जगातील विविध देशांमध्ये आर्थिक एकात्मता आणि परस्पर अवलंबित्व वाढते. या प्रक्रियेमध्ये देशाच्या सीमाक्षेत्राबाहेर भांडवल, वस्तू, सेवा, उद्योजक, व्यावसायिक व कामगार यांची मुक्तपणे ये-जा सुरू होते. म्हणजेच थोडक्यात, देशाच्या भौगोलिक सीमाक्षेत्राबाहेर होणारा आर्थिक क्रियांचा विकास आणि विस्तार म्हणजे जागतिकीकरण होय.

ब)सेवाक्षेत्रः कोणतीही प्राथमिक अथवा पुरक क्रिया जी भौतिक उत्पादन न करता उत्पादक व उपभोक्ते यांच्यामध्ये बिगर वस्तू स्वरूपातील आर्थिक व्यवहार म्हणजे

सेवा होय. यामध्ये बँकिंग, वित्त, वाहतूक-दळणवळण, पर्यटन, मनोरंजन, बांधकाम, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, इ. सेवांना एकत्रितपणे सेवाक्षेत्र असे संबोधले जाते.

### जागतिक व्यापार संघटना व भारताचा सेवा व्यापार:

भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा संस्थापक सदस्य देश आहे. वस्तू व्यापार विषयक तरतुदी प्रमाणेच १९९६ च्या उरूग्वे फेरीमध्ये सेवा व्यापार विषयक सर्वसाधारण करारास (General Agreement on Trade in Services) मान्यता देण्यात आली. सन २००१ मध्ये दोहा येथे झालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या सहाव्या मंत्रिस्तरीय बैठकीमध्ये या कराराच्या विविध मुद्द्यांवर चर्चा होऊन जागतिक व्यापारासाठी सेवाक्षेत्र खुले करण्यात आले. भारताने सन २००० नंतर यावर शिक्कामोर्तब केले. सध्या या करारानुसार रेल्वे व संरक्षण क्षेत्र वगळता इतर सर्व सेवा खाजगी क्षेत्रासाठी अंशतः किंवा पूर्णतः मुक्त करण्यात आलेल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान व तत्सम सेवांमध्ये जागतिक बाजारपेठेमध्ये भारताने ओळख निर्माण केल्याचे आढळून येते.

### उद्दिष्ट्ये व माहितीचे स्त्रोत:

जागतिकीकरणाचा अवलंब केल्यापासून भारतातील स्थूल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) मधील क्षेत्रीय बदल, सेवाक्षेत्राचे रोजगार निर्मितीतील योगदान, सेवाक्षेत्राच्या वृद्धी दरातील प्रवृत्ती, सेवाक्षेत्राच्या माध्यमातून देशात येणारी थेट विदेशी गुंतवणूक व भारताचा आंतरराष्ट्रीय सेवा व्यापारातील प्रवृत्ती, इ. चा अभ्यास करणे.

### सेवाक्षेत्र व स्थूल देशांतर्गत उत्पादन:

देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात होणारी सातत्यपूर्ण वाढ हे देशाच्या आर्थिक प्रगतीचे लक्षण मानले जाते. खुल्या आर्थिक धोरणाच्या कालखंडामध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात नियमित वाढ होताना दिसून येते. यामध्ये कृषी व उद्योग क्षेत्राच्या तुलनेत सेवाक्षेत्राचे जीडीपी मधील योगदान अधिक गतीने वाढते आहे.

सन १९९०-९१ मध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये शेती, उद्योग व सेवाक्षेत्राचे योगदान अनुक्रमे २९ टक्के, ३० टक्के व ४१ टक्के होते. सन २०१२-१३ च्या आर्थिक सर्व्हेक्षणाच्या आकडेवारीनुसार हे योगदान अनुक्रमे १४ टक्के, २७ टक्के व ५९ टक्के असे बदलेले दिसून येते. उद्योग क्षेत्राचे योगदान कमी अधिक प्रमाणात स्थिर आहे. परंतु शेतीक्षेत्राचे जीडीपी मधील योगदान सातत्यपूर्ण घटत असून सेवाक्षेत्राचे योगदान अधिक गतिने वाढताना दिसते आहे.

### सेवाक्षेत्र व रोजगार संधी:

नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला तेव्हा कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा देशातील एकूण रोजगारातील हिस्सा अनुक्रमे ६५ टक्के, १५ टक्के व २० टक्के च्या दरम्यान होता. यामध्ये बदल होऊन सन २०१० मध्ये हे प्रमाण अनुक्रमे ५३ टक्के, २१ टक्के (बांधकाम सह) व २६ टक्के पर्यंत पोहोचले. सन २०१२ मधील NASSCOM (National Association of Software and Services Companies) च्या अहवालानुसार केवळ माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये दरवर्षी १८ दशलक्ष रोजगार संधी निर्माण होत आहेत. याशिवाय बांधकाम, हॉटेल, शिक्षण, प्रशासन व सामाजिक सेवांबरोबरच माहिती व दळणवळण

क्षेत्रामध्येही जागतिकीकरणाच्या काळात रोजगार संधी खूप अधिक गतिने वाढल्याचे दिसते.

राष्ट्रीय नमुना पाहणी संघटना (NSSO) च्या अलिकडील विविध फेऱ्यांमधून ही बाब अगदी स्पष्ट झाली आहे की कमी उत्पन्न गटातील शहरी व ग्रामीण तरुण-तरुणींना रोजगार संधी निर्माण करून सेवाक्षेत्राने त्यांना सामावून घेतले आहे व त्यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे.

## सेवाक्षेत्राच्या वृद्धी दरातील प्रवृत्तीः

नवीन आर्थिक धोरणामुळे सेवाक्षेत्राच्या विस्ताराला अधिक चालना मिळाली. याचा परिणाम एकंदर भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासावर झाला. जागतिकीकरणाच्या कालखंडामध्ये कृषी व उद्योग क्षेत्राच्या तुलनेत सेवाक्षेत्राचा वृद्धीदर अधिक राहिल्याने भारतीय अर्थव्यवस्थेचे विकास इंजिन म्हणून सेवाक्षेत्र काम करू लागले. पंचवार्षिक योजना कालखंडाच्या सुरूवातीला सेवाक्षेत्राचा वार्षिक वृद्धी दर ४ टक्के इतका होता. यामध्ये नंतरच्या कालखंडामध्ये वाढ होत गेली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सेवाक्षेत्राच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले व सन २००९-१० या वर्षामध्ये हा दर ९.८ टक्के इतका वाढला. अलिकडील जागतिक वित्तीय संकटाचा फटका भारतातील सेवाक्षेत्राला बसला त्यामुळे सेवाक्षेत्राच्या वृद्धी दरामध्ये काही प्रमाणात घट झालेली दिसते. तथापि ही घट जगभरातील इतर विकसीत देशांच्या तुलनेत अगदी नगण्य राहिली.

## सेवाक्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूकः

थेट परकीय गुंतवणूक (FDI) म्हटले की सेवाक्षेत्रातील गुंतवणूक अशीच ओळख बनली आहे. नवीन आर्थिक धोरणाच्या प्रक्रियेमध्ये परकीय व्यक्ती आणि संस्थांना देशातील विविध उत्पादक कार्यामध्ये गुंतवणूक करण्याची व नफा मिळविण्याची संधी प्राप्त होते. तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून निर्यातक्षम सेवांची निर्मिती, रोजगार वृद्धी व अद्ययावत तंत्रज्ञान आयातीसाठी आवश्यक परकीय चलनाची उपलब्धता होते.

सन २००० ते २०१२ या कालखंडामध्ये देशामध्ये झालेल्या एकूण थेट परकीय गुंतवणूकीपैकी ५६.०८ टक्के गुंतवणूक ही सेवाक्षेत्रामध्ये झाली. यामध्ये वित्तीय व बिगर वित्तीय सेवा (३६.०४ द.ल.डॉलर्स), बांधकाम विकास (२१.७७ द.ल.डॉलर्स), दूरसंचार (१२.६२ द.ल.डॉलर्स), संगणक हार्डवेअर व सॉफ्टवेअर (११.५४ द.ल.डॉलर्स) आणि हॉटेल व पर्यटन क्षेत्राची आघाडी होती. अलिकडे भारत सरकारने देखील सेवाक्षेत्राच्या अधिकच्या विस्तारासाठी काही धोरणांचा स्वीकार केला. यामध्ये प्रसारण क्षेत्रातील कंपन्यांमधील परकीय गुंतवणुकीची मर्यादा ४९ टक्के वरून ७४ टक्के करणे, परकीय विमान वाहतूक कंपन्यांना ४९ टक्के पर्यंतच्या गुंतवणुकीस मान्यता, विविध कंपन्यांच्या किरकोळ विक्री व्यवसायामध्येही ५१ टक्के पर्यंतची मान्यता, इ. चा उल्लेख करता येईल.

## भारताचा आंतरराष्ट्रीय सेवा व्यापारः

परकीय चलन मिळविण्याचा पारंपरिक मार्ग म्हणून आपण आंतरराष्ट्रीय व्यापाराकडे पाहतो. नविन आर्थिक धोरणामुळे जगभरातील अर्थव्यवस्था भारताला निर्यातीसाठी खुल्या झाल्या. निर्यात बाबींचा आराखडा देखील १९९० च्या दशकापासून बदललेला आढळतो. यामध्ये

पारंपरिक वस्तू ऐवजी औद्योगिक व सेवाक्षेत्र निर्मित उत्पादन व सेवांनी देशाच्या निर्यातीची धुरा संभाळली. सन १९९० मध्ये एकूण जागतिक सेवा व्यापारामध्ये भारताचे योगदान केवळ ०.६ टक्के होते. यामध्ये वाढ होऊन सन २००० मध्ये हे प्रमाण १ टक्के झाले. तर २०११ मध्ये ते ३.३ टक्के पर्यंत वाढले. सदरची वाढ ही जगभरातील एकूण वस्तू व्यापार वृद्धीदरापेक्षा अधिक होती. २००१-०२ ते २०११-१२ या कालखंडामध्ये भारतातील सेवाक्षेत्राच्या निर्यातीचा संयुक्त वार्षिक वृद्धी दर २३.६० टक्के आढळला. सदरचा वृद्धींदर याच कालखंडातील वस्तू व्यापाराच्या (२१.४० टक्के) दरापेक्षा अधिक होता. सध्या देशातील एकूण सेवा निर्यातीमध्ये सॉफ्टवेअर सेवा, व्यावसायिक सेवा, वित्तीय सेवा व संभाषण सेवा यांचा हिस्सा ७५ टक्के आहे. याखालोखाल प्रवास, दळणवळण व विमा सेवांचे योगदान आहे. सेवा आयातीच्या बाबतीत व्यावसायिक सेवा, वित्तीय सेवा व संभाषण सेवा यांचा संयुक्त ६० टक्के हिस्सा आहे.

**चीनचे स्पर्धात्मक आव्हान:**

आंतरराष्ट्रीय स्तरावर सेवाक्षेत्राच्या विस्तारासाठी आवश्यक इंग्रजी भाषेवर प्रभूत्व असणे व तांत्रीक कौशल्य, विशेषतः संगणकीय कौशल्यातील पारंगतता या बाबीकडे चीन अलिकडे अधिक लक्ष केंद्रीत करीत आहे. यामुळेच २००१ ते २०११ कालखंडातील चीनचा सेवा क्षेत्राचा संयुक्त वार्षिक वृद्धी दर जगातील सर्वाधीक म्हणजे ११ टक्के पेक्षा अधिक राहिला. याच्या तुलनेत भारताचा वृद्धीदर ९ टक्के च्या दरम्यान राहिल्याचे आढळते.

खुल्या आर्थिक धोरणाचा स्विकार केल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप बदलत आहे. आर्थिक वृद्धी, रोजगार संधी, व्यापार वृद्धी, मानवी विकास, थेट परकिय गुंतवणूक, शेती व उद्योगाला आवश्यक सेवांची उपलब्धता आणि सामाजिक व आर्थिक बदल अशा सर्वच क्षेत्रात सेवाक्षेत्राचे योगदान वाढत आहे. अर्थव्यवस्थेची वाटचाल कृषीप्रधान कडून सेवाप्रधान अर्थव्यवस्थेकडे सुरू आहे. हे देशाच्या विकासाचे एक लक्षण मानले जाते. तथापि, आपण जेव्हा सेवाक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नामधील हिस्सा व एकूण रोजंदारीतील बदलांचा अभ्यास करतो तेव्हा लक्षात येते की, ग्रामीण तरुणांना कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यांना सेवाक्षेत्रात सामावून घेण्यास अजूनही मोठा वाव आहे. याशिवाय सेवाक्षेत्राचा विस्तार हा केवळ परकिय देशांची मागणी पूर्ण करण्यापुरती मर्यादित न ठेवता देशांतर्गत गरजांच्या पूर्ततेकडेही लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**संदर्भ सूची:**


१.CSO, *National Accounts Statistics*, 2012.

२. GOI, *Economic Survey of India*, 2012-13

३.GOI, *Planning Commission*, Eleventh Five Year Plan, 2007-12

४.NASSCOM, Annual Report, 2012-13

५.RBI, Annual Report, 2012

६.RBI, Mid-Year Economic Analysis, 2012-2013

# भारतातील किंमतवाढीचे चिकित्सक अध्ययन

आर.जी.टाले, खापरखेडा,
प्राचार्य, बॅरी. शेषराव वानखेडे, कला, वाणिज्य महाविद्यालय,
जिल्हा नागपूर.

भ्रमणध्वनीः ९४२३४०८१६९

देशाची आर्थिक स्थिती नाजुक आहे हे सांगण्यासाठी आकडेमोड करण्याची गरज नाही. सामान्य माणसाला महागाईमुळे जगणे कठीण झाले आहे. औद्योगिक क्षेत्रातील मंदीचा परिणाम रोजगार निर्मितीवर झाला आहे. औद्योगिक स्थितीत सुधारणा घडून आली नाही तर अनेक उद्योगात कामगार कपात करावी लागणे अपरिहार्य ठरणार आहे. औद्योगिक क्षेत्राचा विकास दर १.८ टक्क्यांच्या खाली गेल्यामुळे सरकारसह उद्योग जगतदेखील सुन्न झाले आहे. औद्योगिक उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होणे ही बाब देशाच्या भविष्यासाठी तसेच सामाजिक स्थैर्यासाठी घातक ठरू शकते. भारतीय मालाला विदेशातून मागणी कमी झाल्यामुळे निर्यातीतही घसरण झाली आहे. देशांतर्गत मागणीही कमी झाली आहे. ही स्थिती सुधारण्यासाठी ठोस पावले उचलली जाण्याची आवश्यकता आहे. मान्सुनची वाईट स्थिती एकुण परिस्थिती बिघडण्यास कारणीभूत ठरेल की काय असे वाटू लागले आहे. जुन ते सप्टेंबर या काळात पर्जन्यमान २०% कमी झाल्याने त्याचा परिणाम कृषी उत्पादनावर होणार आहे. त्यामुळे खाद्यपदार्थाच्या किंमतीत आणखी वाढ होणे संभवते. किंमती वाढल्यामुळे वस्तुंची खरेदी कमी प्रमाणात करण्याकडे ग्राहकांचा कल राहील. साखर आणि खाद्यतेलाचे दर वाढण्यास सध्याच सुरूवात झाली आहे. साखरेचे साठे साठेबाजांच्या हातात असल्यामुळे त्याच्या किंमती आपल्या मनाप्रमाणे वाढवणे त्यांना शक्य आहे. खाद्यतेलाच्या आयातीवरील करात वाढ करून सरकारने खाद्यतेलाचे भाव वाढण्यास एकप्रकारे हातभारच लावला आहे. भारतीय अर्थव्यवस्था घसरणीची कारणे बाह्य नसून अंतर्गतच आहेत. अनेक आर्थिक घोटाळे उघडकिस आल्यामुळे भारताची जगातील पत कमी झाली आहे. त्याचा परिणाम भारतात होणाऱ्या विदेशी गुंतवणुकीवर झाला आहे. लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सरकारने कर्मचाऱ्यांच्या वेतनात वृद्धी केल्याचे परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागत आहे. देशाच्या महसुलाचा तीन

चतुर्थांश हिस्सा नोकरदारांच्या पगारावर खर्च होत आहे आणि ही नोकरशाही सर्वांत जास्त भ्रष्ट आहे. या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी उत्पादकतेच्या आधारावर वेतन देणे हाच पर्याय असु शकतो.

### किंमत वाढीची प्रवृत्ती:

१)१९५१-५२ चा सामान्य मुल्य निर्देशांक ११८ होता. तो घटून १९९५-५६ मध्ये ९३ झाला. ५ वर्षामध्ये मूल्य निर्देशांक २२ टक्क्यांनी कमी झाला. अन्नधान्याच्या किंमतीत १४.२ + टक्क्यांनी निर्मित वस्तुंच्या किंमतीत १३.३ टक्के व औद्योगिक कच्चा मालाच्या किंमती २८.८ टक्के कमी झाल्यात. कृषी योजना सफल झाल्यात हे किंमत पातळी घटण्याचे मुख्य कारण आहे.

२)तुटीच्या अर्थप्रबंधनाची व्यवस्था करण्यात आली. योजनेचा खर्च अवाढव्य असल्यामुळे किंमतीवर अजिबाज नियंत्रण राहिले नाही व त्यामुळे दुसरी योजना पहिल्या योजनेसारखी यशस्वी झाली नाही. १९५५-५६ ते १९६०-६१ ह्या काळात किंमत पातळीत २०% वृद्धी झाली.

३)१९६१-६६ ह्या ५ वर्षात खाद्यान्नाच्या किंमतीत ४०% तर धान्याच्या किंमतीत ४५% व दाळीच्या किंमतीत ७०% वाढ झाली. औद्योगिक कच्चा माल व कारखानी वस्तू ह्यांच्या किंमतीत वाढ झाली पण ती अपेक्षेपेक्षा कमी होती.

४)१९६७-६८ ही दोन वर्ष अतिशय तीव्र स्फीतीची होती. ह्या दोन वर्षात थोक किंमतीच्या निर्देशांकात अनुक्रमे १४% व १२% वाढ झाली. ह्या काळात भारत प्रचंड किंमत वाढीच्या ज्वालामुखीवर उभा होता.

५)१९७३-७४ किंमत पातळीत ४७ अंकांची वृद्धी झाली. १९७४-७५ मध्ये किंमतीत भयंकर वृद्धी झाली.

१९९० नंतरच्या काळात किंमत पातळीत जी वाढ झाली ती भयंकर होती. आश्चर्य म्हणजे, ह्या भाववाढीला सरकारच जबाबदार आहे. सरकारने प्रशासित किंमतीमध्ये व अप्रत्यक्ष किंमतीमध्ये वाढ केली. त्याचबरोबर अन्नधान्याच्या किंमतीत व पेट्रोलियमच्या किंमती ह्यात झालेली प्रचंड वाढ हीच प्रामुख्याने वाढत्या स्फितीची कारणे होती. १९९०-९१ व १९९१-९२ ह्या वर्षामध्ये किंमती वाढल्यात व स्फीतीचा सरासरी वार्षिक दर अनुक्रमे १०.३ व १३.७% राहिला.

### किंमत वाढीची कारणे:

१)चलन पुरवठ्यात सतत तीव्र स्वरूपाची वाढ.
२)कृषी व औद्योगिक क्षेत्रात उत्पादनाची असमाधानकारक स्थिती.

३)पेट्रोलियम इतर मुळ वस्तू, खाद्य व खाते ह्यांच्या आयात किंमतीत झालेल्या वाढीचा प्रभाव.
४)उत्पादक व उपभोक्ते ह्यांच्या किंमत वाढीच्या अपेक्षा.

५)लोकसंख्येचा वाढता दबावः १९५१ मध्ये ३६.१ कोटी असलेली लोकसंख्या सतत वेगाने वाढत जाऊन ३१ मार्च २०११ ला १२१ कोटी होती.

६)सतत वाढत जाणारा सरकार खर्चः १९५०-५१ मध्ये केंद्रसरकार व राज्यसरकार ह्यांचा एकुण खर्च ७४० कोटी रूपये होता तो सतत वाढत जाऊन १९९९-२००० मध्ये ५,६९,४०० कोटी रू. झाला. केवळ विकासावरील खर्च वाढला असे नसुन विकासेत्तर खर्चही बराच वाढला. सध्या

किंमतीत सतत होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील वाढीचे प्रमुख कारण सतत वाढत असलेला सरकारी व्यय होय.

७)तूटीचे अर्थप्रबंधन व मुद्रा पुरवठ्यात वाढः चौथ्या योजनेपासून व नंतरच्या काळात तूटीचे अर्थप्रबंधन वेगाने वाढू लागले.

८)काळ्या पैशाचा प्रभाव व भ्रष्टाचारः सरकारी अनुमानानुसार १९८३-८४ मध्ये काळा पैसा ३७,००० कोटी रु. होता. १९९९-२००० मध्ये ६०,००० कोटी रु. काळ्या पैशाचे अनुमान होते. काळ्या पैशाचे अस्तित्व व त्याचा कुप्रभाव ह्यामुळे स्फितीकारी प्रवत्ती सतत वाढत आहे.

९)खनिज तेलांच्या किंमतीत वाढः सप्टेंबर १९७३ नंतर पेट्रोलियम उत्पादनाच्या विक्रीत तीव्र स्वरूपाची वाढ व्हावयास लागल्यामुळे स्फीतीचा वेग वाढला. खाडी युद्धामुळे १९९०-९१ ह्या वर्षी एका तडाख्यात पेट्रोलियम उत्पादनांच्या किंमतीत जी भरमसाठ वाढ झाली ती सामान्य किंमत वृद्धीचे मुख्य कारण ठरली.

१०)प्रशासित किंमतीत वाढः सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगही आपली उत्पादने व सेवा ह्यांच्या किंमती सतत वाढवित होते. ह्यात इतर उद्योगांना पुरविण्यात येणारा कच्चा मालही समाविष्ट होता.

**निष्कर्ष व उपायः**

किंमत वाढीची प्रवृत्ती १९५१-५२ चा सामान्य मुल्य निर्देशांक ११८ होता. तो घटून १९५५-५६ मध्ये ९३ झाला. ५ वर्षामध्ये मूल्य निर्देशांक २२ टक्क्यांनी कमी झाला. अन्नधान्याच्या किंमतीत १४.३+ टक्क्यांनी निर्मित वस्तुंच्या किंमतीत १३.३% व औद्योगिक कच्चा मालाच्या किंमती २८.८% ह्यांनी कमी झाल्यात. कृषी योजना सफल झाल्यात हे किंमत पातळी घटण्याचे मुख्य कारण आहे. तुटीच्या अर्थप्रबंधनाची व्यवस्था करण्यात आली. योजनेचा खर्च अवाढव्य असल्यामुळे किंमतीवर अजिबात नियंत्रण राहिले नाही व त्यामुळे दुसरी योजना पहिल्या योजनेसारखी यशस्वी झाली नाही. १९५५-५६ ते १९६०-६१ ह्या काळात किंमत पातळीत २०% वृद्धी झाली. १९६१-६६ ह्या ५ वर्षात खाद्यान्नाच्या किंमतीत ४०% तर धान्याच्या किंमतीत ४५% व दाळीच्या किंमतीत ७०% वाढ झाली. औद्योगिक कच्चा माल व कारखानी वस्तू ह्यांच्या किंमतीत वाढ झाली पण ती अपेक्षेपेक्षा कमी होती. १९६७-६८ ही दोन वर्षे अतिशय तीव्र स्फीतीची होती. ह्या दोन वर्षात थोक किंमतीच्या निर्देशांकात अनुक्रमे १४% व १२% वाढ झाली ह्या काळात भारत प्रचंड किंमत वाढीच्या ज्वालामुखीवर उभा होता. १९७३-७४ किंमत पातळीत ४७ अंकांची वृद्धी झाली. १९७४-७५ मध्ये किंमतीत भयंकर वृद्धी झाली.

किंमत वाढीची कारणे चलन पुरवठ्यात सतत तीव्र स्वरूपाची वाढ, कृषी व औद्योगिक क्षेत्रात उत्पादनाची असमाधानकारक स्थिती, पेट्रोलियम, इतर मुळ वस्तु, खाद्य व खाते ह्यांच्या आयात किंमतीत झालेल्या वाढीचा प्रभाव, उत्पादक व उपभोक्ते ह्यांच्या किंमत वाढीच्या अपेक्षा, भविष्यकाळात आणखी किती वाढतील ह्या अपेक्षेने वर्तमान काळातच किंमती वाढू लागतात. लोकसंख्येचा वाढता दबाव सतत वाढत जाणारा सरकारी खर्च तुटीचे अर्थप्रबंधन व मुद्रा पुरवठ्यात तेलांच्या किंमतीत वाढ, प्रशासित किंमतीत वाढ, राजकोषीय धोरण, जानेवारी १९८४ मध्ये भारत सरकारने सार्वजनिक खर्च

कमी करण्याची घोषणा केली ह्याकरीता सरकारी क्षेत्रामध्ये नवीन भरती बंद करण्यात आली. व सरकारी क्षेत्रातील अनावश्यक खर्च कमी करण्यात आला. असे असले तरी सरकार अजुनही जनतेचा पैसा बेजबाबदारपणे उधळत आहेत. परिणामतः स्फीतीवर नियंत्रण येण्याऐवजी स्फीतीचे चक्र वेगाने फिरत आहे. मौद्रिक धोरणांची उपाय योजना करून व्यवहारातील चलनांची मात्रा कमी करण्याचे प्रयत्न सरकारने सुरू केलेत. व १९९५-९६ नंतर स्फीतीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. मुडीज या एजन्सीने २०१२-१३ या आर्थिक वर्षात विकासाचा दर कमी होऊन तो ५.५% इतका होईल इसे भाकीत केले आहे तर सिटी बँकेने हा दर ५.४% असेल असे म्हटले आहे.

+स्टॅंडर्ड आणि पुअर्स' या रेटिंग संस्थेने भारताची रेटिंग यापुर्वी कमी केली आहे. मार्च अखेर संपलेल्या चालु वर्षाच्या पहिल्या तिमाहीत विकासदर ५.३% इतका कमी झाला असून गेल्या नऊ वर्षातील हा निचांक आहे. २०११-१२ या आर्थिक वर्षात जी.डी.पी.तील वाढ ६.५% होती. यापुर्वीच्या आर्थिक वर्षात ती ८.४% होती. ही घट सुमारे २% इतकी आहे. आर्थिक सुधारणा आणि उदारीकरण या धोरणापासून माघार घेणे आता शक्य होणार नाही. आर्थिक निर्णय घेण्यास टाळाटाळ करणे राजकीय दृष्टिने सरकारला परवडणारे आहे. प्रशासनात शिस्त आणण्यासाठी आणि भ्रष्टाचार कमी करण्यासाठी लोकपालांची निर्मिती करण्याचे काम तातडीने हाती घ्यावे लागेल. आपला देश साधनांनी परिपूर्ण आहे. पण आर्थिक उदारीकरणामुळे भ्रष्टाचार करण्यास प्रोत्साहनच मिळाले आहे. एकीकडे लोकांवरील कराचा बोजा वाढतो आहे. आणि दुसरीकडे विकासाचे फायदे मुठभर लोकांना मिळत असुन बहुजन समाज त्या फायद्यापासून वंचित राहत आहे. आर्थिक शिस्त लागू केल्याशिवाय या स्थितीत सुधारणा होणे आणि भारताची गेलेली पत परत मिळविणे दुरापास्त झाले आहे. वाढती किंमत पातळी ही एक महत्वाची समस्या बनली आहे. भाववाढीला पायबंद घालण्यासाठी वित्तीय तुट शक्य तितकी कमी करणे व त्याचबरोबर प्रत्यय नियंत्रण ठेवणे म्हणजे मुद्रापुरवठा काबुत ठेवणे आवश्यक आहे. ह्याचबरोबर औद्योगिक उत्पादनाचे पुनरूत्थान व विस्तार व्हावयास हवा. तसेच अन्नधान्य, दाळी, खाद्यतेल ह्यासारख्या जीवनाश्यक वस्तुंचा पुरवठा स्वस्त धान्य दुकानातून व्हावयास हवा. ही स्फीतीविरोधी धोरणे कशा प्रकारे अंमलात आणली जातात ह्यावर त्याची यशस्वीता अवलंबून असते.

**संदर्भ सूची:**

१)डॉ. श्रीधर देशपांडे आणि विनायक देशपांडे *भारतीय अर्थव्यवस्था संक्रमण आणि विकास.*

२)Nassom and RBI Report

३) *Economic survey* – 2011-12 Government of India, Oxford University Press.

४)Lokmat news paper, 29/8/2012

५)डॉ.जी.एन.झामरे (जुन २००४) *भारतीय अर्थशास्त्र* पिंपळापुरे अँन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

६)प्राचार्य ए.बी.साळवे, प्रा. सौ. आशा साळवे (१९८१), *अर्थशास्त्र तत्वे* श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर.

७)www. Planning commission of India. Com.

# विकास, जागतिकीकरण व शहरीकरणातील भारताचे स्थान

**विकास सुकाळे, नांदेड**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
पिपल्स कॉलेज.
भ्रमणध्वनी: ९४२३३४५१४५

**सागर कोंडेकर, लातूर**
स्वा.रा.ती.म.वि. उपकेंद्र, लातूर.
भ्रमणध्वनी: ९९२२३०४६७०

२१ वे शतक हे शहरीकरणाचे शतक म्हणून ओळखले जाईल असे अनेक अर्थतज्ञांचे मत आहे. संयूक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक घडामोर्डिशी संबंधीत विभागाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार वर्ष २०१० मध्ये एकूण जागतिक लोकसंख्येपैकी ५१.६% लोकसंख्या ही शहरी भागात राहत होती. वर्ष १९५० मध्ये याच शहरी लोकसंख्येचे प्रमाण २९.४% एवढे होते. मागील दशक सोडता त्या आधीच्या ५० वर्षामध्ये विकसित देशांमधील शहरीकरणाचा वेग प्रचंड राहिला तर तूलनेत विकसनशील व अविकसीत देशांमधील शहरीकरणाचा वेग फार कमी होता. मागील एका दशकामध्ये विकसित देशांच्या शहरीकरणाची गती मंदावली, कारण हे देश शहरीकरणाच्या अंतीम टप्प्यात आली आहेत तर विकसनशील देशांच्या शहरीकरणास वेग प्राप्त झाला आहे. विकसनशील देशांतील वाढत्या शहरीकरणाच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख कारण म्हणजे त्यांचा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील वाढता सहभाग होय.

मागील दशकामध्ये अमेरिका, यूरोपीयन यूनियन सारख्या विकसित देशांमध्ये मंदी आली असतानाच भारत, चीन, ब्राझील सारख्या विकसनशील देशांनी आपला आर्थिक वृद्धीदर सूस्थितीमध्ये राखण्यात यश मिळवीले, या अर्थव्यवस्थांनाच उदयोन्मूख अर्थव्यवस्था म्हणून ओळखले जाऊ लागले. यामध्येच BRICS चा उल्लेख करता येईल. या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांपैकी भारत हा एक प्रमुख देश आहे.

**शहरीकरणाचा अर्थ व पार्श्वभूमी:**

शहरीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये ग्रामीण

वसाहतीचे शहरी / नागरी वसाहतीमध्ये रुपांतर होते, किंवा ग्रामीण वसाहतींकडून शहरांकडे / नगरांकडे लोकांच्या होणाऱ्या स्थलांतरामधून शहरीकरणाची निर्मिती होते. शहर आणि नगर हे मुळात वेगवेगळे शब्द / संकल्पना आहेत. ‘नगर’ हा एखाद्या गावापेक्षा आकाराने मोठा परंतु शहरांपेक्षा छोटा भाग असतो की ज्याची लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त असते. तर शहर हे मोठे नगर असतात की ज्याची लोकसंख्या २०,००० पेक्षा जास्त असते. परंतु शहर व नगर हे दोन्ही शब्द समान अर्थाने वापरले जातात. इंग्रजी मधील Urban या शब्दामध्ये शहर (City) व नगर (Town) या दोहोंचा समावेश होतो.

शहरीकरणाची प्रक्रीया तशी फार जुनी आहे. जगामध्ये ज्या प्रमुख चार सभ्यता झाल्या (इजिप्तीयन, मेसोपोटॅमियन, सिंधू व चीन) त्यांच्यामध्ये सुद्धा तत्कालीन शहरीकरणाचे अवशेष दिसून येतात. भारतासंदर्भात सांगायचे झाले तर जून्या काळी अनेक राजे-महाराजांनी राजगृही अयोध्या, काशी, वैशाली, उज्जैन सारख्या शहरांची निर्मिती केली होती. मुघलांच्या काळास तर शहरीकरणाचे सुवर्णयूग सुद्धा म्हटले गेले आहे. मुघलांच्या काळातील दिल्ली, आग्रा, लखनौ, सूरत, अहमदाबाद येथे आजसुद्धा त्याचे अवशेष दिसतात. ब्रिटीश प्रशासनाच्या काळातसुद्धा भारतात अनेक नवीन शहरे उदयास आले. उदा. मुंबई, मद्रास, कलकत्ता या शहरांची निर्मिती बंदरांमुळे करण्यात आली. तसेच महाबळेश्वर सारखे नगर पर्यटनासाठी निर्माण करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषेनुसार प्रांतरचना करण्यात आली. राज्यांची व केंद्रशासीत प्रदेशांची निर्मिती करण्यात आली. प्रत्येक राज्यामधील राजधानी, जिल्हे, तालुके यांची निर्मिती करण्यात आली. त्या प्रत्येकाच्या निर्मितीचे मापदंड ठरविण्यात आले. त्यांना नियंत्रीत करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेची निर्मिती करण्यात आली.

शहरीकरण ही संकल्पना संख्यात्मक वाटत असली तरीसुद्धा तिचा पाया गुणात्मक आहे. शहरीकरण म्हणजे केवळ ग्रामीण भागांमधून शहरी भागात मोठ्या प्रमाणात होणारे स्थलांतर नसून किंवा केवळ शहरी भागांचा आकार वाढत जाणे हा नसून, शहरी भागातील पायाभूत सुविधा पुरेशा प्रमाणात पुरविणे, आधारभूत संरचनेत वाढ होणे, शैक्षणिक, आरोग्यविषयक सुविधांची उपलब्धता असणे, शहरी भागातील रोजगारामध्ये वाढ होणे, स्वच्छ वातावरण राखले जाणे इ. व अनेक गोष्टींमधील वाढीचा शहरीकरणामध्ये समावेश होतो. नेल्स अँडरसनच्या मते, ‘‘एखादी व्यक्ती ग्रामीण भागात राहत असूनसुद्धा तो त्याच्या विचारामध्ये आणि वर्तनामध्ये फार शहरी असू शकतो. त्याचवेळी एखाद्या मोठ्या शहरात वास्तव्य करणारी एखादी व्यक्ती त्याच्या विचार व वर्तनामध्ये अशहरी असू शकतो.''

### विकास, जागतिकीकरण व शहरीकरणात भारताचे स्थान :

२००८ या वर्षी अमेरिकेमधील घसरण असेल किंवा त्यानंतर युरोपीय देशांमध्ये आलेली मंदी असेल, या सर्वांमूळे जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेवरती पून्हा टिकेची झोड उठवली आहे. याच काळात भारतासारख्या विकसनशील देशाचा वृद्धीदर हा तूलनेत फार चांगल्या स्थितीमध्ये राहिला. एक असाही काळ होता की जेंव्हा भारतीय वृद्धीदरास टिकात्मक दृष्टीकोणातून ‘हिंदू वृद्धीदर'

असे संबोधले जायचे. परंतू १९९०-९१ मध्ये तत्कालीन केंद्रीय वित्तमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण या प्रारुपाचा स्वीकार केल्यानंतर भारतीय वृद्धीदरामध्ये सातत्याने वाढ होऊ लागली आहे.

१९९०-९१ नंतरच्या सर्व पंचवार्षिक योजनांच्या काळातील वृद्धीदर हा ५% पेक्षा जास्तच राहिला आहे. तो अनुक्रमे आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९९२-९७) ६.६८%, नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (१९९७-२००२) ५.३५%, दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (२००२-०७) ७.८% तर अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये (२००७-१२) ७.९% एवढा राहिला. बाराव्या पंचवार्षिक योजनेदरम्यान (२०१२-१७) ९% वृद्धीदराचे लक्ष्य ठेवण्यात आलेले आहे. हे लक्ष्य पूर्ण करत असतानाच बाराव्या पंचवार्षिक योजनेचे प्रमूख उद्दिष्ट ÷गतिशील, शाश्वत सर्वसमावेशक विकास' हे आहे. या वाढत्या वृद्धीदरामध्ये भारतामधील सेवा क्षेत्रांचा सहभाग सर्वाधीक आहे.

पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे २०११-१२ मध्ये निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सेवा क्षेत्राचा सहभाग ६६.८% होता. त्याखालोखाल औद्योगिक क्षेत्राचा वाटा १९.२% होता तर कृषी व कृषी संबंधीत क्षेत्राचा वाटा केवळ १४.०% एवढाच होता. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या सर्वच वर्षांमध्ये सेवाक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा जास्त आहे तर कृषी क्षेत्राचा वाटा कमी आहे. भारत हा एक कृषीप्रधान देश आहे की जेथे पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून ते आजतागायत कृषी क्षेत्राचा वृद्धीदर (काही मोजकेच वर्ष सोडले तर) २.३% पेक्षा जास्त नाही. तर १९९०-९१ मधील उ.खा.जा. (LPG) प्रारुपाच्या स्वीकारानंतर सेवा क्षेत्राचा वृद्धीदर ९.५% एवढा होता तर कृषीचा वृद्धीदर केवळ ३.३% एवढाच होता.

भारतीय अर्थव्यवस्थेसंदर्भातला एक विरोधाभास असा आहे की, भारतामधील एकूण लोकसंख्येपैकी बहुसंख्य लोक हे ग्रामीण भागात राहतात व ज्यांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे अशा लोकसंख्येचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा तुलनेत अत्यल्प आहे तर औद्योगिक व सेवा क्षेत्रांशी संबंधीत असणाऱ्या शहरी लोकसंख्येचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा तूलनेने जास्त आहे. भारताचा वृद्धीदर जरी वाढत असला तरीही भारतामधील दारीद्र्याचे प्रमाण, बेकारी, मानवविकास निर्देशांकामधील खालचा क्रमांक इ. अनेक बाबींमुळे भारताच्या विकास प्रक्रीयेत

**भारतामधील विविध क्षेत्रांचा निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा दर्शविणारा तक्ता**

| क्षेत्र | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-२०१२* |
|---|---|---|---|---|---|
| कृषी व कृषी संबंधित | १६.८ | १५.८ | १४.७ | १४.५ | १४.० |
| औद्योगिक | २०.६ | २०.१ | २०.२ | १९.९ | १९.२ |
| सेवा | ६२.५ | ६४.१ | ६५.१ | ६५.५ | ६६.८ |

स्रोत :- www.rbi.org.in/scripts/annualreportpublications

* Revised estimate.

अडथळे निर्माण होत आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (२०१०) आकडेवारीनुसार भारताचा निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नामध्ये १० वा क्रमांक लागतो. आर्थिक वृद्धीबरोबरच विकास या संकल्पनेला जागा देत १२ व्या पंचवार्षिक योजनेत (२०१२-१७) वाढत्या आर्थिक वृद्धीचे फायदे सर्वांपर्यंत पोहचावेत यासाठी गतिशील, शाश्वत सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

१९९०-९१ मधील उदारीकरणामुळे भारतीय बाजारपेठा परकीय उद्योजकांना खुल्या झाल्या, खाजगीकरणामुळे सार्वजनिक उद्योगांच्या संख्येत घट झाली आणि बाजाराभिमुख खाजगी उद्योगांची निर्मिती झाली. जागतिकीकरणामुळे सर्व जग भारताच्या जवळ आले. परकीय उद्योगांबरोबर झालेले एकत्रीकरण असेल किंवा परकीय उद्योगांची केलेली खरेदी असेल, त्यामुळे औद्योगिक क्षेत्राची भरभराट झाली. सिमेंट, स्टील, ॲल्युमिनीयम, औषधे आणि ऑटोमोबाईल्स क्षेत्रामध्येसुद्धा वाढ झाली.

१९९०-९१ मध्ये एकूण जागतिक निर्यात व आयातीमधील भारताचा वाटा अनुक्रमे ०.५% आणि ०.७% एवढाच होता. हाच वाटा वाढून २०१० मध्ये अनुक्रमे १.५% आणि २.२% एवढा झाला. १९९०-९१ मध्ये भारताची निर्यात केवळ १९ बिलीयन होती ती वाढून २०१०-११ मध्ये २५० बिलीयन झाली. याउलट १९९०-९१ मध्ये भारतामध्ये होणारी आयात २८ बिलीयन होती ती २०१०-११ मध्ये वाढून ३८१ बिलीयन एवढी झाली. १९९०-९१ मध्ये भारताच्या परकीय व्यापार विनीमयाचा राष्ट्रीय उत्पन्नामधील वाटा केवळ १४.६% एवढा होता. तोच वाटा २०००-०१ मध्ये २२.५% झाला आणि २०१०-११ मध्ये ३६.५% एवढा वाढला आहे. भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापारामधील सहभाग कमी दिसत असला तरीही तो मागील दोन दशकांमध्ये झपाट्याने वाढू लागला आहे. जागतिक पातळीवरती माहिती तंत्रज्ञान निर्यातीमध्ये भारताचा २ रा क्रमांक लागतो तसेच वाहतूक सेवा क्षेत्रात १२ वा क्रमांक लागतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेमधील भारताच्या वाढत्या सहभागाबरोबरच भारतामधील शहरीकरणही वेगाने वाढत आहे. भारतामधील औद्योगिक व सेवाक्षेत्र हे प्रामुख्याने शहरांच्या / नगरांच्या आजुबाजूसच निर्माण झालेले आहेत किंवा कांही गावाच्या परिसरात निर्माण झालेल्या उद्योगधंदे व कारखान्यांमुळे आजुबाजूच्या वसाहतींमधून स्थलांतरीत झालेल्या लोकांमुळे त्या गावाची शहरे / नगरे झाली. उदा.- जमशेदपूर, भिलाई, दुर्गापूर इ.

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. परंतू आता परिस्थिती हळूहळू बदलत आहे. १९५१ च्या जनगणनेनुसार ८२.७% भारतीय लोकसंख्या ग्रामीण भागात राहत होती. तीचे प्रमाण २०११ च्या जनगणनेनुसार ६८.८% एवढे कमी झाले आहे. याऊलट १९५१ च्या जनगणनेनुसार भारतामधील शहरी लोकसंख्येचे प्रमाण केवळ १७.३% एवढे होते. तेच शहरी लोकसंख्येचे प्रमाण २०११ च्या जनगणनेनुसार ३१.१% पर्यंत वाढले. तसेच १९५१ मध्ये भारतामधील नगरांची (Towns) ची संख्या केवळ २८४३ एवढीच होती. ती २०११ मध्ये ७९३५ एवढी झाली. मागील दोन दशकांमध्ये भारतामधील नगरांची संख्या झपाट्याने वाढत

आहे तसेच शहरीकरणास सुद्धा गती प्राप्त होत आहे. भारतांतर्गत राज्यामध्ये होणाऱ्या शहरीकरणामध्ये विषमता दिसते. २००१ च्या जनगणनेनुसार दिल्ली (९३.००%), चंदिगड (८९.७८%), गोवा (४९.७७%), तामिळनाडू (४८.८६%), महाराष्ट्र (४२.४०%), गुजरात (३७.३५%) यासारखे जास्त शहरीकरण झालेले केंद्रशासीत प्रदेश / राज्ये आहेत. त्याचवेळी हिमाचल प्रदेश (९.७८%), बिहार (१०.४७%), सिक्कीम (११.१०%), आसाम (१२.७२%), अरुणाचल प्रदेश (२०.४१%) यासारखे कमी शहरीकरण झालेली राज्येही आहेत. भारतामधील शहरीकरणाची गती इतर काही देशांच्या तुलनेत फार कमी दिसते. चीन (४५%), इंडोनेशिया (५४%), ब्राझील (८७%), मेक्सिको (८७%), ईराण (६८.९%) इ. देशांमधील शहरी लोकसंख्येपेक्षा भारतामधील (३१.१%) शहरी लोकसंख्या ही फार कमी आहे. असे असले तरीही मागील दोन दशकांपासून तिचे प्रमाण वाढत आहे.

भारत हा एकमेव असा देश आहे की, जो जगातील सर्वात जास्त लोकसंख्येसह लोकशाही टिकवून आहे (चीनमध्ये लोकशाही नाही). भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा कृषीक्षेत्र आहे. कदाचीत त्यामुळेच २००८ च्या मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर तितकासा परिणाम जाणवला नाही. घरगुती मागणी जास्त असणे, रिजर्व्ह बँकेचे अतिशय कडक पतधोरण, बचतीस प्राधान्य देणारे उपभोक्ते अशा अनेक जमेच्या बाजू यास कारणीभूत आहेत. जागतिक पातळीवर सांगायचे झाले तर, पाश्चिमात्य देशांचे आंतरराष्ट्रीय संघटनांमधील प्रभाव हळूहळू कमी होत आहे तर विकसनशील देशांचा प्रभाव वाढत आहे. भारत हा देश भिन्न आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये विकसनशील देशांचे प्रतिनिधित्व करतो. भारताचा जागतिकीकरण प्रक्रियेतील वाढता सहभाग, शहरीकरणात होत असलेली वाढ आणि स्थिर परंतु सुस्थितीत असणारा वृद्धीदर भारताची एक नवी ओळख निर्माण करेल अशी आशा वाटते.

**संदर्भसूची :**

1) Annapurna Shaw (2012), *Indian Cities*, Oxford University Press.
2) Darshini Mahadevia & Sandip Sarkar, (2012), *Oxford Handbook of Urban Inequalities*, Oxford University Press.
3) Jagdish Bhagwati (2008), *In Defense of Globalization*, Oxford University Press.
4) K.C. Sivaramkrishnan (2011), *Re-Visioning Indian Cities*, Sage Publication.
5) K.C. Sivaramkrishnan, Amitabh Kundu & B.N. Singh (2011), *Oxford Handbook of Urbanization in India*, Oxford University Press.
6) Planning Commission, Government of India (2009), *A Hundred Small Steps-Report of the Committee on Financial Sector Reforms.*
7) S. Mahendra Dev (2013), *India Development Report*, Oxford University Press.

Weblography :

1) www.censusindia.gov.in
2) www.hdrstat.undp.org
3) www.india.gov.in
4) www.planningcommission.gov.in
5) www.un.org.in
6) www.urbanindia.nic.in

# जागतिकीकरण आणि भारतीय महिला : आर्थिक आव्हाने व संधी


**राजकुमार वाईंगडे, अर्जुननगर,**
अर्थशास्त्र विभाग,
देवचंद कॉलेज.
भ्रमणध्वनी : ९९२२२७३९६६

**विद्या रा. म्होपरे, कोल्हापूर,**
कनिष्ठ सहाय्यक,
शिवाजी विद्यापीठ.
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०


सन १९९१ मध्ये भारताने स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण म्हणजे अशी प्रक्रिया की ज्या प्रक्रियेमध्ये वस्तू व सेवा, भांडवल, तंत्रज्ञान आणि श्रम यांची देवाणघेवाण मुक्तपणे होण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रीकरण केले जाते. यासाठी वरील चारही बाबीच्या मुक्त संचारावरील निर्बंध व नियंत्रणे दूर केली जातात. याचाच अर्थ सरकारचा बाजार व्यवस्थेच्या कार्यातील हस्तक्षेप कमी केला जातो व बाजारातील इशाऱ्यानुसार वरील चारही बाबीची मुक्तपणे ने-आण केली जाते.

जागतिकीकरणामुळे शक्य होणारा मुक्त व्यापार हा आर्थिक विकासाचे दरवाजे खुले करणारा असल्याचे समजले जाते. मुक्त व्यापारामुळे, मग तो वस्तू व सेवांचा असो वा इतर बाबींचा त्यामध्ये विशेषीकरण शक्य असते. विशेषीकरणामुळे कामाची विभागणी करणे शक्य होते आणि त्यामुळे मर्यादित असणाऱ्या संसाधनाचा कार्यक्षम वापर करता येऊन उत्पादनाचे आणि कल्याणाचे महत्तमीकरण करता येते. थोडक्यात जागतिकीकरणास आर्थिक विकास व मानव कल्याणाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. भारताने १९९१ साली स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणाच्या माध्यमातून आजपर्यंत भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात खुली केलेली आहे. त्यामुळे तिचे जागतिक अर्थव्यवस्थेशी मोठ्या प्रमाणात संलग्नीकरण झालेले आहे. भारताने स्वीकारलेल्या जागतिकीकरणाच्या धोरणाची फलनिष्पत्ती म्हणून भारतीय अर्थव्यवस्था आज विकासाच्या वरच्या पथावर गेलेली दिसून येते. आज भारतीय उद्योग तुलनेने अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक झाल्याचे दिसून येते. भारत बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दृष्टीने एक आकर्षक व महत्त्वाचे गुंतवणूक ठिकाण म्हणून उदयास आलेला आहे. एकंदरीत संपूर्ण जगात दुसऱ्या क्रमांकाची वेगाने

विकास करणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताची अर्थव्यवस्था नावारूपाला आलेली आहे.

जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेच्या या सुधारलेल्या कामगिरीबरोबरच इतर गोष्टींवर जागतिकीकरणाचा झालेला परिणाम विचारात घेणे गरजेचे आहे. भारतीय महिला ज्या आजही परंपरेने बांधलेल्या आहेत आणि पूर्वीपासून दुय्यम दर्जाची वागणूक अनुभवत आहेत, त्यांच्यावर जागतिकीकरणाचा होणारा परिणाम विचारात घेणे गरजेचे आहे. जागतिकीकरणामुळे भारतीय महिलांची परिस्थिती सुधारणार आहे, का आणखी हलाखीची होणार आहे हे अभ्यासणे ही सध्याची गरज आहे. थोडक्यात, जागतिकीकरणाची जी प्रक्रिया आपण अमलात आणतो आहोत व ज्या प्रक्रियेमध्ये मागे जाणे आता शक्य नाही अशा परिस्थितीमध्ये भारतीय महिलांसाठी कोणत्या गोष्टी सामावलेल्या आहेत यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. त्या अनुषंगाने सदरच्या लेखामध्ये जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून भारतीय महिलांच्या दृष्टीने निर्माण होणारी आर्थिक आव्हाने / समस्या व संधी यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महिलांच्या संदर्भात जागतिकीकरण ही दोन बाजू असलेली प्रक्रिया समजली जाते. एका बाजूला जागतिकीकरणामुळे भारतीय तसेच विकसनशील देशांतील महिला, सामाजिक सुरक्षिततेचे कायदे, अंशदान रूपी संरक्षण, श्रमाचे हक्क व इतर सुरक्षा उपायापासून वंचित होताना दिसून येते. तर दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणामुळे भारतीय महिलांना चांगल्या शिक्षणाच्या संधी व जागतिक पातळीवर आपली छाप उतरविण्याचे मार्ग उपलब्ध झालेले आहेत. परंतु जागतिकीकरणाचे चांगले परिणाम वाढवून वाईट परिणामाची तीव्रता कमी करावयाची झाल्यास सर्वसमावेशक विकासावर आधारित महिलांनाही जागतिकीकरणामुळे गतिमान झालेल्या विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेणे, याचा बदलाचे एजंट म्हणून विचार करणे व विकासाचे काम त्यांच्यापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

भूतकाळाचा विचार केल्यास भारतीय महिला ह्या विविध प्रकारच्या समस्यांनी ग्रासलेले जीवन कंठत असल्याचे सर्वज्ञात आहे. पितृसत्ताक कुटुंबसंस्था व सामाजिक बंधने, जात आधारित भेदाचे धोरण, उत्पादक संसाधनाची अपुरी उपलब्धता, दारिद्र्य, प्रगतीसाठीच्या अपुऱ्या सवलती, आणि ताकदीचा अभाव यासारख्या समस्या या भारतीय महिलांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेले आहेत. जागतिकीकरणाच्या आगमनामुळे मात्र एक नवीन परिस्थिती निर्माण होऊ पाहते आहे. ज्या परिस्थितीमध्ये महिलांच्या दृष्टीने चांगल्या तसेच वाईट अशा बऱ्याच गोष्टी सामावलेल्या असणार आहेत यांचा उहापोह खालीलप्रमाणे करता येईल.

जागतिकीकरणामुळे महिलांसमोर निर्माण झालेली / होणारी आव्हाने

१. भारतीय महिलांची शेती, पशुपालन तसेच खादी आणि ग्रामीण उद्योगातील भूमिका ही अडचणीत येऊन कमी झालेली आहे. जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून यांत्रिकीकरण व स्वयंचलित प्रक्रियांकडेचा कल वाढत आहे व त्यामुळे महिलांच्या हातांना पूर्वी उपलब्ध असणारे काम कमी होत आहे.

२. खाजगीकरणाचे धोरण व

सार्वजनिक सेवांतील घट यामुळे महिलांसाठीच्या नियमित रोजगाराच्या संधीमध्ये घट होत आहे.

४. खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये व्यवसायाच्या ठिकाणी लिंग आधारित विभाजन वाढीस लागून महिलांसाठी कामाच्या ठिकाणची परिस्थिती आणखी बिकट होणार आहे. तसेच अल्प वेतनाच्या व हलक्या दर्जाच्या रोजगार संधी त्यांच्या वाट्याला येत आहेत.

५. बालसंगोपन आणि सामाजिक सुरक्षेच्या क्षेत्रातील सरकारच्या घटत्या सहभागामुळे रोजगार व कौटुंबिक जबाबदारी अशी दुहेरी जबाबदारी महिलांना उचलावी लागत आहे.

६. पुरुषांच्या ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडच्या वाढत्या स्थलांतरामुळे महिलांना कौटुंबिक कामे, शेतीतील कामे व ग्रामीण भागातील रोजगार अशी तिहेरी जबाबदारी पेलावी लागत आहे.

७. बदललेल्या परिस्थितीमध्ये हंगामी काम, असामाजिक कामाचे त्रास, सहकारी कामाच्या पद्धती, परिणाम आधारित वेतनाची पद्धती, इ. सारख्या बाबींमुळे महिलांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडणे कठीण होत आहे.

८. जागतिकीकरणाच्या वातावरणामध्ये सामाजिक व वित्तीय सुरक्षा साधने नाहीशी होत आहेत व त्यामुळे दारिद्र्य उच्चाटन कार्यक्रम, शिक्षणाचे सार्वत्रीकरण व महिलांना उपयोगी आरोग्य कार्यक्रमावर विपरित परिणाम होत आहे.

९. व्यापार क्षेत्रातील उदारीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या अन्न प्रक्रिया उद्योग तसेच इतर महिलांमार्फत चालवले जाणारे उद्योगामध्ये प्रवेश करतील व परिणामतः तुलनेने अकुशल महिला कामगाराची मागणी कमी होईल.

१०. शिक्षण व प्रशिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षणाचा खर्च वाढणार आहे. याचा परिणाम कौटुंबिक बजेटवर पडून मुलीच्या शिक्षणाचा बळी मुलाच्या शिक्षणासाठी दिला जाण्याची शक्यता आहे.

११. आर्थिक कारणामुळे होणारे महिलांचे स्थलांतर हे महिलांचे शोषण तसेच व्यापार यासारख्या सामाजिकदृष्ट्या अनिष्ट गोष्टींना खतपाणी घालणार आहे.

थोडक्यात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये महिलांचे मोठ्या प्रमाणात सिमांतीकरण होण्याची शक्यता आहे. कारण या प्रक्रियेत शिक्षण व प्रशिक्षणाच्या अभावामुळे महिलांसाठी रोजगाराच्या संधी कमी होणे, वेतन कमी होणे, रोजगार हमी नष्ट होणे व आधुनिक उत्पादन प्रक्रियेतून महिला बाहेर फेकल्या जाणे यासारख्या गोष्टी पाहावयास मिळणार आहेत.

### जागतिकीकरणामुळे महिलांसाठी निर्माण झालेल्या संधी:

जागतिकीकरणामुळे जशी वेगवेगळी आव्हाने निर्माण होणार आहेत तसेच महिलांना विकासाच्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत व होणार आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत घडून येणारे काही बदल हे स्वागतार्ह आहेत कारण त्या बदलामुळे महिला या विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहेत. जागतिकीकरणामुळे महिलांच्या दृष्टीने निर्माण होणाऱ्या संधीचा परामर्श खालीलप्रमाणे घेता येईल.

१. महिला आर्थिक व सामाजिकदृष्ट्या

स्वीकारू शकतील अशा उच्च व दर्जेदार शिक्षणाच्या संधी जागतिकीकरणामुळे उपलब्ध होणार आहेत.

२. पात्र महिला उमेदवारासाठी तांत्रिक तसेच इतर आधुनिक क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. ज्या महिलांना जागतिक ओळख मिळवून देतील.

३. जागतिकीकरणामुळे बदललेल्या परिस्थितीत व प्रामुख्याने शहरी भागात महिलांना मिळणारी वागणूक ही मोठ्या प्रमाणात समानतेची आहे.

४. जागतिकीकरणामुळे मिळणारा आंतरराष्ट्रीय अनुभव हा महिलांच्या आर्थिक सामाजिक व राजकीय जीवनात मोठा बदल घडवून आणणारा आहे.

५. लिंग आधारित विषमता / असमानता कमी झाल्यामुळे सामाजिक आर्थिक दृष्टीने महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होणार आहे.

६. शिक्षणामुळे महिलांच्या कुटुंबातील भूमिकेसंदर्भात होणारा दृष्टिकोनात्मक बदल, कुटुंब नियोजनाचे फायदे व आरोग्य सुविधांचे फायदे, संगोपन व चांगल्या रोजगाराच्या संधी इ. मुळे आत्मविश्वास व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम महिला निर्माण होण्यास मदत होणार आहे.

७. आर्थिक व सांस्कृतिक स्थलांतरासंदर्भातील धनात्मक दृष्टिकोन महिलांना आंतरराष्ट्रीय प्रगतीच्या संधी प्राप्त करून देण्यास पोषक ठरेल.

थोडक्यात जागतिकीकरणाची प्रक्रिया महिलांच्या दृष्टीने अनुकूल करावयाची झाल्यास या प्रक्रियेतून महिलांसाठी पुरेशा प्रगतीच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत. तसेच या संधीचा उपयोग करून घेण्याच्या अनुषंगाने महिलांमध्ये क्षमता विकसित झाल्या पाहिजेत. निर्माण होणाऱ्या प्रगतीच्या संधी व महिलांमधील क्षमता यांचा मिलाफ होण्याच्या दृष्टीने कार्यक्षम व्यवस्था देशात विकसित केली पाहिजे. शेवटी काही कारणास्तव महिला जागतिकीकरणामुळे गतिमान झालेल्या विकासाच्या प्रक्रियेतून बाहेर फेकल्या गेल्यास त्यांच्यासाठी आवश्यक सामाजिक सुरक्षेचे जाळे विकसित करणे ही बाब अत्यावश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


1. Dasgupta, Kalpana (2003), *Globalisation and Indian Women : Problems, Possibiliies and Information Needs - An Overview,* IFLA Women's Issues, Public Libraries and Information Science Journals Section. July.
2. G.,Sandhya Rani (2010), *Globalisation and Women*, Asia Pacific Journal of social sciences, Special issue no.1. Dcember
3. Nazreen, Bacchus (2005), *The Effects of Globalisation of Women in Developing Nations* (http://digitalcommons.pace.edu/honorscollegetheses/2, Date : 13/08/2013
4. http://www.mainstreamweekly.net/article1351.html -Date : 15/8/2013.

# परकीय गुंतवणूकीचा भारतातील किरकोळ विक्री क्षेत्रावरील परिणाम

**भगवान लालचंद महाजन**, मुक्ताईनगर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९८९०३५८९८१.

आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा जलद गतीने विकास करण्यासाठी सरकाकडून प्रयत्न सुरु आहेत. यासाठी आंतर्राष्ट्रीय व्यापार व परकिय गुंतवणूकीच्या द्वारे उद्योग, शेती, व्यापार, सेवांमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार टप्याटप्याने सदस्य देशांनी परकीय गुंतवणूकीवरील निर्बंध कमी करावेत व भांडवलाचे सुलभ परिचलन व्हावे हा हेतु असल्याने भारतानेही यास सक्रिय प्रतिसाद दिला आहे.

गेल्या दोन दशकता विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळै देशातील उद्योगधंदे व व्यापारात वाढ होत आहे. भारत सरकारने लायसन्स् , परमिट व कोटा पध्दत बंद केली व त्याच बरोबर नव्या व्यापारी वर्गाने आपल्या व्यवसायात वाढ करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. लोकांचे वेतन, भत्ते व उत्पन्न वाढल्याने ग्राहक पुर्वी पेक्षा अधिक खर्च सुरु लागला. महागाईत वाढ झाली असली तरी उच्च मध्यम वर्गीय चैन ही गरजेची वस्तु मानुन सर्वच बाबतीत खर्च करण्यास उदारता दाखवित आहे. त्यातच स्पर्धात्मक वातावरण व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपली दुकाने अधिकाधिक आकर्षित करुन ग्राहकांसाठी चांगल्या दर्जाच्या वस्तू उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

**भारतातील थेट परकीय गुंतवणूक किरकोळ विक्री क्षेत्राची पार्श्वभूमी:**

(१) पी.व्ही.नरसिंहराव सरकाने मर्यादित प्रमाणावर किरकोळ क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूकीला परवानगी दिली व डेअरी फॉर्म मध्ये बहु राष्ट्रीय कंपनीने प्रवेश केला. (२)१९९७ मध्ये १००% मालकी असलेल्या रोख आणि फंडात (होलसेल) मध्ये थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. (३) मे २००२ मध्ये राष्ट्रीय आघाडी सरकारने किरकोळ क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीचा विचार

मांडला परंतु तो काही नकळत कारणांनी यशस्वी झाला नाही. (४) २०११ मध्ये सिंगल ब्रॅण्ड किरकोळ क्षेत्रात १००% परकीय गुंतवणूक करण्याचा प्रयत्न झाला. (५) २० सप्टेंबर २०१२ रोजी किरकोळ व्यापार क्षेत्रात १००% सिंगल ब्रॅण्ड (सुधारित मार्गदर्शनानुसार) व ५१% मल्टी ब्रॅण्डला किरकोळ व्यापार क्षेत्रात काही अटींवर परवानगी देण्यात आली. त्यास राज्यांनी लागू करावे किंवा काही हा निर्णय राज्यांनी घ्यावा असे केंद्र सरकारने स्पष्ट करावे यास काही राजकीय पक्षांनी विरोध केला. या निर्णया विरोधात देशात आंदोलने बंद पुकारण्यात आले.

### थेट परकीय गुंतवणूक:

जेव्हा विकसित देशातील बड्या व बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील व अविकसित देशातील कंपन्यांचे भांडवल खरेदी करुन व्यवस्थापनाचा ताबा मिळवतात किंवा नव्याने कंपनी सुरु करुन दीर्घकालीन गुंतवणूक करतात तिला थेट परकिय गुंतवणूक म्हणतात.

### किरकोळ विक्रीचा अर्थ:

२००४ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने किरकोळ विक्रीची व्याख्या केली. किरकोळ विक्री म्हणजे अंतिम उपभोगासाठी केलेली विक्री होय जी घाऊक विक्री किंवा प्रक्रियाच्या विरुध्द स्वरुपाची आहे.

### किरकोळ क्षेत्राची विभागणी:

(१)संघटीत किरकोळ व्यापार क्षेत्र :- ज्यात विक्रेत्यांना व्यापारासाठी परवाने दिले जातात त्यांची नोंदणी विक्रीकर, प्राप्तीवर खात्याकडे असते व विस्तीर्ण भागात पसरलेल्या सर्व प्रकारच्या वस्तुंची विक्री करणारी दुकाने यांचा यात समावेश केला जातो.

(२) असंघटीत किरकोळ व्यापार क्षेत्रः या क्षेत्रात कमी किंमतींच्या वस्तुंची विक्री केली जाते. पारंपरिक स्थानिक किराणा दुकाने, जनरल स्टोअर्स, पान विडी दुकाने, रस्त्यावरील विक्रेते इ. किरकोळ दुकानांचा यात समावेश होतो. भारतात संघटित किरकोळ व्यापार क्षेत्राचा ४% व असंघटित किरकोळ व्यापार क्षेत्राचा ९६% इतका वाटा आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या १४% वाटा किरकोळ व्यापार क्षेत्रातून मिळत असून रोजगार व त्यावरील अवलंबित्व असणारे जवळपास ४ कोटी आहेत. मल्टी ब्रॅण्ड किरकोळ व्यापार क्षेत्रात किमान १०० को रु. गुंतवणूक करणाऱ्या परकीय कंपनीला या क्षेत्रात परवानगी मिळू शकते ३०% गुंतवणूक ही पायाभूत सुधारणांसाठी केली जाईल. यात शितगृहे, शित वाहतुक व्यवस्था, अत्याधुनिक जलद वाहतूक व्यवस्था, इत्यादींचा समावेश करण्यात आलेला असेल. १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरात या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल. प्रत्येक दुकान किमान ५००० स्क्वेअर फूटाचे असेल. १२० कोटी लोकसंख्या असलेली भारतीय बाजारपेठ परकिय कंपन्यांसाठी महत्वाची ठरणार आहे. या गुंतवणुकीमुळे संघटित किरकोळ व्यापार क्षेत्रात ४० लाख रोजगार निर्माण होऊ शकतो. सध्या, संघटित किरकोळ व्यापार क्षेत्र हे एकूण क्षेत्राच्या ४ ते ५% आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे यात खुप वाढ होऊन २०% पर्यंत जाऊ शकते तरी सुध्दा ८०% वाटा ग्रामीण भागात असंघटीत क्षेत्राचा असेल.

### एफ.डी. आयचे सिंगल ब्रॅण्ड बाबतचे सुधारित धोरण १००% परकिय गुंतवणूक:

सिंगल ब्रॅण्ड मध्ये परकिय गुंतवणूक करण्याचा सरकारचा हेतू उत्पादन व बाजार क्षेत्रात

गुंतवणूक आकर्षित करुन ग्राहकांपर्यंत आवश्यक असलेल्या वस्तू उपलब्ध करुन देणे व जागतिक डिझाईन प्रवेशाच्या माध्यमातून भारतातील विक्रेत्यांची स्पर्धाशक्ती वाढविणे आहे.

सिंगल ब्रॅण्ड उत्पादन व व्यापारासाठी खालील अटी असतील :

१. उत्पादनाची विक्री सिंगल ब्रॅण्ड असलेली केली जाईल.

२. उत्पादनाची विक्री भारताशिवाय आंतर्राष्ट्रीय बाजारात सिंगल ब्रॅण्डच्या सहाय्याने केली जाईल.

३. उत्पादन प्रक्रियेच्या समयी सिंगल ब्रॅण्ड मान्य केले असेल त्या ब्रॅण्डनेच उत्पादनाची विक्री केली जाईल.

४. सिंगल ब्रॅण्ड असलेल्या वस्तुंचे उत्पादन करावयाचे झाल्यास परकिय गुंतवणूकदारांनी Department of Industrial Policy and Promotion मधील Secretariat for Industrial Assistance ची परवानगी घेणे आवश्यक आहे.

### मल्टीब्रॅण्ड किरकोळ परकिय गुंतवणूक:

मल्टीब्रॅण्ड किरकोळ मध्ये सरकारने ५१% थेट परकिय गुंतवणूकीला परवानगी दिली परकिय गुंतवणूकीचा समावेश असलेला किरकोळ स्टोअर्स खालील अटींसह एका छताखाली मल्टी ब्रॅण्ड द्वारा वस्तू विकू शकतो.

१. ताजा शेतमाल यात फळे, पालेभाज्या, फुले, धान्य, डाळी, ताजी अंडी, मासे, मांस उत्पादने हे ब्रॅण्ड नसलेली असतील.

२. किमान १०० को.रु. गुंतवणूक करणाऱ्या कंपनीला या क्षेत्रात परवानगी मिळू शकते.

३. थेट परकिय गुंतवणूकीच्या ३०% भाग पायाभूत सुधारणेसाठी खर्च केला जाईल.

४. उत्पादनाच्या ३०% किंमतीचा कच्चामाल व उत्पादन प्रक्रियेसाठी लागणारे साहित्य भारतातील लघु उद्योगातुन खरेदी करावे, ज्यांची मालमत्ता १० लाखांच्या आत आहे.

५. लघु उद्योगांचे हे मुल्य स्थापनेच्या वेळचे असेल या मालमत्तेची मर्यादा उद्योगांनी ओलाडली तर त्यावेळेस ते लघुउद्योग असणार नाहीत.

६. गुंतवणूकदारांनी आपले जमाखर्चाचे हिशेब वैधानिक मान्यता असलेल्या ऑडीटर कडून तपासुन घ्यावेत. किरकोळ क्षेत्रात थेट परकिय

### गुंतवणूकीसाठी कार्यपध्दती :

गुंतवणूकदारांना गुंतवणुकीसंबंधीचा प्रस्ताव Department of Industrial Policy and Promotion कडे द्यावा लागतो. नियमानुसार हे प्रस्ताव असतील तर Foreign Investment Promotion Board यास अंतीम मान्यता देते.

### गुंतवणूकीला अनुकूल राज्ये:

१) महाराष्ट्र २) हरियाणा ३) आंध्र प्रदेश ४)राजस्थान ५) जम्मू काश्मीर ६) उत्तराखंड ७) मणीपुर ८) आसाम ९) दिल्ली.

उत्तराखंड, मणीपुर, आसाम मध्ये १० लाख लोकसंख्या असलेली राजधानी शिवाय इतर शहरे नाहीत.

### गुंतवणूकीला प्रतिकूल राज्ये:

१) गुजरात २) उत्तर प्रदेश ३) प. बंगाल ४)बिहार ५) तामिळनाडू ६) केरळ ७)छत्तीसगढ ८) ओरिसा

खालील मोठ्या कंपन्या या क्षेत्रात प्रवेश करु शकतात:

१. वॉल मार्ट स्टोअर्स इन्क २.कॅरफोर एस् ए
३. टेस्को पी.एल.सी ४.मेट्रो ए.जी, ५.इके

भारतीय किरकोळ क्षेत्रातील थेट परकिय गुंतवणूकीचे विश्लेषण:

१. आर्थिक विकासाला चालना.

२. जगातील सर्वाधिक दुकानांच दाटी निर्माण होईल न लहान दुकानांना बाहेर पडण्याची भिती राहणार नाही.

३. किरकोळ व होलसेल व्यापारात भारताचा वृध्दी दर जास्त राहील.

दोष:

१. किरकोळ क्षेत्रात अल्प भांडवल गुंतवणूक.

२. शिक्षीत व प्रशिक्षित कामगारांची कमतरता.

३. स्पर्धेचा अभाव.

४. पायाभूत सुविधांचा अभाव.

५. शितगृहांच्या कमतरेमुळे वस्तु खराब होतील.

संधी:

१. भविष्यात मोठी रोजगार निर्मितीची अपेक्षा.

२. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

३. परकिय गुंतवणूकीचा ओघ वाढेल.

४. वस्तुंच्या किंमतीत घट होईल व दर्जा सुधारेल

५. निर्यात क्षमतेत वाढ होईल.

धोके:

१. दीर्घ काळात किराणा व किरकोळ व्यावसायिकांना तोटा होईल.

२. परकिय गुंतवणुकदारांचे किरकोळ व्यापारक्षेत्रावर नियंत्रण असेल.

३. मल्टी ब्रॅण्ड थेट परकिय गुंतवणूकीमुळे उत्पादन क्षेत्रातील रोजगारात घट होईल.

४. भारतीयांकडून कामे केले जातील व नफा परदेशात जाईल.

निष्कर्ष:

गॅट व जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार भारतात किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक केली जात असली तरी त्यातून स्थानिक व्यावसायिकांची स्पर्धाशक्ती वाढेल व उत्पादनाचा दर्जा सुधारेल उपभोक्त्यांना सुध्दा स्पर्धात्मक किंमतीत वस्तू उपलब्ध होतील. थोडक्यात, सरकारच्या या धोरणामुळे सामाजिक आर्थिक विकासाला चालना मिळेल

संदर्भ सूची:

१. *आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र* - प्रा. एन.एल. चव्हाण

२. *व्यापारी मित्र* मासिक, मे २०११

३. *व्यापारी मित्र* मासिक, डिसेंबर २०१२

४. इंटरनेट.

# आजचे जागतिकीकरण... वित्तीय जागतिकीकरण

**बाजीराव ज्ञा. इंगवले, वैभववाडी,**
आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, जि. सिंधुदुर्ग.
भ्रमणध्वनी: ७५८८११३१४६.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने १९८० नंतर अडचणीत असलेल्या उदा. आग्नेय आशियातील मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, रशिया, चीन या देशांसाठी सुरू केलेल्या ÷रचना-जुळवणूक-सुविधा' या नवीन मदत योजना धोरणात बदल करण्याची अट घालून मदत देण्यास सुरुवात झाली. देशांतर्गत नियंत्रणे शिथिल करणे, परदेशी व्यापार व परकिय गुंतवणूक यावरील निर्बंध काढून टाकणे आणि सार्वजनिक खर्च कमी करणे या प्रमुख अटी अशा करारात असतात. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यवहारांवरील निर्बंध कमी करण्याचा प्रयत्न ÷गॅट' संघटनेमार्फत सुरू होता. शेवटी १९९४ मध्ये झालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या करारात आंतरराष्ट्रीय व्यवहारावरील निर्बंध कमी करण्याचे सर्व सदस्यराष्ट्रांनी मान्य केले. यातून राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध जास्त खुले झाले. याला ÷जागतिकीकरण' असे नाव दिले.

जागतिकीकरण याचा अर्थ राष्ट्रीय किंवा प्रादेशिक व्यवहाराऐवजी सर्व देशांमध्ये मुक्तपणे आर्थिक व्यवहार होणे, प्रदेश देशाने व्यापार, गुंतवणूक व कर्जव्यवहार यांच्या बाबतीत इतर देशांशी व्यवहार वाढविणे आणि त्यापासून मिळणारे लाभ न्याय्यपद्धतीने वाटून घेणे यातून जागतिक पातळीवर विशेषीकरण आणि उत्पादक साधनसामुग्रीमध्ये कार्यक्षमतेने वापर होऊन सर्व देशांची प्रगती होऊ शकते. उत्पादक साधनसामुग्रीमध्ये नैसर्गिक, मानवी व मानवनिर्मित साधनसामुग्रीच्या जोडीने उत्पादनतंत्राचा समावेश होतो. प्रत्येक देशाकडे एकूण जगातील साधनसामुग्रीचा साठा असतो. ज्या देशाकडे साधनसामुग्री मोठ्या प्रमाणावर असते तो देश संपन्न बनतो. पण इतर देशाशी सहकार्य केल्याने तो अधिक जास्त संपन्न बनू शकतो हे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्राने सिद्ध केले आहे. जी साधनसामुग्री एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतरीत होऊ शकत नाही ती वस्तू व सेवांमध्ये रूपांतरीत करून स्थलांतरीत होऊ शकते.

आंतरराष्ट्रीय व्यवहारात पुढील व्यवहारांचा समावेश होतो -

१. भौतिक स्वरूपात वस्तूंची देवघेव.

२. सेवांची देवघेव.

३. श्रम व भांडवल यांची देवघेव.

४. संयोजन कौशल्याची देवघेव.

५. तंत्रज्ञानाची देवघेव.

६. नैसर्गिक साधनसामुग्रीचा शोध व शक्य असेल तेथे तिच्या वापरातील सहकार्य.

उत्पादनसाधनसामुग्रीत काही नैसर्गिक साधनसामुग्री जेथे उपलब्ध असेल तेथेच तिचा वापर केला जाऊ शकतो. जमिनीत असणारी सुपिकता, हवामान, पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत यांच्याबाबतीत स्थलांतर शक्य नसते. खनिज संपत्ती नैसर्गिक स्वरूपात स्थलांतर करणे अवघड असते पण तिच्यावर प्रक्रिया करून स्थलांतरास योग्य वस्तूत रुपांतर करता येते. यासाठी देशात भांडवल व तंत्रज्ञान उपलब्ध नसेल तर ते दुसऱ्या देशातून आणून व्यवसाय वाढवून नैसर्गिक संपत्ती पूर्णपणे वापरता येते. ज्या नैसर्गिक साधनसामुग्रीचे स्थलांतर शक्य नसते तिचा वापर करून वस्तूचे उत्पादन करता येते आणि वस्तूंची निर्यात करता येते. यासाठी दुसऱ्या देशांच्या भांडवलाचा वापर होऊ शकतो. त्यासाठी येथे न्याय व्यवस्था असणे फायद्याचे ठरते.

आधुनिक काळात उत्पादनाबरोबर वित्तपुरवठा, विपणन, वाहतूक अशा सेवांचीही गरज भासते. आंतरराष्ट्रीय व्यापारात या सेवांची गरज जास्त भासते. एका देशातून दुसऱ्या देशामध्ये सेवा पुरविण्यामुळे उत्पादन वाढू शकते व वस्तू कमी खर्चात तयार होऊ शकतात. श्रमाच्या बाबतीत कुशल श्रमाचे स्थलांतर करणे सोपे असते. आधुनिक काळात अकुशल श्रम एका देशातून दुसऱ्या देशात नेण्यापेक्षा ज्या देशात श्रम भरपूर उपलब्ध आहे तेथे भांडवल व संयोजन नेऊन व्यवसाय उभारणे सोयीचे ठरते.

पूर्वी काही मोजक्याच देशांनी आंतरराष्ट्रीय व्यवहारांचा फायदा मिळविला आणि स्वतः समृद्ध होऊन इतर देशांना दरिद्री बनविले. त्यामुळे त्यांची बाजारपेठ मर्यादित बनली आणि विकसित देशातच संघर्ष निर्माण झाला. न्याय्य पद्धतीने आंतरराष्ट्रीय व्यवहार झाले असते तर सर्व देशांचा फायदा झाला असता. बाजारपेठेसाठी संघर्ष निर्माण झाला नसता. या अनुभवावरून बोध घेऊन सहकारावर आधारित जागतिकीकरण घडून येणे महत्वाचे आहे. अशा जागतिकीकरणात उत्पादक घटक व तंत्रज्ञान यांचा फायदा सर्व देशांना वाजवी मोबदल्यात मिळेल आणि सर्व देशांचा कमाल वेगाने विकास होऊन बाजारपेठ विस्तारल्याचा फायदा सर्व देशांना मिळेल.

सर्वंकष जागतिकीकरणात सर्व प्रकारचे आंतरराष्ट्रीय व्यवहार खुलेपणाने होणे आवश्यक आहे. जकात व व्यापार यासंबंधी सर्वसाधारण करार (गॅट) या संघटनेतर्फे अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. व्यापार मुक्तपणे होऊन त्याचे लाभ सर्वांना मिळावेत हा त्यातील हेतू होता. पण विकसित देशांनी संरक्षणाचे धोरण चालू ठेवल्याने न्यायव्यवस्था अस्तित्वात येऊ शकली नाही. सन १९८६ नंतर उरूग्वे देशात सुरू झालेल्या चर्चेच्या फेरीतून जागतिक व्यापार संघटनेचा करार झाला. यातून सर्वंकष जागतिकीकरणाकडे जाण्याचा मार्ग सुरू झाला. पण आजपर्यंत कराराची अंमलबजावणी समाधानकारकरित्या झालेली

नाही. पण सेवांचा व्यापार, गुंतवणूक, बौद्धिक संपदा अधिकार, कृषिक्षेत्रातील व्यापार याबाबतीत प्रगती होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सर्वात सोपी प्रक्रिया वित्तीय क्षेत्रात आहे. विकसित देशांना आपल्याजवळील भांडवलासाठी गुंतवणूकीचे मार्ग उपलब्ध नसल्याने त्यांचा हितसंबंध वित्तीय क्षेत्रातील जागतिकीकरणाला अनुकूल आहे. अल्पविकसीत व गरीब देशांना भांडवलाची गरज असल्याने ते देशही या उदारीकरणाला अनुकूल आहेत. याचा परिणाम म्हणून एका देशातील खाजगी व्यवसायिकांनी दुसऱ्या देशातून व्यापारी तत्वावर कर्ज घेणे, एका देशातील प्रमंडळांनी दुसऱ्या देशातील भांडवल बाजारातून भांडवल उभारणी करणे, एका देशातील वित्तसंस्थांनी दुसऱ्या देशातील भांडवल बाजारात व्यवहार करणे, एका देशातील बँकांनी त्या देशाचे चलन दुसऱ्या देशात नेऊन दुसऱ्या देशात कर्जव्यवहार करणे असे निरनिराळे मार्ग वापरले जात आहेत. यातूनच वित्तीय जागतिकीकरण झाले आहे. याची सुरूवात पूर्वीच्या काळापासून झाली आहे. पूर्वी खाजगी भांडवल गुंतवणूकीच्यामार्गाने येत असे. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत वित्तपुरवठ्याची व्यवस्था होत गेली. अधिकाधिक देश आर्थिक विकासासाठी वित्तपुरवठ्याची मागणी करू लागली तशी ही व्यवस्था अपुरी पडू लागली. त्याचबरोबर रशियाचे विघटन व तेथील धोरणात्मक बदल यामुळे अमेरिका व तिच्या प्रभावाखाली आंतरराष्ट्रीय संघटना यांना भांडवलासंबंधी व्यवहार बाजारपेठेच्या माध्यमातून होण्यासाठी आर्थिक सुधारणांच्या नावाखाली वित्तीय क्षेत्रातील सुधारणांचा कार्यक्रम भांडवलाची गरज असणाऱ्या देशावर लादणे शक्य झाले. विकसित देशातील भांडवलाला या मार्गाने जास्त दराने गुंतवणुकीला वाव मिळाला. विकसनशील देशांची भांडवलाची गरज यातून भागली त्यामुळे वित्तीय जागतिकीकरण मोठ्या प्रमाणावर झाले.

सेवांच्या व्यापारात जागतिकीकरणाने काही प्रमाणात प्रगती केली आहे. कृषि क्षेत्रातील व्यापारात जागतिकीकरणाची प्रक्रिया विकसित देशांच्या करारांची अंमलबजावणी न करण्याच्या वृत्तीमुळे अडली आहे. उदा. कापसाच्या बाबतीत अलिकडे जागतिक व्यापार संघटनेत विवाद निर्माण होऊन सुरुवातीला निकाल विकसित देशांच्या विरूद्ध लागला आहे तो पुढे कायम झाल्यास विकसनशील देश विवाद निवारण व्यवस्थेचा जास्त प्रमाणात वापर करून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील अडथळे दूर करतील.

सर्वंकष जागतिकीकरण घडून देण्याची प्रक्रिया नविन असल्याने पूर्वीपासून चलनात असलेल्या वित्तीय जागतिकरणाच्या मानाने इतर क्षेत्रातील जागतिकीकरण कमी प्रमाणात झाले आहे. त्यामुळे सध्या चालू असलेले जागतिकीकरण हे मुख्यत: वित्तीय जागतिकीकरण राहिलेले आहे.

**जागतिकीकरणाचे दोष:**

१. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गळेकापू स्पर्धेमुळे भारतीय उद्योगावर परिणाम होईल.

२. बहुराष्ट्रीय कंपन्यांमुळे समाजाची पिळवणूक होईल.

३. विकसित राष्ट्रांतील चंगळवादाचे आगमन भारतात होईल. त्यातून चैनीच्या वस्तूंची मागणी वाढेल.

४. परदेशातील प्रदूषण निर्माण करणाऱ्या उद्योगांचे

भारतात स्थानांतर होईल.

५. नैसर्गिक संपत्तीचा ऱ्हास होऊन त्याचे शेतीवरही अनिष्ट परिणाम होतील.

६. सांस्कृतिक विविधतेवर परिणाम होईल.

**जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सरकारच्या भूमिकेचे परिक्षण:**

१. जागतिकीकरण याचा अर्थ देशाची अर्थव्यवस्था इतर देशांच्या अर्थव्यवस्थेशी जोडली जाणे. यासाठी सरकारने इतर देशांच्या सरकारशी संवाद साधणे आवश्यक आहे. जोपर्यंत इतर देशांचा जागतिकीकरणाबाबत दृष्टीकोन पूर्णपणे माहित होत नाही तोपर्यंत जागतिकीकरणाचा विचार होऊ नये.

२. जागतिकीकरणातून देशाला कितपत फायदा होईल याचा अभ्यास करणे आणि कोणत्या परिस्थितीत जागतिकीकरण स्विकारायचे याबद्दलची भूमिका ठरविणे हे सरकारचे पहिले काम आहे.

३. जागतिकीकरणामुळे अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांना लाभ मिळतो तर काही क्षेत्रांची पिछेहाट होते. या प्रक्रियेत बदल सुरळीतपणे कसे होतील याची योजना सरकारने तयार केली पाहिजे.

४. जागतिकीकरणात खाजगी क्षेत्राची भूमिका महत्वाची असते. खाजगी क्षेत्रावरील बंधने व नियंत्रणे कमी करून त्यांना विदेशी भांडवल व तंत्रज्ञान मिळविण्यास स्वातंत्र्य दिले पाहिजे. याच वेळी सामाजिक दृष्टीकोन दुर्बल असलेल्या वर्गाला न्याय मिळेल याकडेही लक्ष दिले गेले पाहिजे.

५. प्रशासनाचा दर्जा सुधारणे महत्वाचे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विदेशी उद्योजक देशात व्यवसाय सुरू करतात तर देशातील उद्योजक परदेशात व्यवसाय सुरू करतात. विदेशी उद्योजकांना व्यवसाय सुरू करताना विलंब होणार नाही व संरक्षणात्मक सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रशासकिय प्रक्रिया सुलभ झाली पाहिजे.

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण म्हणजे भारताची बाजारपेठ, अमेरीकेची बाजारपेठ, इंग्लंडची बाजारपेठ, जपानची बाजारपेठ असा भेदभाव न ठेवता संपूर्ण जग ही एकच बाजारपेठ असून या जगात असणारे सर्व देश हे या जागतिक बाजारपेठेतील घटक आहेत असा भारतीय अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाचा अर्थ आहे. परंतु जागतिकीकरणाने जगातील ८५% लोकसंख्येचे जीवनमान सुधारावे हा प्रगत देशांचा प्रयत्न नाही तर औद्योगिक प्रगत देशातील १५% लोकसंख्येचे जीवनमान उंचावणे हा त्यांचा हेतू आहे. जागतिकीकरण सामान्यत: दुर्बलांना टाळून श्रीमंत राष्ट्रांच्या प्रगतीला मदत करते यावरून जागतिकीकरण कोणासाठी हा प्रश्न निर्माण होतो.

**संदर्भसूची:**

१. प्रा. भोसले, काटे : *÷÷भारतीय अर्थव्यवस्था"* फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. प्रा. के. एच्. ठक्कर : *÷÷भारतीय अर्थशास्त्र"* फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. प्रा. एन्. जी. कुलकर्णी : *÷÷अर्थशास्त्र"* बीना प्रकाशन, नाशिक.

४. *अर्थसंवाद* त्रैमासिक.

५. विविध सहकारी महाराष्ट्र अंक.

६. विविध स्पर्धा परीक्षा अंक.

# विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीमुळे आर्थिक सुधारणा

**धेडे डी.आर., वारणानगर,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर
भ्रमणध्वनी: ९९२२२४४२७३.

प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासामध्ये भांडवलाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. अमेरिका, इंग्लंड या देशांचा उल्लेख प्रगत राष्ट्रे म्हणून केला जातो. परंतु या देशांनी देखील पूर्वी अनेक देशांकडून कर्ज रुपाने भांडवल घेतले होते. भारत हा विकसनशील देश असल्यामुळे भारतात भांडवलाची कमतरता आहे. परंतू सन १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था खुली झाली. त्यामुळे विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीमध्ये वाढ होण्यास मदत झाली आहे. त्याचाच अनुकूल परिणाम म्हणून भारताच्या आर्थिक सुधारणामध्ये वाढ झालेली आहे याची वास्तवता सदरच्या शोध निबंधामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.सदरचा शोधनिबंध पूर्ण करत असताना ज्या आर्थिक सुधारणामधील वाढ अभ्यासण्यात आलेली आहे त्याचा कालावधी २००१ ते २०११ च्या दरम्यानचा आहे.

### भारतातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक:

सन १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था खुली झाली. त्यामुळे सन १९९१ नंतर भारतात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा प्रवाह मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. सन १९८५-९५ मध्ये ०.४५५ अब्ज डॉलर्स वरुन सन २००८-०९ मध्ये ३५.१५८ अब्ज डॉलर्स पर्यंत वाढ झालेली आहे. म्हणून भारताच्या आर्थिक विकासात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

### भारतात राज्यनिहाय होणारी परकिय प्रत्यक्ष गुंतवणूक:

भारतामध्ये थेट परकीय गुंतवणूक होत असली तरीही राज्यनिहाय त्याचे प्रमाण विषम आहे. त्यामुळे भारतातील सर्व राज्यांचा समतोल आर्थिक विकास झालेला नाही. काही राज्यांचा मोठ्या प्रमाणात आर्थिक विकास झाला तर काही राज्यांचा विकास झालेला नाही. पुढील तक्त्यात भारतातील सर्वाधिक विदेशी थेट गुंतवणूक आकर्षित करणाऱ्या प्रथम पाच राज्यांची सूची दाखविली आहे.

### प्रादेशिक कार्यालयनिहाय FDI चा प्रवाह

(कोटी रुपये)

| RBI-प्रादेशिक कार्यालय | अंतर्गत राज्य | २००८-०९FDI | % एकूण FDI |
|---|---|---|---|
| १. मुंबई | महाराष्ट्र, दादर, हवेली, दीव, दमण | १,७८,६७९.० | ३५% |
| २.नवी दिल्ली | दिल्ली, युपीचा काही भाग, हरियाणा | ६६,६५६.४ | १३% |
| ३. चेन्नई | तामिळनाडू, पाँडेचरी | ४३,२८५.९ | ८% |
| ४.बंगळूर | कर्नाटक | ४२,१४०.८ | ८% |
| ५. हैद्राबाद | आंध्रप्रदेश | ३७,०६९.९ | ७% |

Source: SIA News Letter (August 2008, Page No.3)

वरील तक्त्यात RBI च्या प्रादेशिक कार्यालयनिहाय प्रथम पाच कार्यालयांतील FDI चा प्रवाह दाखविला आहे. मुंबई या प्रादेशिक कार्यालयांतर्गत एकूण FDI च्या ३५% होते. भारतात सर्वाधिक FDI या कार्यालयांतर्गत राज्यांमध्ये होते ज्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. म्हणून भारतात महाराष्ट्र राज्य सर्वाधिक FDI आकर्षित करणारे राज्य आहे. सध्या मात्र हा प्रवाह गुजरातमध्ये वाढत आहे. मुंबई नंतर दिल्ली (१३%), चेन्नई (८%), बंगळूर (८%), हैद्राबाद (७%) RBI च्या कार्यालयाचा समावेश होतो. यावरुन असे दिसून येते की, भारतामध्ये समतोल प्रमाणात परकीय गुंतवणूकीचे वितरण न झाल्यामुळे प्रादेशिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

### भारतात गुंतवणूक करणारे देश:

भारताच्या उदार धोरणामुळे विदेशी गुंतवणूकीचे प्रमाण वाढत आहे. भारतामध्ये सन १९९१ ते २००७ या कालावधीत सर्वाधिक विदेशी गुंतवणूक मॉरिशस या देशाने १८,१४६.८१ मिलीयन डॉलर्स केली आहे. भारतातील एकूण प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या ४१.२४% वाटा आहे. त्यानंतर अमेरिका ५,८९३.९१ मिलीयन डॉलर्स (१२.८७%), यु.के. ३,८५७.२५ मिलीयन डॉलर्स (६.६८%), नेदरलँड २६३७.८६ मिलीयन डॉलर्स (५.९७%), जपान ४.८५%, जर्मनी ३.६८%, सिंगापूर ३.६७%, फ्रान्स १.९६%, दक्षिण कोरिया १.६६%, स्वित्झर्लॅन्ड १.५०% विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक भारतात केली आहे. त्यामुळे या दहा देशातून भारतात फार मोठ्या प्रमाणात विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक केली जात आहे.

### विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीमुळे भारतातील आर्थिक सुधारणात वाढ : एक वास्तव-

विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीमुळे भारतातील आर्थिक सुधारणांमध्ये वाढ झालेली आहे हे एक वास्तव आहे. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे-

१)भारतातील पक्क्या घरांमध्ये झालेली वाढ: भारतामध्ये सन १९९१ मध्ये एकूण घरांपैकी पक्क्या घरांचे शेकडा प्रमाण १०.८% होते. सन २००१ मध्ये हे प्रमाण १९.८% पर्यंत पोहचले तर सन २०११ मध्ये यात २९% पर्यंत वाढ झाली.

२)भारतातील घरांमधील वीजेच्या वापरात झालेली वाढः भारतात सन १९९१ मध्ये एकूण घरांपैकी ४२.४% घरांमध्ये वीजेचा वापर केला जात होता. परंतू सन २००१ मध्ये याचे प्रमाण ५५.९% पर्यंत पोहचले तर सन २०११ मध्ये यात ६७.३% पर्यंत वाढ झाली.

३)भारतातील एलपीजी/पीएनजीचा घरगुती इंधन वापरातील वाढः भारतातील एकूण घरांपैकी सन २००१ मध्ये १७.५% घरांमध्ये या प्रकारच्या इंधनाचा (गॅसचा) वापर होत होता. परंतु सन २०११ पर्यंत यामध्ये २८.५% पर्यंत वाढ झाली.

४)भारतामध्ये बँकींग सुविधांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबात झालेली वाढः सन २००१ मध्ये भारतातील ग्रामीण व शहरी भागातील एकूण कुटुंबापैकी अनुक्रमे ३०.११% व ४९.५२% कुटुंबे बॅकींग सुविधांचा लाभ घेत होते तर सन २०११ मध्ये बँकींग सुविधा घेणाऱ्या कुटुंबाचे ग्रामीण व शहरी शेकडा प्रमाण अनुक्रमे ५४.४४% व ६७.७७% पर्यंत पोहचले. थोडक्यात सन २००१ मध्ये बॅकींग सुविधा घेणाऱ्या ग्रामीण व शहरी भागातील एकूण कुटुंबापैकी ३५.५४% प्रमाण होते तर सन २०११ मध्ये हे प्रमाण ५८.७% पर्यंत पोहचले.

५)भारतातील घरांमधील टेलिफोन सुविधा वापरातील वाढः सन २००१ मध्ये भारतातील एकूण घरांपैकी ग्रामीण व शहरी भागात टेलिफोन सुविधा घेणाऱ्या घरांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ३.८% व २३% होते तर सन २०११ मध्ये या सुविधा घेणाऱ्या घरांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ५४.३% व ८२% पर्यंत वाढलेले आहे. थोडक्यात सन २००१ मध्ये ग्रामीण व शहरी भागातील एकूण घरांपैकी ९.१% घरात टेलिफोन सुविधा होत्या तर २०११ मध्ये ग्रामीण व शहरी भागातील एकूण घरांपैकी ६३.२% घरांमध्ये टेलिफोन सुविधा पोहचल्या आहेत.

निष्कर्षः

१)सन २००८-२००९ मध्ये भारतात विदेशी प्रत्यक्ष एकूण गुंतवणूक ३,६७,८३२ कोटी रुपयांची झाली.

२)सन २००१ ते २०११ या कालावधीमध्ये पक्क्या घरांच्या संख्येत ३.४ कोटीची वाढ झाली.

३)सन २००१ च्या तुलनेत सन २०११ मध्ये पक्क्या घरांच्या प्रमाणात ६८.२७% नी वाढ झालेली आहे.

४)सन २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये घरात वीजेचा वापर करणाऱ्यांची संख्या ६.०३ कोटींनी वाढली आहे.

५)सन २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये घरांमध्ये वीजेचा वापर करणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ८३.०६% नी वाढलेले आहे.

६)सन २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये घरांमध्ये इंधन म्हणून गॅसचा वापर करणाऱ्यांमध्ये ३.७१ कोटींची भर पडलेली आहे.

७)सन २००१ च्या तुलनेत सन २०११ मध्ये घरगुती गॅसचा इंधन म्हणून वापरणाऱ्यांचे शेकडा प्रमाण ६१.४०% नी वाढलेले आहे.

८)सन २००१ ते २०११ या कालावधीत बँकींग सुविधा घेणाऱ्या ७.७४ कोटी कुटुंबाची भर पडलेली आहे.

९)सन २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये ग्रामीण व शहरी भागात बॅकींग सुविधा घेणाऱ्या एकूण कुटुंबात ६०.४७% नी वाढ झालेली आहे.

संदर्भसूची:

१) *दैनिक लोकमत* (सोलापूर जिल्हा आवृत्ती),

दिनांक १७.९.२०१२, पृ. २
२) *अर्थसंवाद*, एप्रिल-जून २०१२, संपादक अविनाश निकम, खंड ३६, अंक-१, पृ. ७२
३) *Economic Survey of India*, 2010-11
४) Arvind Virmani, *Foreign Investment Reforms*, ICRIER, New Delhi
५) Chopra Chanchal (2003), *Foreign Direct Investment in India*, Deep & Deep Publication, New Delhi.

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा ×

*सारं जगच पैशामागं धावतय्..... अर्थव्यवस्थेचं यश -अपयश पैशाच्या मोजपट्टीनं मोजलं जातय्... अर्थव्यवस्थेच्या विकासदराचा आकडा कसा आहे? सिंगल आहे की डबल? हे कायमच महत्त्वाचं असतं. राष्ट्रीय उत्पन्न अन् राष्ट्रीय कर्ज खूप काही सांगून जातं.. तसे आर्थिक विषय बरेच आहेत, अनेक वेळा मनाच्या पातळीवर लिहिण्याचा विचार झालेला.... आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार... **'अर्थसंवाद'** च्या माध्यमातून... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे...* **फक्त एवढंच् करावं..**

- लेखकांनी आपला शोधनिबंध **Shree-Dev7-2336** या फॉन्टमध्ये **PageMaker 6.5** सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ **14** असावी. गरज असल्यास एखादा टेबल घ्यावा. लेखातील टेबलचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा.
- **PageMaker 6.5** या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. **MS-Word मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत.** आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# जागतिकीकरणाचा भारताच्या बाह्य क्षेत्रावरील परिणामांचा आढावा

एन. एल. चव्हाण, फैजपूर,
धनाजी नाना महाविद्यालय, जिल्हा जळगाव.
भ्रमणध्वनी:९४२०३४७०८७
इ-मेल. nlchavhan@rediffmail.com

जागतिकीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यात देशीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेत रुपांतरण होत. वस्तु व सेवा, भांडवल, तंत्रज्ञान, मानवी संसाधन यांचा प्रवाह एका देशातून दुसऱ्या देशात मुक्तपणे होत राहतो. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यातून आणि जागतिकीकरणाच्या माध्यमातून संपुर्ण जगाचे एक जागतिक खेड्यात (Global Village) रुपांतरण होते. जागतिकीकरणाच्या माध्यमातून संपूर्ण जगाची विकास गती गतिमान झाली आहे. जागतिकीकरणापासून अलिप्त राहुन आज जगातील कोणताही देश आपला आर्थिक विकास साध्य करु शकत नाही. भारताने १९९१ पासून आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला आहे. आर्थिक सुधारणांमध्ये खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण आणि बाजारीकरणाला प्राधान्य देण्यात आले आहे. आर्थिक सुधारणांच्या २२ वर्षाच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेने उल्लेखनिय कामागिरी केली आहे. या कामगिरीवर जागतिकीकरणाचा मोठा प्रभाव राहीला आहे.

## भारतीय अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाचे टप्पे:

भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरणाकडे पाऊल पडण्यास भारतावरील १९९० मधील आर्थिक संकट कारणीभूत ठरले आहे. आर्थिक संकटाचे निवारण करण्यासाठी भारताला जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्याकडून आर्थिक मदत घ्यावी लागली. मदत देतांना या दोन्ही संस्थांनी भारताला वित्तीय तुट कमी करणे, चलनवाढीचा दर नियंत्रित करणे, अर्थव्यवस्थेचे उदारीकरण करणे इत्यादी बाबत मार्गदर्शक सूचना केल्या. भारत सरकारने सुचनांचे पालन करण्यासाठी भारताने पुढील पाऊल उचलले.

१. रुपयाचे अवमूल्यनः सरकारने १ जुलै ते ४ जुलै १९९१ च्या दरम्यान भारतीय रुपयाचे प्रथम ८.७% ते ९.७% च्या दरम्यान आणि दुसरे ११.८३% ते १२.३१%

च्या दरम्यान असे २०.५३% ते २२.१% च्या दरम्यान अवमूल्यन केले. हे अवमूल्यन डॉलर, पौंड, मार्क, फ्रॅन्क आणि येन या प्रमुख चलनाच्या संदर्भात करण्यात आले.

२. रुपयाची चालू खात्यावरील अंशतः व पूर्णतः परिवर्तनियता: आर्थिक उदारीकरणाचा आणि निर्यात प्रोत्साहनाचा भाग म्हणुन भारत सरकारने १९९२-९३ च्या अंदाज पत्रकात रुपया चालू खात्यावर अंशतः परिवर्तनीय करण्याचा निर्णय घेतला. १९ ऑगस्ट १९९४ रोजी रुपया चालू खात्यावर पुर्णतः परिवर्तनिय करण्यात आला.

३. आयात उदारीकरण: उदारीकरणाच्या बाबत जागतिक बँकेने सुचित केले की, सरकारने केवळ एकच प्रतिबंधात्मक आयात वस्तुंची सूची तयार करावी. सरकारने आयातींवरील संख्यात्मक व जकात विषयक नियंत्रणे हटवावीत, नियंत्रणे कमी करावीत, या सुचनेनुसार सरकारने जकातीचे दर कमी केले.

४. व्यापाराशी संबंधित बौध्दिक संपदा अधिकार: जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार भारताने बौध्दिक संपदा अधिकार कायद्यात सुधारणा केली. सरकारने २००५ मध्ये उत्पादनावर आधारित सुधारित पेटंट कायदा संसदेत संमत केला.

५. व्यापाराशी संबंधित गुंतवणूक उपाय: जागतिकीकरण संदर्भात सरकारने मान्य केले की, देशी उद्योग आणि विदेशी उद्योग यांच्यात कोणताही भेद केला जाणार नाही.

६.विदेशी भांडवली गुंतवणूक आगमनाला सुविधा: सरकारने १९९१ पासून थेट विदेशी गुंतवणुकीवरील नियंत्रणे शिथिल केली. आज सट्टेबाजी व बिटींग, लॉटरी व्यवसाय, चीट फंड, निधी कंपनी, अणु ऊर्जा इत्यादी निर्बंधात्मक क्षेत्र वगळता रिझर्व्ह बँकेच्या स्वयंचलीत मार्गाने आणि सरकारच्या विदेशी गुंतवणूक बोर्डाच्या परवानगी मार्गाने ६२ पेक्षा ही अधिक उद्योग व सेवा क्षेत्रात १०% पासून ते १००% पर्यंत थेट विदेशी गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

७. निर्गुंतवणुकीकरण: खाजगीकरणाचा एक भाग म्हणून आणि जागतिकीकरणाची एक अट म्हणून भारत सरकारने नवीन आर्थिक धोरणात सार्वजनिक उपक्रमाचे निर्गुंतवणूक माध्यमातून खाजगीकरण करण्यास सुरुवात केली.

८. औद्योगिक परवाना धोरणात शिथिलता: सरकारने जुलै १९९१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले. त्यात परवाना राज रद्द करण्याबाबत सूचना देण्यात आल्या, परवाना धोरणात शिथितला आणण्यात आली.

९. वित्तीय क्षेत्रात व्यापक सुधारणा: या अंतर्गत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना स्वायत्तता प्रदान करण्यात आली. बँकींग वीमा क्षेत्रात गुंतवणूक करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

१०.नियंत्रणात्मक कायद्यांमध्ये सुधारणा: सरकारने १९६९ च्या MRTP Act मध्ये दुरुस्त्या केल्या. १९७३ चा FERA कायदा रद्द करुन त्याच्या जागी FEMA कायदा करण्यात आला आहे.

## जागतिकीकरणाचा भारताच्या बाह्य क्षेत्रावरील परिणाम:

जागतिकीकरणाचा स्विकार करुन आज २२ वर्ष झाली आहेत. जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रावर सकारात्मक व नकारात्मक प्रभाव होत आहेत. अनेक क्षेत्रांपैकी विदेशी व्यापार क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा आढावा पुढील प्रमाणे घेतला आहे.

१.जागतिक व्यापारातील वाटा: जागतिकीकरणापुर्वी १९९० मध्ये जागतिक निर्यात व्यापारात भारताचा वाटा ०.५% होता. तो २०००

मध्ये ०.७% पर्यंत वाढला. २०१० मध्ये १.५% आणि २०११ मध्ये १.७% पर्यंत वाढला. जागतिकीकरणाच्या २२ वर्षाच्या काळात भारताच्या निर्यात व्यापारात निश्चितच वाढ झाली, परंतु ही वाढ अत्यंत नगण्य आहे.

२.आयात निर्यात व्यापार मूल्यात वाढ: जागतिकीकरणामुळे भारताच्या विदेशी व्यापाराच्या कक्षा रुंदावल्या आहेत. १९९७-२००२ या नवव्या योजनेत आयात मुल्यात २०४७६३ कोटी रुपयांनी आणि निर्यात मुल्यात १६८४०० कोटी रुपयांनी वाढ झाली. २००२-२००७ या दहाव्या योजनेत हे मूल्य ५३०२११ कोटी रुपये आणि ३९०४०८ कोटी रुपयांनी वाढले, तर २००७-२०१२ या अकराव्या योजनेत ह्या मूल्यात ११७६१०९ कोटी रुपये व ९९२८३१ कोटी रुपयांनी वाढ झाली.

३. व्यापारतोलातील वाढती तुट:
जागतिकीकरणापूर्वीही आणि जागतिकीकरण काळात, ही नेहमीच निर्यात मूल्यापेक्षा आयात मूल्य जास्त राहिल्याने व्यापारतोलात तुट सातत्याने वाढत गेली. १९९२-१९९७ या आठव्या योजनेत व्यापारतोलतील एकूण तुट ११३५२ कोटी रुपये होती ती २००७-२०१२ या अकराव्या योजनेत २९१६०३० कोटी रुपयांपर्यंत वाढली १९९२-९३ च्या स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी व्यापारतोलाच्या तुटीचे प्रमाण १.३८% होते. ते २०११-१२ मध्ये १०.९०% पर्यंत वाढले. व्यापारतोलातील वाढती तूट ही समस्या जागतिकीकरणातून निर्माण झाली आहे.

४. अदृष्य प्राप्तीत वाढ: जागतिकीकरणाचा सकारात्मक परिणाम म्हणून भारतातून वाहतूक व दळणवळण, बँकींग व वीमा, पर्यटन व हॉटेल, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर, वैद्यकीय सेवा इत्यादी सेवांची निर्यात वाढली आहे. १९९३-९४ मध्ये सेवा निर्यातीपासून निव्वळ प्राप्ती २८९८ मिलीयन डॉलरची होती. २०११-१२ मध्ये १,११,६०४ मिलीयन डॉलर पर्यंत वाढली.

५. थेट विदेशी गुंतवणूक वाढ: सरकारच्या प्रोत्साहनात्मक धोरणाचा परिणाम म्हणुन भारतातील थेट विदेशी गुंतवणुकीच्या प्रवाहात वाढ झाली आहे. ऑगस्ट १९९१ ते जानेवारी २०१३ या काळात भारतात २९९५२२ मिलीयन डॉलर इतका थेट विदेशी गुंतवणुकीचा अंतप्रर्वाह आला.

६. पोर्टफोलीओ गुंतवणुकीत वाढ :- थेट विदेशी गुंतवणुकीबरोबर पोर्टफोलीओ गुंतवणूक अंतर्गत विदेशी संस्थात्मक गुंवतणुकीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. ऑगस्ट १९९१ ते जानेवारी २०१३ या काळात १५७७३१ मिलीयन डॉलरची विदेशी संस्थात्मक गुंतवणूक झाली.

७. विदेशी चलन साठ्यात वाढ: जागतिकीकरणाचा सर्वात जास्त सकारात्मक प्रभाव म्हणुन विदेशी चलन साठ्याकडे पाहिले जात आहे. जागतिकीकरणापुर्वी भारताकडे दोन आठवड्याच्या विदेश व्यापाराचे मूल्य देता येईल इतकाच विदेशी चलनाचा साठा होता. १९९१-९२ मध्ये तो ५६३१ मिलीयन डॉलर इतका होता. २०११-१२ मध्ये तो २६१६५६ मिलीयन डॉलर पर्यंत वाढला.

९. रुपयाच्या मूल्यात घसरण: जुलै १९९१ मध्ये जेव्हा रुपयाचे अनमूल्यन करण्यात आले तेव्हा विनिमय दर १ डॉलर = २४.४७ रुपये होता नंतरच्या काळात निर्यात मूल्यापेक्षा आयात मूल्य जास्त झाल्याने विनिमयासाठी डॉलरची मागणी

वाढत गेली. त्याचा परिणाम म्हणून रुपयाचे मूल्य घसरत गेले. १९९७-९८ मध्ये विनिमय दर १ डॉलर =३७.०७ रुपये होता नंतर १९९८-९९ ते २०११-१२ या काळात विनिमय दर १ डॉलर = ४२ रुपये ते ४८ रुपयाच्या दरम्यान कमी जास्त होत राहीला. २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये रुपयाच्या विनियम दरात मोठी घसरण झाली. ऑगस्ट २०१३ मध्ये विनियम दर १ डॉलर=६१ रुपये होता. जुलै १९९१ जे ऑगस्ट २०१३ या २२ वर्षाच्या काळात रुपयाच्या मूल्यात जवळ-जवळ १५०% नी घट झाली.

**१०. विदेशी कर्जे, उचल, अनुदानात वाढ:** जागतिकीकरणाच्या काळात भारताच्या विदेशी कर्ज, उचल, मदत, अनुदानात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. मार्च ११९२ मध्ये सर्व कर्जे ८५२८५ मिलीयन डॉलरची होती. ती सप्टेंबर २०१२ पर्यंत ३६५३१५ मिलीयन डॉलर पर्यंत वाढली.

**निष्कर्ष:**

२२ वर्षातील जागतिकीकरणाचा सकारात्मक परिणाम म्हणून भारताच्या व्यापार मूल्यात वाढ झाली, जागतिक व्यापारातील भारताच्या वाट्यात वाढ झाली, अदृष्य प्राप्तीत वाढ झाली, थेट विदेशी गुंतवणुकीच्या अंतर्प्रवाहात वाढ झाली, पोर्टफोलियो गुंतवणूक वाढली. सर्वात महत्वाचे म्हणजे निर्यात वस्तू व सेवांचे मूल्य, थेट विदेशी गुंतवणूक, पोर्टफोलीयो गुंतवणूक, विदेशी कर्जे इत्यादी कारणांनी भारतात विदेशी चलनाची आवक वाढली म्हणून विदेशी चलन साठ्यात लक्षणिय वाढ झाली. जागतिकीकरणाचा नकारात्मक परिणाम म्हणून व्यापारतोल व व्यवहारतोलाच्या चालू खात्यावरील तूट वाढली. आयातीत प्रचंड प्रमाणावर वाढ झाल्याने विनिमय दरात घसरण झाली.

**संदर्भ सूची:**


1. D.M. Mithani - *International Economics* - 6th Edt. 2010 Himalaya Publishing House, Mumbai.

2. Surinder Kumar Singla, Kulvindersingh - *Impact of Globalization : The Indian Experience*, Journal of Economics, Commerce and Research Vol. 2 Issue 1 June 2012-10-19.

3. Prakash Somalkar, *Impact of Globilzation of Indian Economy* Abhinav National Monthly Journal Vol. I Issue 8.

4. Tanver Malik - *Impact of Globalization on Indian Economy.* www.fibre2fashion.com

5. Chandrashekaran Balakrishnna - *Impact of Globalization of on Developing countries and India.* economic.about.com/od/

6. Wikipedia - Globalization in India. en.wikipedia.org.

7.Govt. of India - *Economic Survey* - 2012-13.

8. Datta, Mahajan - *Indian Economy (2012)* S. Chand & Co. New Delhi.

9. डॉ. एन.एल. चव्हाण - आंतरराष्ट्रीय व्यापार व व्यवहार(२०१३) प्रशान्त पब्लिकेशन्स्, जळगांव.

# ÷ब्रिक्स÷(BRICS) संघटना आणि विकास

डी.आर. बच्छाव, नाशिक,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
के.टी.एच.एम. कॉलेज, गंगापूर रोड,
भ्रमणध्वनी-०७५८८१७३८६२

जिम ओ÷नेईल यांनी २००१ मध्ये ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या चार उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या नावातील पहिले अक्षर घेऊन ÷ब्रिक÷(BRIC) हा शब्द तयार केला आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या क्षितिजावर एका प्रभावशाली समुहाचा उदय झाला. अलिकडेच या समुहामध्ये दक्षिण आफ्रिकेचा प्रवेश झाला आणि ÷ब्रिक÷चे रूपांतर ÷ब्रिक्स÷(BRICS) मध्ये झाले. त्यातूनच पुढे ÷चिंडिया÷(चीन आणि भारत) आणि ÷चिंडोनेशिया÷(चीन, भारत आणि इंडोनेशिया) या शब्दांचा जन्म झाला. खरे तर ÷ब्रिक्स÷चा उदय होण्यामागे कारणेदेखील तशीच होती. अनेक दशके संपूर्ण आर्थिक जगतात अमेरिकेची ताकद जाणवत होती. केवळ आर्थिक क्षेत्रच नव्हे, तर व्यापार आणि उद्योगांशी निगडित प्रत्येक क्षेत्रावर आणि संबंधित संस्थांवर अमेरिकेचेच वर्चस्व होते. पण हळू हळू परिस्थिती पालटली आणि ÷ब्रिक्स÷च्या स्वरूपात पर्यायी सत्ताकेंद्र आकाराला आले आहे.

या पार्श्वभूमीवर अलीकडेच दक्षिण आफ्रिकेतील डर्बनमध्ये ÷ब्रिक्स÷देशांची पाचवी शिखर परिषद पार पडली आणि या परिषदेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. जागतिक अर्थव्यवस्थेचे केंद्र आता बहुकेंद्री झाले असून, यामध्ये ÷ब्रिक्स÷महत्त्वाची भूमिका बजावेल. परंतु त्यासाठी या देशातील पायाभूत सुविधांच्या विकासाला आर्थिक पाठबळ मिळणे आवश्यक आहे, असा सूर या परिषदेत व्यक्त झाला. मात्र त्यासाठी कोणत्याही आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थेवर अवलंबून राहण्यापेक्षा ÷ब्रिक्स विकास बँक÷स्थापन करण्याचा संकल्प परिषदेत सोडला गेला. जगाचे नेतृत्त्व करण्याची क्षमता असलेल्या ÷ब्रिक्स÷देशांना अमेरिका आणि युरोपीय समुदायाच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीवरील अवलंबित्त्व कमी करून स्वयंनिर्भर होणे गरजेचे होते. त्या दृष्टीने ÷ब्रिक्स विकास बँक÷हे महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

वरील सर्व पार्श्वभूमीचा विचार करता, भारतात मात्र नवीन बँकिंग विधेयकामुळे सहकारी तसेच राष्ट्रीयीकृत बँकांवरील नियंत्रणे कडक होणार आहेत कारण सन २००५ पासून लोकसभेपुढे प्रलंबित असलेले आणि १४ व्या लोकसभेची मुदत संपल्याने पुन्हा एकदा १५ व्या लोकसभेपुढे नव्या स्वरूपात सादर केलेले बहुचर्चित बँकिंग कायदा दुरूस्ती विद्येयक नुकतेच लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाले व त्याच कालावधीत बँकिंगच्या संदर्भात जागतिक अर्थव्यवस्थेच्या क्षितिजावर वेगाने उदयास येत असलेल्या ब्राझिल, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या ÷ब्रिक्स÷समुहाने जागतिक बँकेच्या धर्तीवर ÷ब्रिक्स डेव्हलपमेंट बँक÷(BRICS Development Bank) स्थापण्याचा निर्णय घेतला असून, ÷ब्रिक्स÷देशांच्या अर्थमंत्र्यांच्या परिषदेत ह्या विषयावर शिक्कामोर्तब करण्यात आले. हा तसा योगायोगच म्हटला पाहिजे की त्याचवेळी भारतात बँकिंगमध्ये नव्या पर्वाला सुरूवात होऊन नवीन बँकिंग विद्येयक देखील लोकसभेत मंजूर करण्यात आले. जगाचे नेतृत्त्व करण्याची क्षमता असलेल्या ÷ब्रिक्स÷देशातील पायाभूत सुविधांच्या विकासाला आर्थिक पाठबळ पूरविण्यासाठी ÷ब्रिक्स डेव्हलपमेंट बँक÷स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, ÷ब्रिक्स÷नेत्याच्या शिखर परिषदेत याची ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या अर्थमंत्र्याच्या परिषदेत ब्रिक्स बँक स्थापन करण्यावर एकमत झाले त्यासाठी दक्षिण आफ्रिकेचे अर्थमंत्री प्रवीण गोर्धन यांनी सांगितले की, अमेरिका आणि युरोपीय समुदायाच्या वर्चस्वावरील जागतिक बँकेवरील अवलंबित्त्व कमी करून ÷ब्रिक्स÷ची क्षमतावृद्धी व कार्यतत्परता, वाढविण्यासाठी ÷ब्रिक्स÷ची निर्मिती करण्यात आल्याचे गोर्धन यांनी नमूद केले. अशा ह्या बँकेचे स्वरूप सर्वसाधारणपणे असे असेल.

१.प्रस्तावित बँकेत प्रत्येक सदस्य देशांकडून भागभांडवल म्हणून १० अब्ज डॉलरची गुंतवणूक असेल.

२.विकसनशील देशांतील पायाभूत सुविधांत गुंतवणूक केली जाणार.

३.÷ब्रिक्स÷देशांना करन्सी स्वॅप करण्याची सोय उपलब्ध होणार.

४.जागतिक जीडीपीच्या तुलनेत ÷ब्रिक्स÷चा वाटा २५ टक्के असेल.

५.एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के लोकसंख्या ÷ब्रिक्स÷देशातील आहे. याचा लाभ ह्या देशांना अधिक असेल.

÷ब्रिक्स÷समुहामध्ये सामील असलेल्या पाचही देशांचा सर्वसाधारणपणे देशांमधील सहकार्य वाढीला, थेट परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचा हेतू नमूद करण्यात आला आहे. विकसनशील देशांमधील सहकार्य वाढवितानाच बहुध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करणे, जागतिक बँक (World Bank) आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) सारख्या वित्तीय संस्थाच्या नेतृत्वाची रचना बदलणे, विकसनशील देशांमधील उत्पादने अमेरिका व युरोपातील बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यापर्यंतचे अडथळे कमी करणे इत्यादी विविध उद्दिष्टे व कार्यपद्धती गृहित धरूनच ÷ब्रिक्स÷कडे पाहिले जाते अशा ह्या पाचही देशांचा २०१२ मधील जीडीपी (GDP) पुढीलप्रमाणे आहे.

### ÷ब्रिक्स÷देशांचा २०१२ मधील जीडीपी

(अब्ज डॉलर)

| क्र. | समाविष्ट देश | जीडीपी |
|---|---|---|
| १ | ब्राझील | २४७६.६५ |
| २ | रशिया | १८५७.७७ |
| ३ | भारत | १८४७.९८ |
| ४ | चीन | ७२९८.१० |
| ५ | दक्षिण आफ्रिका | ४०८.२२ |

### ÷ब्रिक्स÷संघटना आणि आर्थिक विकास

जागतिक बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी तसेच अशियाई विकास बँक यांना ÷ब्रिक्स÷चा निर्मितीपर्यंत जगातील विविध विकसनशील तसेच विकसित देशांना पायाभूत तसेच विविध क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी भरीव मदत केली. परंतु ÷ब्रिक्स÷च्या स्थापनेनंतर येत्या काही दशकांमध्ये ÷ब्रिक्स÷देशांच्या अर्थव्यवस्था वेगाने विकसित होत असून त्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये न्याय्य स्थान मिळावे या उद्देशाने ÷ब्रिक्स÷ही संघटना ÷ब्रिक्स÷समूहातील देशाच्या विकासासाठी विशेषतः मूलभूत सोयीसूविधा उपलब्ध करून देण्यावर भर देत आहे. तसेच समूहाव्यतिरिक्त इतर देशांच्या विकासासाठी देखील हातभार लावला जात आहे. जागतिक महामंदीच्या काळात अमेरिका तसेच इतर युरोपातील व्यवस्थांवरील आर्थिक संकटे आली त्यामुळे ह्या दोन देशांच्या अर्थव्यवस्था घसरणीला लागल्या म्हणजेच अर्थव्यवस्थेची प्रगती चालु ठेवण्यात हे देश सक्षम ठरू शकले नाहीत. त्यामानाने ब्राझील, रशिया, भारत व चीन देशांच्या अर्थव्यवस्था तुलनेत सक्षम आणि अतिशय योग्य होत्या हे आपणास त्याच्या जीडीपी वरून दिसून येईल.

त्या दृष्टीने १६ जून २००९ रोजी ह्या ४ देशांची पहिली परिषद झाली त्यानंतर चीनमध्ये २०११ मध्ये झालेल्या तिसऱ्या परिषदेमध्ये ह्या संघटनेत दक्षिण आफ्रिकेचाही समावेश झाला त्यामुळेच ही संघटना ÷ब्रिक्स÷म्हणून ओळखली जाऊ लागली व ह्या ÷ब्रिक्स÷संघटनेने ÷ब्रिक्स÷समूह तसेच उर्वरित देशांच्या आर्थिक विकासासाठी वित्तीय मदत देऊन शाश्वत बदल केला आहे.

### ब्रिक्स आणि बँकिंगमधील नवे पर्व:

१९९१ च्या उदारीकरणाच्या पहिल्या पर्वानंतर बँकिंग दुरूस्ती विधेयक २०११ हे बँकिंग क्षेत्रासाठी सर्वात महत्त्वाचे पाऊल होय. यामुळे ÷ब्रिक्स÷ची निर्मिती झाली त्यानुसार देशी-विदेशी गुंतवणूक वाढणार आहे अशा ह्या बँकिंग स्पर्धेत नवीन बँकांच्या निर्मितीतील वाव असून विविध देशातील देशांअंतर्गत बँकांना ह्याचा लाभ होणार आहे. भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांनाही ह्याचा फायदा होणार आहे यामुळे भविष्यकाळात खाजगी गुंतवणूक वाढेल तसे झाल्यास त्या प्रमाणात जास्त कर्ज वाटप करता येईल त्याचा लाभ भारतातील ग्रामीण तसेच शहरातील मध्यमवर्गीयांना होऊ शकेल कारण भारतात अद्यापही हजारो गावातील निम्म्या लोकसंख्येपर्यंत बँकिंग सेवा पोहोचलेल्याच नाहीत त्यामुळे सावकारांचे फावते आहे. त्यादृष्टीने ÷ब्रिक्स÷च्या माध्यमातून भारत, ब्राझील, रशिया, चीन व दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला हातभार लागून दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होऊ शकेल. भारतासारख्या विकसनशील देशाला ÷ब्रिक्स÷ची गरज होती कारण खाजगी बँका तसेच विदेशी बँका आल्या की, अंधाधुंदी माजते हे तसे भारतीय पुढाऱ्यांचे प्रचारी

विधान आहे. सहकारी वा सरकारी बँका व पतपेढ्यांमध्ये भ्रष्टाचार होतो शिवाय बँकिंगमध्ये सरकार स्वत: किती भांडवलाची गुंतवणूक करते यास देखील मर्यादा आहेत. युरोप-अमेरिकेत बँका, विमा कंपन्या कोसळल्या पण भारतात रिझर्व्ह बँकेने वाय्.व्ही. रेड्डींच्या काळात योग्य ती काळजी घेतली होती व भारतातील विद्यमान गव्हर्नर सुब्बाराव देखील अर्थखात्याच्या दबावास भीक न घालता स्वतंत्रपणे काम करत आहे. त्याचा फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला झाला आहे. त्यामुळेच कदाचित ÷ब्रिक्स÷मध्ये भारताला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे हे नाकारता येणार नाही. म्हणजेच ÷ब्रिक्स÷बँकेत भारताची प्रतिमा आगदी नितळ आहे हे निर्विवाद सत्य इतर सहयोगी देश नाकारत नाहीत. शीतयुद्धाच्या शेवटानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचा आणि पश्चिम युरोपातील देशांचा वरचष्मा निर्माण झाला. सोव्हिएत महासंघाच्या विघटनानंतर निर्माण झालेला रशियाही आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता मात्र त्यानंतरच्या दहा वर्षानंतर परिस्थिती वेगाने बदलली ह्या ÷ब्रिक्स÷मध्ये सहयोगी पाचही देशांच्या अर्थव्यवस्थांची व्याप्ती वाढतच गेली, त्यातच जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ह्यासारख्या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था अमेरिका व युरोपीय देशांच्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यवस्थेमध्ये, विशेषत: सुरक्षा परिषदेचीही रचना वाढविण्यासाठी दबाव वाढत आहे. त्यामुळे अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला ÷ब्रिक्स÷देशांकडून आव्हान मिळू लागले आहे. कारण ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच देशांची लोकसंख्या सुमारे तीन अब्ज असून, (जगाच्या लोकसंख्येच्या ४० टक्के) आहे. पाचही देशांचा एकत्रित देशांतर्गत उत्पादन जीडीपी अंदाजे जगाच्या २५% टक्के असून या देशांकडून परकीय चलनाची गंगाजळी तब्बल जगाच्या ३५ टक्क्यांपर्यंत आहे.

**सारांश:** ÷ब्रिक्स÷देशांमधील सहकार्य वाढविताना, थेट परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, विकसनशील देशांमधील सहकार्य वाढवितानाच, बहुध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करणे त्यामुळे कोणत्याही एका देशाचे वर्चस्व जगावर राहणार नाही. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सारख्या वित्तीय संस्थांच्या नेतृत्वाची रचना बदलणे, विकसनशील देशांमधील उत्पादने अमेरिका व युरोपातील बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यापर्यंतचे अडथळे कमी करणे होय.

**संदर्भ सूची:**


1) *Banking Law and Pratice*, Mishra Sukhwindar, S. Chand & Co., Delhi.
2) *Introduction of Banking*, Mishra & Puri, Vidya Publishing House, Aurangabad.
3) *Indian Banking System*, Mukund Mahajan, Nirali Publications, Pune.



हे त्रैमासिक डॉ. अनिल सूर्यवंशी (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजी नगर, बार्शी- ४१३ ४११, जिल्हा सोलापूर येथे प्रसिध्द केले.

# अर्थ शब्दांची वाट पाहे : वर्तनार्थशास्त्र


**ज. फा. पाटील, कोल्हापूर**
विश्वस्त व माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२


**वर्तनार्थशास्त्र (Behavioral Economics):**

लॉर्ड लिओनेल रॉबिन्स यांची *'अर्थशास्त्राचा संबंध मूल्यनिर्णयांशी (Value Judgement) नाही'* ही भूमिका फार मोठ्या प्रमाणात आता बदलण्याची गरज आहे असे वाटते. २००१ पासूनच रॉबर्ट नेल्सन यांच्या एका ग्रंथाच्या प्रकाशनापासून अर्थशास्त्रीय विचार पध्दती एक धर्म झाली आहे हा विचार बळावत गेला. नेल्सन यांच्या मते आर्थिक धोरणासाठी शास्त्रीय आधार घेतानाही अर्थशास्त्रज्ञ पूर्णत: मूल्य-निरपेक्ष किंवा मूल्य-विरहित होऊ शकत नाहीत. अन्याय, अशांतता, विषमता, सामाजिक अस्थैर्य, राजकीय डावपेच अशा गोष्टींचाही परिणाम आर्थिक घटितावर होत असतो. त्यांच्या मागची कारण परंपराही आर्थिक धोरणावर परिणाम करते. नेल्सन यांच्या मते उपरोक्त कारणाने अर्थशास्त्रीय विचार पध्दतीतही मूल्य-संदर्भ प्रच्छन्न असतात. याच प्रकारचे विश्लेषण जर्नल ऑफ इकॉनॉमिक परस्पेक्टिव्ह या जर्नलमध्ये डॅरान एसमोग्लू व जेम्स रॉबिन्सन यांच्या निबंधात केलेले आढळते. आर्थिक निर्णयामागे मोठ्या प्रमाणात मूल्यांचा प्रभाव असतो अशी त्यांची दृढ धारणा आहे. मार्क बुकॅनन यांच्या मते, म्हणूनच अर्थशास्त्रीय विश्लेषणात मानसशास्त्रीय, वर्तनवादी दृष्टिकोनाचा प्रभाव पडणे अपरिहार्य आहे. अशा आर्थिक विश्लेषणाला मूल्यभारीत अर्थशास्त्र म्हणणे योग्य होईल. त्या अर्थाने बिहेव्हिरल इकॉनॉमिक्स यासाठी मराठीत 'वर्तनार्थशास्त्र' असा प्रतिशब्द वापरणे योग्य ठरेल.


संदर्भ: मार्क बुकॅनन-*इकॉनॉमिस्ट्स् आर यू सायंटिस्टस् ऑफ बिलिव्हर्स?* इकॉनॉमिक टाईम्स, जुलै २०१३.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

# सदतिसावे राष्ट्रीय अधिवेशन
# चांदूरबाजार ऐवजी अमरावती शहरात

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सदतिसावे वार्षिक अधिवेशन पिपल्स वेल्फेअर सोसायटी अमरावती संचलित कै.नारायणराव अमृतराव देशमुख महाविद्यालय, चांदूर बाजार यांच्या तर्फे अमरावती शहरात २२, २३ व २४ नोव्हेंबर २०१३ या कालावधीत आयोजित केले आहे. अधिवेशन स्थळ अमरावती शहरातील संगीतसूर्य केशवराव भोसले सभागृह, शासकीय विदर्भ ज्ञानविज्ञान संस्था परिसर वि.म.वि. रोड, कठोरा नाका हे आहे. सातारा येथील डॉ.जगन्नाथ पाटील हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनाच्या संयोजकाकडून परिषदेच्या सदस्यांना निमंत्रण व माहिती पत्रक पाठविले आहेत. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.९५०/- आहे. जे परिषदेचे सदस्य नाहीत त्यांना साधारण सदस्य शुल्क रु.३००/- अतिरिक्त भरून सहभागी होता येईल. विद्यार्थ्यांकडून रु.५००/- शुल्क आकारण्यात येईल. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय यापूर्वीच निश्चित करण्यात आले आहेत.

१) मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात विषमता आणि दारिद्र्य याबाबत सैध्दान्तिक विवेचन.

२) विदेशी गुंतवणुकीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम.

३) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ: सद्यस्थिती व भवितव्य.

आयत्या वेळेचा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेच्या मा.अध्यक्षांनी अधिवेशनापूर्वीच जाहीर केला आहे. आयत्या वेळेच्या (चौथ्या) विषयासाठी पेपर मागविले जात नाहीत.

**आयत्या वेळेचा विषय: उर्जेचे अर्थशास्त्र-धोरण, समस्या व उपाय**

परिषदेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

डॉ. जगन्नाथ पाटील,
अध्यक्ष

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष

प्राचार्य सुरेश देशमुख,
स्थानिक कार्याध्यक्ष

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह-खजिनदार

डॉ.वनिता चोरे,
स्थानिक कार्यवाह

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# अर्थ शब्दांची वाट पाहे

*ज. फा. पाटील यांच्या Fiscal Cliff बाबत नि. भा. सप्रे यांची प्रतिक्रिया त्यांच्याच शब्दात देत आहोत.*

*-प्रमुख संपादक*

---

## Fiscal Cliff

*डॉ. ज. फा. पाटील यांनी **जानेवारी-मार्च, २०१३** या अर्थसंवादात Fiscal Cliff याचा मराठी अनुवाद राजवित्तीय कडा असा दिलेला आहे. त्याबद्दल थोडे...*

डॉ. पाटील यांनी अमेरिकन अर्थव्यवस्था टोकाची बिघडलेली व काही उपाय केले नसता कडेलोट झाली असती अशा चर्चेला मान्यता दिली आहे. या परिस्थितीला ते Fiscal Cliff असे म्हणतात.

प्रत्यक्षात Fiscal Cliff याचा अर्थ निराळाच आहे. अमेरिकन अर्थकारण व राजकारण हे एका विशिष्ट द्विपक्षीय एकत्रिकरण व विभाजन अशा संबंधातून साकारले आहे. काही बाबत द्विपक्षीय एकत्रिकरण तर काही बाबत पूर्ण विभाजन असे आहे.

राजवित्तीय किंवा अंदाजपत्रकीय तत्त्वांचा विचार केला तर डेमोक्रॅटिक व रिपब्लिकन पक्षात पुर्ण विभाजन आहे. डेमोक्रॅटिक पक्षाला म्हणजेच प्रे. ओबामा यांना अंदाजपत्रक खर्चात वाढ, काही करात वाढ व कर्ज-मर्यादा वाढ या तत्त्वावर सादर करावयाचे असते. या उलट रिपब्लिकन पक्षाला खर्चात कपात, करात वाढ नाही व कर्ज - मर्यादा वाढ नाही अशीच अंदाजपत्रके मान्य आहेत. प्रे. ओबामा यांना या तत्त्वाच्या विरोधातून मार्ग काढावयाचा आहे. तो कठीण व चढणीचा आहे. याला Fiscal Cliff असे म्हणतात, टोकाच्या परिस्थितीला नव्हे.

स्वतंत्रपणे किंवा शब्दकोशीयपणे Cliff याचा अर्थ कडा होतो. तो बरोबर आहे, पण Fiscal Cliff मध्ये तो संदर्भामुळे बदलतो. त्यात Opposition, Unable to move किंवा contest या अर्थाचा समावेश होतो. Cliff मध्ये हे सर्व अर्थ येतात. राजवित्तीय कडा असा अनुवाद हे अर्थ दर्शवीत नाही, म्हणून Fiscal Cliff चा बराचसा जवळचा अनुवाद "राजवित्तीय रोधकता" असा देता येईल.

प्रा. पाटिल यांनी शोध-मासिकात प्राथमिक स्वरुपाचे (Fisc, Fiscal) अर्थ सांगणे बरोबर नाही.

- नी. भा. सप्रे

# अर्थ शब्दांची वाट पाहे

*नी. भा. सप्रे यांच्या Fiscal Cliff बाबतच्या प्रतिक्रियेसंदर्भात लेखक ज.फा.पाटील यांचे मनोगत त्यांच्याच शब्दात देत आहोत.*

*-प्रमुख संपादक*

---

दि.५/९/२०१३

प्रा.डॉ.नि.भा.सप्रे (पुणे) यांचे 'अर्थ शब्दांची वाट पाहे' या संबंधातील टिपण मिळाले. त्यांच्या सारख्या ज्येष्ठतम प्राध्यापकाने संबंधित टिपणाची नोंद घेऊन प्रतिसाद कळविला ही मला व अर्थसंवादला आनंद देणारी व अभिमान वाटणारी गोष्ट आहे. आज शिक्षकदिनानिमित्त त्यांना सादर नमस्कार.

'अर्थ शब्दांची वाट पाहे' या सदराचा हेतू विशिष्ट अर्थासाठी शब्द सूचविणे हा आहे. पण मूळ नवअनुभूतीसाठी शब्द सूचविणे व इंग्रजीतील नव्या शब्दास किंवा शब्द रचनेस प्रतिशब्द देणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. प्रा.सप्रे यांनी त्यांना Fiscal Cliff या शब्द रचनेचा जो अर्थ भावला त्याला 'राजवित्तीय रोधकता' असा शब्द दिला आहे. मी मला भावलेला अर्थ लक्षात घेवून 'राजवित्तीय कडा' असा शब्द दिला आहे. सुदैवाने Fisc, Fiscal ते Fiscal Cliff या अर्थाने 'राजवित्तीय' हा शब्द त्यांनीही वापरला आहे. प्रश्न राहिला तो Cliff या शब्दाच्या अर्थाबद्दल व त्याला मराठी शब्द देण्याचा. वस्तुत: चढ चढताना (Climbing a slope) रोधकता जाणवते. चढाच्या टोकाला (आर्थिक अरिष्टामध्ये) पुढे कडेलोट असतो. अशा वेळी समन्वयाचे धोरण, कडेलोट होणार नाही तसेच घसरगुंडी होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. नजर फिरणार नाही, भोंवळ येणार नाही, तोल सांभाळला जावा हे लक्षात येण्यासाठी कडेलोटाचा टप्पा जाणवणे महत्त्वाचे म्हणून 'कडा' हा शब्द - शब्दाचा अर्थ स्पष्ट करणे व अर्थासाठी शब्द देणे व तेही सोप्या पध्दतीने हे परिभाषा विकासाची गरज व जबाबदारी आहे. मी पूर्वी दिलेले टिप्पण ही भूमिका 'अर्थसंवाद' या शोध त्रैमासिकासाठी देत आहे. कृपया 'अर्थसंवाद'च्या येत्या अंकात हे पत्र प्रसिध्द करावे ही नम्र विनंती. कळावे.

आपला स्नेहांकित

- डॉ. ज. फा. पाटील.

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.अनिल सूर्यवंशी, गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.अनिल सूर्यवंशी |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, .शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११, जिल्हा-सोलापूर. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी अनिल सूर्यवंशी असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.अनिल सूर्यवंशी,
मुद्रक व प्रकाशक







**Accredited by NAAC with "B" Grade**

**Affiliated to SantGadge Baba Amravati University**

*Salient Features*

- *Highly Qualified and Dedicated Faculty*
- *Provision of Higher Education to Rural Students at Affordable Fees*
- *Innovative Practices for students*
- *Deep Commitment to Society Through Extension Activities*
- *Glorious Achievements in Academic and Sports*


Principal S. N. Deshmukh

WEBSITE : www.nadm.org MAIL: nadm143@yahoo.com PH.: 07227244479